टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत

‘इतिहास’ विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)

पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

# “महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास”
# (सन १९६० ते सन २०१०)


संशोधक

श्री. सुदिन पोपट गायकवाड

बी. एस्सी. (कृषी), एल. एल. बी., एम. ए.

मार्गदर्शक

डॉ. दीपक गोविंद देशपांडे

प्राचार्य, बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी,

ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)


## ऑगस्ट २०१४

# * मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र *

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पदव्युत्तर इतिहास विभाग, तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत ‘इतिहास’ या विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी श्री. सुदिन पोपट गायकवाड यांनी ‘महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)’या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. सदर माहिती त्यांनी इतरत्र कोठेही वापरलेली नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (U.G.C.) २००९ च्या नवीन नियमाला अनुसरुन सदर प्रबंधाचे काम केले आहे.

मार्गदर्शक
डॉ. दीपक गोविंद देशपांडे
प्राचार्य, बाबासाहेब चितळे महाविद्यालय,
भिलवडी, ता. पलूस, जि. सांगली

स्थळ: पुणे
दिनांक: ऑगस्ट २०१४

# C E R T I F I C A T E

This is to certify that the thesis entitled, "महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)" submitted by Mr. Sudin Popat Gaikwad to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of Philosophy (Ph.D.) is a bonafide record of the research work carried out by him under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Further more, in accordance with the UGC rules 2009 that govern the Ph.D. student, the student has completed the due process that includes Entrance Examination, Interview and Pre-submission viva.

Place : Pune (Dr.Deepak Govind Deshpande)
Date : August 2014 Research Guide

# * प्रतिज्ञापत्र *

मी, श्री. सुदिन पोपट गायकवाड जाहिर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत 'इतिहास' या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) शिक्षणक्रमासाठी सादर केलेल्या 'महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)'हा माझा स्वत:चा शोध प्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

स्थळ: पुणे

दिनांक: ऑगस्ट २०१४

संशोधक विद्यार्थी

गायकवाड सुदिन पोपट

# * ऋणनिर्देश *

"महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)" या प्रबंधाच्या कार्यसिध्दीसाठी अनेक मान्यवर व्यक्ती व संस्था यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले. त्यांच्या ऋणनिर्देश या ठिकाणी मी करीत आहे. प्रा. विजय कारेकर (माजी अधिष्ठाता), डॉ. श्रीकात कार्लेकर,(अधिष्ठाता) तात्विक व सामाजिक शास्त्र, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे व डॉ. श्रध्दा कुंभोजकर (माजी इतिहास विभाग प्रमुख), डॉ. संध्या पंडीत,( इतिहास विभाग प्रमुख) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांनी प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यास परवानगी देऊन मला उपकृत केले त्या बद्दल त्यांना मन:पूर्वक धन्यवाद.

सर्वात महत्वाचे म्हणजे या प्रबंधास मूर्तस्वरुप येण्यास ज्यांचे बहुमोल मार्गदर्शन उपयोगी ठरले ते माझे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. दीपक देशपांडे यांचे ऋण मी शब्दात व्यक्त करु शकत नाही. त्यांनी अत्यंत आपुलकीने, निरपेक्षवृत्तीने आणि त्याचबरोबर परखडपणे मला मार्गदर्शन केले. त्यामुळे या ठिकाणी त्यांचे ऋण मानणे माझे कर्तव्य समजतो. तसेच सरांचे बंधू व सरांचे कुटूंबीय यांनी मला वेळोवेळी आपुलकीने वागविले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी राहीन.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे ग्रंथपाल व इतर कर्मचारी व मुंबई विद्यापीठ, वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी प्रशिक्षण संस्था, पुणे, कामगार आयुक्त कार्यालयाचे ग्रंथापाल, कै. ना. मे. लोखंडे श्रमविज्ञान संस्था, मुंबईचे ग्रंथपाल व कर्मचारी वर्ग यांनी प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यक ते संदर्भग्रंथ, नियतकालिके, कात्रणे, लेख उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

महाराष्ट्र राज्याच्या कामगार विभागाचे मंत्री मा. श्री. हसन मुश्रीफ आणि राज्यमंत्री श्री. राजेंद्र गावित, माथाडी कामगार चळवळीचे नेते डॉ. बाबा आढाव, डॉ. हरिष धुरट,श्री. राजकुमार घायाळ यांनी सदर प्रबंध तयार करण्यासाठी उपयुक्त माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्दल त्यांचे मी ऋण व्यक्त करतो.

महाराष्ट्र राज्याच्या कामगार विभागाच्या माजी प्रधान सचिव डॉ. कविता गुप्ता, माजी कामगार आयुक्त श्री. मधुकर गायकवाड, उपसचिव श्री. आनंद आस्वले, अप्पर कामगार आयुक्त

श्री. दिलीप बोथरे, श्री. दिनकर पगार, श्री. र. वि. कुलकर्णी, श्री. ल. रा. लाकसवार, उपकामगार आयुक्त डॉ. ए. डी. पाटील, श्री. रा. भा. जाधव, श्रीमती सुरेखा जाधव, सहाय्यक कामगार आयुक्त श्री. विश्वास जाधव, श्री. पाटणकर, श्री. विकास पनवेलकर, श्री. संभाजी मोरे, श्री. आंधळे, कै. ना. मे. लोखंडे, श्रमविज्ञान संस्था, मुंबईचे संचालक डॉ. राजन तुंगारे, डॉ. शशिकांत लोखंडे, श्री. पोपटराव पवार तसेच कामगार आयुक्त कार्यालयातील सर्व उपकामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी तसेच सांगली माथाडी मंडळातील शिपाई श्री. पाटील आणि इतर सहकारी यांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल मी मनापासून त्यांचे आभार मानतो. मंत्रालयातील कामगार विभागातील माथाडी कक्ष, असंघटित कामगार कक्ष, कामगार–८ या कार्यासनातील तसेच विभागातील माझे सर्व सहकारी यांचे मी मनापासून आभार मानतो. त्याचबरोबर माथाडी कामगार व मालक ज्यांनी मुलाखतीसाठी आपला बहुमुल्य वेळ दिला आणि आपुलकीने सविस्तर माहिती दिली त्यांचेही आभार मानतो. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील माझे सर्व अधिकारी व सहकारी यांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सर्वात महत्वाचे ऋण म्हणजे माझे आई–वडील व माझे गुरुजन आणि माझे प्रेरणास्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेशिवाय सदर संशोधन पूर्ण करणे अशक्य होते. विशेषत: माझी आई जिने स्वत: निरक्षर असूनही मला घडविले या सर्वांच्या मी ऋणात राहू इच्छितो. माझ्या या प्रबंधाच्या कामास माझी पत्नी सौ. सुवर्णा गायकवाड व मुलगा आदित्य तसेच इतर सर्व कुटुंबिय यांचे मनापासून सर्वोतोपरी सहकार्य लाभले.

या संशोधन अहवालासाठी सुभाष बाबुराव कुल कला महाविद्यालयाचे प्रा. नंदकुमार जाधव तसेच सदर प्रबंधासाठी अक्षर जुळणी व आकर्षक मांडणी करुन दिल्याबद्दल गुरुकृपा ऑफसेट प्रिंटर्स व इतर सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सुदिन पोपट गायकवाड
संशोधक

# * अनुक्रमणिका *


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मुखपृष्ठ<br>मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र<br>प्रमाणपत्र<br>प्रतिज्ञापत्र<br>ऋणनिर्देश<br>अनुक्रमणिका | |
| प्रकरण पहिले | **महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळ– पार्श्वभूमी व संशोधन पध्दती**<br>१.१ प्रस्तावना<br>१.१.१. पार्श्वभूमी<br>१.१.२. कामगार आणि कामगार कायदे<br>१.२ संशोधनाचा विषय<br>१.३ संशोधनाचे महत्त्व<br>१.४ संशोधनाची गृहितके<br>१.५ संशोधनाच्या व्याप्ती व मर्यादा<br>१.६ सैधांतिक पार्श्वभूमी<br>१.७ इतिहास संशोधनाचे प्रकार<br>१.७.१ कथनात्मक किंवा निवेदनात्मक संशोधन<br>१.७.२ विश्लेषणात्मक संशोधन<br>१.७.३ मूलगामी संशोधन<br>१.७.४ इतिहासाचे पुनर्लेखन<br>१.७.५ माथाडी कामगार चळवळ कथनात्मक व विश्लेषणात्मक चळवळ<br>१.८ संशोधन विषयासंदर्भातील प्राथमिक व दुय्यम साधन सामग्री<br>१.८.१ आजपर्यंतचे झालेले संशोधन कार्य<br>१.८.२ इतर प्राथमिक व दुय्यम संदर्भ साहित्य<br>१.९ संशोधन विषयाची प्रकरणानुसार विभागणी<br>प्रकरण १ महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळ– पार्श्वभूमी व संशोधन पध्दती<br>प्रकरण २ कामगार चळवळीचा उदय आणि महाराष्ट्रातील | १–४६ |

| | | |
|---|---|---|
| | माथाडी कामगार चळवळीची वाटचाल<br><br>प्रकरण ३ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची निर्मिती व अंमलबजावणी<br>प्रकरण ४ माथाडी कामगार चळवळीचा माथाडी कामगार आणि मालक व शासन यांचेमधील परस्पर संबंधावरील परिणाम<br>प्रकरण ५ मान्यवरांच्या नजरेतून माथाडी कामगार चळवळीची वाटचाल व भवितव्य<br>प्रकरण ६ समारोप<br>१.१० महाराष्ट्रातील माथाडी कामगारांची तत्कालीन स्थिती<br>१.१०.१ माथाडी कामगारांची तत्कालीन सामाजिक व आर्थिक परिस्थिती<br>१.१०.२ माथाडी कामगारांचे प्रकार<br>१.१०.३ माथाडी कामगारांचे सर्वसाधारण जीवनमान<br>१.१०.४ माथाडी कामगारांचे आरोग्य<br>१.१०.५ माथाडी कामगारांच्या निवृत्तीनंतरचा काळ<br>१.११ माथाडी कामगार चळवळ आणि महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ अंमलबजावणीचा संक्षिप्त आढावा<br>१.११.१ अंमलबजावणीचा आढावा<br>१.११.२ महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची व्याप्ती<br>१.११.३ माथाडी मंडळाची स्थापना<br>१.११.४ माथाडी कामगारांना सद्यस्थितीत मिळणारे फायदे<br>१.११.५ माथाडी मंडळाची सद्यस्थिती<br>१.११.६ माथाडी कामगारांच्या संदर्भात अलिकडील काळात घेण्यात आलेले निर्णय<br>१.१२ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ च्या अंमलबजावणीचा कालानुक्रमे संक्षिप्त तपशील<br>१.१२.१ सन १९६०–७० चा कालावधी–माथाडी कायद्याची निर्मिती<br>१.१२.२ सन १९७०–८० चे दशक | |

| | | |
|---|---|---|
| | १.१२.३ सन १९८०–९० चे दशक<br>१.१२.४ सन १९९०–२००० चे दशक व त्यानंतरचा कालावधी<br>१.१२.५ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ मधील प्रमुख सुधारणा<br><br>संदर्भ सूची | ४१–४६ |
| प्रकरण दुसरे | **कामगार चळवळीचा उदय आणि महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीची वाटचाल**<br>२.१ प्रास्ताविक–कामगार चळवळीचा उदय<br>२.१.१ औद्योगिक क्रांती, भांडवलशाहीचा उदय व कामगार वर्ग<br>२.२ भारतीय कामगार चळवळीचा उदय व विकास<br>२.२.१ ब्रिटीशकालीन औद्योगिक व कामगार धोरण<br>२.३ भारतीय राज्यघटना आणि कामगारांसाठीच्या तरतूदी<br>२.४ पंचवार्षिक योजना आणि औद्योगिक विकास व त्याचा कामगार धोरणावरील परिणाम<br>२.५ भारतातील मालक–कामगार संबंध आणि विविध संप व त्याचा कामांवरील परिणाम<br>२.५.१ मालक–कामगार संबंधांचे उद्योग आणि जनजीवनावरील परिणाम<br>२.५.२ भारतातील औद्योगिक कलह व त्याचे परिणाम<br>२.५.२.१ पहिल्या महायुध्दा दरम्यानच्या काळातील औद्योगिक कलह<br>२.५.२.२ सन १९२९ ते १९३९ या कालखंडातील औद्योगिक कलह<br>२.५.२.३ दुसऱ्या महायुध्दा लगतच्या काळातील औद्योगिक कलह<br>२.५.२.४ पंचवार्षिक नियोजनाच्या सुरुवातीच्या टप्प्यातील काळ<br>२.५.२.५ पंचवार्षिक नियोजनाच्या नंतरच्या टप्प्यातील काळ<br>२.५.२.६ आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्या– | ४७–१०८ |

नंतरचा काळ

२.६ औद्योगिक कलहांची कारण मिमांसा

२.७ औद्योगिक कलहांचे परिणाम

२.८ भारतातील आद्योगिक कलहाविषयक कायदे व त्या अंतर्गतच्या यंत्रणा

२.८.१ सन १८४७ चा औद्योगिक कलह कायदा

२.८.२ सन १९५० चा औद्योगिक कलह (कामगार पुनर्विचार न्यायालय) कायदा

२.८.३ सन १९५६ चा औद्योगिक कलह कायदा

२.९ राष्ट्रीय कामगार चौकशी आयोग–सन १९६६–६९

२.९.१ राष्ट्रीय कामगार आयोगाची स्थापना

२.९.१.१ राष्ट्रीय कामगार चौकशी आयोगाच्या शिफारशी

२.९.१.२ असंघटित कामगारांसाठी केंद्रीय आयोग

२.१० कामगार कल्याण आणि असंघटित कामगार

२.११ असंघटित कामगार आणि त्यांच्यासाठीच्या उपाययोजना

२.११.१ विकास आयुक्त (असंघटित कामगार) कार्यालय

२.११.२ असंघटित कामगारांसाठीचा सामाजिक सुरक्षितता अधिनियम २००८

२.११.३ इमारत व बांधकाम कामगार

२.११.४ घरेलू कामगार

२.१२ महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळ–महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची पार्श्वभूमी

२.१२.१ मुंबई गोदीतील हमाल माथाडी कामगारांची चळवळ

२.१२.२ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ पूर्वीची स्थिती व कायदा होण्यासाठीचे प्रयत्न

२.१२.२.१ हमाल माथाडी कामगारांची कामाची परिस्थिती व संघटना बांधण्यातील अडचणी

२.१२.२.२ महाराष्ट्रातील पहिल्या माथाडी हमाल कामगारांच्या संघटनेची स्थापना

२.१२.२.३ माथाडी हमाल कामगारांसाठीच्या स्वतंत्र कायदा व इतर मागण्यांसाठीचे संप व आंदोलने

| | | |
|---|---|---|
| | २.१२.३ असंरक्षित मजूरांसाठी चौकशी समितीची स्थापना | |
| | २.१२.३.१ के. आर. पोवार समिती | |
| | २.१२.३.२ लोखंडी जथ्था कामगार चौकशी समिती | |
| | २.१२.३.३ शिवाजीराव पाटील समिती | |
| | २.१३ महाराष्ट्र विधान मंडळातील चर्चा व विधेयकाचे कायद्यात रुपांतर | |
| | २.१३.१ विधेयकाचे विधान मंडळात सादरीकरण व चर्चा | |
| | २.१३.२ विधेयकाचे कायद्यात रुपांतर | |
| | २.१३.३ कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये | |
| | २.१३.३.१ अधिनियमातील विविध व्याख्या | |
| | २.१३.३.२ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ ची ठळक वैशिष्ट्ये व व्याप्ती | |
| | २.१४ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ या अधिनियमाची अंमलबजावणी करणारे घटक | |
| | २.१४.१ शासन | |
| | २.१४.२ मा. कामगार मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्य सल्लागार समिती | |
| | २.१४.३ मंत्रालयातील कामगार विभाग | |
| | २.१४.४ कामगार आयुक्त | |
| | २.१४.५ माथाडी कक्ष | |
| | २.१४.६ माथाडी मंडळाचा अध्यक्ष | |
| | २.१४.७ माथाडी मंडळाचा सचिव | |
| | २.१४.८ माथाडी मंडळ कर्मचारी | |
| | २.१५ माथाडी मंडळाची रचना, कार्यकक्षा आणि अधिकार व कर्तव्ये | |
| | २.१५.१ माथाडी मंडळाची रचना व प्रशासन | |
| | २.१५.२ माथाडी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये | |
| | २.१६ माथाडी अधिनियम व त्या अंतर्गत मंडळाची आवश्यकता | |
| | २.१६.१ कल्याणकारी तरतूदींना कायद्याचे अधिष्ठान देणे | |
| | २.१६.२ माथाडी मंडळाची स्थापना करणे | |
| | २.१६.३ कामगारांसाठी कल्याणकारी योजना तयार | |

| | | |
|---|---|---|
| | करणे व राबविणे<br>२.१६.४ निश्चित काम व निश्चित कामगार उपलब्धता<br>२.१६.५ मालक–कामगारांतील मतभेद सामोपचाराने सोडविणे<br>२.१६.६ शासनाचे माथाडी मंडळावर नियंत्रण ठेवणे<br>२.१६.७ शासनाला सल्ला देण्यासाठी सल्लागार समिती<br><br>संदर्भ सूची | <br><br><br><br><br><br>१००–१०८ |
| प्रकरण तिसरे | **महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची अंमलबजावणी–माथाडी मंडळांची स्थापना आणि प्रगती**<br>३.१ कायद्याची अंमलबजावणी सुरु होण्यासाठीचे प्रयत्न<br>३.२ माथाडी मंडळांची स्थापना व कायद्याच्या अंमलबजावणीचा मागोवा<br>३.२.१ कोकण विभागातील माथाडी मंडळाची स्थापना व अंमलबजावणी<br>३.२.१.१ किराणा बाजार आणि दुकाने मंडळ<br>३.२.१.२ मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार मंडळ<br>३.२.१.३ माल वाहतूक कामगार मंडळ,मुंबई<br>३.२.१.४ कापड बाजार आणि दुकाने मंडळ, बृहन्मुंबई<br>३.२.१.५ कापूस बाजार कामगार मंडळ, मुंबई<br>३.२.१.६ खोका मेकींग बोर्ड, मुंबई<br>३.२.१.७ धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार दुकाने मंडळ, मुंबई<br>३.२.१.८ दी रेल्वे गुडस् क्लिअरींग आणि फॉरवर्डीग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई<br>३.२.१.९ मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई<br>३.२.१.१० क्लिअरींग आणि फॉरवर्डीग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई<br>३.२.१.११ रत्नागिरी–सिंधुदूर्ग माथाडी असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी<br>३.२.२ पुणे विभाग<br>३.२.२.१ पुणे जिल्ह्यातील माथाडी मंडळे<br>३.२.२.१.१ पुणे माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ | १०९–१७१ |

| | | |
|---|---|---|
| | ३.२.२.१.२ पिंपरी–चिंचवड माथाडी असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.२.२ कोल्हापूर जिल्ह्यातील माथाडी मंडळे | |
| | ३.२.२.२.१ कोल्हापूर माथाडी मंडळ, कोल्हापूर | |
| | ३.२.२.२.२ इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.२.३ सांगली–मिरज माथाडी कामगार मंडळ | |
| | ३.२.२.४ सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.२.५ सातारा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.३ नाशिक विभाग | |
| | ३.२.३.१ नाशिक जिल्ह्यातील माथाडी मंडळे | |
| | ३.२.३.१.१ नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.३.१.२ नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव | |
| | ३.२.३.२ धुळे–नंदुरबार माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.३.३ अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.३.४ जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.४ औरंगाबाद विभाग | |
| | ३.२.४.१ जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.४.२ लातूर–उस्मानाबाद जिल्हा असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.४.३ नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.४.४ औरंगाबाद माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ | |
| | ३.२.४.५ परभणी–हिंगोली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.४.६ बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ | |
| | ३.२.५ अमरावती विभाग | |
| | ३.२.५.१ अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार | |

| | | |
|---|---|---|
| | मंडळ<br>३.२.५.२ अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला<br>३.२.५.३ यवतमाळ असंरक्षित आणि माथाडी मंडळ, यवतमाळ<br>३.२.६ नागपूर विभाग<br>३.२.६.१ नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर<br>३.२.६.२ भंडारा–गोंदिया माथाडी, हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा<br>३.२.६.३ चंद्रपूर–गडचिरोली माथाडी हमाल व अंसरक्षित कामगार मंडळ, चंद्रपूर | |
| | संदर्भ सूची | १६०–१७१ |
| प्रकरण चौथे | **माथाडी कामगार चळवळीचा माथाडी कामगार आणि मालक व शासन यांच्या मधील परस्पर संबंधांवरील परिणाम**<br>४.१ महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार कायद्यापूर्वीचे मालक–माथाडी कामगार संबंध<br>४.१.१ सुरुवातीच्या काळातील सन १९६० पूर्वीचे मालक आणि माथाडी कामगारांचे संबंध<br>४.१.२ माथाडी कामगारांच्या एकत्रिकरणाच्या काळातील सन १९६० ते १९६९ दरम्यानचे मालक–माथाडी कामगार संबंध<br>४.१.३ महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ पारित झाल्यानंतरच्या काळातील मालक–माथाडी कामगार संबंध<br>४.२ शासनाची माथाडी कामगार कल्याण विषयक भूमिका आणि शासन व माथाडी कामगार यांचे परस्पर संबंध<br>४.२.१ माथाडी कामगार संघटित होण्यापूर्वी सन १९६० पूर्वीचा काळ<br>४.२.२ माथाडी कामगार संघटित झाल्यानंतर सन १९६० ते १९६९ मध्ये माथाडी कामगार कायदा पास होईपर्यंतचा काळ<br>४.२.३ माथाडी कायदा पारित झाल्यानंतरचा सन | १७२–२१७ |

| | | |
|---|---|---|
| | १९६९ नंतरचा काळ<br>४.२.४ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ च्या अधिक चांगल्या अंमलबजावणीसाठी शासनाने नेमलेल्या समित्या<br>४.२.४.१ राज्य सल्लागार समितीची पहिली उपसमिती<br>४.२.४.२ राज्य सल्लागार समितीची दुसरी उपसमिती<br>४.२.४.३ राज्य सल्लागार समितीची तिसरी उपसमिती<br>४.२.४.४ डी. बी. देव समिती<br>४.२.४.५ रत्नाकर गायकवाड समिती<br>४.२.४.६ दिनकर पगार समिती<br>४.२.४.७ अजित निंबाळकर समिती<br>४.३ माथाडी कामगार संघटनांचे कल्याणकारी काम<br>४.३.१ महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन– उपक्रम<br>४.३.१.१ बृहन्मुंबई माथाडी कामगार सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई<br>४.३.१.२ माथाडी हॉस्पीटल<br>४.३.१.३ माथाडी ग्राहक भांडार<br>४.३.१.४ माथाडी कामगारांच्या गृहबांधणी योजनांसाठी प्रयत्न<br>४.३.१.५ तळमळ रजिस्टर<br>४.३.२ हमाल पंचायत, पुणे<br>४.३.३ अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, मुंबई<br>४.४ यांत्रिकीकरणाचा माथाडी कामगारांवर परिणाम<br>४.५ माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यानच्या अनुचित घटना व प्रथा<br>४.६ महाराष्ट्रातील माथाडी कामगार संघटना<br><br>**संदर्भ सूची** | २१०–२१७ |
| प्रकरण पाचवे | **मान्यवरांच्या नजरेतून माथाडी कामगार चळवळ**<br><br>**संदर्भ सूची** | २१८–२३२<br><br>२३०–२३२ |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण सहावे | **समारोप**<br>माथाडी कायद्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनातील स्थित्यंतर<br>गृहितकांच्या अनुषंगाने संशोधनातील निष्कर्ष<br>माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना<br>अ) प्रचलित माथाडी कायद्यातील तरतूदींच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीबाबत उपाययोजना<br>ब) माथाडी कायद्यात आवश्यक सुधारणा<br>क) माथाडी मंडळाचे दैनंदिन कामकाज अधिक चांगल्या पध्दतीने होण्यासाठीच्या उपाययोजना<br>शासकीय योजनांच्या समन्वयातून आर्थिक व सामाजिक सुरक्षितता<br>प्रस्तूत विषयाच्या संशोधनातून काही नवीन संशोधन विषयाला वाव<br><br>**संदर्भ सूची** | २३३–२५३<br><br><br><br><br><br><br><br><br><br>२५२–२५३ |
| | **संदर्भ ग्रंथ सूची**<br><br>**परिशिष्ये –**<br>१. कामगार कायदे<br>२. मुंबईतील माथाडी मंडळामध्ये कार्यरत असलेल्या कामगार संघटना व त्यांची सभासद संख्या दर्शविणारा तक्ता<br>३. माथाडी कायद्यांर्तगत येणाऱ्या उद्योगधंद्याची यादी<br>४. माथाडी मंडळाचे कार्यालयीन पत्ते व स्थापनेचा दिनांक (सन २००० अखेर)<br>५. नोंदित मालक कामगार– माहे जानेवारी २०१० ते डिसेंबर २०१० यादी<br>६. माथाडी कायद्यापूर्वी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या समित्यांचे अहवाल– श्री. के. आर. पोवार, यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल,<br>७. माथाडी कायद्यापूर्वी महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या समित्यांचे अहवाल– श्री. शिवाजीराव पाटील, श्री. बी. एस. कालेलकर यांचे अध्यक्षतेखालील समित्यांचे अहवाल, | २५४–२७३<br><br>२७४–३३५ |

| | | |
|---|---|---|
| | ८. प्रशासकीय सुधारणांसाठी नेमलेल्या देव समितीचा अहवाल व सल्लागार समितीच्या तिसऱ्या उपसमितीचा अहवाल<br>९. श्री. रत्नाकर गायकवाड, तत्कालीन कामगार आयुक्त यांनी शासनाला सादर केलेल्या अहवालाचे पत्र.<br>१०. माथाडी कामगार चळवळी विषयक माहिती देणाऱ्या माथाडी मित्र पाक्षिक<br>११. माथाडी मित्र पाक्षिक व माथाडी कायद्यास २५ वर्षे पूर्ण झाली त्यावेळचा माथाडी कायदा विशेषांक<br>१२. अण्णासाहेब पाटील आणि सुरुवातीची माथाडी कामगार चळवळ याविषयी माहिती देणारे पुस्तके<br>१३. माथाडी कायदा अधिक परिपूर्ण करण्यासाठी नेमलेली संयुक्त समिती<br>१४. विधानमंडळात माथाडी कायदा सादर करताना कामगार मंत्र्यांचे भाषण व कायदा पास झाला त्याबाबतचे इतिवृत्त<br>१५.फोटो,अहवाल,पत्र,मुलाखती,बातम्या,लेख,शुभसंदेश,प्रश्नावली | |

# महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास (सन १९६० ते सन २०१०)

## १ प्रस्तावना :

विविध प्रकारचा माल किंवा जड वस्तू माथ्यावरुन म्हणजेच डोक्यावरुन वाहून नेणाऱ्या व अशा प्रकारची इतरही अनुषंगिक कामे करणाऱ्या अकुशल कामगारास माथाडी कामगार म्हणतात. या माथाडी कामगारांना पूर्वी हमाल, घाटी किंवा गडी म्हणूनच संबोधले जात असे. त्यांना सामाजिक, आर्थिक अशी कोणतीच सुरक्षितता नव्हती. या कामगारांनी संघटीत होवून आपल्या न्याय मागण्या मांडण्यास सुरुवात केल्यानंतर १९६२ पासून त्यांना श्री. आण्णासाहेब पाटील यांनी'माथाडी कामगार' हे नाव दिले. या कामगारांनी सन १९६०ते सन १९७० च्या दशकात एकत्र येवून लढा दिला. योग्य वेतन, मुलभूत सोयी सुविधा या माथाडी कामगारांनी संघर्षाअंती मिळविल्या. महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा एकूणच भारतीय कामगार चळवळीत महत्त्वपूर्ण वाटा आहे.या माथाडी कामगारांच्या लढ्याचा इतिहास व त्यातील विविध घटकांच्या योगदानाची मांडणी प्रबंधात केली आहे.

## २ संशोधनाचा विषय :

महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा (सन १९६० ते सन २०१०) अभ्यास करणे हा संशोधनाचा विषय होय. महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमामुळे प्रथमच प्रचलित कामगार कायद्यांच्या व्याख्येत न बसणाऱ्या माथाडी कामगारांसारख्या असंघटीत कामगारांनाही सामाजिक सुरक्षितता मिळाली, हे या अधिनियमाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे. माथाडी हमाल कामगारांनी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संघर्ष सुरु केला. माथाडी कामगार चळवळीच्या या घटनांचा व कार्याचा अभ्यास करणे आणि हा संशोधनाचा विषय शासन, माथाडी कामगार संघटना, या विषयाचे अभ्यासक, शासकीय अधिकारी अशा सर्व समावेशक स्तरावर मांडणे हे ध्येय आहे. माथाडी कामगारांची चळवळ ऐतिहासिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून दुर्लक्षित राहिली आहे. माथाडी कामगार चळवळ अशिक्षित, असंघटीत, गरीब कामगारांनी अन्यायाविरुध्द केलेला संघर्ष आहे. मालक व राज्यकर्ते या

सारख्या संपन्न, संघटीत व सुशिक्षित घटकांविरुध्द त्यांना संघर्ष करावा लागला आहे. हा संशोधन प्रबंध भावी पिढी व समाजाला तसेच इतर असंघटीत कामगारांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरावा.

## ३ संशोधनाचे महत्व :

या कामगार चळवळीचा लढा घरेलू कामगार, इमारत व इतर बांधकाम कामगार, सफाई कामगार, काच–पत्रा, भंगार वेचणारे कामगार, रिक्षा चालक इत्यादी असंघटीत कामगारांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. भारतातील इतर राज्य देखील या अधिनियमाचा अभ्यास करुन अशा कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबवित आहेत.

## ४ संशोधनाची गृहितके :

१. महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ हा स्वतंत्र भारतातील असंघटीत व असुरक्षित तसेच विखुरलेल्या स्वरुपात, निश्चित एका मालकाकडे काम न करणाऱ्या माथाडी कामगार या घटकासाठी स्वतंत्रपणे तयार केलेला पहिलाच कायदा आहे.

२. असंघटीत, असुरक्षित अशा एका स्वतंत्र कामगार वर्गासाठी गरजेनुसार वेगळा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.

३. माथाडी कामगारांची चळवळ व त्यांचे यश अन्य असंघटीत कामगारांसाठी महत्वपूर्ण व मार्गदर्शक आहे.

४. माथाडी कामगारांनी आणि कामगार नेत्यांनी माथाडी अधिनियमाची निर्मिती व त्याच्या राज्यभर अंमलबजावणीसाठी चळवळीच्या माध्यमातून महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

५. माथाडी अधिनियम आणि माथाडी मंडळांमुळे माथाडी कामगारांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळाली.

६. माथाडी अधिनियम आणि माथाडी मंडळामुळे व्यापारी आणि उद्योगधंद्यांना नियमित आणि निश्चित स्वरुपात माथाडी कामगारांची सेवा उपलब्ध झाली.

७. मालवाहतूकीतील यांत्रिकीकरणामुळे माथाडी कामगारांच्या कामावर परिणाम होवू शकतो, त्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे

## ५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास हा संशोधनाचा विषय असला तरी भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील कामगार चळवळी, कामगार कायदे, कामगार विषयक शासनाचे धोरण तसेच त्यापुर्वीची माथाडी कामगारांची स्थिती, विशेषत: मुंबई गोदीतील हमालांची स्थिती आणि त्यांनी सन १९२० आणि १९४७ मध्ये केलेला संप, डॉक लेबर बोर्डाची स्थापना, येथेपासून ते १९६९ मधील या अधिनियमाची निर्मिती आणि आता पर्यंत या अधिनियमाची अंमलबजावणीची प्रगती, त्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष असा सन १९२० ते सन २०१० या कालावधीतील एकूण ९० वर्षाचा आढावा थोडक्यात घेतला आहे.

## ६ सैध्दांतिक पाश्र्वभूमी :

कामगार हा औद्योगिक व्यवस्थेचा आणि अर्थव्यवस्थेचा अविभाज्य, महत्वपूर्ण घटक आहे. परंतु तितकाच तो दूर्लक्षिला जाणारा घटक आहे. संघर्षासाठी एकत्रित येण्यासाठी त्यांची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक कुवत नसते. अशाच घटकांपैकी एक म्हणजे माथाडी कामगार होत.या माथाडी कामगारांनी एकत्र येवून लढा दिला.

माथाडी कामगारांच्या चळवळीत श्री. आण्णासाहेब पाटील, श्री. मनोहर कोतवाल, डॉ.बाबा आढाव, श्री. बापुसाहेब मगदूम, ॲड. काशिनाथ वळईकर, श्री. आनंदराव गोळे, श्री.बाबुराव रामिष्टे, श्री. बळवंतराव पवार, श्री.शिवाजीराव पाटील, विदर्भातील डॉ. हरिष धुरट, मराठवाड्यातील श्री. राजकुमार घायाळ या कामगार नेत्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

माथाडी कामगारांसारख्या असंघटीत, असुशिक्षित कामगारांनी स्वत:च्या सामाजिक सुरक्षिततेसाठी प्रतिकुल परिस्थितीत स्वतंत्र कायदा निर्माण करुन घेणे व त्याची अंमलबजावणी करुन घेणे ही भारतीय

कामगार चळवळीतील महत्वपूर्ण घटना होय. याचा इतिहास इतर सर्व असंघटीत कामगार वर्गासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारा आहे.

### ७ माथाडी कामगार चळवळ–कथनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन :

माथाडी कामगार चळवळ हा संशोधनाचा विषय कथनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन या प्रकारात मोडतो. माथाडी कामगार चळवळीचा उदय व विस्तार, माथाडी अधिनियमाची निर्मिती व अंमलबजावणी, माथाडी अधिनियमात वेळोवेळी झालेल्या सुधारणा या सर्व बाबींशी संबंधित घटना सुसंगतरित्या या संशोधनात मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे संशोधन कथनात्मक स्वरुपाचे संशोधन आहे.हे संशोधन करताना यामधील कामगार, मालक, शासन, कामगार नेते यांचे परस्पर संबंधाचे व घटनांचे विश्लेषणही यात करण्यात आले आहे. त्यामुळे काही प्रमाणात ते विश्लेषणात्मकही आहे. त्याचबरोबर कमी प्रमाणात संख्या असणाऱ्या असंघटीत कामगारांसाठी एका राज्याने केलेला हा देशाच्या इतिहासातील पहिलाच कायदा आहे. तसेच, अन्य असंघटीत कामगारांसाठी ही माथाडी कामगार चळवळ प्रेरणादायी वमार्गदर्शक असल्याचे स्पष्ट होत असल्याने हे नवा दृष्टिकोन पुढे आणणारे संशोधन ठरते.

### ८ संशोधन विषयासंदर्भातील प्राथमिक व दुय्यम साधनसामग्री :

सदर संशोधन करताना ऐतिहासिक, शासकीय व वैयक्तिक दस्ताऐवजांचे संकलन तसेच कामगार, आस्थापना मालक, कामगार नेते, शासकीय अधिकारी यांच्या मुलाखतींचा देखील वापर करण्यात आला आहे.यासाठी मा. श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री), मा. श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री), मा. श्री. शशिकांत शिंदे जलसंपदा मंत्री आणि पूर्वाश्रमीचे माथाडी कामगार मंडळ कर्मचारी मा. श्री. नरेंद्र पाटील (विधान परिषद सदस्य) तसेच डॉ. बाबा आढाव (पुणे), श्री.बळवंतराव पवार (मुंबई), डॉ. हरिष धुरट (नागपूर), श्री. राजकुमार घायाळ (बीड) इ. कामगार नेत्यांच्या तसेच या मंडळावर काम केलेल्या सेवानिवृत्त आणि सेवेत कार्यरत असणाऱ्या विविध अधिकाऱ्यांच्याही मुलाखती घेण्यात आल्या. संशोधन कालखंडातील महाराष्ट्र माथाडी कामगार युनियनच्या तसेच इतर माथाडी कामगार संघटनांच्या कार्यालयातील जुने दस्ताऐवज, मंत्रालय तसेच कामगार आयुक्त कार्यालयातील जुने दस्ताऐवज, छायाचित्रे, श्री. के. आर.पोवार, श्री. शिवाजीराव पाटील, श्री. बी. एस. कालेलकर यांचे अध्यक्षतेखालील

समित्यांचे मूळ अहवाल, विधानमंडळात सदर अधिनियम पारीत करतानाच्या झालेल्या याविषयावरील चर्चेचे इतिवृत्त, विविध माथाडी मंडळाचे सन १९७१ ते सन १९७२ पासूनचे वार्षिक अहवाल, सन १९६९ मध्ये सदर कायदा झाल्यानंतर त्यांच्या अंमलबजावणीत सुधारणा सुचविण्यासाठी वेळोवेळी राज्यशासनाने नेमलेल्या समित्यांचे मूळ अहवाल, शासन निर्णय व परिपत्रके, दृकश्राव्य चित्रपट, जुनी वर्तमानपत्राची कात्रणे, माथाडी मित्र पाक्षिकाचे अंक, हमाल माथाडी मंडळाचे जुने विशेषांक, श्री. आण्णासाहेब पाटील यांचेवरील गौरव अंक, केंद्र व राज्य शासनाचे अहवाल, जनर्रल्स, विविध संकेतस्थळे. सेवानिवृत्त व कार्यरत माथाडी कामगार, मालक, पदाधिकारी, अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष केलेली चर्चा व मुलाखती,माथाडी चळवळीची पार्श्वभूमी विषद करणारे श्री. आण्णासाहेब पाटलांवरील श्री. व्ही. पी. पाटील यांनी लिहिलेले ‘दि ग्रेट माथाडी आण्णासाहेब पाटील हे पुस्तक, श्री. ज्ञानदेव लक्ष्मण गोळे यांनी लिहिलेले ‘निश्चयाचा महामेरु’ हे पुस्तक व श्री. आप्पा कोरपे, अहमदनगर यांनी लिहिलेले ‘मी तो हमाल’या पुस्तकात माथाडी कामगारांच्या तत्कालीन परिस्थिती व कायद्यानंतरची परिस्थिती आर्थिक शोषण याबाबत लिहिले आहे. यांचाही आवश्यकतेनुसार वापर केला आहे.

## ८.१ आजपर्यंतचे झालेले संशोधन कार्य :

माथाडी कामगार चळवळीचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून संशोधनात्मक अभ्यास पुरेशा प्रमाणात झालेला नाही. मात्र समाजशास्त्राच्या काही विद्यार्थ्यांनी याविषयी विद्यावाचस्पती प्रबंध सादर केलेले आहेत. माथाडी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा तसेच या कायद्यामुळे झालेल्या बदलांचा अभ्यास प्रा. डॉ.लक्ष्मीकांत देशपांडे, नागपूर विद्यापीठ यांनी केलेला आहे. सातारा शहरातील माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा अभ्यास प्रा. द. भ. शेंडगे यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठास पीएच.डी. साठी सादर केलेल्या प्रबंधात केलेला आहे.

माथाडी कामगार चळवळीशी संबंधित व्यक्तींनी याबाबत वेळोवेळी लिखाण केलेले आहे. माथाडी कामगारांची स्थिती आणि त्यावर आवश्यक उपायोजना याबाबत प्रामुख्याने सदर लिखाण आहे.

## ९ संशोधन विषयाची प्रकरणानुसार विभागणी :

संशोधकाने खालील प्रकरणे व त्यातील उपघटकांच्या आधारे मांडणी करुन आपली संशोधन प्रक्रियापूर्ण केली आहे.

**प्रकरण १ : पार्श्वभूमी व संशोधन पध्दती**

या प्रकरणात माथाडी कामगार चळवळीची संक्षिप्त पार्श्वभूमी तसेच या असंघटीत व अशिक्षित कामगारांनी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर असंघटीत कामगार अधिनियम, १९६९ या अधिनियमाच्या निर्मितीसाठी केलेले प्रयत्न व इतर कामगार चळवळीपासूनचे त्यांचे वेगळेपण याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. तसेच संशोधन विषय, त्याचे महत्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, सैध्दांतिक पार्श्वभूमी, संदर्भ साहित्याचा वापर इत्यादीचाही आढावा घेतला आहे.

**प्रकरण २ : कामगार चळवळीची वाटचाल**

या प्रकरणात भारतातील चळवळीचा उदय, महाराष्ट्रातील विशेषत: मुंबईतील कामगार चळवळी आणि त्यातून शासनाने कामगारांसाठी केलेले कायदे यांचा आढावा घेतला आहे. तसेच महाराष्ट्रातील माथाडी कामगारांच्या चळवळीचा उदय व त्यातील विविध घटनाक्रम यांचाही विचार करण्यात आला आहे. माथाडी कामगारांनी केलेल्या चळवळीची शासनाने घेतलेली दखल, शासनाने नेमलेल्या विविध समित्या व त्यांचे अहवाल, हा अधिनियम पारित होताना महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहात झालेली चर्चा यांचा विचार करण्यात आला आहे.

**प्रकरण ३ : महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची निर्मिती व अंमलबजावणी**

या प्रकरणामध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ च्या अंमलबजावणीतील अडचणी, त्यासाठी माथाडी कामगारांनी केलेला संघर्ष, शासनाने केलेले प्रयत्न, व्यापाऱ्यांचा असलेला विरोध, माथाडी मंडळांची राज्यभरात झालेली स्थापना, त्याचा महसूली विभाग

निहाय आढावा घेतला आहे. यामंडळांचे स्थापनेच्या प्रथम वर्षातील स्थिती आणि सध्याची स्थिती याचा मालक व कामगारांच्या संख्येतील वाढ, माथाडी कामगारांना देण्यात येत असलेल्या कल्याणकारी सुविधा, जमा होणाऱ्या लेव्हीच्या रकमेतील वाढ या बाबातचा संख्यात्मक माहितीच्या आधारे आढावा घेतला आहे. यातून माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात झालेला फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण ४ : माथाडी कामगार चळवळीचा माथाडी कामगार आणि मालक व शासन यांचेमधील परस्पर संबंधांवरील परिणाम**

या प्रकरणामध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ ची अंमलबजावणी आणि त्याचे शासन, मालक व माथाडी कामगार यांचे संबंधांवरील परिणाम याचाही विचार केलेला आहे. तसेच या कायद्याच्या अधिक चांगल्या अंमलबजावणीसाठी शासनाने नेमलेल्या विविध समित्या, विविध माथाडी कामगार संघटना व त्यांचे काम, यांत्रिकीकरणाचा माथाडी कामगारांवर झालेला परिणाम, माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान घडलेल्या काही अनुचित घटना व प्रकार या बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

**प्रकरण ५ : मान्यवरांच्या नजरेतून माथाडी कामगार चळवळीची वाटचाल व भवितव्य**

या प्रकरणामध्ये माथाडी अधिनियमाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती तसेच, माथाडी कामगार चळवळीशी संबंधित असणाऱ्या मान्यवरांच्या दृष्टिकोनातून आजपर्यंतची माथाडी कामगार चळवळीची वाटचाल, भविष्यातील वाटचाल याविषयी त्यांची मते याचा विचार केलेला आहे.

**प्रकरण ६ : समारोप**

सदर संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष आणि त्या आधारे माथाडी कायद्याच्या अधिक परिणामकारक अंमलबजावणीसाठी काही उपाययोजना याबाबतचे विचार प्रस्तुत प्रकरणात नमूद केलेले आहे. तसेच या विषयावरील भविष्यातील संशोधनाला असलेला असणारा वावही स्पष्ट केलेला आहे.

## १० माथाडी कायद्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनातील स्थित्यंतर :

माथाडी कामगार शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या देखील मागासलेला होता. गावी शेती किंवा इतर रोजगाराचे पुरेसे उत्पन्न नसल्यामुळे घाटमाथ्यावरील जिल्ह्यातून हे कामगार मुंबईमध्ये येत. कायमस्वरुपी आणि निश्चित असे कामाचे ठिकाण व स्वरुप नसल्यामुळे माथाडी कामगारांचे मालक–कामगार असे संबंध प्रस्थापित होत नव्हते. यामुळे त्यावेळच्या कामगार कायद्यांचे संरक्षणही त्यांना मिळत नव्हते. यामुळे विखुरलेल्या स्वरुपात असल्यामुळे त्यांची संघटना बांधणे अवघड होते. श्री. अण्णासाहेब पाटलांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने माथाडी कामगारांना एकत्र आणून संघर्षास सुरुवात केली. याची परिणिती म्हणून राज्य शासनाने ‘महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ पास केला.

या अधिनियमामुळे माथाडी कामगारांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला. माथाडी कामगार आणि मालकांची माथाडी मंडळामध्ये रितसर नोंद होवू लागली. माथाडी कामगारांना नियोजित स्वरुपात रोजगार मिळू लागला. त्यांचे वेतन दर निश्चित झाले. त्याचबरोबर भविष्य निर्वाह निधी, उपदान, भरपगारी रजा, वैद्यकीय सुविधा, अपघात नुकसान भरपाई इत्यादी लाभ मिळू लागले. त्यांचे सर्वसामान्य राहणीमानही सुधारले. माथाडी कामगार यामुळे स्वाभीमानाने समाजात वावरु लागले आहेत.

माथाडी कायद्याच्या या यशाबरोबरच काही अनुचित प्रथादेखील सुरु झाल्या आहेत. काही अनुचित घटना घडल्या आहेत, काही त्रुटी आढळून येत आहेत. माथाडी कामगारांना मिळणाऱ्या मजुरीमध्ये देखील बरीच तफावत आहे. माथाडी मंडळाच्या कार्यकक्षेत पुरेसे काम उपलब्ध नसल्यामुळे अनेक कामगारांची इच्छा असूनही त्यांची माथाडी मंडळात नोंद होत नाही.

आता, राज्यातील सर्व जिल्ह्यात माथाही मंडळे स्थापन झाली असून राज्यभरात ८३५८३ मालकांची नोंद झालेली आहे आणि २०१९५४ कामगारांची नोंद झालेली असून त्यांना या कायद्याचा लाभ मिळत आहे. एकेकाळी कोणतीही सुरक्षितता नसणारे माथाडी कामगार एकजुटीच्या जोरावर सन्मानाने जगत आहेत, हे या माथाडी कायद्याचे क्रांतीकारक यश आहे.

## ११ गृहितकांच्या अनुषंगाने संशोधनातील निष्कर्ष :

सदर संशोधनाच्या सुरुवातीला काही गृहीतके मांडण्यात आली होती. या गृहीतकांस अनुसरुन अभ्यास करण्यात आला. त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ हा कायदा माथाडी–हमाल कामगारांच्या कामाचे विशिष्ट स्वरुप व त्यांच्या गरजा लक्षात ठेवून केलेला कायदा आहे हे या कायद्याच्या नावावरुन स्पष्ट होते. या कायद्यापूर्वीचे सर्व कामगार कायदे विषयानुरुप सरसकट संघटित स्वरुपात काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या कामगारांसाठी तयार केलेले होते. अशा प्रकारचा विशिष्ट प्रकारच्या असंरक्षित कामगारांसाठी स्वतंत्र कायदा भारतात कोणत्याच राज्यात नव्हता. तसा सुस्पष्ट उल्लेख श्री. नरेंद्र तिडके, कामगार मंत्री यांनी या कायद्याचे प्रारुप विधानमंडळात सादर करताना तसेच यावरील चर्चे दरम्यान देखील वारंवार केलेला आहे. तसेच आमदार हशु आडवाणी, लिलाधर शाह, एम.बी. हॅरिस, तुषार पवार, प्र. बा. वैद्य यांनी देखील हा अशा प्रकारचा पहिलाच कायदा असल्याचे विधानमंडळातील चर्चेदरम्यान नमूद केले आहे.

श्री. मनोहर कोतवाल, डॉ. बाबा आढाव, अण्णासाहेब पाटील यांचे सारखे अनुभवी कामगार नेत्यांनी देखील माथाडी कामगार या घटकासाठी स्वतंत्रपणे केलेला हा पहिलाच कायदा असल्याचे आपल्या लेखांमधून मांडले आहे. तसेच या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे सर्वश्री अंकुश मोरे, कामगार उपआयुक्त, तुकाराम चोळके, अपर कामगार आयुक्त यासारख्या शासकिय अधिकाऱ्यांनी देखील हा अशा प्रकारच्या असंघटित कामगारांसाठीचा देशातील पहिला कायदा असल्याचा उल्लेख केलेला आहे.

त्यामुळे अशा प्रकारचा त्यामुळे असंघटित, असुरक्षित अशा एका स्वतंत्र कामगार वर्गासाठी गरजेनुसार वेगळा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरते. याबाबीचा देखील उल्लेख श्री. नरेंद्र तिडके, कामगार मंत्री तसेच अनेक आमदारांनी विधानमंडळात हा कायदा पास होताना केलेल्या भाषणात केलेला आहे.

एखाद्या विशिष्ट असंघटित कामगार वर्गासाठी मालकाने मजूरीच्या रकमेच्या प्रमाणात काही रक्कम (लेव्ही) दरमहा मालकांकडून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण मंडळाच्या माध्यमातून जमा करुन त्यातून या

कामगारांना विविध कल्याणकारी लाभ पुरविता येवू शकतात, ही संकल्पना प्रथमच या कायद्याच्या माध्यमातून साध्य झाल्याचे देशातील कामगार चळवळीपुढे आले. माथाडी कायद्यानंतर बांधकाम कामगार, यंत्रमाग कामगार, घरेलू कामगार, सफाई कामगार यांनी देखील माथाडी कायद्याच्या धर्तीवर स्वतंत्र कायद्याची मागणी केली आहे. यापैकी बांधकाम कामगार,घरेलू कामगार, सुरक्षा रक्षकांसाठी स्वतंत्र कायदा करुन त्यांना सामाजिक सुरक्षितता दिली आहे. तसेच केंद्र शासनाने सर्वच असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता अधिनियम, २००८ हा कायदा पास केला आहे. हा कायदा करण्यापूर्वी वर्मा आयोग आणि अर्जुन सेन गुप्ता आयोगाने महाराष्ट्राच्या माथाडी कायद्याचा सखोल अभ्यास व संबंधितांशी चर्चाही केली आहे. माथाडी कायदा हा इतर सर्वच असंघटित कामगारांसाठी दिशादर्शक व महत्त्वपूर्ण कायदा असल्याचे दिसून येते.

कामगार चळवळीत भाग घेतल्यास आहे ती नोकरी जाण्याची त्यांना भीती होती. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना अन्यायाविरुध्द लढण्यास प्रवृत्त करणे हे सुरुवातीच्या माथाडी कामगार नेत्यांचे व माथाडी कामगारांचे मोठे योगदान होय. श्री. अण्णासाहेब पाटील, डॉ. बाबा आढाव व त्यांचे सहकाऱ्यांनी वारंवार संप, निदर्शने, उपोषणे यांचे माध्यमातून पाठपुरावा केला. मुंबईतील माथाडी कामगारांना या कायद्याचा लाभ त्वरीत मिळाला. मुंबई बाहेर इतर जिल्ह्यात माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी डॉ. बाबा आढाव, श्री. बापू मगदूम, श्री. राजकुमार घायाळ, डॉ. हरिष धुरट यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला आहे. सर्वश्री शशिकांत शिंदे, मंत्री , नरेंद्र पाटील (आमदार), भाई जगताप (आमदार), बाबुराव रामिष्टे,गुलाबराव जगताप, बळवंतराव पवार हे माथाडी कामगार नेते सध्याच्या काळात माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.

माथाडी कायद्यामुळे या कामगारांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला आहे. या माथाडी मंडळाचे वार्षिक अहवालानुसार त्यांनी माथाडी कामगारांना दिलेले आर्थिक लाभ, सामाजिक सुरक्षितता, विमा लाभ, आरोग्य सुविधा, वाटप केलेला पगार या बाबी पाहिल्या असता, या कामगारांना या कायद्यामुळे निश्चितच सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळाल्याचे स्पष्ट होते. तथापि, हे सर्व लाभ या कायद्यातील परिशिष्टामधील उद्योगांमध्ये असणाऱ्या आणि माथाडी मंडळात नोंद झालेल्या कामगारांनाच केवळ मिळत आहेत. या व्यतिरीक्त नोंद न झालेल्या लाखो कामगारांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता

अद्यापही मिळू शकेलेली नाही. त्यामुळे या कायद्याचा उद्देश्य पूर्णपणे साध्य झाला आहे असे म्हणता येणार नाही.

माथाडी कायद्यामुळे कामगारांबरोबरच मालकांनाही एक प्रकारची सुरक्षितता लाभली आहे. नियमित स्वरुपात कामगार उपलब्ध होत असले तरी हे कामगार मालकांच्या मर्जीतले आणि त्यांचे नियंत्रणाखाली नसल्यामुळे आणि मंडळाने ठरवून दिलेल्या दरानेच मजूरी तसेच लेव्हीची अतिरिक्त रक्कम द्यावी लागत असल्यामुळे मालक वर्ग बऱ्याचदा समाधानी नसतो.

यांत्रिकीकरणामुळे माथाडी कामगारांना उपलब्ध होणाऱ्या कामावर फार मोठा परिणाम झालेला असल्याची बाब आढळून आली नाही. यांत्रिकीकरण होत असतानाच औद्योगिकीकरणातही मोठ्या प्रमाणात वाढ होवून माथाडी कामगारांना अधिकचे काम उपलब्ध होत आहे. तरी भविष्यातील यांत्रिकीकरणाची अपरिहार्यता लक्षात घेवून माथाडी कामगारांना त्यादृष्टीने प्रशिक्षित करणे व त्यांना अधिक चांगल्या प्रकारचा रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे मांडलेल्या गृहितकांपैकी अभ्यासाअंती पहिले, दुसरे, तिसरे, चौथे आणि सातवे गृहितकात पूर्णपणे तथ्य असल्याचे आढळते तर पाचवे, सहावे गृहितकांत काही प्रमाणात तथ्य असल्याचे आढळून येते.

## १२ माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना :

माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास करताना या चळवळीच्या यश आणि त्रुटी या दोन्ही बाजू समोर आल्या. या कायद्याच्या अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

### १२.१ प्रचलित माथाडी कायद्यातील तरतूदींच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीबाबत:

**१) माथाडी कायद्याची व्याप्ती वाढविण्यात यावी**

**२) शासकिय-निमशासकिय कार्यालयांत माथाडी कायद्याची अंमलबजावणी** या ठिकाणी माथाडी कायद्याची अंमलबजावणी विशेष मोहिम आखून केल्यास फार मोठ्या संख्येने असलेल्या तेथील माथाडी कामगारांना लाभ मिळवून देता येईल.

**३) कायद्यातील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी**

४) **माथाडी मंडळाचे गठण** : राज्य शासनाने कामगार, मालक व शासन प्रतिनिधींचे त्रिपक्षीय मंडळ गठित करावयाचे आहे. त्यामुळे सर्व ठिकाणी त्रिपक्षीय मंडळाचे गठन वेळचेवेळी झाले पाहिजे.

५) माथाडी मंडळाचे वार्षिक अहवाल विधानमंडळापुढे दरवर्षी ठेवणे

६) मंडळाचे लेखे अद्ययावत ठेवणे

७) मा. मंत्री (कामगार) यांचे अध्यक्षतेखालील सल्लागार समितीच्या नियमित बैठका होणे आवश्यक .

८) पुरेशा संख्येने निरिक्षकांच्या नेमणूका करणे आवश्यक आहे.

९) **न्यायालयीन प्रक्रिया** : अपिल प्रथम प्राधान्याने करणे तसेच न्यायालयात मंडळाची बाजू मांडण्यासाठी अभ्यासू वकिल नेमणे आवश्यक आहे.

१०) मातृत्त्व लाभ अधिनियम, १९६१ नुसार स्त्री कामगारांना लाभ देणे

१२.२ प्रचलित माथाडी कायद्यात आवश्यक सुधारणा :.

१) न्यायालयीन प्रक्रिये दरम्यान माथाडी कामगारांना संरक्षण देणे

२) एक सदस्य मंडळाऐवजी शासकिय अधिकाऱ्यांचे बहुसदस्य मंडळ .

३) विशेष न्यायालयाची तरतूद

१२.३ माथाडी मंडळाचे दैनंदिन कामकाज अधिक चांगल्या पध्दतीने होण्यासाठीच्या उपाययोजना

१) पूर्णवेळ अधिकारी / कर्मचारी नेमणूक

२) मंडळाचे कामात जास्तीत जास्त प्रमाणात संगणक व संगणकीय प्रणालींचा वापर करणे :

३) लेखा अधिकाऱ्याची नेमणूक

४) माथाडी मंडळ कर्मचाऱ्यांचा महसूली विभागनिहाय समुच्चय करणे :

५) सहकामगार आयुक्त (माथाडी) यांचे अधिकारात वाढ करणे :

६) अशासकीय पदाधिकाऱ्यांचे परिसंवाद व चर्चासत्र

१२.४ शासकीय योजनांचा समन्वय:

१) शासकीय योजनांचा लाभ माथाडी कामगारांना मिळण्यासाठी समन्वयन

२) माथाडी कामगारांच्या घरातील महिलांचे बचत गट

३) म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी समन्वय साधणे :

४) **जनश्री विमा योजनेचा लाभ** सर्व अनोंदणीकृत माथाडी कामगारांना कामगार संघटना व मंडळाच्या माध्यमातून देता येईल.

५) **तांत्रिक प्रशिक्षण** :स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने विशिष्ट उद्योग धंद्यांचे प्रशिक्षण देऊन अधिक चांगल्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देता येवू शकतील.

६) **सेवानिवृत्ती (पेन्शन) योजना :**

७) **राष्ट्रीय पातळीवर माथाडी कायदा लागू करणे :**

## १३ प्रस्तूत विषयाच्या संशोधनातून काही नवीन संशोधन विषयाला वाव:

१) माथाडी मंडळाच्या स्थापनेपासून ते त्यांच्या आतापर्यंतच्या प्रगतीचा अभ्यास एक स्वतंत्र विषय म्हणून ऐतिहासिक तसेच सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून करता येईल.

२) त्यानुसार बृहन्मुंबई व परिसरातील माथाडी मंडळाचा इतिहास हा देखील अभ्यासाचा स्वतंत्र विषय होवू शकेल.

३) त्यामुळे महसूली विभागनिहाय महसूली विभागातील माथाडी मंडळाचा अभ्यास अशा प्रकारे करता येईल.

४) राज्यातील एखाद्या जिल्ह्यातील किंवा ३५ पैकी एका माथाडी मंडळाचा इतिहास

५) माथाडी कामगार कायद्यातील तरतूदी, त्यात झालेल्या सुधारणा व भविष्यातील आवश्यक सुधारणा याचा देखील अभ्यास करता येईल.

६) विविध माथाडी मंडळांचा परस्पर तुलनात्मक अभ्यास, खूल्या आर्थिक धोरणाचा माथाडी कायदा व माथाडी मंडळे आणि माथाडी कामगार यांचेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास व उपाययोजना.

७) श्री. अण्णासाहेब पाटील यांचे माथाडी कामगार चळवळीतील योगदान

८) श्री. अण्णासाहेब पाटील यांचे पश्चात माथाडी कामगार चळवळीची वाटचाल.

९) माथाडी कामगार चळवळीचा महाराष्ट्रातील उद्योगधंद्यावर व व्यापारावर झालेल्या परिणामांचा अभ्यास.

अशा प्रकारे विविध दृष्टिकोनातून माथाडी कामगार चळवळीच्या अभ्यासाला वाव आहे असे वाटते.

# संदर्भ ग्रंथ सूची

## अ) प्राथमिक साधने(प्रकाशित–महाराष्ट्र शासन)


**१) महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या समित्यांचे अहवाल :**

१. कालेलकर बी. एस. (अध्यक्ष), लोखंडी जथा कामगार चौकशी समिती अहवाल, दि. १५ डिसेंबर १९६५.

२. गायकवाड र. य., कामगार आयुक्त, माथाडी मंडळाच्या कामकाजाबाबत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी, दि. १७ एप्रिल १९९४.

३. देव डी. बी. (अध्यक्ष), माथाडी मंडळाचा आकृतीबंध आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नेमलेल्या एक सदस्यिय समितीचा अहवाल, दि. ८ फेब्रुवारी १९९१.

४. निंबाळकर समितीचा अहवाल, १९८५, (पुर्नमुद्रीत) हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक.

५. पगार दि. पो., (अध्यक्ष), सुरक्षा रक्षक बृहन्मुबंई व ठाणे या मंडलातील त्रुटीची चौकशी करणे व माथाडी, सुरक्षा रक्षक मंडळाच्या बुडीत बँकेत केलेल्या गुंतवणुकीची चौकशी करणेसाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेली समितीचा अहवाल, नोव्हेंबर २०११.

६. पाटील शिवाजीराव (अध्यक्ष), असंरक्षित कामगारांसाठी नेमलेल्या समितीचा अहवाल, दि. १७ नोव्हेंबर १९६७.

७. पोवार के. आर. (अध्यक्ष) माथाडी कामगारांबाबत चौकशी समिती अहवाल, बृहन्मुंबई दि. १२ जानेवारी १९६५.

८. महाराष्ट्र अधिनियम १९६९, असाधारण राजपत्र, भाग ४, दि. १३ जून १९६९.

९. राज्य सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त, मुंबई, दि. ६.१२.१९६९.

२)	**महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाचे इतिवृत्त :**

१.	विधानसभा कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, दिनांक २५ व २६ मार्च १९६९.

२.	विधान परिषद कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,दि.३१मार्च व १एप्रिल १९६९.

३)	**माथाडी मंडळाचे अहवाल व कार्यालयीन टिप्पण्या :**

१.	अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, सन १९९१–९२ व १९९२–९३ चा वार्षिक अहवाल,दि. ८.११.१९९५.

२.	अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, वार्षिक अहवाल, सन २००६,०७, २००७–०८, २००८–०९, दि. ६.५.२०११.

३.	अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी, डिसेंबर २०१३.

४.	अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती, पहिला वार्षिक अहवाल, सन १९९१–९२ ते १९९४–९५, दि. २४ जुलै २०००.

५.	अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती, वार्षिक अहवाल, सन २००९–१०, दि. १५ सप्टेंबर २०१०.

६.	अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांची कार्यालयीन टिप्पणी, माहे डिसेंबर २०१३.

७.	अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९१–९२.

८.	अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, सन २००९–१०, दि. २७ मे २०१३.

९.	अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर कार्यालयीन टिप्पणी, दि. १.१.२०१४.

१०.	इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९३–९४.

११.	इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची कार्यालयीन टिप्पणी दि. जानेवारी २०१४.

१२. औरंगाबाद माथाडी आणि इतर कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९२–९३, दि. १७.११.१९९४.

१३. औरंगाबाद माथाडी आणि इतर कामगार मंडळ, १९ वा वार्षिक अहवाल, सन १९१०–११, दि. १८.६.२०११.

१४. कापड बाजार आणि दुकाने मंडळ, बृहन्मुंबई प्रथम वार्षिक अहवाल (१९७१–७२) दि. ८ फेब्रुवारी १९७३.

१५. कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी, डिसेंबर २०१३.

१६. कापड बाजार आणि दुकाने मंडळ, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सन २००९–१० भुलेश्वर, मुंबई दि. ५ जानेवारी २०१२.

१७. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार कोल्हापूर बारावा वार्षिक अहवाल, सन १९९६–९७.

१८. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी

१९. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सन २००९–१० चा वार्षिक अहवाल दि. निरंक.

२०. क्लिअरींग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९१–९२, दि. २३.१०.१९९२.

२१. क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई सोळावा वार्षिक अहवाल, २००६–२००७, दि. निरंक.

२२. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई मंडळ, पहिला वार्षिक अहवाल, सन १९७३–७४,दि.५ डिसेंबर १९७९.

२३. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई, अडतीसावा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, मुंबई फलटण रोड दि. २३.५.२०११.

२४. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, भडोच स्ट्रीट मुंबई, कळंबोली जि. रायगड प्रथम वार्षिक अहवाल (१९७०–७१) दि. ६ सप्टेंबर १९७६.

२५. चंद्रपूर–गडचिरोली माथाडी मंडळाची कार्यालयीन टिप्पणी.

२६. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम त्रैवार्षिक अहवाल, सन १९९२–९३, ९३–९४, ९४–९५, दि. २५.११.१९९७.

२७. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, सन २००७–०८, दि. ९ डिसेंबर २०१३.

२८. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी, सन २०१२–१३.

२९. जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, जालना, प्रथम वार्षिक अहवाल, दि. १९.७.१९८८ ते दि. ३१.३.१९९०; दि. १८.८.१९९०.

३०. जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ जालना, २२ वा वार्षिक अहवाल, सन २०११–१२, दि. ६.६.२०१२.

३१. दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड फॉर ग्रेटर बॉम्बे, प्रथम वार्षिक अहवाल,

३२. दि रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंटस् लेबर बोर्ड मुंबई मंडळ, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, २००८–०९.

३३. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी, जानेवारी २०१४.

३४. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई द्वितीय वार्षिक अहवाल १९७४–७५, दि. ३० ऑगस्ट १९७६.

३५. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई मंडळ ३७ वा वार्षिक अहवाल, सन २००९–१०, दि. ३०.५.२०११.

३६. नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी.

३७. नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी.

३८. नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ,नाशिक पहिला वार्षिक अहवाल सन१९८५–८६.

३९. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांची कार्यालयीन टिप्पणी.

४०. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा वार्षिक अहवाल सन २०११–१२.

४१. नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव, पहिला वार्षिक अहवाल, सन १९८९–९० दि. १.४.१९९२.

४२. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव, २३ वा वार्षिक अहवाल, सन २०११–१२, दि. २५.४.२०१३.

४३. नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड, लेखापरिक्षण अहवाल, सन १९९२–९३, दि. २८.४.१९९४.

४४. नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड, वार्षिक लेखापरिक्षण अहवाल, सन २००८–०९, दि. २२.७.२०११.

४५. परभणी–हिंगोली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. २.४.२०१४.

४६. पुणे माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल सन १९८०–८१ दि. २९.१२.१९८४.

४७. पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, श्रमशक्ती भवन, मार्केटयार्ड पुणे यांची कार्यालयीन टिप्पणी दि. डिसेंबर २०१३.

४८. पिंपरी चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, पुणे प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९२–९३.

४९. पिंपरी चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, पंधरावा वार्षिक अहवाल, सन २००६–०७, चिंचवड, पुणे दि. निरंक.

५०. बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, बीड, दि. ३१.३.१९९८ रोजीचे बॅलन्स शीट, दि. ९.७.१९९९.

५१. बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांची कार्यालयीन टिप्पणी

५२. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल..

५३. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी दि. २४.१.२०१४.

५४. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सन २०१०–११, दि. २१.१२.२०११.

५५. भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा, लेखापरिक्षण व वार्षिक अहवाल, सन २००५–०६, दि. १.१०.२०१०.

५६. भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा, कार्यालयीन टिप्पणी.

५७. माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी.

५८. माल वाहतूक कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९७२–७३, बृहन्मुंबई.

५९. माल वाहतूक व कामगार मंडळ, बृहन्मुंबई, अडतिसावा वार्षिक अहवाल (सन २००८–०९) दि. ९.७.२०१०.

६०. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९८५–८६, दि. ७.७.१९८८.

६१. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी..

६२. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, सव्वीसावा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, दि. ५.१२.१९९२.

६३. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, सदतिसावा वार्षिक अहवाल भडोच स्ट्रीट मुंबई, (सन २००६–०७) कळंबोली जि. रायगड

६४. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, भडोच स्ट्रीट मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल सन १९७०–७१ कळंबोली जि. रायगड दि. ६.८.१९७६ .

६५. रत्नागिरी–सिंधुदूर्ग माथाडी असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी मंडळ, रत्नागिरी यांची कार्यालयीन टिप्पणी माहे जानेवारी २०१४.

६६. लातूर–उस्मानाबाद जिल्हा असंरक्षित कामगार मंडळाची कार्यालयीन टिप्पणी.

६७. सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल.

६८. सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल सन१९८९–९०.

६९. सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. ३१.१.२०१४.

७०. सांगली मिरज माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सांगली, पहिला वार्षिक अहवाल सन १९८४–८५ दि.२९.१.१९९२.

७१. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, उपरोक्त.

७२. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, द्वितीय वार्षिक अहवाल,१९८५–८६ दि.१७.२.१९८८

७३. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, तृतीय वार्षिक अहवाल,१९८६–८७.

७४. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, वार्षिक अहवाल,२०१२–१३.

## ४) महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय, राजपत्र, परिपत्रके, पत्रे, कार्यालयीन टिप्पण्या व इतर दस्ताऐवज :

१. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्षाची टिप्पणी.

२. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्ष, कार्यासन १४ यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. २० जूलै २०११.

३. गायकवाड र. य., कामगार आयुक्त, यांचे अर्ध शासकीय पत्र, प्र. का.आ./ माथाडी/१०९४/मु.क.७/१२६४ दि. १७ एप्रिल १९९४.

४. जाधव रा. भा. (अध्यक्ष), माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ तथा सहाय्यक कामगार आयुक्त यांचे पत्र दि. १८.२.२०१४.

५. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र भाग,एफ. एल., उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १ मे २०११.

६. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र भाग एफ. एल., उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १२.८.२०१२.

७. महाराष्ट्र शासन, अधिसूचना भाग I-L UWA 1473/197778/LAB-IV उद्योग व कामगार विभाग सचिवालय, मुंबई दि. ३० मार्च १९७४.

८. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. डब्ल्युए १४/२००२/(९८/६)/ काम–५, दि. २२.१.२००४.

९. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.UWA 1386/CR (11109) LAB-5 दि. ८ जुलै १९९२.

१०. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 1387/ CR11639/ Labs मंत्रालय, मुंबई दि. १ सप्टेंबर १९९०

११. महाराष्ट्र शासन अधिसूचना, ऊर्जा, व उद्योग व कामगार विभाग क्र;. UWA/ 142002/ 148/8, दि. १३.२.२००४.

१२. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. ३ मे २००६.

१३. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. UWA/ 1487/ CR (11600)/Lab-5, दि. २१ जून १९९१.

१४. महाराष्ट्र शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 142002/(130/7)/कामगार–५, दि. ५.२.२००४.

१५. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग IV दि. १३ जून १९६९.

१६. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग आठ, महाराष्ट्र कायदा क्र.१/२००९ दि. ६ जानेवारी २००९.

१७. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग ५, महाराष्ट्र विधानसभेत व विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके, ११ मार्च १९६९.

१८. महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 1087 (11460) LAB-5 मंत्रालय, मुंबई दि. १३ जुलै १९८४.

१९. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 488 CR (11699) LAB-5 मंत्रालय मुंबई दि. १८ ऑगस्ट १९८८.

२०. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र,भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १४.३.१९९६.

२१. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग I-L, MGG Sr.No. 38 क्र. UWA 1369/ Iron & Steel) LBA/4, उद्योग व कामगार विभाग, सचिवालय दि.१५.१२.१९६९.

२२. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १४.३.१९९६.

२३. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 1588/ (11855)/Labs-5 मंत्रालय, मुंबई,दि. २१.१.१९९१.

२४. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 142002/(97/6) कामगार–५, दि. १२.११.२००३.

२५. महाराष्ट्र शासन, अ. सा. राजपत्र, भाग एक–एल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १ ऑगस्ट १९९२.

२६. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग राजपत्र भाग–१ MGGक्र. ४३ अधिसूचना क्र. UWA 1369/(Grocery)/LAB-IV दि. १५ डिसेंबर १९६९ (उपरोक्त प्रथम वार्षिक अहवालासोबत पुर्नमुद्रित केलेली)

२७. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (खुद्द) कार्यक्रम अंदाजपत्रक २०१३–१४.

२८. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1472/ 152991/ Lab IV दि. ३१.१.१९७३.

२९. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1389/ 11965/ काम–५ दि. २४ एप्रिल १९८९.

३०. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1487/ 11490/ काम–५ दि. १५.९.१९८९.

३१. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA 1469 (GR) 160783/LAB-IV,सचिवालय, मुंबई दि. ६ एप्रिल १९७०.

३२. महाराष्ट्र शासन, कामगार–८, कार्यासन, मंत्रालय, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी.

३३. महाराष्ट्र शासन, कामगार व समाज कल्याण विभाग, पत्र क्र. BSE/1459/148843-J दि. नोव्हें. १९५९ (माथाडी कायदा विशेषांक–महाराष्ट्र हमाल मापाडी महामंडळ, पुणे, १९९४)

३४. महाराष्ट्र शासन, परिपत्रक, क्र. एसजीए १५००२(३७८३) काम–५, दि.१०.१०.२००२

३५. महाराष्ट्र शासन पत्र क्र. युडब्ल्युए १०८७/ सी.आर.११५८९/ कामगार–८ दि. १९ फेब्रुवारी १९९०. (पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिकेतील पुनर्मुद्रित)

३६. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी.

३७. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उद्योग व कामगार विभाग क्र. UWA 1471 (GL)/102307 LAB IV सचिवालय, मुंबई दि. ११ मार्च १९७१.

३८. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उद्योग आणि कामगार विभाग क्र.UWA/ 272/ 101763/ Lab IV सचिवालय, मुंबई दि. ३० मार्च १९७२.

३९. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल; उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. २२.१.१९८५.

४०. महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.UWA 1087 (11460) LAB-5 उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १३ फेब्रुवारी १९९२.

४१. महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक–ल, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 1484 CR (10408) LAB-5 दि. १८.८.१९८८

४२. महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग एक–ल, दि. १२ ऑगस्ट १९९२, दि. २६ मार्च १९९२.

४३. महाराष्ट्र शासन, राजपत्र, ऊर्जा, व उद्योग व कामगार विभाग. दि. १ सप्टेंबर १९९०.

४४. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, कार्यासन कामगार–५, दि. २६ मार्च २०१०.

४५. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. सिआयडी ३३०८/ १८५१ /प्र.क्र.१४ / नवि१० दि. ५ सप्टेंबर २०११.

४६. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग कार्यासन/काम–५ दि.४.१०.२०१२

४७. महाराष्ट्र शासन,शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र. युडब्ल्यु १५०९/प्र.क्र.१८१९/कामगार–५ दि. ३१ ऑगस्ट २००९ व २६ मार्च २०१०.

४८. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग, क्र. MSC 70264-LAB-II, सचिवालय, मुंबई, दि. १५ जुलै १९६५.

४९. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १९ डिसेंबर २०००.

५०. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. युडब्ल्युए १५१०/आर–३५८/कामगार–५ दि. ५.१०.२०१०.

५१. विक्रीकर आयुक्त कार्यालय, परिपत्रक, क्र. विउआ/प्रशा. २९/२०११/ परिपत्रक प्र. १२७, मुंबई दि. ३ ऑगस्ट २०११.

५२. Goverment of Maharashtra, Notification, Industries, Energy Labour Department, Dt 12/4/1991

## प्राथमिक साधने(प्रकाशित– साधने)

**५) नियतकालिके, विशेषांक व इतर साधने(प्रकाशित) :**

१. नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विशेषांक, फ्रेबुवारी २०१२.

२. पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० व्या वर्धापन दिन स्मरणिका, सप्टेंबर २०००.

३. महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन रौप्य महोत्सवी विशेषांक, सप्टेंबर १९८८.

४. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ संदर्भ पुस्तिका, दि. २२ नोव्हेंबर २०१२. माथाडी मित्र, कामगार व महाराष्ट्र दिन विशेषांक, मे १९८१.

५. माथाडी मित्र (पाक्षिक) कै. अण्णासाहेब पाटील स्मृती विशेषांक, दि. २३ मार्च १९८३.

६. हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

७. माथाडी कामगार सहकारी पतपेढी वार्षिक अहवाल, सन २०१०–११.

८. माथाडी कामगार सहकारी ग्राहक भांडार वार्षिक अहवाल,सन२०११-१२.

९. माथाडी हॉस्पीटल ट्रस्टची कार्यालयीन टिप्पणी, सन २०१३.

६) **लेखसूची(प्रकाशित) :**

१. अतितकर जी. व्ही., पुण्याचे माथाडी मंडळ वैशिष्ट्यपूर्ण आणि आदर्श ठरावे, पुणे माथाडी मंडळ, स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००.

२. अध्यक्ष, सोलापूर रेल्वे हमाल पंचायत, माथाडी प्रश्न–सप्रेम नमस्कार, हमाल माथाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

३. अध्यक्ष, नांदेड हमाल मापाडी हातगाडा संघ यांचे पत्र, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

४. अष्टेकर श्याम,शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन रौप्य महोत्सव विशेषांक, दि. २१ सप्टेंबर १९८८.

५. आढाव बाबा, माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

६. आढाव बाबा (संपादकीय), हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन पेन्शन विशेषांक, फेब्रुवारी २०१२.

७. ओविद पी. जे., 'अण्णासाहेब पाटील एक महान कामगार पुढारी', रौप्य महोत्सव विशेषांक, सप्टेंबर १९८८.

८. काटे बंडू किसन, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र विशेषांक, १९८१.

९. कुलकर्णी व्ही. वाय., माथाडी कामगार कायदा–एक दृष्टिक्षेप, पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००.

१०. कुलकर्णी एस. आर., कामगार चळवळ–काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

११. कोतवाल मनोहर, 'माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१२. कोरपे अप्पा, घुले शंकरराव, अहमदनगर हमाल पंचायतीची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१३. काळबेरे दत्ता (संपादकिय), संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी झालीच पाहिजे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१४. खिमासिया दिनेश, मालकांचे मनोगत, माथाडी मित्र पाक्षिक, मे १९८१.

१५. खांदेवाले श्रीनिवास, जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात श्रमिक संघापुढील संघटनात्मक आव्हाने, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

१६. गिरमे सुरेश, हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय, हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन विशेषांक, फेब्रुवारी २०१२.

१७. घायाळ राजकुमार, शासकीय धान्य गोदामातील हमालांसाठीच्या चळवळीतील संक्षिप्त नोंदी, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१८. चोळके टी. जी., माथाडी कामगार कायदा–एक मूल्यमापन, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१९. जोशी वि. द. हमाल माथाडी कामगार व आरोग्य, पुणे माथाडी मंडळ स्मरणिक, सन २०००.

२०. जोशी मनोहर, स्वयंभू कामगार नेता, रौप्य महोत्सव विशेषांक, सप्टेंबर १९८८.

२१. झावरे शिवाजीराव, 'माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२२. झावरे शिवाजीराव, मुंबई स्थित माथाडी मंडळे व जिल्हा स्तरीय माथाडी मंडळे–एक दृष्टिक्षेप, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२३. डिंगरे चित्तरंजन, माथाडी कायद्याची पार्श्वभूमी, कायदा व अपेक्षित बदल, पुणे माथाडी मंडळ स्मरणिका, सप्टेंबर २०००.

२४. तुंगतकर जयंत, कष्टकऱ्यांसाठी आरोग्याची काळजी, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२५. तुंगारे राजन, गोर गरीब कष्टकऱ्यांचे कैवारी–नारायण मेघाजी लोखंडे, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

२६. तिडके नरेंद, प्रत्येक कामगाराला कायद्याचे संरक्षण हवे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२७. तिडके नरेंद्र, शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन रौप्य महोत्सव विशेषांक, दि. २१ सप्टेंबर १९८८.

२८. देशपांडे दा. गो., माथाडी बोर्डात जाणे–येणे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२९. देशपांडे प. द., हमाल संबंधी कायदे आणि योजना, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

३०. दौंड अविनाश, कामगार चळवळ–काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

३१. धुरट हरिष, विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

३२. धुरट हरिष, मन मनगटात बळ पाहिजे, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन विशेषांक, फेब्रुवारी २०१२.

३३. नारकर प्रभाकर, बाबुराव रामिष्टे–मॅन विथ ए मिशन, मा. बाबुराव रामिष्टे षष्ठ्यद्विपूर्ती विशेषांक, सन २०१२.

३४. निंबाळकर अजित, माथाडी कायदा–असंरक्षित कामगारांसाठी एक वरदान, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९४४.

३५. पटेल शांती, स्वातंत्र्यपूर्व व नंतरची कामगार चळवळ, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

३६. पाटील अण्णासाहेब, ‘माथाडी कामगार चळवळ’, किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई तपपूर्ती स्मरणिका, १९७९ (पुनर्मुद्रित)

३७. पाटील अण्णासाहेब, नाशिक जिल्ह्यातील असुरक्षित कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळावे म्हणून माथाडी युनियनची नाशिक जिल्ह्याकडे धाव, माथाडी मित्र पाक्षिक, मे. १९८१.

३८. पाटील उदय, माथाडी कायद्याने आमुलाग्र बदल घडविला, पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००.

३९. पाटील वसंत दादा, शुभसंदेश, रौप्य महोत्सव विशेषांक, दि. २० सप्टेंबर १९८८.

४०. पाटील राजाराम, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र पाक्षिक, मे, १९८१.

४१. पाटील रामचंद्र (संपादकीय), पुणे माथाडी मंडळ–२० वा वर्धापन दिन स्मरणिका, सन २०००.

४२. बाबू बाळकृष्ण, भुजबळ विलास, माथाडी मंडळाकडून अपेक्षा, पुणे माथाडी मंडळ स्मरणिका, सन २०००.

४३. भागवत टी. आर., सल्ला कामगारांना आणि व्यापाऱ्यांनाही, माथाडी मित्र विशेषांक, १९८१.

४४. भिलारे ज्ञानेश्वर, कामगार चळवळ–काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

४५. मारुती विश्वासराव, 'कामगार चळवळ मजबूत करण्यासाठी श्रमशक्तीच्या एकजुटीची गरज', ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी, २०१२.

४६. मेहता अरुण, माथाडी मंडळाची शिखर संस्था झाली पाहिजे, हमाल मापाडी वार्ता– माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

४७. मोरे अंकुश, पुणे माथाडी मंडळ स्मरणिका, सन २०००.

४८. यादव दादू नारायण, अण्णासाहेब पाटील एक विशाल शक्ती होती, माथाडी मित्र पाक्षिक, दि. २३ मार्च १९८५.

४९. रामिष्टे बाबुराव हरि, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, 'माथाडी कामगार संघटना', रौप्य महोत्सवी वाटचाल, सप्टेंबर १९८८.

५०. रामिष्टे बाबुराव, पुणे माथाडी मंडळ, स्मरणिक, सन २०००.

५१. शेलार नामदेव, भारतीय कामगार चळवळीचे जनक–नारायण मेघाजी लोखंडे, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

५२. शिंदे यशवंतराव, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र विशेषांक, १९८१.

५३. साळुंखे अरुण, पाठीवर किती ओझे घ्यावे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

**७)राज्यघटनेतील तरतूदी व केंद्र शासनाचे कायदे ,अहवाल व प्रकाशने :**

१. आंबेडकर भिमराव (अध्यक्ष, मसुदा समिती), भारतीय राज्य घटना.

२. Government of India Act, No.9/1948, The Dock Workers (Regulations of employment) Act, 1948, Dt. 4th March, 1948.

३. Government of India, Industrial Disput Act, 1947, Act No. 14/1947, Dt. 11th March 1947.

४. Government of India, Industrial Disput (Labour Appellate Tribunal) Act, 1950, Dt. 20 May 1950.

५. Government of India Act,The unorganized Workers Social Security Act, 2008.

६. Government of India Act,Building and Other onstructionWorkers(Regulations of Employment) Act, 1996.

७. Indian Industrial Commission Report, 1916.

८. Indian Labour Year Book, 2011.

९. Letter by Mr.S.N.Jariya,Labour Minister,Government of India to Mr.Narayan Rane,Chief Minister,Maharashtra dt.30 Auguest 1999

१०. Report of National Commission on Labour, 1999, Dt. 15. 10.1999.

११. Report of National Commission for Enterprises in the unorganized sector, Dt. 7.7.2007.

## ८)महाराष्ट्र शासनाचे कायदे ( प्रकाशित )–

१.महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.

२.महाराष्ट्र घरेलू कामगार अधिनियम, २००८

## ब) दुय्यम साधने:

### १) पुस्तके ( प्रकाशित ) मराठी :

१. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., 'भारतीय कामगार समस्या', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९७९.

२. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०११.

३. कोरपे अप्पा, मी तो हमाल, रुपाली प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, १९९२.

४. गुप्ते वि. प., कामगार चळवळ, एस. एम. जोशी, सोशेलिस्ट फाऊंडेशन व नानासाहेब गोरे ॲकॅडमी, प्रथमावृत्ती, १९९७.

५. पाटील व्ही. पी., 'दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील', जयजगदीश प्रकाशन, कराड (सातारा), सप्टें १९९८.

६. प्राची, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८ ते १९२०), प्राची प्रकाशन, मुंबई, द्वितीय आवृत्ती, २००८.

७. भेंडे सुभाष, मराठी विश्वकोश, खंड–३.

८.

## २) अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध(मराठी) :

१) देशपांडे लक्ष्मीकांत, 'नागपूर शहरातील माथाडी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास' राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर.

२) शेंडगे द. भ., सातारा शहरातील माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा अभ्यास, यशवंतरावजी चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## ३) वर्तमान पत्रे :

१. दैनिक पुण्यनगरी

२. दैनिक लोकमत

३. दैनिक सकाळ

४. Indian Express

५. Nagpur Times

## ४) वेबसाईटस् :

१. www.marathivishwakosh.in dt.5/7/2012

२. www.history.com dt.13/2/2014

३. www.britannica.com dt.13/2/2014

४. www.planningcommission.nic.in 15/03/2014

५. www.gov.in 15/3/2014

६. www.umed.in 15/3/2014

५) दृक–श्राव्य माध्यमे :

१. दूरदर्शन चॅनेल–मी माझा, पाटील नरेंद्र यांची मुलाखत, श्रेया (मुलाखतकार), नवी मुंबई.

२. मराठी चित्रपट, अण्णासाहेब पाटील–दि ग्रेट माथाडी, राजश्री पाटील (निर्माती),सन २०११.

दुय्यम साधने– (प्रकाशित) इंग्रजी :

१. Davala Sarath (Editor), Unprotected Labour in India – Issues and concerns, Friedrich Elbert Stiffing (Indian Office), Delhi, 1994.

२. Punekar S. D., Deodhar S. B., Sankran Saraswati, Labour Welfare Trade Unionism and Industrial Relations, Himalaya Publishing House, Bombay, 1978.

मुलाखती :

१. आढाव बाबा, माथाडी कामगार नेते, दि. ८ मार्च २०१४.

२. गावित राजेंद्र, विद्यमान कामगार राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुलाखत, दि. ३ मार्च २०१४.

३. गुप्ता कविता (भा.प्र.से.), कामगार विभागाच्या माजी प्रधान सचिव, मुलाखत. एप्रिल २०१४.

४. दाभाडे गुलाबराव, अध्यक्ष, धुळे–नंदुरबार माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, धुळे, . एप्रिल २०१४.

५. मुश्रीफ हसन, विद्यमान कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुलाखत, दि. ४.३.२०१४.

# प्रकरण १ ले

# महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळ– पार्श्वभूमी व संशोधन पध्दती

## १.१ प्रस्तावना :

विविध प्रकारचा माल किंवा जड वस्तू माथ्यावरुन म्हणजेच डोक्यावरुन वाहून नेणाऱ्या व अशा प्रकारची इतरही अनुषंगिक कामे करणाऱ्या अकुशल कामगारास माथाडी कामगार म्हणतात.[१] मालाच्या वाहतुकीसाठी ते माथ्याबरोबरच पाठीचाही प्रामुख्याने वापर करतात. घाऊक व किरकोळ बाजार, वेगवेगळ्या प्रकारची गोदामे, रेल्वेतील मालधक्का, कृषी उत्पन्न बाजार समिती इत्यादी ठिकाणी ते वाहतुकीची कामे करतात. या माथाडी कामगारांना पूर्वी हमाल, घाटी किंवा गडी म्हणूनच संबोधले जात असे.[२] तसेच त्यांना अत्यंत तुच्छतेची वागणूक व्यापारी मालक देत. त्यांना हे माल वाहतुकीचे काम रोजच्या रोज मिळत नसे. मजूरीदेखील खूप कमी मिळत असे. त्यांना सामाजिक,आर्थिक अशी कोणतीच सुरक्षितता नव्हती. या कामगारांनी संघटित होवून आपल्या न्याय मागण्या मांडण्यास सुरुवात केल्यानंतर सन १९६२ पासून त्यांना श्री. अण्णासाहेब पाटील यांनी 'माथाडी कामगार' हे नाव दिले.[३] हमाल या संबोधनात एक प्रकारची तुच्छता, हीनता जाणवते. व्यापारी जेव्हा या कामगारांना हाक मारत तेव्हा हीच तुच्छतेची भावना त्यांच्या बोलण्यातून येत असे. या कामगारांना कोणतीही सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. माथाडी नावामुळे या कामगारांमध्ये एक प्रकारची आत्मसन्मानाची भावना निर्माण झाली. हमाल, गडी या शब्दातून येणारी तुच्छतेची, हीनतेची वागणूक आपोआप कमी झाली. माथाडी कामगार आता मानाने जगत आहेत.[४]

### १.१.१ पार्श्वभूमी :

माथाडी कामगार व्यापाऱ्यांकडे येणारा विविध प्रकारचा माल ट्रक, रेल्वे, गोदीतून उतरवणे, त्याची थप्पी लावून रचणे आणि व्यापाऱ्यांकडील विक्री झालेला माल वाहतूकीसाठी वाहनात चढविणे तसेच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अंगमेहनतीने नेण्याचे काम करतात.[५] कामाच्या स्वरुपानुसार काही कामगार एकत्रित येऊन काम करतात किंवा मुकादमाच्या देखरेखीखाली टोळी

पध्दतीने काम करतात. विकसित देशात ही कामे प्रामुख्याने यंत्राद्वारे होतात. भारतात देखील आता कन्व्हेअर बेल्ट, पोती शिवणारी स्वयंचलित यंत्रे, क्रेन यांचा वापर मोठ्या उद्योगांमध्ये सुरु झाला आहे.[६] भारतासारख्या विकसनशिल देशात ही कामे कामगारच करतात. येथे मोठ्या प्रमाणात आणि स्वस्त मजूरीवर उपलब्ध असणारे मनुष्यबळ वापरणे व्यापाऱ्यांना व उद्योगधंद्यांना फायद्याचे ठरते. यंत्राद्वारे वाहतुकीसाठी सुरुवातीला मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागते, तशी या माथाडी, हमाल मजूरांसाठी कोणतीही गुंतवणूक करावी लागत नाही.

प्राचीन काळी देखील दास वर्ग अंगमेहनतीने मालाची व इतर वाहतूक करत असे. भोयी लोक मेणे आणि पालख्यांतून माल तसेच राजेरजवाडे, त्यांचे कुटुंबियांना एका ठिकाणाहून दुसरीकडे नेत. चाकाचा शोध लागल्यानंतर जसजशी वाहतूक साधनांत प्रगती होत गेली, तशी माणसांकरवी अंगमेहनतीने वाहतूकीची पध्दत कमी होत गेली. तरी देखिल माणसांकरवी होणारी वाहतूक काळजीपूर्वक व मालाला कोणतीही हानी न पोहोचवता तसेच स्वस्त दराने होत असल्याने त्याचा वापर सुरुच आहे.[७] यंत्राने मालवाहतूक करणे सर्वच व्यापार व्यवसायात शक्य नसते. आलेला माल गोडाऊनमध्ये तळघरात किंवा पोटमाळ्यावर नेवून रचून ठेवणे, ग्राहकांच्या मागणीनुसार तळघरातील किंवा पोटमाळ्यावरील माल वाहनात भरणे, बाजारपेठेतील एका व्यापाऱ्याकडील माल तिथल्याच दुसऱ्या व्यापाऱ्याकडे पोहचवणे, दवा बाजारासारख्या बाजारातील औषधांचे काळजीपूर्वक पॅकिंग करणे व ते नाजूकपणे आणि काळजीपूर्वक हाताळणे, पालेवाल्या महिला कामगारांचे धान्य निवडीचे काम, मोठ्या बोटीतील माल कधीकधी छोट्याबोटीत भरुन किनाऱ्यावर आणने अशा ठिकाणी यंत्राने काम करणे शक्य नसते, ही वाहतूक माणसांकरवीच करावी लागते. जीवनावश्यक वस्तूंच्या वितरण व्यवस्थेत अद्यापही मानवी घटकालाच महत्त्व आहे; कारण अशा मालाची काळजीपूर्वक चढ–उतार आणि ने–आण करणे हे काम माणसांमार्फतच करावे लागते. त्यामुळे ही कामे करणाऱ्या माथाडी–हमालांची वितरण व्यवस्थेतील भूमिका महत्त्वाची आहे. ब्रिटिश काळात औद्योगिकीकरणाला चालना मिळाली. भारतातला कच्चा माल बोटीने इंग्लंडला नेणे व तेथून तयार केलेला पक्का माल भारतात आणणे, यातून प्रचंड नफा कमविणे हे ब्रिटीशांचे तत्त्व होते.[८] युरोपिय व्यापारी कापूस,

नीळ, तलम, कापड आणि प्रामुख्याने मसाल्याचे पदार्थ इ. वस्तू भारतातून घेवून जात आणि भारतात सुती कपडे व इतर तयार वस्तू आणून विकत. फ्रेंच, पोर्तुगीज, ब्रिटीश यांपैकी फ्रेंच आणि पोर्तुगीज भारतातील काही ठराविक भागातच व्यापार आणि राजकीय सत्ता स्थापन करु शकले. मात्र ब्रिटीशांनी भारताच्या बहुतांश भागात आपला व्यापार आणि राजकीय सत्ता निर्माण केली. त्याकाळी युरोपिय देशांशी व्यापारासाठी जलवाहतूक हा स्वस्त आणि प्रमुख व्यापाराचा मार्ग होता. तसेच देशातील प्रमुख बंदरे ब्रिटीशांकडेच होती. ब्रिटीशांनी मुंबई शहर वसवून मुंबई बंदर विकसित केले. या व्यापाराचे महाराष्ट्रातील प्रमुख केंद्र मुंबईत होते. मुंबईत या मालाची चढ–उतार करण्यासाठी प्रमुख्याने गोदीमध्ये व व्यापाराचे ठिकाणी माथाडी कामगार काम करत. वाडी बंदर, दाना बंदर, भट बाजार, चिंच बंदर या परिसरात काम करणाऱ्या माथाडी कामगारांची संख्या तुलनेने जास्त होती.[९] मुंबईतील व्यापाराची ही प्रमुख केंद्र होती. परदेशातून येणारा माल या भागात उतरवून घेवून पुढे तो मागणीनुसार सर्वत्र वितरीत केला जाई. तसेच परदेशात पाठवायचा माल येथे आणून बोटीने पाठवला जाई. त्यामुळे साहजिकच हमाल–माथाडींची संख्या या परिसरात एकवटलेली होती. घाटावरुन सातारा, सांगली, कोल्हापुर, पुणे, धुळे, अहमदनगर इत्यादीजिल्ह्यातून हे कामगार मुंबईत येत.[१०] मुंबईत अत्यंत अपुऱ्या सोयी सुविधांसह व कमी वेतनावर ते काम करत. याकामगारांना गावी शेती व रोजगाराचे इतर साधन नसे किंवा अत्यंत कमी आणि कोरडवाहू शेती असे. यातून मिळणाऱ्या कमी उत्पन्नात कुटुंबाचे पालनपोषण करणे शक्य होत नसे. या कामगारांची शरीरयष्टी मजबूत असे, कष्ट करण्याची तयारीही होती. त्यामुळे कामाच्या शोधात ते मुंबईला येत. गावाकडून आलेल्या अगोदरच्या मित्र, नातेवाईकाच्या मदतीने मिळेल ते हमालीचे काम, मिळेल त्या मजूरीवर करत. तसेच तुटपुंज्या मजूरीचा कमीत कमी भाग स्वत:साठी वापरुन उरलेला जास्तीत जास्त भाग गावी असलेल्या कुटुंबासाठी पाठवत. हे कामगार मुंबई शहरात विखूरलेले होते. या कामगारांनी सन १९६० ते सन १९७० च्या दशकात एकत्र येवून लढा दिला. त्या लढ्याची शासनाला दखल घ्यावी लागली.[११] योग्य वेतन, मुलभूत सोयी सुविधा या माथाडी कामगारांनी संघर्षाअंती मिळविल्या. मात्र आता देखील संघर्ष सुरुच आहे. बदलत्या परिस्थितीत मिळालेल्या सोयी सुविधा टिकवून ठेवणे

आणि अधिक चांगल्या सोयी सुविधा  मिळवणे यासाठी हा संघर्ष सुरु आहे. महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा एकूणच भारतीय कामगार चळवळीत महत्त्वपूर्ण वाटा आहे. या माथाडी कामगारांच्या लढ्याचा इतिहास व त्यातील विविध घटकांच्या योगदानाची मांडणी प्रबंधात केली आहे. प्रस्तुत प्रकरणात माथाडी कामगार चळवळीची पार्श्वभूमी आणि या विषयीच्या संशोधनासाठी वापरलेली संशोधन पध्दती, संदर्भ साहित्य इत्यादीचा आढावा घेतलेला आहे.

### १.१.२  कामगार आणि कामगार कायदे :

कामगार हा कोणत्याही राज्य व्यवस्थेचा आणि आर्थिक व्यवस्थेचा अविभाज्य आणि महत्वपूर्ण घटक आहे. या घटकाचे देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीत अत्यंत महत्वाचे स्थान आहे. तथापि राज्यकर्ते, व्यापारी, कारखानदार, भांडवलदार यांचेकडून हा दुर्बल घटक नेहमी दूर्लक्षित राहतो किंवा दूर्लक्षित केला जातो. त्याची पिळवणूक केली जाते आणि त्यातून नफ्याचे प्रमाण वाढविले जाते.[१२] त्याला आवश्यक सोयी–सुविधा, विशेषत: पुरेसे वेतन, भत्ते दिले जात नाहीत. कामाच्या ठिकाणी आवश्यक सोयी सुविधा दिल्या जात नाहीत. सामाजिक सुरक्षितता, आरोग्यविषयक सुविधा दिल्या जात नाहीत. व्यवसाय अथवा उत्पादन प्रकियेत आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सर्वात दुर्बल घटक कामगार असल्यामुळे कामगारांचेच शोषण होते. यामध्येही महिला आणि बाल कामगारांचे सर्वाधिक शोषण होते. अशा वेळी आपले हक्क मिळविण्यासाठी कामगारांना एकत्र येवून लढा द्यावा लागतो. सुरुवातीला ब्रिटिशांनी उद्योगांसाठी पुरेसे आणि नियमित कामगार मिळावे व उद्योग व्यवस्थित सुरु राहावा, त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण व्हावे या हेतूने कामगार कायदे केले.[१३] सन १८६० मधील वर्कस मेन ब्रीच ऑफ कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट कायद्यानुसार काम सोडून जाणाऱ्या कामगाराला शिक्षा देण्याची तरतूद होती. या कायद्यानुसार कामगारांना काम सोडणे, संप करणे या गोष्टी करण्यास मज्जाव होता. मात्र त्यांचे गाऱ्हाणे ऐकणे व समस्या सोडविण्यासाठी कोणतीही यंत्रणा नव्हती.[१४] या कायद्याच्या तरतूदी पाहता तो पूर्णपणे मालक वर्गाच्या हितासाठी केलेला कायदा असल्याचे दिसून येते. कामगारांना त्यांचे शोषणाची जाणीव होऊ लागली आणि त्यांनी एकत्र येवून संप, निदर्शने इत्यादी माध्यमातून मागण्या मांडल्या.

अशा लढ्यातून ब्रिटीशांनी तसेच स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्य शासनाने कामगारांसाठी अनेक कामगार कायदे केले आहेत. त्यापैकी मुख्य म्हणजे कारखाने अधिननियम १८८१, श्रमिक संघ अधिनियम १९२६, वेतन प्रदान अधिनियम १९३६, औद्योगिक विवाद अधिनियम १९४७, कारखाना अधिनियम १९४८, किमान वेतन अधिनियम १९४८, बोनस प्रदान अधिनियम १९६५, प्रसुती लाभ अधिनियम १९६१ इत्यादी आहेत.[१५] यातील महत्त्वाच्या अधिनियमांची यादी परिशिष्ट १ मध्ये जोडली आहे.

प्रचलित कामगार कायदे अस्तित्वात असले तरी त्यांचा बहुतांश लाभ हा कारखाने व आस्थापनांमध्ये संघटितरित्या काम करणाऱ्या कामगारांना होतो. हे कामगार एकत्रित काम करत असल्यामुळे त्यांचे कामाच्या परिस्थितीबाबत, वेतनाबाबत, त्यांचेवर होणाऱ्या अन्यायाबाबत ते एकत्र येवून सहजपणे चर्चा करतात. यातून त्यांना त्यांचेवरील अन्यायाची जाणीव होते तसेच त्या विरुध्द लढण्याची स्फूर्ती मिळते. एकूण कामगार संख्येच्या फक्त ८% कामगार संघटीतरित्या काम करतात तर ९२% कामगार असंघटीत आहेत.[१६] या असंघटीत कामगारांना रोजंदारीवर काम करावे लागते. मजूरी कमी दिली जाते, कामाची नियमित उपलब्धता आणि शाश्वती नसते, कोणत्याही प्रकारची सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक सुरक्षितता नसते. मग असे घटक त्यांचे कामाचे स्वरुपानुसार एकत्र येऊन लढा देतात व विविध सोयी सुविधा मिळविण्यासाठी विविध कायदेशीर तरतूदी, योजना आणि कामगार कायदे करुन घेतात.[१७] सुरुवातीचे कामगार कायदे प्रामुख्याने कारखान्यातील किंवा मोठ्या संख्येने कामगार असणाऱ्या आस्थापनातील कामगारांसाठीच केले गेले. असंघटीत अशा विखुरलेल्या स्वरुपात काम करणाऱ्या कामगारांसाठी, त्यांच्या कामाचे स्वरुप आणि गरजा लक्षात घेऊन कायदे केलेले नव्हते. या कामगारांपैकी माल वाहतुकीचे काम करणाऱ्या कामगारांनी एकत्र येवून त्यांचे कामाचे स्वरुप आणि गरजा लक्षात घेवून स्वतंत्र कायद्याच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षिततेची मागणी केली, त्यासाठी लढा दिला.[१८] अशा प्रकारे एकत्र येऊन स्वतंत्ररित्या कायदा पास करुन घेणारी माथाडी कामगार चळवळ ही एक देशातील प्रमुख कामगार चळवळ आहे.

ब्रिटीश राजवटीत औद्योगिकीकरण होऊन उद्योगांना चालना मिळाली आणि त्याचबरोबर पारंपरिक व्यवसाय व हस्तव्यवसाय बुडाले आणि ब्रिटीशांच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारे व्यवसाय उदयास आले. त्यानुसार भारतातील कच्चा माल इंग्लंडला नेणे व तेथील पक्का माल आणून भारतात विकणे व नफा कमविणे हा ब्रिटीशांचा प्रमुख उद्देश होता.[१९] मुळात ब्रिटीश आणि अन्य युरोपिय देश भारतात व्यापाराच्या उद्देशानेच आले. व्यापाराला पोषक रहावे म्हणून त्यांनी येथे ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी सारख्या कंपनीच्या माध्यमातून व्यापारा बरोबरच राजकिय सत्ता स्थापन करण्यासही सुरुवात केली. राजकिय सत्ता स्थापन केल्यावर कच्च्या व पक्क्या मालाच्या वाहतुकीसाठी बंदरे विकसित केली. मद्रास, कलकत्ता आणि बॉम्बे (आताचे मुंबई) ही यापैकी प्रमुख बंदरे होत. तत्कालीन मुंबई हे बेट होते, त्याचा बंदर म्हणून आणि शहर म्हणून विकास इंग्रजांनी केला. मुंबई गोदीची स्थापना सन १८७५ मध्ये करण्यात आली. या मुंबई बंदरावर परदेशात जाणारा कच्चा माल बोटीवर चढविणे आणि परदेशातून आलेला पक्का माल बोटीतून उतरवून विक्रीसाठी भारतातील शहरांमध्ये पोहोचविणे यासाठी माथाडी, हमाल कामगारांचे गोदीच्या परिसरात साधारणत: एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी एकत्रीकरण झाले. इंग्रज तसेच अन्य व्यापारीही जास्तीत जास्त नफा मिळविण्यासाठी या गोदी कामगारांची पिळवणूक करत. त्यांचेकडून जास्तीत जास्त मालाची वाहतूक करुन घेत आणि त्यांना कमी मजूरी देत. इतर कोणतेही सामाजिक सुरक्षेचे फायदे त्यांना मिळत नव्हते. यासाठी मुंबईतील गोदी कामगारांनी पगारवाढ, बोनस, वाढीव महागाई भत्ता इ. मागण्यांसाठी २० जानेवारी १९२० रोजी संप केला.[२०] १५ दिवसानंतर तडजोड होवून गोदी कामगारांच्या पगारवाढ, बोनस इ. मागण्या मान्य झाल्या आणि हे गोदी कामगार पुन्हा कामावर रुजू झाले. त्यानंतर पुन्हा मुंबईतील गोदी कामगारांनी विविध मागण्यांसाठी २४ डिसेंबर १९४७ पासून संप सुरु केला. हा संप ४७ दिवस चालला. यातून डॉक वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट) ॲक्ट,१९४८ हा कायदा पास झाला.[२१] या कायद्यामुळे गोदीतील कंत्राटी कामगार पध्दत रद्द झाली. तसेच या कामगारांसाठी कल्याणकारी योजना लागू करण्यात आली. हे गोदीतील हमाल माथाडी कामगारांचे मोठे यश होते. हा गोदीमधील हमाल माथाडी कामगारांचा मोठा विजय होय. श्री. मनोहर

कोतवाल या कामगार नेत्यानी गोदी कामगारांसाठीच्या या योजनेचे प्रारुप तयार केले. मुंबईतील माथाडी कामगारांनी देखिल सन १९६० ते १९७० च्या दशकात एकत्र येवून राज्य शासनाकडे गोदी कामगारांसाठीच्या,'डॉक वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट) ॲक्ट'या कायद्यासारखा माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी केली. शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुन महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ हा कायदा पारित करुन घेतला.[२२] माथाडी कायद्यानुसार या कष्टकरी कामगारांसाठी कल्याणकारी मंडळे स्थापन करण्यात आली. या मंडळांच्या माध्यमातून या कामगारांना पुरेसे वेतन, नियमित व शाश्वत रोजगार, पगारी रजा, भविष्य निर्वाह निधी, उपदान व अन्य सोयी-सुविधा इत्यादी लाभ दिले जातात. यातून या हमाल माथाडी कामगारांना आर्थिक व सामाजिक स्थैर्य लाभले आहे.[२३] अनिश्चित, हीन दर्जाचे जीवन एकेकाळी जगणारा माथाडी कामगार या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे आज सन्मानाने जगत आहे.

## १.२ संशोधनाचा विषय :

महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा (सन १९६० ते सन २०१०) अभ्यास करणे हा संशोधनाचा विषय होय. महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमामुळे प्रथमच प्रचलित कामगार कायद्यांच्या व्याख्येत न बसणाऱ्या माथाडी कामगारांसारख्या असंघटीत कामगारांनाही सामाजिक सुरक्षितता मिळाली, हे या अधिनियमाचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे.[२४]या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे हे अभ्यासकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. माथाडी हमाल कामगारांची संख्या पूर्वीपासूनच मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात आहे. राज्याच्या इतर जिल्ह्यात ही संख्या तुलनेने कमी होती. त्यामुळे मुंबईमधील हमाल-माथाडी कामगारांनी सर्वप्रथम एकत्र येवून स्वतंत्र कायदा आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी संघर्ष केला. त्यामुळे मुंबई परिसरातच या कायद्याच्या अंमलबजावणीला सर्वप्रथम सुरुवात झाली.[२५] हळूहळू राज्यातील सर्वच जिल्ह्यामध्ये माथाडी हमाल कामगारांचे संघटन झाले आहे. त्यांनी या कायद्याच्या

अंमलबजावणीसाठी संघर्ष सुरु केला. माथाडी कामगार चळवळीच्या या घटनांचा व कार्याचा अभ्यास करणे, हा संशोधनाचा विषय शासन, माथाडी कामगार संघटना, या विषयाचे अभ्यासक, शासकीय अधिकारी अशा सर्व समावेशक स्तरावर मांडणे हे ध्येय आहे. माथाडी कामगारांची चळवळ ऐतिहासिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून दुर्लक्षित राहिली आहे. माथाडी कामगार चळवळ म्हणजे अशिक्षित, असंघटीत, गरीब कामगारांनी अन्यायाविरुध्द केलेला संघर्ष आहे. हे कामगार कधीही संघटना बांधू शकणार नाहीत असे व्यापाऱ्यांना वाटत होते. मात्र माथाडी कामगारांनी एकत्र येवून संघर्ष सुरु केल्यावर व्यापाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली. मालक व राज्यकर्ते या सारख्या संपन्न, संघटीत व सुशिक्षित घटकांविरुध्द त्यांना संघर्ष करावा लागला आहे.[२६] हा संशोधन प्रबंध भावी पिढी व समाजाला तसेच इतर असंघटीत कामगारांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरावा.

## १.३ संशोधनाचे महत्व :

सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील एकुण कामगारांची संख्या ४०.२२ कोटी आहे. त्यापैकी ३७.४४ कोटी कामगार असंघटीत आहेत. महाराष्ट्रातील एकुण कामगार संख्या ४.१२ कोटी आहे. त्यापैकी ३.८० कोटी असंघटीत क्षेत्रात काम करतात.[२७] म्हणजेच एकुण कामगार संख्येच्या ९२% कामगार असंघटीत आहेत. या असंघटीत कामगारांपैकीच एक घटक माथाडी कामगार आहे. या माथाडी कामगारांनी प्रतिकूल परिस्थितीत व्यापारी, कारखानदार,विविध उद्योगधंद्यांचे मालक आणि शासनाविरुध्द लढा दिला. त्यामुळे महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ हा स्वतंत्र अधिनियम शासनाला पारित करावा लागला. या अधिनियमामुळे माथाडी कामगारांना कायदेशीर सामाजिक सुरक्षितता मिळाली. या कामगार चळवळीचा लढा घरेलू कामगार, इमारत व इतर बांधकाम कामगार, सफाई कामगार, काच–पत्रा–भंगार वेचणारे कामगार, रिक्षा चालक इत्यादी असंघटीत कामगारांसाठी मार्गदर्शक ठरत आहे. आता लोकप्रतिनिधी व कामगार नेते माथाडी कामगार मंडळाच्या धर्तीवर इतर असंघटीत

कामगारांसाठी कल्याणकारी मंडळाची निर्मिती करण्याची मागणी करत आहेत.[२८] माथाडी कामगार व त्यांचे नेते यांची लढाऊ वृत्ती व त्यांनी आतापर्यंत केलेला तसेच सद्यस्थितीत करत असलेला संघर्ष हा इतर असंघटीत कामगारांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. भारतातील इतर राज्ये देखील या अधिनियमाचा अभ्यास करुन अशा कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबवित आहेत.[२९] त्यामुळे महाराष्ट्रातील या माथाडी कामगारांच्या चळवळींचा सर्वसमावेशक इतिहास महत्वपूर्ण ठरतो. या सर्व बाबींमुळे या संशोधन विषयाचे महत्व अधिक आहे.

## १.४ संशोधनाची गृहितके :

१. महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ हा स्वतंत्र भारतातील असंघटीत व असुरक्षित तसेच विखुरलेल्या स्वरुपात, निश्चित एका मालकाकडे काम न करणाऱ्या माथाडी कामगार या घटकासाठी स्वतंत्रपणे तयार केलेला पहिलाच कायदा आहे.

२. असंघटीत, असुरक्षित अशा एका स्वतंत्र कामगार वर्गासाठी गरजेनुसार वेगळा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.

३. माथाडी कामगारांची चळवळ व त्यांचे यश अन्य असंघटीत कामगारांसाठी महत्वपूर्ण व मार्गदर्शक आहे.

४. माथाडी कामगारांनी आणि कामगार नेत्यांनी माथाडी अधिनियमाची निर्मिती व त्याच्या राज्यभर अंमलबजावणीसाठी चळवळीच्या माध्यमातून महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

५. माथाडी अधिनियम आणि माथाडी मंडळांमुळे माथाडी कामगारांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळाली.

६. माथाडी अधिनियम आणि माथाडी मंडळामुळे व्यापारी आणि उद्योगधंद्यांना नियमित आणि निश्चित स्वरुपात माथाडी कामगारांची सेवा उपलब्ध झाली.

७. मालवाहतूकीतील यांत्रिकीकरणामुळे माथाडी कामगारांच्या कामावर परिणाम होवू शकतो, त्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे

## १.५ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकऱ्यांचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ दिनांक ५.६.१९६९ रोजी मा. राष्ट्रपतींकडून मंजूर झाला.[३०] त्यासाठी साधारणत: सन १९६० पासुन माथाडींचे आद्य नेते श्री. अण्णासाहेब पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी माथाडी कामगारांना संघटीत करुन चळवळीला एकसंघ स्वरुप दिले. तसेच श्री. मनोहर कोतवाल आणि डॉ. बाबा आढाव यांनी देखील वारंवार यासाठी पाठपुरावा केला व वेळोवेळी योगदान दिले. महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास हा संशोधनाचा विषय असला तरी भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील कामगार चळवळी, कामगार कायदे, कामगार विषयक शासनाचे धोरण तसेच त्यापुर्वीची माथाडी कामगारांची स्थिती, विशेषत: मुंबई गोदीतील हमालांची स्थिती आणि त्यांनी सन १९२० आणि १९४७ मध्ये केलेला संप, डॉक लेबर बोर्डाची स्थापना, येथेपासून ते १९६९ मधील या अधिनियमाची निर्मिती आणि आता पर्यंत या अधिनियमाची अंमलबजावणीची प्रगती, त्यासाठी केलेला संघर्ष असा सन १९२० ते सन २०१० या कालावधीतील एकूण ९० वर्षाचा आढावा थोडक्यात घेतला आहे. यात कामगार चळवळ विशेषत: भारतातील कामगार चळवळ, महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळ व माथाडी कायदा याचाच अभ्यास प्रामुख्याने घेतलेला आहे.

## १.६ सैध्दांतिक पार्श्वभूमी :

कामगार हा औद्योगिक व्यवस्थेचा आणि अर्थव्यवस्थेचा अविभाज्य, महत्वपूर्ण घटक आहे. परंतु तितकाच तो दूर्लक्षिला जाणारा घटक आहे. आद्योगिकीकरणापासून किंबहुना त्यापुर्वी अनादी कालापासून कामगारांचे शोषण होत आहे. नफ्याचे प्रमाण वाढवून मिळावे या हव्यासापोटी हे शोषण

होत आहे. असंघटीत कामगाराची तर संघटीत कामगारांपेक्षा अधिकच दयनीय अवस्था असते. ते एकत्रित नसतात. सुशिक्षित नसतात. संघर्षासाठी एकत्रित येण्यासाठी त्यांची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक कुवत नसते. अशाच घटकांपैकी एक म्हणजे माथाडी कामगार होत. या माथाडी कामगारांनी महाराष्ट्रात श्री.अण्णासाहेब पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली सन १९६०–७० या दशकात एकत्र येवून लढा दिला. त्या लढ्याचे यश म्हणजे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर असंघटीत कामगार अधिनियम, १९६९ या स्वतंत्र अधिनियमाची झालेली निर्मिती व अंमलबजावणी हे फार महत्वपूर्ण आहे.

माथाडी कामगारांच्या चळवळीत श्री.अण्णासाहेब पाटील, श्री.मनोहर कोतवाल, डॉ. बाबा आढाव, श्री.बापुसाहेब मगदूम, ॲड.काशिनाथ वळईकर, श्री.आनंदराव गोळे,श्री. बाबुराव रामिष्टे, श्री.बळवंतराव पवार, श्री.शिवाजीराव पाटील, डॉ.हरिष धुरट, मराठवाड्यातील श्री.राजकुमार घायाळ या कामगार नेत्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. डॉ.बाबा आढाव यांनी हमाल पंचायतीच्या माध्यमातून उल्लेखनीय काम केले. त्यांनी या अधिनियमाची पुणे जिल्हा व परिसरात अंमलबजावणी होण्यासाठी प्रयत्न केले.श्री.बापुसाहेब मगदूम हे सांगली जिल्हा व परिसरात अंमलबजावणीसाठी कार्य करत आहेत.विदर्भातही या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी तसे प्रयत्न डॉ.हरिष धुरट यांनी केले. तर मराठवाड्यात श्री.राजकुमार घायाळ यांनी माथाडी कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उल्लेखनीय काम केले.

महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन ही संघटना श्री. अण्णासाहेब पाटील यांनी डिसेंबर १९६३ मध्ये नोंदणी क्र. ४५९३/१९६२ अन्वये स्थापन केली.[३१] ही माथाडी कामगारांची पहिलीच संघटना होय. अधिनियमाच्या निर्मिती प्रक्रियेपासूनच या संघटनेने महत्वपूर्ण काम केलेले आहे. नंतरच्या काळात अनेक माथाडी संघटना स्थापन झाल्या आहेत. या विविध माथाडी कामगार संघटनांनी वेळोवेळी या चळवळीला महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. या माथाडी कामगार संघटनांची यादी परिशिष्ट २ येथे दिली आहे.

मालक, शासन यांच्याशी माथाडी कामगारांचा होणारा संघर्ष तसेच संप काळात सर्वसाधारण जनतेला होणारा त्रास या सर्व बाबी माथाडी कामगार चळवळीचा अविभाज्य घटक आहेत. त्या सहन करत माथाडी कामगारांसारख्या असंघटीत, असुशिक्षित कामगारांनी स्वत:च्या सामाजिक सुरक्षिततेसाठी प्रतिकुल परिस्थितीत स्वतंत्र कायदा निर्माण करुन घेणे व त्याची अंमलबजावणी करुन घेणे ही भारतीय कामगार चळवळीतील महत्वपूर्ण घटना होय. याचा इतिहास इतर सर्व असंघटीत कामगार वर्गासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणारा आहे.

## १.७ इतिहास संशोधनाचे प्रकार :

इतिहासातील संशोधन कार्याचे स्वरुपानुरुप सामान्यत: तीन प्रकार आहेत. कोणत्याही ऐतिहासिक घटनेचे किंवा घटनाक्रमाचे संशोधना दरम्यान प्राप्त होणाऱ्या निष्कर्षानुसार मांडणी करणे, प्रचलित इतिहास निष्कर्षांना छेद देवून त्यांचे नवीन पुराव्याच्या आधारे पुर्नलेखन करणे, एखाद्या घटनेबद्दल यापुर्वी झालेल्या संशोधनावर वेगळ्याने प्रकाश टाकून मांडणी करणे, नव्याने संशोधन करणे या आधारे निवेदनात्मक, विश्लेषणात्मक व मूलगामी हे इतिहास संशोधनाचे प्रकार आहेत.[३२]

### १.७.१ कथनात्मक किंवा निवेदनात्मक संशोधन :

एखाद्या घटनेबाबत, प्रसंगाबाबत अगर विषयासंबंधी नवी माहिती, तोवर अज्ञात असलेली माहिती मिळवून ती सूत्रबध्द रितीने वाचकांपुढे मांडणे हा संशोधनाचा पहिला प्रकार होय. ह्याचा मुळ उद्देश गतकालीन अज्ञात बाबींवर प्रकाशझोत टाकणे, गतकालासंबंधीच्या ज्ञानात भर टाकणे, ज्ञानाचे नवे दालन खुले करणे हा असतो. यात नव्या माहितीच्या संशोधनावर व त्याच्या पध्दतशीर सुसंगत मांडणीवर भर असतो.

### १.७.२ विश्लेषणात्मक संशोधन :

एखाद्या विषयासंबंधी नवी माहिती प्रकाशात आणण्याऐवजी उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीचा, ऐतिहासिक साधनांचा नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करुन प्रस्थापित प्रमेयाहून भिन्न प्रमेय

मांडणे हा विश्लेषणात्मक संशोधनाचा उद्देश असतो. उपलब्ध साधनसामुग्रीचे पुर्न:परिक्षण करुन प्रचलित मतापेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा अशा संशोधनाचा प्रयत्न असतो. यात नव्या साधनांच्या शोधाला स्थान नसते. अनेकदा नवी सामुग्री, नवा पुरावा हाती लागल्यामुळे नवे प्रमेय मांडण्यास पुष्टी मिळते. मात्र संपूर्ण भर नव्या पुराव्यांच्या मांडणीवर नसतो. उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकाचा हेतू असतो.

### १.७.३ मूलगामी संशोधन :

मूलगामी संशोधन हे वरील दोन प्रकारांपेक्षा अधिक मौलिक व तात्विक स्वरुपाचे असते. इतिहास विषयाच्या सखोल व प्रदीर्घ चिंतनातून त्याबाबत काही नवे सिध्दांत मांडण्याचा त्यात प्रयत्न असतो. यात उपलब्ध ऐतिहासिक माहितीचा, साधन सामुग्रीचा वापर करण्यात येत असला तरी त्यातून काही सर्वसामान्य मूलगामी सिध्दांत मांडले जातात. त्यामुळे इतिहास विषयाला नवी तात्विक बैठक दिली जाते. अशा संशोधनासाठी केवळ एखाद्या घटनेचा अगर व्यक्तीच्या कार्याचा अभ्यास पुरेसा नसतो तर दीर्घ कालखंडातील घटनाप्रवाहांचा अगर गतकालीन मानवी जीवनाच्या विविध घटकांचा अभ्यास करुन त्यातील अंतस्थ सूत्र उलगडून दाखविण्याचा मूलगामी संशोधकाचा प्रयत्न असतो.

### १.७.४ इतिहासाचे पुनर्लेखन :

एखाद्या ऐतिहासिक घटनेची कारणमिमांसा करताना किंवा त्या घटनेचे स्पष्टीकरण देताना त्या घटनेमागील कारणांची वर्गवारी इतिहासकार करीत असतो. अनेक कारणांमधून एखाद्या कारणाला अग्रक्रम देऊन त्या आधारे कारणांची मालिका तयार करीत असतो. त्यासाठी इतिहासाचे लेखन आणि पुर्नलेखन आवश्यक ठरते. बऱ्याचदा विखुरलेल्या स्वरुपातील माहिती एकत्रित करुन ऐतिहासिक घटना एकसंघ स्वरुपात मांडणे आवश्यक असते. अनेक कारणांमधून एखाद्या कारणाला अग्रक्रम देऊन त्या आधारे कारणांची मालिका तयार करावी लागते. त्यासाठी इतिहासाचे लेखन आणि पुर्नलेखन आवश्यक ठरते. त्यामुळे इतिहास लेखनात वैविध्य येते. इतिहासाच्या अशा

पुर्नलेखनामुळे एकाच गोष्टीकडे पाहण्याचे वेगवेगळे दृष्टिकोन असू शकतात. याचा प्रत्यय येवून दृष्टी व्यापक होते.

एखाद्या घटनेबाबत उपलब्ध असलेले सगळे पुरावे तपासताना त्यातील सर्व दुवे एकाचवेळी हाती येत नाहीत. हा इतिहासाच्या पुर्नलेखनाची शक्यता दर्शविणारा आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. काही दुवे संदिग्ध अगर अस्पष्ट असतात, तर काही ठिकाणी लहानशी पोकळी वाटते. ती भरुन काढणे इतिहासकाराचे काम आहे. काही पुरावे शोध घेण्याच्या प्रक्रियेदरम्यान काही काळाने मिळतात. अशा स्थितीमुळे इतिहासाच्या पुर्नलेखनाला वाव मिळतो. प्रत्येक इतिहासकार आपल्या बौद्धिक व मानसिक क्षमतेनुसार, वैचारिक धोरणानुसार कल्पनाशक्तीच्या मदतीने सुट्टे दुवे सांधतो. अशावेळी तर्कनिष्ठतेचा वापर करावा लागतो. प्रत्येक इतिहासकाराच्या कल्पनाशक्तीचा वापर वेगवेगळ्या प्रकारे होत असल्यामुळे इतिहासाचे पुर्नलेखन करण्यास संधी मिळते.[३३]

### १.७.५ माथाडी कामगार चळवळ–कथनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन :

माथाडी कामगार चळवळ हा संशोधनाचा विषय कथनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन या प्रकारात मोडतो. माथाडी कामगार चळवळीचा उदय व विस्तार, माथाडी अधिनियमाची निर्मिती व अंमलबजावणी, माथाडी अधिनियमात वेळोवेळी झालेल्या सुधारणा या सर्व बाबींशी संबंधित घटना सुसंगतरित्या या संशोधनात मांडण्यात आल्या आहेत. त्यामुळे हे कथनात्मक स्वरुपाचे संशोधन आहे. हे संशोधन करताना यामधील कामगार, मालक, शासन, कामगार नेते यांचे परस्पर संबंधाचे व घटनांचे विश्लेषणही यात करण्यात आले आहे. त्यामुळे काही प्रमाणात ते विश्लेषणात्मकही आहे. त्याचबरोबर कमी प्रमाणात संख्या असणाऱ्या असंघटीत कामगारांसाठी एका राज्याने केलेला हा देशाच्या इतिहासातील पहिलाच कायदा आहे. तसेच, अन्य असंघटीत कामगारांसाठी ही माथाडी कामगार चळवळ प्रेरणादायी व मार्गदर्शक असल्याचे स्पष्ट होत असल्याने हे नवा दृष्टिकोन पुढे आणणारे संशोधन ठरते.

## १.८ संशोधन विषयासंदर्भातील प्राथमिक व दुय्यम साधनसामग्री :

सदर संशोधन करताना ऐतिहासिक, शासकीय व वैयक्तिक दस्ताऐवजांचे संकलन तसेच कामगार, आस्थापना मालक, कामगार नेते, शासकीय अधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. मा. श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री), मा. श्री. राजेंद्र गावित (कामगार राज्यमंत्री), मा. श्री. शशीकांत शिंदे, जलसंपदा मंत्री आणि पूर्वाश्रमीचे माथाडी कामगार मंडळ कर्मचारी, मा. श्री. नरेंद्र पाटील (विधान परिषद सदस्य) तसेच डॉ. बाबा आढाव (पुणे), डॉ. हरिष धुरट (नागपूर), श्री. राजकुमार घायाळ (बीड) इ. कामगार नेत्यांच्या तसेच माथाडी मंडळावर काम केलेल्या सेवानिवृत्त आणि सेवेत कार्यरत असणाऱ्या विविध अधिकाऱ्यांच्या मुलाखतींचा देखील वापर करण्यात आला आहे. संशोधन कालखंडातील महाराष्ट्र माथाडी कामगार युनियनच्या तसेच इतर माथाडी कामगार संघटनांच्या कार्यालयातील जुने दस्ताऐवज, मंत्रालय तसेच कामगार आयुक्त कार्यालयातील जुने दस्ताऐवज, छायाचित्रे, राज्य शासनाने माथाडी कामगारांच्या तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी या कायद्याच्या निर्मिती पूर्वी नेमलेल्या श्री. के. आर. पोवार, श्री. शिवाजीराव पाटील, श्री. बी. एस. कालेलकर यांचे अध्यक्षतेखालील समित्यांचे मूळ अहवाल, विधानमंडळात सदर अधिनियम पारीत करताना झालेल्या या विषयावरील चर्चेचे इतिवृत्त, विविध माथाडी मंडळाचे सन १९७१–१९७२ पासूनचे वार्षिक अहवाल, सन १९६९ मध्ये सदर कायदा झाल्यानंतर त्यांच्या अंमलबजावणीत सुधारणा सुचविण्यासाठी वेळोवेळी राज्यशासनाने नेमलेल्या डॉ. बाबा आढाव, श्री. अजित निंबाळकर, श्री. रत्नाकर गायकवाड, श्री. डी. बी. देव,श्री. दिनकर पगार यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांचे मूळ अहवाल, शासन निर्णय व परिपत्रके, माथाडी कामगार व श्री. अण्णासाहेब पाटील यांचेवरील डॉ. राजश्री पाटील यांनी निर्मिती केलेला दृकश्राव्य चित्रपट, जुनी वर्तमानपत्राची कात्रणे, माथाडी मित्र पाक्षिकाचे अंक, हमाल माथाडी मंडळाचे जुने विशेषांक, श्री. अण्णासाहेब पाटील आणि श्री. बाबुराव रामिष्टे यांचेवरील गौरव अंक, केंद्र व राज्य शासनाचे अहवाल, जर्नल्स, विविध संकेतस्थळे. सेवानिवृत्त व कार्यरत मापाडी कामगार, मालक, पदाधिकारी, अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष केलेली चर्चा व मुलाखती,माथाडी चळवळीची पार्श्वभूमी विषद करणारे श्री. अण्णासाहेब पाटलांवरील श्री. व्ही. पी. पाटील यांनी लिहिलेले ‘दि ग्रेट माथाडी

अण्णासाहेब पाटील' हे पुस्तक, श्री. ज्ञानदेव लक्ष्मण गोळे यांनी लिहिलेले 'निश्चयाचा महामेरु' हे पुस्तक तसेच श्री. आप्पा कोरपे, अहमदनगर यांनी 'मी तो हमाल'या पुस्तकात माथाडी कामगारांची तत्कालीन परिस्थिती,आर्थिक शोषण व माथाडी कायद्यानंतरची परिस्थिती नमूद केली आहे, यांचाही आवश्यकतेनुसार वापर केला आहे.

**१.८.१ आजपर्यंतचे झालेले संशोधन कार्य :**

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची निर्मिती व अंमलबजावणी बाबतचा तसेच,महाराष्ट्रातील माथाडी कामगार आणि एकंदरीत माथाडी कामगार चळवळीचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून संशोधनात्मक अभ्यास पुरेशा प्रमाणात झालेला नाही. मात्र समाजशास्त्राच्या आणि अर्थशास्त्राच्या काही विद्यार्थ्यांनी याविषयी विद्यावाचस्पती अभ्यासक्रमासाठी प्रबंध सादर केलेले आहेत. माथाडी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा तसेच या कायद्यामुळे झालेल्या बदलांचा अभ्यास प्रा. डॉ. लक्ष्मीकांत देशपांडे, नागपूर विद्यापीठ यांनी केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी नागपूर शहरातील माथाडी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास या विषयावर पीएच. डी. साठी नागपूर विद्यापीठास प्रबंध सादर केलेला आहे. त्याचप्रमाणे सातारा शहरातील माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा अभ्यास प्रा. द. भ. शेंडगे यांनी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठास पीएच. डी. साठी सादर केलेल्या प्रबंधात केलेला आहे. तसेच मुंबई येथील समाजकार्य महाविद्यालयाच्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी देखील या माथाडी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनाचा अभ्यास केलेला आहे.

माथाडी कामगार चळवळीशी संबंधित व्यक्तींनी याबाबत वेळोवेळी लिखाण केलेले आहे. माथाडी कामगारांची स्थिती आणि त्यावर आवश्यक उपायोजना याबाबत प्रामुख्याने सदर लिखाण आहे. स्वत: माथाडी कामगार म्हणून काम केलेले माथाडी कामगार नेते श्री. अण्णासाहेब पांडुरंग पाटील यांनी सन १९७९ मध्ये किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबईच्या प्रसिध्द केलेल्या स्मरणिकेत 'माथाडी कामगार व माथाडी कायदा निर्मिती आणि अंमलबजावणी' याबाबत विचार मांडले आहेत. सदर लेख अण्णासाहेब पाटील स्मृती विशेषांक, १९८३,मध्ये पुर्नमुद्रीत केलेला आहे.

तसेच महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या माथाडी मित्र पाक्षिकाचे जुने अंक, माथाडी युनियनचा रौप्य महोत्सवी विशेषांक यामध्ये माथाडी कामगार कायद्याची पार्श्वभूमी, त्यासाठी कामगारांनी केलेली आंदोलने, संप तसेच या कायद्याची निर्मिती आणि अंमलबजावणी याबाबत यामध्ये प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या विविध अधिकारी, पदाधिकारी अणि माथाडी कामगारांनी लेख लिहीले आहेत. माथाडी अधिनियमास २५ वर्षे पुर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर हमाल मापाडी महामंडळ, पुणे यांनी सन १९९४ मध्ये हमाल–माथाडी कायदा विशेषांक प्रसिध्द केला आहे. या हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक १९९४ मध्ये आजीमाजी मंत्री, राज्यमंत्री, विविध पदाधिकारी, अधिकारी, कामगार नेते, वैद्यकिय व्यवसायिक, विधिज्ञ यांनी माथाडी कायदा आणि त्याची अंमलबजावणी व माथाडी कामगारांच्या जीवनावरील त्याचा परिणाम याबाबत आकडेवारी आणि विश्लेषणासह आपली मते नमूद केली आहेत. याचाही वापर सदर संशोधनात करण्यात आला आहे.तसेच पुणे जिल्हा हमाल माथाडी मंडळाने २० व्या वर्धापन दिनानिमित्त सन २००० मध्ये प्रसिध्द केलेल्या स्मरणीकेत देखील या कायद्याच्या अंमलबजावणीचा आढावा कामगार, मालक, अधिकारी यांनी घेतलेला आहे.

### १.८.२ इतर प्राथमिक व दुय्यम संदर्भ साहित्य :

सदर संशोधन करताना प्राथमिक व दुय्यम या दोन्ही स्वरुपाच्या संदर्भ साहित्याचा वापर करण्यात आला आहे. भारतातील कामगार चळवळ व ट्रेड युनियन यांचेशी संबंधित कै. नारायण मेघाजी लोखंडे यांचे जीवनकार्यावर कै. ना. मे. लोखंडे श्रम विज्ञान संस्था, मुंबई यांनी प्रसिध्द केलेला विशेषांक तसेच तेथील उपलब्ध पुस्तके, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, औरंगाबाद, नाशिक, नागपूर येथील उपलब्ध पुस्तके, अहवाल तसेच केंद्र व राज्य शासनाचे आणि विविध माथाडी मंडळांचे वार्षिक अहवाल याचाही वापर करण्यात आला आहे.

## १.९ संशोधन विषयाची प्रकरणानुसार विभागणी :

संशोधकाने खालील प्रकरणे व त्यातील उपघटकांच्या आधारे मांडणी करुन आपली संशोधन प्रक्रिया पूर्ण केली आहे.

**प्रकरण १ : पार्श्वभूमी व संशोधन पध्दती**

या प्रकरणात माथाडी कामगार चळवळीची संक्षिप्त पार्श्वभूमी तसेच या असंघटीत व अशिक्षित कामगारांनी महाराष्ट्र माथाडी कामगार अधिनियम, १९६९ या अधिनियमाच्या निर्मितीसाठी केलेले प्रयत्न व इतर कामगार चळवळीपासूनचे त्यांचे वेगळेपण याचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. तसेच संशोधन विषय, त्याचे महत्व, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, सैध्दांतिक पार्श्वभूमी, संदर्भ साहित्याचा वापर इत्यादीचाही आढावा घेतला आहे.

**प्रकरण २ : कामगार चळवळीची वाटचाल**

या प्रकरणात भारतातील चळवळीचा उदय, महाराष्ट्रातील विशेषत: मुंबईतील कामगार चळवळी आणि त्यातून शासनाने कामगारांसाठी केलेले कायदे यांचा आढावा घेतला आहे. तसेच महाराष्ट्रातील माथाडी कामगारांच्या चळवळीचा उदय व त्यातील विविध घटनाक्रम यांचाही विचार करण्यात आला आहे. माथाडी कामगारांनी केलेल्या चळवळीची शासनाने घेतलेली दखल, शासनाने नेमलेल्या विविध समित्या व त्यांचे अहवाल, हा अधिनियम पारित होताना महाराष्ट्र विधानमंडळाच्या विधानसभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहात झालेली चर्चा यांचा विचार करण्यात आला आहे.

**प्रकरण ३ : महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची निर्मिती व अंमलबजावणी**

या प्रकरणामध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाच्या अंमलबजावणीतील अडचणी, त्यासाठी माथाडी कामगारांनी केलेला संघर्ष, शासनाने केलेले प्रयत्न, व्यापाऱ्यांचा असलेला विरोध, माथाडी मंडळांची राज्यभरात झालेली स्थापना, त्याचा महसूली विभागनिहाय आढावा घेतला आहे. या मंडळांचे स्थापनेच्या वर्षातील स्थिती आणि सध्याची स्थिती याचा मालक व कामगारांच्या संख्येतील वाढ, माथाडी कामगारांना देण्यात येत असलेल्या कल्याणकारी सुविधा, जमा होणाऱ्या लेव्हीच्या रकमेतील वाढ या बाबातच्या संख्यात्मक माहितीच्या

आधारे आढावा घेतला आहे. यातून माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनात झालेला फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण ४ : माथाडी कामगार चळवळीचा माथाडी कामगार आणि मालक व शासन यांचेमधील परस्पर संबंधांवरील परिणाम**

या प्रकरणामध्ये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ ची अंमलबजावणी आणि त्याचे शासन, मालक व माथाडी कामगार यांचे संबंधांवरील परिणाम याचाही विचार केलेला आहे. तसेच या कायद्याच्या अधिक चांगल्या अंमलबजावणीसाठी शासनाने नेमलेल्या विविध समित्या, विविध माथाडी कामगार संघटना व त्यांचे काम, यांत्रिकीकरणाचा माथाडी कामगारांवर झालेला परिणाम, माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान घडलेल्या काही अनुचित घटना व प्रकार या बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

**प्रकरण ५ : मान्यवरांच्या नजरेतून माथाडी कामगार चळवळीची वाटचाल व भवितव्य**

या प्रकरणामध्ये माथाडी अधिनियमाच्या अंमलबजावणीची सद्यस्थिती तसेच, माथाडी कामगार चळवळीशी संबंधित असणाऱ्या मान्यवरांच्या दृष्टिकोनातून आजपर्यंतची माथाडी कामगार चळवळीची वाटचाल, भविष्यातील वाटचाल याविषयी त्यांची मते याचा विचार केलेला आहे.

**प्रकरण ६ : समारोप**

सदर संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष आणि त्या आधारे माथाडी कायद्याच्या अधिक परिणामकारक अंमलबजावणीसाठी काही उपाययोजना याबाबतचे विचार प्रस्तुत प्रकरणात नमूद केलेले आहे. तसेच या विषयावरील भविष्यातील संशोधनाला असणारा वावही स्पष्ट केलेला आहे.

## १.१० महाराष्ट्रातील माथाडी कामगारांची तत्कालीन परिस्थिती :

### १.१०.१ माथाडी कामगारांची तत्कालीन, सामाजिक व आर्थिक परिस्थिती :

बाजारपेठांत, कारखान्यात विविध प्रकारच्या वाहनात मालाची चढ–उतार करणे, मालाची ने–आण करणे असे माथाडी कामगारांच्या कामाचे स्वरुप असते. माथाडी कामगार

शारीरिक कष्टाने ही मालाची चढ–उतार व ने–आण करतात. या कामासाठी शरीरयष्टी मजबूत असणे आणि धडधाकट, ताकतवान असणे आवश्यक आहे. कामगारांमध्ये पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. स्त्रिया अत्यंत कमी प्रमाणात आहेत. त्यात प्रामुख्याने झाडलोट, धान्य निवडणे, पाणी देणे इत्यादी अनुषंगिक कामे करतात. शारीरिक मेहनतीचे काम असल्यामुळे कामगार सरासरी ४५ ते ५० वर्षे वयापर्यंत काम करु शकतात. या कामासाठी ताकद तसेच कौशल्यही आवश्यक आहे.[३४] कमीतकमी ताकदीचा वापर करुन अनुभव कौशल्याच्या जोरावर मोठमोठी ओझी व जड वस्तू माथाडी कामगार वाहतात. राज्यात मुंबई शहरात माथाडी कामगारांची सर्वाधिक संख्या पूर्वीही होती आणि आताही आहे. यामध्ये महाराष्ट्रीयन विशेषत: सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे भागातील बहुसंख्य कामगार आहेत. यांची बोलीभाषा मराठी आहे. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प होते. आता सुशिक्षित कामगार आढळून येतात. ग्रामीण पार्श्वभूमी आणि अशिक्षितता यामुळे कुटुंब नियोजनाचा अभाव होता. बहुतांश माथाडी कामगारांना चार, पाच किंवा त्यापेक्षा जास्त मुले असत. कुटुंब गावी राहत असे. आता मात्र या परिस्थितीत बदल झाला असून बरेच माथाडी कामगार सुशिक्षित आहेत. शिक्षणामुळे कुटुंब नियोजनाचे महत्व पटल्यामुळे कामगारांच्या मुलांची संख्या दोन किंवा तीन आहे. माथाडी कामगार मुंबईमध्ये नातेवाईक, फुटपाथ, गोदाम यापैकी जेथे जागा मिळेल तेथे राहत असत. आता शासनाने माथाडी कामगारांसाठी राबविलेल्या गृहनिर्माण योजनांमुळे तसेच भरवशाच्या व नियमित उत्पन्नामुळे बहुतांश जण आता कुटुंबासोबतच मुंबई अथवा मुंबईच्या उपनगरात राहतात.[३५]

या अधिनियमाच्या निर्मिती व अंमलबजावणीपूर्वी माथाडी कामगारांना महिनाभरात जेवढे दिवस काम मिळेल तेवढ्याच दिवसाची मजूरी मिळत असे. गोडाऊनमधील कमी प्रकाशात व कोंदट वातावरणात काम करावे लागे. गोडाऊनला खिडकी नसे, पिण्याचे पाणी तसेच वैयक्तिक स्वच्छतेसाठी देखील पाणी उपलब्ध नसे. मालाच्या पोत्यावरच बसून जेवण करावे लागे. मालाच्या स्वरुपानुसार त्याचे वजन व कामाचे स्वरुप वेगवेगळे असे. लोखंड बाजारातील कामगारांना लोखंडी सामान एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने–आण करणे, ते सामान ट्रकमध्ये चढविणे व ट्रकमधून

उतरविणे अशी अवजड कामे करावी लागत. तर, दवा बाजारातील कामगारांना औषधाचे काळजीपूर्वक पॅकिंग करणे ती एका ठिकाणाहून दुसरीकडे वाहून नेणे अशी कामे करावी लागत. धान्य बाजारातील कामगारांना १०० किलो वजनाची पोती ट्रक मधून उतरविणे–चढविणे तसेच त्याची ने–आण पाठीवरुन करावी लागे.[३६] यामुळे माथाडी कामगारांना मानेचे, पाठीचे, मणक्याचे आजार होत. १०० किलोचे पोते उचलताना व वाहतानाही अपघाताची शक्यता व तीव्रता जास्त राहते. शास्त्रीय अभ्यासानुसार ५० किलोपेक्षा जास्त वजन उचलणे आरोग्याच्या दृष्टीने चांगले नाही, हितकारक नाही.[३७] यामुळे पाठीच्या मणक्यातील चकत्यांवर प्रचंड ताण येऊन त्या झीजतात तसचे स्लीप डिस्क, स्पॉण्डीलायसीस, सायटीका सारखे आजार होऊन कायम त्रास होत राहतो. पोत्याच्या वजनाची मर्यादा आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या कन्व्हेंशन क्रमांक १२७ आणि १२८ नुसार केंद्र शासनाने ५० किलो केली आहे.[३८] हातगाडी कामगाराला हातगाडीवरुन मालाची ने–आण करावी लागते. या मालाचे ओझे व आकारमान किती असावे याला त्यावेळी कसलीही मर्यादा नव्हती. त्यामुळे माल लवकरात लवकर पोहचावा म्हणुन मालक जास्तीत जास्त माल हातगाडीवर लादत तसेच कामगार देखील अधिक पैसे मिळावे म्हणून कुवतीपेक्षा जास्त माल लादत आणि वाहून नेत. एखाद्या कामगाराच्या अंगावर पोते पडणे, तो कामगारच पडणे अथवा अतिश्रमाने त्याला चक्कर येणे, रक्ताची उलटी होणे असे अपघात होत होते. मात्र काम थांबू नये व आपले नुकसान होऊ नये म्हणुन मालक इतर कामगारांवर ओरडत व अपघात ग्रस्त कामगाराला मदत देखील करु देत नसत. कोणतीही वैद्यकिय वा आर्थिक मदत देत नसत. अपंग झालेल्या कामगाराला गावी पाठवून देत व जबाबदारीतून मोकळे होत असत.[३९]

अशा प्रकारे या माथाडी कामगारांना कोणतीही आर्थिक व सामाजिक सुरक्षितता नव्हती, त्यांची कौटुंबिक स्थिती हालाखीची होती. त्यांना वैद्यकिय सुविधा, नियमित काम व नियमित पगार, पेंन्शन, ग्रॅज्युईटी, प्रॉव्हिडंड फंड, पगारी रजा, घरासाठीची योजना किंवा घरभाडे भत्ता यापैकी कोणत्याच सोयी सुविधा मिळत नव्हत्या. जीवनमानाचा दर्जा अत्यंत निकृष्ट होता.

### १.१०.२ माथाडी कामगारांचे प्रकार :

माथाडी कामगारांच्या कामाचे वेगवेगळे प्रकार आहेत. कामाच्या प्रकारावरुन त्यांना विशिष्ट प्रकारचे माथाडी कामगार म्हणून संबोधले जाते.

क) **वाराई कामगार :** ट्रकमधील माल खाली करणाऱ्या कामगाराला वाराई कामगार म्हणतात. वाराई कामगार ट्रकमधील माल दुसऱ्या हमालाच्या डोक्यावर किंवा खांद्यावर देतो.

ख) **वारफेर कामगार :** गोदामातील माल त्याच गोदामात दुसऱ्या ठिकाणी हलविणे.

ग) **थापी मारणे :**गोदामात किंवा ट्रकमध्ये गोणी व्यवस्थित रचून ठेवणे.

घ) **लोडिंग :**ट्रक, रेल्वे वॅगन किंवा कंटेनरमध्ये माल चढविणे.

च) **अनलोडिंग :**ट्रक, रेल्वे वॅगन किंवा कंटेनरमधून माल उतरविणे.

छ) **पालेवाली :** धान्य बाजारातील जमिनीवर पडलेल्या धान्याला गुजरातीत पाला म्हणतात. या पाल्यामधून धान्य निवडून वेगळे करणाऱ्या महिला माथाडी कामगारांना पालेवाली म्हणतात.

याबरोबरच माल गोणीत भरल्यावर गोणी शिवणे, माल दुकाने किंवा गोदामातील माळ्यावर व पोटमाळ्यावर चढवणे व तेथून उतरवणे, तळघरात साठवणूक असल्यास माल तळघरात घेणे व तेथून परत आणणे इत्यादी कामे करावी लागत. लोखंड बाजारातील कामगारांना मालाची चढ उतार आणि वाहतूकीबरोबरच वजन करणे, एकत्र बांधून बंडल करणे, आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी आणि रचून ठेवण्यासाठी सोयीचे व्हावे म्हणून लोखंड वाकवणे अशा प्रकारची कामे करावी लागतात.[४०]

वरीलप्रमाणे कामाच्या प्रकारानुसार माथाडी कामगारांचे विविध प्रकार पडलेले आहेत. यापैकी वाराई कामगारांना तुलनेने कमी कष्टाचे काम आहे. वारफेर, थापी मारणे, लोडिंग, अनलोडिंग ही कामे जास्त कष्टाची आहेत. पालेवाली महिलांना धान्यातून विविध प्रकारचा केरकचरा वेगळा करण्याचे काम शारीरिकदृष्ट्या फार त्रासदायक असते. सतत वाकून मान व पाठदुखी तसेच केर–कचऱ्यामुळे फुप्फुसाचे व श्वसनाचे विविध आजार होतात.[४१] पालेवाली हा प्रकार वगळता इतर पाच प्रकाराच्या कामात महिला माथाडी कामगारांचे प्रमाण अद्यापही अत्यंत कमी आहे.माल वाहतुकीचे कामासाठी जास्त ताकद लागत असल्यामुळे महिलांचा फारसा सहभाग नसतो.

### १.१०.३ माथाडी कामगारांचे सर्वसाधारण जीवनमान :

या कायद्याच्या निर्मितीपूर्वी बिकट आर्थिक परिस्थितीमुळे माथाडी कामगारांचे सर्वसाधारण जीवनमान हालाखीचे होते. काम करताना बहुतांश तत्कालीन हमाल बनियन व हाफ पँट वरच काम करायचे. कामा व्यतिरीक्त नेहमीचा पेहराव पायजमा व शर्ट असे. हातगाडी ओढणारा हमाल वगळता इतरांच्या पायात चपला देखील नसत.

आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे कष्टाचे काम असूनही त्यांना पोटभर जेवण मिळत नसे. हॉटेलमध्ये जावून जेवण करणे परवडत नसे. तंबाखूचे व्यसन बहुतेकांना असे. पैसा वाचविण्यासाठी दुगानी तंबाखू खात असत. दुगानी तंबाखू म्हणजे एकदा खाल्लेली तंबाखू पुन्हा वाळवून तीच तंबाखू खाणे. बहुतेक कामगार देवभक्त असत आणि गावाच्या कुलदैवताच्या जत्रेला प्रत्येकजण रजा घेऊन जात असत. ही रजा पगारी नसे त्यामुळे या काळातील रोजगार बुडत असे. मुंबईहून आणलेले पैसे लवकरच संपून जात, मग कोणाकडून तरी उसने पैसे घेऊन कामगार पुन्हा मुंबईला येत. प्रवास खर्चात बचत करण्यासाठी ते बहुतेक प्रवास ट्रकनेच करत. मजूरीची रक्कम स्वत:साठी कमीतकमी वापरत आणि जास्तीत जास्त बचत करुन गावी कुटुंबाला पैसे पाठवत.[४२] अशा प्रकारे माथाडी कामगार मुंबईत स्वत: हालाखीत राहून गावी आई–वडील आणि बायको–मुलांना जास्तीत जास्त पैसे पाठविण्याचा प्रयत्न करत.

मुंबईत राहण्याची सोय झोपडपट्टीत किंवा गावकीच्या खोलत असे. राहणीमानाचा दर्जा अत्यंत निम्न होता. बरेच हमाल गोदामात किंवा मालकाच्या दुकानात रहात. काही फुटपाथवर, चाळीच्या गॅलरीत, जीन्याखाली झोपत. सार्वजनिक स्नानगृहे व शौचालयाचा वापर करावा लागे. दिवसभरात प्यायला पुरेसे व स्वच्छ पाणीदेखील मिळत नसे. मजूरीचे निश्चित असे दर नव्हते. कामाचे तास व प्रमाण निश्चित ठरलेले नव्हते. जेवणाची ठराविक सुट्टी नव्हती. सुरु असलेले काम संपल्यावरच मालाच्या पोत्यावर बसून जेवण करता येत असे अन्यथा दिवसभर उपाशी रहावे लागे.[४३] अशा प्रकारे माथाडी कामगारांना अन्न, वस्त्र, निवारा या तीनही मुलभूत मानवी गरजांसाठी संघर्ष करावा लागत होता.

बहुतेक माथाडी कामगार एकत्रितपणे काम करतात, त्याला टोळी म्हणतात. एका टोळीतील कामगार एकाच गावातील किंवा परिसरातील असत. एका टोळीत २ ते ९० पर्यंत कामगार असत. टोळीच्या प्रमुखाला मुकादम म्हणतात. काम विहित वेळेत करुन घेण्याची जबाबदारी मुकादमाची असे. पूर्वी मजूरीची रक्कम मालक मुकादमाला देत आणि मुकादम कामगारांमध्ये वाटत असे.[४४] माथाडी कामगार अशा प्रकारे सामुहिक जबाबदारीने काम करत आणि येणारी मजुरी लोकशाही पध्दतीने सर्वांना समान अशाप्रकारे वाटून घेत. आता देखील हीच पध्दत सुरु आहे. आता मुकादमाऐवजी मजूरी थेट माथाडी मंडळात जमा करण्यात येते आणि मग ती टोळीतील कामगारांमध्ये वाटली जाते.

माथाडी कामगार कोणाचा नोकर आहे हे देखील निश्चित नव्हते. बाजारात ज्याचा माल आहे त्याने तो माल उतरवून घेण्यासाठी सांगितल्यास मजूरी त्याचेकडून मिळे. बऱ्याचदा दुकानांमध्ये काम करणारे हमाल–माथाडी हे माल विकत घेणाऱ्या गिऱ्हाईकाच्या सांगण्यावरुन मालाची वाहतूक करत आणि त्या गिऱ्हाईकांकडून मजूरी घेत.त्यामुळे ‘हमाल आमचे दुकानातील नोकर नाहीत’ अशी भूमिका मालक घेत. बऱ्याचदा दुकानदार माथाडी हमालांकडून त्यांचे घरची वैयक्तिक कामे, दुकानातील किरकोळ कामे विना मोबदला करुन घेत. ही कामे न केल्यास मालक काम देणार नाही आणि मजूरीला मुकावे लागेल म्हणून माथाडी कामगारांना निमूटपणे ही कामेदेखील करावी लागत. तांत्रिकदृष्ट्या माथाडी कामगार व ते जेथे काम करतात ते मालक अथवा आस्थापनांमध्ये मालक–कामगार असे नाते नव्हते.[४५] कारण कामाचे ठिकाण अथवा मालक कायम स्वरुपी एकच नव्हते तसेच बहुतांश कामे मुकादम घेत आणि मग कामगारांकडून ते ही कामे करुन घेत. मजूरीचे पैसे देखील मुकादमाकडेच देण्यात येत असत.

सर्वच माथाडी कामगारांचे सर्वसाधारण जीवनमान कष्टमय व खालच्या दर्जाचे होते. प्रचंड अंगमेहनत आणि त्या तुलनेने कमी मोबदला व हीन दर्जाची वागणूक त्यांना मिळत असे. आता मात्र या कायद्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेमुळे त्यांचे जीवनमानाचा दर्जा उंचावला आहे.

### १.१०.४ माथाडी कामगारांचे आरोग्य :

या अधिनियमाच्या निर्मितीपूर्वी माथाडी कामगारांना कोणत्याही वैद्यकिय सुविधा नव्हत्या. आरोग्य अथवा आयुर्विम्याचे संरक्षण नव्हते. वजन वाहण्याची कमाल मर्यादा निश्चित नव्हती. सततच्या जड वजन वाहण्यामुळे पाठीचे व मणक्याचे, सांध्याचे विकार होतात. सिमेंट वाहतूक करणाऱ्यांना फुप्फुसाचा, टीबीचा आजार होतात.[४६] पालेवाल्या महिलांना धान्य साफ करताना घशात, डोळ्यात, डोक्यात घाणीचे कण जात. अद्यापही या परिस्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. माथाडी मंडळांनी याबाबतची सामाजिक सुरक्षितता व आरोग्याची सुविधा दिलेली असली तरी शारीरिक आजारांना प्रत्येक कामगाराला तोंड द्यावे लागते.

### १.१०.५ माथाडी कामगारांच्या निवृत्तीनंतरचा काळ :

शारीरिक कष्टाचे काम असल्यामुळे माथाडी कामगारांना वयाच्या ४५ ते ५० वर्षापर्यंत काम शक्य होत असे. त्यानंतर ते गावी परत जात असत. त्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षितता मालकाकडून अथवा शासनाकडून नव्हती. निवृत्ती वेतन, प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅज्युईटी या कोणत्याही सुविधा नव्हत्या. कामगाराला अतिश्रमाने शारीरिक विकार झालेले असत, त्यामुळे अन्य कष्टाची तसेच शेतीची कामे शक्य होत नसत. अशिक्षित असल्यामुळे इतर कामेही करणे शक्य नसे. माथाडी कामगारांना आर्थिकदृष्ट्या परावलंबी सेवानिवृत्त जीवन जगावे लागे.[४७]

अशा प्रकारे माथाडी कामगारांचे आर्थिक, सामाजिक आणि कौटुबिक जीवनमान निकृष्ट दर्जाचे होते. आरोग्य विषयक सुविधा व सेवानिवृत्ती नंतरची सुरक्षितता नव्हती. या सर्व बाबींचे लाभ व सामाजिक सुरक्षितता व सन्मान त्यांना महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ मुळे मिळाला. त्यामुळे आता अशा कामगारांचे निवृत्तीनंतरचे आयुष्य अधिक चांगल्या पध्दतीने त्यांना जगता येऊ लागले आहे.

## १.११ माथाडी कामगार चळवळ आणि महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण)अधिनियम, १९६९ अंमलबजावणीचा संक्षिप्त आढावा :

### १.११.१ अंमलबजावणीचा आढावा :

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ संमत करण्यात आला. सदर कायदाखालील व्यवसायातील नोकऱ्यांसाठी लागू करण्यात आला.

१) लोखंड व पोलाद बाजार किंवा दुकान यातील नोकरी

२) कापड व कापूस बाजार किंवा दुकान यातील नोकरी

३) गोदीमधील नोकरी

४) किराणा बाजार किंवा दुकान यामधील नोकरी

५) रेल्वे यार्डमधील नोकरी

६) सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनात माल भरणे किंवा तो उतरविणे या संदर्भातील नोकरी

७) भाजीपाला बाजारातील नोकरी

८) खोकी तयार करण्याच्या कामातील किंवा इमारती लाकूड बाजारातील नोकरी

९) मिठागरामधील नोकरी

१०) मच्छिमार उद्योगातील नोकरी[४८]

सुरुवातीला या १० व्यवसायांमध्ये कामे करणाऱ्या कामगारांना या अधिनियमाच्या तरतूदी लागू करण्यात आल्या. त्यासाठी स्वतंत्र योजना तयार करुन स्वतंत्र मंडळाची स्थापना करण्यास सन १९७०–१९७१ या वर्षी शासनाने सुरुवात केली. त्यापैकी सन १९७० ते १९७४ या कालावधीत मुंबई व ठाणे जिल्ह्यासाठी लोखंड व पोलाद मंडळ, मालवाहतूक कामगार

मंडळ,किराणा बाजार कामगार मंडळ, खोका मेकिंग व टिंबर मार्केट लेबर बोर्ड, कापड बाजार मंडळ, कॉटन कामगार मंडळ, रेल्वे कामगार मंडळ, धातू व कागद कामगार मंडळ, फिशरीज कामगार मंडळ कार्यान्वित झाली. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ १९८५ मध्ये स्थापन झाले. मिठागरातील नोकरी या व्यवसायासाठी योजना तयार करण्यात आली नाही किंवा त्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्यात आले नाही.[४९] या मंडळामार्फत या उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची व मालकांची नोंद करण्यात आली. मंडळाच्या योजनेच्या अंमलबजावणीमुळे या व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांना कामाचा योग्य मोबदला मिळू लागला. त्यांना भविष्यनिर्वाह निधी, उपदान, रजेचा पगार, सानुग्रह अनुदान, अपघात नुकसान भरपाई यासारखे फायदे मंडळामार्फत मिळू लागले. त्यांचे कामाचे तास नक्की करण्यात आले. अतिरिक्त कामाचा मोबदला दुप्पट मिळू लागला. त्यांच्या कामामध्ये सुसूत्रता आली. अंगमेहनतीने हमालीचे काम करणारे कामगार वेगवेगळ्या मंडळांतर्गत संरक्षित झाले.[५०]

प्रारंभी महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ व त्या अंतर्गत तयार केलेल्या मंडळाच्या योजनांच्या तरतुदी फक्त बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा या विभागासाठीच लागू करण्यात आल्या होत्या. तद्नंतर सदरच्या अधिनियमाच्या तरतूदी १९९१ साली रायगड जिल्ह्यासाठी लागू करण्यात आल्या. नंतरच्या कालावधीत योजनेच्या तरतूदी व्यवसायनिहाय लागू न करता जिल्हा पातळीवर लागू करण्यात आल्या. जिल्हा पातळीवर माथाडी अधिनियम, १९६९ व संबंधित योजना लागू करतेवेळी अधिनियमामध्ये समाविष्ट केलेल्या अनुसूचित नोकऱ्यांसाठी स्वतंत्र मंडळाची स्थापना न करता तेथे अनुसूचीतील सर्व नोकऱ्यांसाठी एकाच मंडळाची स्थापना करण्यात आली.[५१]

### १.११.२ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाची व्याप्ती :

प्रचलित कामगार कायदे विविध उद्योग, आस्थापना व त्यामध्ये कार्यरत असलेल्या सर्व कामगारांना संबंधित कायद्याच्या तरतूदीनुसार लागू होतात. प्रत्येक कायद्यात कामगार आणि त्याचा मालक यांच्या विशिष्ट व्याख्या दिलेल्या असतात. या व्याख्येनुसार कामगार म्हणून पात्र ठरणाऱ्या

कामगारांना त्या कायद्याचे संरक्षण व फायदे मिळतात. माथाडी कामगार त्यावेळच्या कोणत्याच कायद्याच्या व्याख्येनुसार कामगार ठरत नव्हते.[५२] त्यामुळे त्यांचेसाठी स्वतंत्र कायदा करावा लागला. महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या तरतूदी या अधिनियमासोबत जोडलेल्या सूचीत नमूद केलेल्या नोकऱ्यांनाच फक्त लागू होतात हे या अधिनियमाचे वैशिष्ट्य आहे. सदर सूची परिशिष्ठ ३ येथे दिली आहे. असंघटीत कामगारांपैकी माथाडी कामगार हे देशातील पहिले असे कामगार आहेत की, वेगवेगळ्या ठिकाणी काम करत असताना आणि वेगवेगळे मालक व आस्थापना असतानाही त्यांनी त्या वेळच्या प्रचलित कामगार कायद्याचा लाभ मिळत नसल्यामुळे आंदोलने करुन स्वतंत्र कायदा पारित करुन घेतला.

महाराष्ट्र राज्यात रेल्वे यार्ड, वेअर हाऊस, भाजीपाला व फळे, धान्य बाजारपेठ, ट्रान्सपोर्ट, खोका मेकिंग व इतर व्यवसायामध्ये मालाची चढउतार करणाऱ्या असंरक्षित व असंघटीत माथाडी कामगारांना विविध सोयी–सुविधा व फायदे मिळू लागले. नोकरीची सुरक्षा मिळाली.[५३] कायद्यांसोबत जोडलेल्या सूचीत नमूद केलेल्या उद्योगाच्या मालकांना माथाडी कामगारांचा पुरेसा आणि नियमित पुरवठा होऊ लागला. कामगार मालक संघर्ष कमी झाले, औद्योगिक शांतता निर्माण झाली.[५४] कामाच्या सेवाशर्ती, कामाचे तास, वेतन, पगारी रजा व इतर फायदे याचा अंतर्भाव करुन या असंरक्षित कामगारांना संरक्षण देणे तसेच कामगारांचा पुरेसा आणि नियमित पुरवठा होऊन त्यांचे श्रमाचा पूर्ण वापर व्हावा हे महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमाचे उद्दिष्ट आहे.[५५] ज्या ठिकाणी इतर कामगार कायद्यानुसार मालक व कामगार असे संबंध निर्माण होत नाहीत, अशा ठिकाणच्या माथाडी, हमाल कामगाराचा अंतर्भाव या कायद्यात होतो. या अधिनियमंतर्गत अशा असंरक्षित कामगारांना संरक्षण देऊन विविध फायदे देण्याच्या उद्देशाने हा अधिनियम करण्यात आला.

### १.११.३ माथाडी मंडळांची स्थापना:

सर्व जिल्ह्यांना टप्प्याटप्प्याने माथाडी अधिनियमाच्या व त्या अंतर्गत योजनेच्या तरतूदी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्रात आतापर्यंत ३५ माथाडी मंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. या मंडळाची यादी परिशिष्ठ ४ येथे जोडली आहे. यापैकी १० माथाडी मंडळे मुंबई परिसरातील विशिष्ट उद्योगांसाठी जसे रेल्वे यार्ड, वेअर हाऊस, भाजीपाला व फळे, धान्य बाजारपेठ, ट्रान्सपोर्ट, खोका मेकिंग, लोखंड व पोलाद इत्यादी मंडळे स्थापन झालेली आहेत. त्यांचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई, ठाणे व रायगड जिल्हा असे आहे. उर्वरित मंडळे जिल्हा पातळीवर व काही ठिकाणी परिस्थितीनुसार २ किंवा अधिक जिल्ह्यांमध्ये १ अशा प्रकारे मंडळे स्थापन केलेली आहेत.[५६] उदा. धुळे, नंदुरबार जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी–सिंधुदुर्ग माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ इत्यादी. राज्यातील माथाडी मंडळात एकुण ८३५८३ मालक नोंद असून २०१९५४ माथाडी कामगार नोंद आहेत.[५७]

### १.११.४ माथाडी कामगारांना सद्य:स्थितीत मिळणारे फायदे :

माथाडी कामगारांचे कामाचे ठिकाण एकच नसल्यामुळे मालकही एक नसतो त्यामुळे त्यांना इतर कामगाराप्रमाणे मालकाकडून मजूरी व्यतिरिक्त इतर आर्थिक लाभ व सोयी–सुविधा देणे शक्य नव्हते. यासाठी पैशांची तरतूद व्हावी तसेच मंडळाचे प्रशासकिय कामावरील खर्चाची तरतूद व्हावी म्हणून माथाडी कामगार ज्या–ज्या नोंद झालेल्या मालकांकडे काम करतात, त्यांचेकडून मजूरीच्या रकमेच्या ठराविक टक्केवारीने अधिकचे पैसे मंडळाकडे जमा करण्यात यावेत. या जमा झालेल्या पैशातून मग कामगारांना आर्थिक लाभ देण्यात यावेत तसेच मंडळाचा प्रशासकिय खर्च भागवावा अशी शिफारस श्री.शिवाजीराव पाटील यांचे समितीने केली होती.[५८] त्यानुसार माथाडी कायद्यात आणि प्रत्येक मंडळाच्या योजनेत तरतूद करण्यात आली आहे. यानुसार मालकांकडून मजूरी व्यतिरिक्त अधिकची रक्कम घेण्यात येते. या अधिकच्या रकमेस लेव्ही म्हणतात. माथाडी मंडळाच्या योजनेच्या तरतूदीनुसार मालकाकडून लेव्ही वसूल करण्यात येते. मालकाकडून कामगारांच्या मजूरीवर किमान ३०टक्के व कमाल ५० टक्के एवढी रक्कम लेव्ही स्वरुपात

मंडळाकडे जमा करण्यात येते.[५९] या लेव्हीच्या रकमेतून नोंद झालेल्या माथाडी कामगारांना त्या–त्या मंडळामार्फत विविध आर्थिक लाभ दिले जातात तसेच मंडळाचा प्रशासकिय खर्च भागविला जातो. यामध्ये भविष्यनिर्वाह निधी, उपदान, घरभाडे भत्ता, आजारपणाची रजा, सणाची रजा, दिवाळी बोनस, भरपगारी रजा यांचा समावेश होतो. नवी मुंबई येथे माथाडी हॉस्पिटल उभारलेले आहे. त्यामार्फत मुंबई, रायगड व ठाणे जिल्ह्यातील नोंद केलेल्या माथाडी कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकिय सुविधा देण्यात येतात. राज्यातील इतर माथाडी मंडळातील माथाडी कामगारांना त्यांच्या स्थानिक पातळीवर वैद्यकिय लाभ दिले जातात. साधारणत: ३ टक्के लेव्ही प्रशासकीय खर्चासाठी असते. यामधून मंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर सर्व प्रशासकीय खर्च भागविण्यात येतात. लेव्हीची टक्केवारी आणि तिचा वापर प्रत्येक मंडळाने ठरविल्यानुसार होतो. उदाहरणार्थ किराणाबाजार व दुकाने मंडळ (मुंबई, ठाणे आणि रायगड) व मालवाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई या मंडळातील नोंद झालेल्या व्यापाऱ्यांनी मजूरीच्या रकमेच्या प्रमाणात अनुक्रमे ४१% आणि ४०% रक्कम लेव्ही म्हणून मंडळात भरण्याची तरतूद आहे. यातून कामगारांना विविध लाभ दिले जातात. या लेव्हीच्या वापराची टक्केवारी पुढील प्रमाणे आहे,

| अ.क्र. | बाब | किराणा बाजार व दुकाने मंडळ (%) (लेव्हीचा दर ४१%)[६०] | मालवाहतूक कामगार मंडळ (%) (लेव्हीचा दर ४०%) |
|---|---|---|---|
| १ | भविष्यनिर्वाह निधी | १०.०० | १०.०० |
| २ | उपदान | ३.६७ | ३.५० |
| ३ | दिवाळी बोहनी | १४.५० | १४.५० |
| ४ | कामगार घरभाडे | २.०० | १.५० |
| ५ | रजेच्या काळातील कामगार प्रवास भत्ता | ०.६२ | १.०० |
| ६ | रजेचा पगार | ४.५० | ४.५० |
| ७ | हॉस्पिटल / वैद्यकिय सुविधा | २.०० | २.०० |
| ८ | भरपगारी रजा | ४.५० | ०.६५ |
| ९ | अपघात नुकसान भरपाई | ०.५० | ०.५० |
| १० | व्यवस्थापन खर्च | २.२१ | १.८५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | एकूण | ४१.०० | ४०.०० |

मालवाहतूक कामगार मंडळाचा लेव्हीचा दर ४०% आहे.[६१] त्यानुसार उपदान, घरभाडे, भरपगारी रजा यासाठीची तरतूद काही प्रमाणात किराणा बाजार व दुकाने मंडळापेक्षा कमी आहे. सर्वसाधारणपणे सर्वच मंडळाच्या लेव्हीच्या वापराची टक्केवारी जमा होणाऱ्या रकमेच्या प्रमाणात वरील प्रमाणे कमी–अधिक आहे.

### १.११.५ माथाडी मंडळांची सद्य:स्थिती :

महाराष्ट्रातील ३५ माथाडी मंडळांची यादी आणि त्यातील नोंद झालेल्या कामगार व मालकाची संख्या परिशिष्ट ५ येथे जोडली आहे. या मंडळाची एकत्रित सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.[६२]

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्रात माथाडी अधिनियमाच्या व त्याअंतर्गत योजनेच्या तरतूदी लागू करण्यात आलेले कार्यक्षेत्र | संपूर्ण महाराष्ट्र |
| २ | कार्यरत माथाडी मंडळाची संख्या | ३५ |
| ३ | नोंद झालेले कामगार | २०१९५४ |
| ४ | कामावर असलेले कामगार | १२१५५६ |
| ५ | नोंद झालेले मालक | ८३५८३ |
| ६ | कार्यरत मालक | ५७६०५ |
| ७ | लेव्हीचा किमान दर | ३०% |
| ८ | लेव्हीचा कमाल दर | ५०% |

### १.११.६ माथाडी कामगारांच्या संदर्भात अलिकडील काळात घेण्यात आलेले निर्णय

१) नगर विकास विभागाने माथाडी कामगारांना नवी मुंबईत कोपरखैरणे व घणसोली येथे घरे आणि विकसित केलेल्या भूखंडाचे वाटप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचे वाटप नगर विकास विभाग करत आहे.[६३]

२) माथाडी मंडळ, माथाडी हमाल व तोलणार हे व्यवसाय कराच्या कार्यकक्षेत येत नसल्याचे विक्रीकर कार्यालयाने ऑगस्ट २०११ मध्ये स्पष्ट केले आहे. त्यानुसार मंडळांना व्यवसाय कर भरावा न लागल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. याबाबतचे परिपत्रक विक्रीकर आयुक्त कार्यालयाने दि.३.८.२०११ रोजी निर्गमित केले आहे.[६४] अशा प्रकारे माथाडी मंडळांना इनकम टॅक्समधून सूट मिळावी म्हणून श्री. एकनाथ कोंडीबा दळवी (मुख्य हिशोब तपासणीस, किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई) यांनी दिल्ली पर्यंत जावून प्रयत्न केले.[६५] त्यासाठी त्यांनी श्री. शरद पवार यांचे माध्यमातून केंद्रातील संबंधित विभागात प्रयत्न करुन ही सूट मिळवली. त्याकरिता केरळ राज्यात जाऊन तेथील याबाबतची माहितीही त्यांनी आणली होती.

३) माथाडी मंडळांचे कामकाज सुरळीतपणे व गतिमानतेने चालविण्यासाठी मंडळांसाठी नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यानुसार ६६ पदे तातडीने भरण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.[६६] त्यानुसार आता आवश्यक पदे भरण्यात येत आहेत. यातून मंडळांचे कामकाज अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल.

४) माथाडी कायद्याच्या तरतूदींचा आढावा घेवून त्याचे प्रभावी अंमलबजावणीसाठी काय उपाय करता येथील याचा विचार करण्यासाठी डॉ. बाबा आढाव यांचे अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली आहे.[६७] या अभ्यास गटाने सर्व माथाडी कामगारांना समान वेतन, पेंशन, वैद्यकीय सुविधा देणे, मॉडेल ॲक्टचा कृषी उत्पन्न समिती व माथाडी

कामगारांवरील परिणाम, राज्य पातळीवर शिखर मंडळ स्थापन करणे या मुद्यांचाही अभ्यास करावयाचा आहे.

अशा प्रकारे माथाडी कामगारांसाठीचा सदर अधिनियम व त्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या माथाडी मंडळांमार्फत या असंघटीत कामगारांसाठी महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या कल्याणकारी योजना इतर असंघटीत कामगारांसाठी मार्गदर्शक व प्रोत्साहित करणाऱ्या आहेत आणि यामुळेच या माथाडी कामगार चळवळीचे महत्व अनन्य साधारण आहे. याबाबतची सविस्तर माहिती आपण पुढील प्रकरणांमध्ये घेणार आहोत.

## १.१२ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ च्या अंमलबजावणीचा कालानुक्रमे संक्षिप्त तपशील

या अधिनियमाची निर्मिती व अंमलबजावणीचा आढावा घेतला असता साधारणत: पुढीलप्रमाणे ठळक घडामोडी आढळून येतात.

### १.१२.१ सन १९६०–१९७० चा कालावधी–माथाडी कायद्याची निर्मिती :

शासनाने सन १९६७ मध्ये प्रसिध्द केलेल्या श्री. शिवाजीराव पाटील यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या अहवालातील शिफारशीबाबत सूचना व आपली मते प्रदर्शित करण्यास मालक, कामगार आणि इतर संबंधित सुचविले.[६८] एखादा कायदा परिपूर्ण होण्यासाठी आणि त्याची व्यवहारात प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यासाठी अशा प्रकारे या कायद्याशी संबंधित घटकांची मते विचारात घेणे आवश्यक असते. माथाडी कायद्याशी संबंधित घटक म्हणजे कामगार आणि व्यापारी मालक वर्ग होय. त्यामुळे या बाबतीत विचार विनिमय करुन व प्राप्त झालेली मते लक्षात घेवून शासनाने एक प्रारुप विधेयक तयार केले. ते विधानमंडळापुढे सन १९६८ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात आले.[६९] विधानमंडळाच्या नागपूर अधिवेशनात त्यावर चर्चा होवून ते अधिक परिपूर्ण व्हावे म्हणून हे विधेयक पुढे परिक्षणासाठी विधानमंडळाच्या संयुक्त निवड समितीपुढे पाठवून परिक्षण झाले. सदर संयुक्त समितीने सुधारणेनिशी पाठविलेले विधेयक विधानमंडळात एप्रिल

१९६९ मध्ये संमत केले.[७०] ५ जून १९६९ रोजी राष्ट्रपतींनी त्याला संमती दिली. सन १९६० ते १९७० च्या दशकातील सहा वर्षाच्या कालावधीत शासनाने नियुक्त केलेल्या तीन समित्यांनी सादर केलेली मते, माथाडी कामगारांचा पाठपुरावा, शासनाचा दृष्टिकोन यामुळे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ पारित झालेला आहे.

**१.१२.२ सन १९७० ते १९८० चे दशक :**

सन १९७० ते १९८० च्या दशकात माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत पुढील घडामोडी घडल्या.

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी अधिनियम, १९६९ मध्ये विधानमंडळात पास झाल्यानंतर माथाडी कामगार मंडळ स्थापन करावयाची होती. या मंडळावर शासनाचे तसेच मालक आणि कामगारांचे प्रतिनिधी नेमायचे होते. तसेच मंडळाची स्वतंत्र कार्यालये देखील निर्माण करावयाची होती. या तांत्रिक बाबींसाठी काहीसा वेळ लागला.[७१]

१) सन १९६९ मध्ये १५ डिसेंबर रोजी किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई आणि लोखंड व पोलाद बाजार कामगार मंडळाची स्थापना झाली.

२) १९७१ मध्ये माल वाहतूक मंडळ, मुंबई २५ मार्च रोजी आणि कापड बाजार व दुकाने मंडळ, मुंबई २६ मार्च रोजी स्थापन झाले.

३) दि. २९ एप्रिल १९७२ रोजी कापूस बाजार मंडळ, मुंबई स्थापन झाले.

४) सन १९७३ मध्ये धातू आणि कागद बाजार मंडळ, मुंबई १८ एप्रिल रोजी आणि खोका मेकिंग मंडळ, मुंबई १६ जून रोजी स्थापन झाले.

५) सन १९७४ मध्ये १९ मार्च रोजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर आणि ३० मार्च रोजी पुणे माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ स्थापन झाले.

६) ६ ऑक्टोबर १९७६ रोजी रेल्वे गुड्स मंडळ, मुंबई स्थापन झाले.

७) दि. २८ एप्रिल १९७८ रोजी कोल्हापूर माथाडी मंडळ स्थापन झाले.[७२]

अशा प्रकारे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ लागू झाल्यानंतर लगेचच डिसेंबर १९६९ मध्ये दोन मंडळे स्थापन होवून १९७० मध्ये त्यांचे काम सुरु झाले. तर १९७० ते १९८० या पहिल्या दशकात ९ अशा एकूण ११ माथाडी मंडळाची स्थापना होवून कामकाजास सुरुवात झाली. यावेळी ९ माथाडी मंडळे मुंबई आणि परिसरातील विविध व्यवसायातील माथाडी कामगारांसाठी स्थापन झाली. मुंबई बाहेर केवळ नागपूर, पुणे आणि कोल्हापूर या जिल्ह्यामध्ये पहिल्या दशकामध्ये माथाडी मंडळे स्थापन झाली.

**१.१२.३ सन १९८० ते १९९० चे दशक :**

या दशकामध्ये माथाडी कायद्याची अंमलबजावणीची पध्दती स्थिरस्थावर झालेली होती. या कालावधीत प्रामुख्याने मुंबईबाहेर इतर जिल्ह्यांसाठी माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली. या दशकात खालील माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली.

१) सांगली जिल्हा माथाडी कामगार मंडळ दि. १३ जुलै १९८४ रोजी

२) भाजीपाला कामगार मंडळ, मुंबई दि. २२ ऑक्टोबर १९८५ रोजी स्थापन करण्यात आले.

३) सन १९८८ मध्ये जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, १९ जुलै रोजी, सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, १८ ऑगस्ट रोजी आणि नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, २८ डिसेंबर रोजी स्थापन करण्यात आले.

४) सन १९८९ मध्ये १२ जानेवारी रोजी धुळे माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ व २४ एप्रिल रोजी लासलगाव (नाशिक) माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना झाली.[७३]

अशाप्रकारे या दशकात स्थापन झालेल्या ७ माथाडी मंडळांपैकी केवळ एकच मुंबईत स्थापन झाले तर मुंबई बाहेरील जिल्ह्यात ६ माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली. इतर जिल्ह्यात

एखाद्या विशिष्ट कामाशी संबंधित माथाडी कामगारांची संख्या कमी असल्यामुळे कायद्याच्या परिशिष्टातील सर्वच प्रकारच्या व्यापार, उद्योगातील माथाडी कामगारांसाठी जिल्ह्यात एकच माथाडी मंडळ स्थापन करण्याचे धोरण ठेवण्यात आल्याचे स्पष्ट होते. लासलगाव, जिल्हा नाशिक येथील कांदा व्यवसायातील कामगारांची संख्या लक्षात घेऊन तेथे स्वतंत्र मंडळे स्थापन करण्यात आले. या पुढील काळात देखील मंडळांच्या स्थापनेबाबत हेच धोरण कायम ठेवण्यात आले. याच दशकात दि. २३ मार्च १९८१ रोजी श्री. अण्णासाहेब पाटील यांच्या मृत्यूची दुर्दैवी घटना घडली. यामुळे माथाडी कामगार चळवळीला फार मोठा धक्का बसला.

### १.१२.४ सन १९९० ते २००० चे दशक आणि त्या नंतरचा कालावधी :

सन १९९० पर्यंत राज्यभरात ९ जिल्ह्यात १८ माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली होती. या कालावधीत माथाडी मंडळाचे कामकाजाची पध्दत स्थिर होवून मालकांचा विरोधही मावळला होता. सन १९९० ते सन २००० या दशकात खालील माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली.

१) दि. १ सप्टेंबर १९९० रोजी लातूर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना झाली.

२) सन १९९१ मध्ये ११ जानेवारी रोजी अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, २१ जानेवारी रोजी अकोला माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, २५ मार्च रोजी सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, १२ एप्रिल रोजी 'दि क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ' आणि ४ मे रोजी अहमदनगर माथाडी आणि संरक्षित कामगार मंडळ स्थापन करण्यात आले.

३) या दशकात सन १९९२ मध्ये १३ फेब्रुवारी रोजी इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, २६ मार्च रोजी जळगाव माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, ८ जुलै रोजी पिंपरी–चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, १ ऑगस्ट रोजी नांदेड

माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, तर १९ ऑगस्ट रोजी औरंगाबाद माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना करण्यात आली.[७४]

अशाप्रकारे सन १९९० ते सन २००० या दशकात एकूण ११ मंडळे स्थापन करण्यात आली. त्यापैकी केवळ १ मंडळ मुंबईमध्ये तर उर्वरीत बाहेरच्या जिल्ह्यात स्थापन करण्यात आली. असे करताना इचलकरंजी येथील यंत्रमाग व्यवसायातील कापसाच्या गाठोड्या, तयार सूत यांचे वाहतुकीचे काम करणाऱ्या कामगारांची मोठी संख्या लक्षात घेवून आणि पिंपरी–चिंचवड येथील औद्योगिक क्षेत्रातील वाढती कामगार संख्या लक्षात घेवून अनुक्रमे कोल्हापूर व पुणे जिल्ह्यातील या क्षेत्रात इचलकरंजी व पिंपरी चिंचवड येथे स्वतंत्रपणे माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली.

सन २००० नंतरच्या कालावधीत बीडसह राज्यातील उर्वरीत सर्व जिल्ह्यात माथाडी माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली. कामगारांची संख्या आणि मंडळ चालविण्यासाठी प्रशासकीय खर्चाची बाब लक्षात घेवून सर्वच प्रकारच्या व्यवसायासाठी एकच मंडळ स्थापन करण्याचे धोरण सुरु ठेवण्यात आले. तसेच दोन अथवा तीन जिल्ह्यांसाठी एक माथाडी कामगार मंडळ स्थापन करण्यात आले आहे अथवा यापूर्वीच स्थापन झालेल्या जवळच्या जिल्ह्याच्या माथाडी मंडळास कमी माथाडी कामगार संख्या असलेला जिल्हा संलग्न ठेवण्यात आला आहे.[७५] त्यानुसार धुळे–नंदूरबार, परभणी–हिंगोली, लातूर–उस्मानाबाद, नागपूर–वर्धा, अकोला–वाशिम–बुलढाणा, चंद्रपूर–गडचिरोली, भंडारा–गोंदिया, रत्नागिरी –सिंधुदुर्ग या २ किंवा अधिक जिल्ह्यासाठी एकच मंडळ स्थापन झालेले आहे.

### १.१२.५ महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ मधील प्रमुख सुधारणा :

माथाडी कायद्याची अंमलबजावणी सन १९७० मध्ये सुरु झाल्यानंतर त्यामध्ये काही सुधारणांची आवश्यकता भासू लागली. कायद्यातील तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे किंवा काही नवीन तरतूदींची त्यात भर घालण्यासाठी या कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. यापैकी काही प्रमुख सुधारणा पुढील प्रमाणे आहेत.

१)	काही कारणांमुळे मालक, कामगार व शासन प्रतिनिधींचे त्रिपक्षीय परिपूर्ण मंडळ स्थापन होवू शकत नसल्यास एक सदस्यिय मंडळ स्थापन करण्याचे अधिकार सन १९७२ मधील सुधारणेनुसार शासनास देण्यात आले.[७६] त्यानुसार मालक–कामगार यांचे प्रतिनिधी नसतानाही शासकिय अधिकाऱ्याचे एक सदस्यिय मंडळ म्हणून नेमणूक करता येऊ लागली. या एक सदस्यिय मंडळास परिपूर्ण त्रिपक्षीय मंडळाला असलेले सर्व अधिकार असतात. त्यामुळे परिपूर्ण मंडळ नसतानाही माथाडी कामगारांना देय लाभ अखंडपणे देता येतात.

२)	सुरुवातीला कायद्यातील कलम २ नुसार हा कायदा नोंदणी केलेल्या तसेच नोंदणी न केलेल्या सर्वच कामगारांना लागू होता. सन १९७४ च्या सुधारणेनुसार ही तरतूद वगळून केवळ नोंदणी केलेल्या कामगारांनाच कायद्याचे लाभ देय राहतील अशी सुधारणा करण्यात आली.[७७] यामुळे या कायद्यांतर्गत माथाडी मंडळाचे लाभार्थी अधिक सुस्पष्ट झाले, योजनेतील विसंगती दूर होवून अंमलबजावणी सुरळीत झाली. मात्र यामुळे नोंदणी न होवू शकलेला फार मोठा माथाडी कामगार वर्ग या कायद्यातील लाभापासून वंचित राहिला.

३)	कामगारांच्या मजुरीची रक्कम ठरवून दिलेल्या वेळेत मंडळाकडे भरणा न करणाऱ्या मालकांवर दंड आकारण्याची तरतूद सन १९७४ मध्ये नव्याने करण्यात आली. या तरतूदीनुसार मालकाने वेळेत न भरलेल्या रकमेच्या १०% इतक्या रकमेपर्यंत दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली.[७८] यामुळे वेळेवर मजूरीची रक्कम न भरणाऱ्या मालकांना शह बसला. ते मंडळात मजूरीची रक्कम नियमित भरू लागले आणि माथाडी कामगारांना नियमितपणे पगार मिळू लागला.

४)	माथाडी कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधीची तरतूद सन १९७७ मध्ये करण्यात आली. त्यानुसार भविष्य निर्वाह निधी कायदा, १९५२ मधील तरतूदींचा विचार करुन माथाडी कामगारांसाठी त्यांच्या कामाच्या परिस्थितीनुरुप योजना तयार करणे आणि त्यांना भविष्य निर्वाह निधीचा लाभ देण्यात येवू लागला आहे.[७९] यानुसार प्रत्येक मंडळाने स्वत:चे नियम

तयार करावयाचे आणि त्यानुसार माथाडी कामगारांना भविष्य निर्वाह निधीचा लाभ द्यावयाचा आहे. यासाठी लेव्हीच्या रकमेतील ठराविक रक्कम वापरली जाते.

५) माथाडी कायद्यांतर्गतचे खटले कामगार न्यायालयात चालविण्याची तरतूद सन १९८१ मध्ये करण्यात आली. मुंबई औद्योगिक संबंध अधिनियमानुसार स्थानिक क्षेत्रासाठी स्थापन करण्यात आलेल्या कामगार न्यायालयात देखील हे खटले चालविण्याची मुभा देण्यात आली.[८०] त्यामुळे व्यापाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन केले तर माथाडी मंडळाचे निरिक्षक न्यायालयात खटला दाखल करतात. यामुळे माथाडी कामगारांना कायदेशीपणे न्याय मिळण्याची सुविधा मिळाली.

६) माथाडी कायद्याची सुरुवातीला मुंबई जिल्ह्यापुर्तीच आणि काही ठराविक व्यापार–धंद्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत होती. त्याची व्याप्ती वाढवून ठाणे, रायगड जिल्ह्यातील वेगवेगळ्या व्यापार धंद्यातील कामगारांना हा कायदा लागू करण्यात आला असल्याचा उल्लेख सन १९८७ मधील सुधारणेने करण्यात आला.[८१]

सद्य:स्थितीत राज्यातील यवतमाळ जिल्हा वगळता सर्वत्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमाची अंमलबजावणी सुरु झाली आहे.यवतमाळ जिल्ह्यात दि. १८.२.२०१४ रोजी माथाडी मंडळासाठी सचिवांची नेमणूक करण्यात आली असून लवकरच जिल्ह्यातील माथाडी कामगारांची व मालकांची नोंद सुरु होईल. तसेच कामगारांना लाभ मिळणे सुरु होईल. पश्चिम महाराष्ट्र वगळता इतरत्र विशेषत: विदर्भात या कायद्याची अंमलबजावणी व्हावी म्हणून माथाडी कामगार नेत्यांनी तसेच त्यांच्या विविध कामगार संघटनांनी सन १९८० नंतरच्या कालावधीत मोर्चे संप इत्यादी मार्गाने पाठपुरावा केला आणि त्याची फलश्रृती म्हणून हा कायदा राज्यातील सर्व ३५ जिल्ह्यांमध्ये लागू झालेला आहे.

# संदर्भ सूची


१. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष) माथाडी कामगारांबाबत चौकशी समिती अहवाल, बृहन्मुंबई दि. १२ जानेवारी १९६५. पृ. ४.

२. पाटील अण्णासाहेब, माथाडी मित्र पाक्षिक, कै. अण्णासाहेब पाटील स्मृती विशेषांक, १९८३, ॲड. काशिनाथ वळवईकर (संपादक) दि. २३ मार्च १९८३ पृ. क्र. २, ९. (किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई, तपपूर्ती १९७९ समारंभाच्या वेळी प्रकाशित स्मरणिकेतून घेतलेले पुर्नमुद्रीत)

३. रामिष्टे बाबुराव हरि, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, माथाडी कामगार संघटना–रौप्य महोत्सवी वाटचाल, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन (रजि.) रौप्य महोत्सवी विशेषांक, सप्टेंबर १९८८. पृ. क्र. २

४. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण (लेखक व प्रकाशक), निश्चयाचा महामेरु; प्रथमावृत्ती २३ मार्च १९८४, पृ.क्र. १८.

५. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष) उपरोक्त, पृ. ४.

६. झावरे शिवाजीराव, सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, पुणे माथाडी मंडळ, 'माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, सरचिटणीस महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ पुणे, (प्रकाशक), काळेबेरे दत्ता (संपादक) १९९४, पृ. ६२.

७. पाटील व्ही. पी., 'दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील', जयजगदीश प्रकाशन (कराड), सातारा, पाटील रणजित (प्रकाशक) सप्टेंबर १९९८, पृ. क्र. ५१.

८. अंबर्डेकर ना. श., ज. फा. पाटील, भारतीय कामगार समस्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ (प्रकाशक), दि. २६.१.१९७९ पृ. ३.

९. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष) उपरोक्त, पृ. ४

१०. आढाव बाबा, माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ३९.

११. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. ३५.

१२. गुप्ते वि. प., कामगार चळवळ, एस. एस. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन व नानासाहेब गोरे ॲकॅडमी (प्रकाशक), प्रथमावृत्ती, पुणे, एप्रिल, १९९७, पृ. १०.

१३. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त पृ. २२९.

१४. कित्ता, पृ. १७७

१५. महाराष्ट्र शासन, कार्यक्रम अंदाजपत्रक सन २०१३–१४, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग (कामगार) पृ. १३.

१६. Davala Sarath (Editor),Unprotected Labour in India-Issues and Concerns,Friedrich Ebert Stiffing (India Office),First Edition, 1994, Pg. 5.

१७. चोळके टी. जी., सहा. कामगार आयुक्त, 'माथाडी कामगार कायदा–एक मूल्यमापन', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त पृ. ३३.

१८. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. २५.

१९. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २ व ३.

२०. मारुती विश्वासराव, कार्यकारी संपादक, पोर्ट ट्रस्ट कामगार, 'कामगार चळवळ मजूबत करण्यासाठी श्रमशक्तीच्या एकजुटीची गरज', नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विशेषांक, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक कृती समिती, परळ (मुंबई) ९ फेब्रुवारी २०१२, पृ. ३९.

२१. Government of India, Act No.9/1948, The Dock Workers (Regulation of Employment Act), 1948, Dt. 4 March, 1948.

२२. कुलकर्णी व्ही. वाय., सहायक कामगार आयुक्त, 'माथाडी कामगार कायदा–एक दृष्टीक्षेप', पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, पाटील रामचंद्र (संपादक), पुणे, दि. १५.९.२०००, पृ. ५७.

२३. पाटील उदय (माथाडी कामगार, पुणे), ‘माथाडी कायद्याने आमुलाग्र बदल घडविला’, पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, उपरोक्त पृ. ६५.

२४. कोतवाल मनोहर, ‘माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा’, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. १६, १७.

२५. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा, (अध्यक्ष), महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार सल्लागार समितीने नेमलेल्या उपसमितीचा अहवाल, सन १९८८, पृ. ३.

२६. गोळे लक्ष्मण ज्ञानदेव, उपरोक्त, पृ. ७.

२७. भारत सरकार, २००१ ची जनगणना.

२८. आढाव बाबा, ‘माथाडी कायद्याची वाटचाल’, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ४१.

२९. निंबाळकर अजित, माजी कामगार आयुक्त, ‘माथाडी कायदा–असंरक्षित कामगारांसाठी एक वरदान’, माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ३०.

३०. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग IV दि. १३ जून १९६९, पृ. १

३१. महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन (मुख्य कार्यालय), मुंबई यांची टिप्पणी.

३२. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर; तिसरी आवृत्ती, दि. १५ फेब्रुवारी २०११, पृ. ५६, ५७.

३३. कित्ता, पृ. ५२ ते ५५.

३४. महाराष्ट्र शासन, पाटील शिवाजीराव (अध्यक्ष), असंरक्षित कामगारांसाठी नेमलेल्या समितीचा अहवाल, दि. १७ नोव्हेंबर १९६७, पृ. १४.

३५. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. ५२.

३६. कित्ता, पृ. ५२, ५३, ५४.

३७. साळुंखे अरुण, पाठीवर किती ओझे घ्यावे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त पृ. ६९.

३८. केंद्र शासनाचे पत्र, श्री. जरिया एस. एन. केंद्रीय श्रममंत्री यांनी श्री. नारायण राणे, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले पत्र, दि. ३० ऑगस्ट १९९९.

३९. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. ६०, ६१.

४०. कित्ता, पृ. ५८, ५९.

४१. कित्ता, पृ. ७०.

४२. कित्ता, पृ. ६४, ६५, ६६.

४३. कित्ता, पृ. ५४, ५५.

४४. किराणा बाजार व दुकाने मंडळ, बृन्मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, १९७०–७१ दि. २८ फेब्रुवारी १९७२, पृ. ९.

४५. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. २४.

४६. तुंगतकर जयंत, कष्टकऱ्यांसाठी आरोग्याची काळजी, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ७१.

४७. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. ६७.

४८. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्षाची टिप्पणी.

४९. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा (अध्यक्ष), महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार सल्लागार समितीच्या उपसमितीचा अहवाल, उपरोक्त, परिशिष्ट अ,

५०. तिडके नरेंद्र, माजी मंत्री, यांचा संदेश, रौप्य महोत्सव विशेषांक, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, दि. २१ सप्टेंबर १९८८.

५१. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्षाची टिप्पणी, दिनांक निरंक

५२. महाराष्ट्र शासन, पाटील शिवाजीराव, (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. २७.

५३. पाटील राजाराम, ‘कामगारांचे मनोगत’, माथाडी मित्र पाक्षिक, कामगार व महाराष्ट्र दिन विशेषांक, पाटील अण्णासाहेब (संपादक), मे, १९८१, पृ. क्र. १५.

५४. खिमासिया दिनेश, ‘मालकांचे मनोगत’, माथाडी मित्र पाक्षिक, कामगार व महाराष्ट्र दिन विशेषांक, मे, १९८१, उपरोक्त, पृ. क्र. १६.

५५. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग IV दि. १३ जून १९६९, पृ. १.

५६. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, कामगार–५ कार्यासनाची टिप्पणी, डिसेंबर २०१३.

५७. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्ष, कार्यासन १४ यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. २० जूलै २०११.

५८. महाराष्ट्र शासन, पाटील शिवाजीराव (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. ६३ व ८४.

५९. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, कार्यासन कामगार–५, दि. २६ मार्च २०१०.

६०. किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल, सन २००८–०९, दि. ५ एप्रिल २०१० पृ. २६.

६१. मालवाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई, ३८ वा वार्षिक अहवाल, सन २००८–०९ दि. ६ जुलै २००१ पृ. ४.

६२. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्ष कार्यासन १४ यांची कार्यालयीन टिप्पणी दि. २० जूलै २०११

६३. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. सिआयडी ३३०८/ १८५१ /प्र.क्र.१४ / नवि१० दि. ५ सप्टेंबर २०११.

६४. विक्रीकर आयुक्त कार्यालय, परिपत्रक, क्र. विउआ/प्रशा२९/२०११/ परिपत्रक प्र. १२७, मुंबई दि. ३ ऑगस्ट २०११.

६५. नार्वेकर राधाकृष्ण, 'एका माथाडीचा कर्तबगार सुपुत्र', दैनिक पुण्यनगरी, दि. ९ डिसेंबर २०११.

६६. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग कार्यासन/कामगार–५ दि. ४/१०/२०१२.

६७. महाराष्ट्र शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र. युडब्ल्यु १५०९/प्र.क्र.१८१९/कामगार–५ दि. ३१ ऑगस्ट २००९ व २६ मार्च २०१०.

६८. किराणा बाजार आणि दुकाने मंडळ, बृहन्मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९७०–७१, दि. २८ फेब्रुवारी १९७२, पृ. ७.

६९. तिडके न. म. (माजी कामगार मंत्री), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानसभा इतिवृत्त दि. २५ मार्च १९६९, पृ. ४१७.

७०. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान परिषद सभागृह इतिवृत्त, दि. १ एप्रिल १९६९ पृ. ४६५.

७१. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. ३५ ते ३७.

७२. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा (अध्यक्ष), उपरोक्त, परिशिष्ट, अ,

७३. कित्ता, परिशिष्ट, अ,

७४. पाटील रामचंद्र (संपादक), अपर कामगार आयुक्त पुणे व अध्यक्ष पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००, पृ. ९४ ते ९५.

७५. झावरे शिवाजीराव, सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, पुणे माथाडी कामगार मंडळ, 'मुंबई स्थित माथाडी मंडळे व जिल्हा स्तरीय माथाडी मंडळे–एक दृष्टीक्षेप', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ५१.

७६. महाराष्ट्र शासन, कायदा क्र. ३०/१९६९,(२००६ पर्यंत सुधारित) पृ. ८३४६.

७७. कित्ता, पृ. ८३४४.

७८. कित्ता, पृ. ८३४५.

७९. कित्ता, पृ. ८३४६

८०. कित्ता, पृ. ८३४९.
कित्ता, पृ. ८३४३ A, B, C.

# प्रकरण २ रे

# कामगार चळवळीचा उदय आणि महाराष्ट्रातील  माथाडी कामगार चळवळीची वाटचाल

## २.१ प्रास्ताविक–कामगार चळवळीचा उदय :

जेव्हा उत्पादन प्रक्रिया सुरु झाली तेव्हा पासून कामगार वर्ग अस्तित्वात आहे. उत्पादनसाठी मोबदला देऊन अथवा अल्पसा मोबदला देऊन अथवा मोबदला न देता स्वत: किंवा स्वत:च्या कुटुंबा व्यतिरीक्त अन्य व्यक्तींचा वापर करणे सुरु झाले तेव्हापासून श्रमिक म्हणजेच कामगार वर्ग अस्तित्वात आला.[१] प्रारंभी माणूस भटक्या, रानटी अवस्थेत नैसर्गिक साधन संपत्तीतून खाद्य गोळा करुन जगत होता. त्याला उत्पादन प्रक्रिया अवगत नव्हती. नंतर पिक उत्पादनाची प्रक्रिया माहिती झाल्यावर तो शेती करु लागला. यातूनच खाजगी मालकी व हेतूपुर्वक उत्पादनास सुरुवात झाली. नंतर त्यातील काही शक्तिवान घटक इतरांकडून कमी किंवा विना मोबदल्यात काम करुन घेवून स्वत:चे उत्पादन वाढवू लागले. यातूनच गुलामगिरीची शोषणाची प्रक्रिया सुरु झाली.[२] शोषक व शोषित हे दोन वर्ग निर्माण झाले. त्यातूनच पुढे आपले शोषण टाळून चांगल्या दर्जाचे जीवन जगता यावे यासाठी शोषितांनी शोषकांविरुध्द संघर्ष करण्यास हळूहळू सुरुवात केली.

शेतकरी फावल्या वेळेत जीवनावश्यक वस्तूंचे घरगुती स्वरुपात उत्पादन करुन वस्तू विनिमय पद्धतीने गरजा भागवत असे. कालांतराने जसजशी या वस्तूंची मागणी वाढली तसतसा व्यापारी वर्ग निर्माण झाला. त्यांनी नफा मिळविण्यासाठी उत्पादकाला कच्चा माल व भांडवल पुरवून जास्तीत जास्त उत्पादन होण्यासाठी प्रोत्साहन दिले. या प्रक्रियेतून भांडवलवादी व्यापार पध्दती उदयास आली.[3] या पध्दतीमुळे उत्पादन व नफा मोठ्या प्रमाणात वाढले. मात्र याचा मोठा भाग व्यापारी अथवा भांडवलदार यांना मिळत असे तर कारागिरांना अत्यंत कमी लाभ मिळत असे.

त्यामुळे आर्थिक विषमताही मोठ्या प्रमाणात निर्माण होवू लागली. त्यातून या दोन गटांमध्ये असंतोष वाढीस लागला.

### २.१.१ औद्योगिक क्रांती, भांडवलशाहीचा उदय व कामगार वर्ग :

कालांतराने पुढील काळात कारागिरांना घरगुती स्वरुपाच्या उत्पादन प्रक्रियेतून वाढती मागणी पुरी करणे अशक्य झाले. या गरजेतून यंत्रांचा शोध लागला. युरोपिय देशांमध्ये अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात धावता धोटा, वाफेचे इंजिन, पॉवर लूम यासारख्या लागलेल्या शोधांमुळे औद्योगिकीकरण होवून उत्पादन प्रक्रिया मोठ्या प्रमाणात वाढली.[४] या औद्योगिक क्रांतीचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनावर फार मोठा परिणाम झाला. शिघ्रगतीने प्रवास करणे, एकमेकांशी संपर्क ठेवणे शक्य झाले. शारीरिक कष्ट कमी होवून कौशल्याची आवश्यकता उत्पादन प्रक्रियेसाठी निर्माण झाली. अकुशल कामगारांमध्ये बेकारी वाढली. कारखान्यात काम करण्यासाठी कुशल, अकुशल असे कामगार नेमण्यात येऊ लागले. आर्थिक गुंतवणूक करणारा भांडवलदार वर्ग निर्माण झाला.[५] कच्चा माल व यंत्र सामग्रीसाठी लागणारी गुंतवणूक निश्चित स्वरुपाची आहे. त्यामध्ये कपात करुन भांडवलदारांना नफा वाढविता येत नाही. कामगार व त्याचे श्रम यावरील गुंतवणूक कमी करुन किंवा किमान ठेवून म्हणजेच मजूरी कमी किंवा किमान देऊन उत्पादन वाढविणे व त्यायोगे नफ्याचे प्रमाणही वाढविणे शक्य होते. त्यामुळे भांडवलदार कामगार वर्गाचे शोषण करु लागले.[६] कामगारांना कामाचे निश्चित तास न ठेवता जास्तीत जास्त राबवून घेत, कामाच्या ठिकाणी आवश्यक सुविधा न पुरविणे, सुट्टी न देणे, केलेल्या श्रमापेक्षा कमी मोबदला देणे हे प्रकार भांडवलदार करत. या शोषणामुळेच कामगार एकत्र आले, त्यासाठीची तात्विक बैठक मांडून कामगारांना एकत्र आणणारे कामगार पुढारी निर्माण झाले. कामगार चळवळी सुरु झाल्या.[७] कामगारांनी संघटीत लढ्यासाठी कामगार संघ स्थापन केले व आपल्या न्याय हक्कांच्या मागण्यांसाठी भांडवलदारा विरुध्द संप, उठाव या माध्यमातून संघर्ष सुरु केला.

एकत्रित येऊन अथवा संप करुन मागण्या केल्यास मालकांवर दडपण येते व मागण्या मान्य होतात असा अनुभव कामगारांना आला. सुरुवातीचे काळात भांडवलदारांचे शासनावर दडपण होते. कामगारांची निदर्शने, संप, आंदोलने यांना शासनाचाही विरोधच असायचा. अमेरिकेतील कामगारांनी दररोज आठ तास काम असावे अशी मागणी केली. यासाठी कामगार १ मे, १८८६ पासून संपावर जातील असे जाहिर केले. त्यानुसार १ मे, १८८६ रोजी शिकागो शहरात ४०,००० कामगार संपावर गेले. त्यावेळी कामगारांची सभा उधळण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. कामगारांवर केलेल्या गोळीबारात सहा कामगार ठार झाले. त्यावेळी पोलिसांवरही बॉम्ब टाकला गेला व एक पोलिस मृत्यूमुखी पडला. आठ कामगार नेत्यांवर खटला भरला गेला, त्यापैकी चारजणांना फाशी झाली.[८] ही घटना सामुहिक कामगार चळवळीची सुरुवात मानली जाते. येथूनच कामगारांनी एकत्र येऊन मालक व शासन यांचे विरुध्द संघर्षास सुरुवात केली.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे शेतीबरोबर घरगुती स्वरुपात वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या कारागिरांनी नियमित आणि शाश्वत उत्पन्नाच्या दृष्टीने नोकरीसाठी शहरांकडे स्थलांतर सुरु केले.[९] मालकांनाही कुशल व स्थिर कामगार वर्गाची नियमित व शाश्वत उत्पादनासाठी आवश्यकता होती. त्यामुळे कामगार कसे टिकून राहतील यासाठी ते देखील प्रयत्न करु लागले. कार्ल मार्क्स यांनी सन १८६९ मध्ये लंडन येथे कामगारांची पहिली आंतरराष्ट्रीय संघटना 'International Working Men's Association' स्थापन केली.[१०] कामगारांना अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक सुविधा मिळाव्यात, तसेच त्यांना सामाजिक प्रतिष्ठाही मिळावी हा यामागे उद्देश होता. सन १९१७ मध्ये रशियात लेनीनच्या नेतृत्त्वाखाली साम्यवादी क्रांती झाली.[११] तेव्हा पासून रशियात साम्यवादी सत्ता अस्तित्त्वात आली. मात्र सन १९८० पासून साम्यवादी रशियन अर्थव्यवस्था अडचणीत येवू लागली. त्यामुळे आर्थिक सुधारणांचा बदलत्या काळानुसार अवलंब करण्याशिवाय अन्य मार्ग रशियन राज्यकर्त्यांसमोर राहिला नाही. पेरोस्त्रेईका म्हणजे पुनर्निर्माण (Reconstruction) आणि ग्लासनोस्त म्हणजे खुलेपणा (Openness). सोव्हीयत रशियाचे तत्कालीन अध्यक्ष बोरिस येल्त्सीन यांनी अर्थव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी हे पेरोस्त्रेईका व ग्लासनोस्त धोरण स्विकारले.

त्याचाही जागतिक कामगार चळवळीवर दूरगामी परिणाम झाला. देशातील उत्पन्नाची साधने जनतेच्या मूलत: कामगारांच्या मालकीची असणे हा विचार या रशियन राज्यक्रांतीने दिला. या साम्यावादामुळे जागतिक कामगार चळवळीला विसाव्या शतकाच्या सुरुवातीला एक वेगळी दिशा मिळाली. तरी या शतकाच्या शेवटी सन १९९२ मध्ये सोवियत रशियाला पेरोस्त्रेईका आणि ग्लासनोस्त हे खुले आर्थिक धोरण स्वीकारावे लागले.[१२] तसेच सोविएत रशियाचे विभाजनही झाले. साम्यवादी अर्थव्यवस्थेत रशियामध्ये देशाच्या साधन संपत्तीवर कामगारांची मालकी होती. या कालावधीत रशियाने विज्ञान तंत्रज्ञानासह सर्वच क्षेत्रात प्रगती साधून अमेरिकेलाही शह दिला. असे असतानाही बदलत्या काळात साम्यवादी रशियाला अर्थव्यवस्थेवर नियंत्रण ठेवता आले नाही आणि शेवटी या साम्यवादी राष्ट्राला देखील खुली अर्थव्यवस्था स्विकारावी लागली. चीनने देखील Open Door Policy च्या माध्यमातून सन १९७९ पासून खुले आर्थिक धोरण स्वीकारले आहे.[१३] माओ त्से तुंग यांच्या नेतृत्त्वाखाली सन १९४९ मध्ये चिनी साम्यवादी क्रांती झाली. चीनने आपल्याभोवती साम्यवादाचा पोलादी पडदा उभारला. मात्र त्यांनाही बदलत्या जागतिक अर्थकारणाबरोबर गती राखण्यासाठी खुले धोरण काही प्रमाणात का होईना स्वीकारावे लागले. यावरुन साम्यवादी शासन प्रणाली आणि साम्यवादी कामगार चळवळी देखील कामगारांसाठी एक परिपूर्ण आदर्श विचार प्रणाली ठरु शकलेली नाही. सध्याच्या खुल्या आर्थिक धोरणात कामगार काद्यातील तरतूदी त्यांनाही शिथिल कराव्या लागल्या आहेत.[१४] सेझ (SEZ) म्हणजेच स्पेशल इकॉनॉमिक झोन या संकल्पनेनुसार उद्योग धंद्यांची उभारणी करण्यात येत आहे. या सेझ प्रकल्पातील कामगार समस्यांवर नेहमीच्या स्थानिक कामगार कायद्यानुसार स्थानिक अधिकाऱ्यांना कारवाई करता येत नाही. प्रचलित फॅक्टरी ॲक्ट नुसार स्त्रियांना रात्री १०.०० ते सकाळी ५.३० या वेळेत कामावर ठेवता येत नाही. मात्र कॉलसेंटर, बी.पी.ओ. मधील स्त्री कामगारांनाही २४ तास काम करण्याची मुभा आहे. अशा प्रकारे बदलत्या जागतिक व्यापाराच्या आणि अर्थकारणाच्या संदर्भानुसार उद्योगधंद्यांना काहीसे फायदेशीर असे कामगार कायद्याचे स्वरुप बदलले आहे.

## २.२ भारतीय कामगार चळवळीचा उदय व विकास :

### २.२.१ ब्रिटीशकालीन औद्योगिक व कामगार धोरण :

ब्रिटीशकालीन औद्योगिक व कामगार धोरणात भारतीय कामगार चळवळीचा उगम आहे. भारतातील आधुनिक औद्योगिक विकासाची सुरुवात सन १८५० पासून ब्रिटीश राजवटीत झाली. सन १८५३–५४ मध्ये भारतात रेल्वे, पोस्ट व तारायंत्र आणि इतर आधुनिक दळणवळणाची साधने सुरु झाली.[१५] ब्रिटीशांचा मूळ उद्देश व्यापारातून नफा कमविणे हाच होता. त्यामुळे त्यांनी व्यापाराच्या वृध्दीसाठी तसेच भारतावरील सत्तेची पकड घट्ट करण्यासाठी ही दळणवळणाची साधने निर्माण केली. रेल्वेमुळे कच्च्या आणि पक्क्या मालाची तसेच सैन्य आणि दारुगोळ्याची जलद वाहतूक करणे शक्य झाले. तार, टेलिफोन यामुळे संदेशाची, बाजारभावाची माहिती तातडीने होवू लगाली. भारत सुरुवातीपासूनच कृषीप्रधान देश आहे.[१६] त्यावेळी ९० टक्केपेक्षा जास्त लोक शेतीवर अवलंबून होते. शेतकरी आपल्या जीवनावश्यक गरजा बारा बलुतेदारी पध्दतीने वस्तूविनिमयाने भागवत होते. ग्रामीण भागातील भूमीहीन शेतमजूर, कोरडवाहू शेती करणारे व अल्पभूधारक शेतकरी हे कुटीर उद्योगात काम करीत. या कुटीर उद्योगातून मलमल, रेशमी कापड यासारख्या वस्तूंचे उच्च दर्जाचे उत्पन्न होत असे. या वस्तूंना त्यांच्या दर्जामुळे जगभरातून मागणी होती. कला व हस्तव्यवसाय याबाबत भारत तत्कालीन युरोपच्या तुलनेने प्रगत होता. भारतीय कारागीरांचे हस्तकौशल्य तसेच राजे लोकांच्या संपत्तीबाबत भारत प्रसिध्द होता.[१७] भारतातुन युरोप, पश्चिम आफ्रिका, मध्यपूर्व, मध्य आशिया व जपान इत्यादी देशांना निर्यात केली जात असे. त्या देशातून सोने व अन्य मौल्यवान धातू आयात केले जात. सतराव्या–अठराव्या शतकापर्यंत ही स्थिती होती. युरोपातील औद्योगिक क्रांतीनंतर आणि ब्रिटीशांनी भारतावर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर ही परिस्थिती बदलली.[१८] वस्तूंचे कारखान्यातून मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरु झाले व किंमती कमी झाल्या. त्यामानाने भारतीय कुटीर उद्योगातील उत्पादन वाढवणे अथवा किमती कमी राखणे शक्य नव्हते. त्याचा परिणाम स्थानिक उद्योगांवर झाला.

देश आर्थिकदृष्ट्या सक्षम राहून आणि आर्थिक विकास होण्यासाठी निर्यात अधिक आणि आयात कमीत कमी असणे आवश्यक असते. त्यामुळे भारताच्या निर्यातीची युरोपीय देशांनी दखल घेतली. इंग्लंडने सन १७०१ व सन १७२० मध्ये भारतातून इंग्लंडमध्ये होणाऱ्या आयातीवर बंधने घालणारे कायदे पास केले.[१९] त्यामुळे परदेशी माल स्वस्त दरात आणि देशी माल महाग अशी परिस्थिती निर्माण झाली. भारतातील स्वस्त कच्चा माल युरोपीय बाजारपेठेत निर्यात करणे, तेथील यंत्रावर मोठ्या प्रमाणात कमी उत्पादन खर्चात पक्का माल तयार करणे, हा पक्का माल भारतात आयात करुन स्थानिक मालाच्या किंमतीच्या तुलनेने कमी किमतीत विकणे हे धोरण ठेवले. त्यामुळे येथील जुने उद्योगधंदे हळूहळू नामशेष झाले.[२०] इंग्रजांच्या आर्थिक व राजकीय वसाहतवादी धोरणांमुळे भारतातील कुटीरोद्योग व हस्तव्यवसाय नवनवीन शास्त्रीय शोध व यंत्राच्या मदतीने बनवलेल्या मुबलक उत्पादनांशी स्पर्धा करु शकले नाहीत. इंग्रजांनी भारतातील मालावर विविध कर, मोठ्या प्रमाणावर जकाती लादल्या. भारतीय कुटीरोद्योग व हस्त व्यवसायातील बेकार झालेले कारागीर रोजगारासाठी शहरात आले.[२१] ब्रिटीशांनी भारतात कारखानदारी पध्दतीच्या उद्योगधंद्यांचा विकास सुरु केला. ग्रामीण भागातील या लोकांना शहरातील कारखान्यात मजूर म्हणून काम करण्याची मागणी वाढू लागली. इंग्लंडमधील व्यापाराला चालना देणे, भारतात कच्च्या मालाचे उत्पादन करणे, येथील वाढत्या स्थानिक लोकसंख्येच्या गरजा पुरविणे व त्यातून नफा कमविणे, राजकीय सत्ता अबाधित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे या ब्रिटीशांच्या उद्देशातून हा उद्योगधंद्याचा, कामगार धोरणाचा व दळणवळणाच्या पायाभूत सुविधांचा विकास सुरु झाला होता.

अशा प्रकारे भारतात कामगार चळवळीची खऱ्या अर्थाने सुरुवात ब्रिटीश राजवटीत झाली. ब्रिटीशांचा मुख्य उद्देश नफा कमविणे हा असल्यामुळे कामगार हा घटक दुय्यम ठरला. ब्रिटीश सत्तेला बाधा येईल अशा प्रकारे स्थानिक परिस्थितीत हस्तक्षेप न करण्याचे ब्रिटीशांचे धोरण होते. मात्र जेव्हा कामगार चळवळीचा जोर वाढला आणि परिणाम स्वरुप अशांतता निर्माण झाली. त्याचा उत्पादनावर विपरित परिणाम होऊ लागला. तेव्हा ब्रिटीश शासनाने भारतीय कामगारांसाठी विविध कायदे करुन त्यांना कायद्याने संरक्षण दिले. हळूहळू कामगार वर्ग अधिक संघटीत होऊन जास्तीत

जास्त न्याय्य मागण्या मान्य व्हाव्यात यादृष्टीने ब्रिटीश शासनाशी आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय शासनाशीही संघर्ष करत आहे. जो कामगार वर्ग मोठ्या कारखाने किंवा आस्थापनांमध्ये मोठ्या संख्येने काम करतो तो सहजपणे एकत्र येऊन संघर्ष करतो, अशा कामगार वर्गासाठी शासनाने प्राधान्याने कायदे केले. मात्र जो मोठा कामगार वर्ग विखुरलेल्या स्वरुपात असंघटितपणे बांधकाम, मालवाहतूक, घरकाम इत्यादी स्वरुपाचे काम करत आहे, त्याचा शासनाने फारसा प्राधान्याने विचार केलेला नाही, नंतरच्या काळात प्रदीर्घ संघर्षाअंती या कामगारांसाठी कल्याणकारी कायदे केले तरी या कायद्यांच्या अंमबजावणीसाठी देखील पुन्हा–पुन्हा त्यांना संघर्ष करावा लागत आहे.

## २.३ भारतीय राज्यघटना आणि कामगारांसाठीच्या तरतूदी :

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्येच भारत एक सार्वभौम समाजवादी आणि आर्थिक न्याय व समानता असणारे गणराज्य घडविण्याचा संकल्प नमूद आहे. त्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या निदेशक तत्वामध्ये पुढील तरतूदी आहेत.[२२]

**अनुच्छेद ४१ :** राज्य हे, आपल्या आर्थिक क्षमता व विकास यांच्या मर्यादेत कामाचा, शिक्षणाचा हक्क आणि बेकारी, वार्धक्य, आजार व विकलांगता यांनी पिडीत अशा व्यक्तींच्या बाबतीत लोकसहाय्याचा हक्क उपलब्ध करुन देण्यासाठी परिणामकारक तरतूद करील.

**अनुच्छेद ४२ :** राज्य हे, कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसूतीविषयक सहाय्यासाठी तरतूद करील.

**अनुच्छेद ४३ :** राज्य हे, यथायोग्य, विधी–विधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करुन शेतकी, औद्योगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम, निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतीचा आणि सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग याची शाश्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करुन

देण्यासाठी आणि विशेषत: ग्रामीण क्षेत्रामध्ये कुटीरउद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील.

**अनुच्छेद ४३ क :** राज्य हे, कोणत्याही उद्योगात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा संघटना यांच्या व्यवस्थापनामध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी यथायोग्य विधी–विधानाद्वारे किंवा अन्य मार्गाने उपाययोजना करील.

अशा प्रकारे भारतीय संविधानाने समाजवाद, आर्थिक न्याय, बेकारी विरुध्द उपाययोजना, कामाच्या ठिकाणी योग्य परिस्थिती, प्रसूतिविषयक सहाय्य याची तरतूद केली आहे. तसेच असंघटीत कामगारांसाठी देखील काम, निर्वाह वेतन, कामगारांची सामाजिक व सांस्कृतिक उन्नती, कामगारांचा व्यवस्थापनात सहभाग याबाबत राज्यांना मार्गदर्शक तत्त्वे विहीत करुन दिली आहेत. मात्र या कल्याणकारी सुविधा प्राप्त करुन घेण्यासाठी या कामगारांना सातत्याने संघर्ष करावा लागला आहे.

## २.४ पंचवार्षिक योजना आणि औद्योगिक विकास व त्याचा कामगार धोरणावरील परिणाम :

सन १९४७ ते सन १९५१ या स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक धोरणाची नव्याने आखणी करण्यात आली. देशाचा सर्वांगिण विकास व्हावा म्हणून सन १९५१ पासून पाच वर्षाचे नियोजन करुन योजना आखण्यात आल्या, त्यास पंचवार्षिक योजना म्हणतात.[२३] विविध समस्या तसेच औद्योगिक शांतता व सलोखा राहण्याच्या दृष्टीने मालक व कामगार वर्गातील संघर्ष टाळण्याचे जास्तीत जास्त प्रयत्न या काळात झाले. पहिल्या पंचवार्षिक योजनेत (सन १९५१–५६) सार्वजनिक उद्योगांवर भर देण्यात आला. हिंदुस्थान मशीन टूल्स, हिंदुस्थान जहाज बांधणी कारखाना, नॅशनल इंस्ट्रूमेंटस् इत्यादीची स्थापना करण्यात आली.[२४] औद्योगिक विकासाची जबाबदारी प्रामुख्याने खाजगी क्षेत्रावर टाकण्यात आली. मात्र त्यांना अपेक्षित मदत न झाल्यामुळे पहिल्या योजनेत अपेक्षित औद्योगिक विकास झाला नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत (सन

१९५६–६१) औद्योगिक विकासाचा पाया मजबूत व विस्तृत करण्यात आला. तिसऱ्या (सन १९६१–१९६६) योजनेतही औद्योगिक विकासाला अग्रक्रम देण्यात आला. मात्र चीन व पाकिस्तानशी झालेली युद्धे, परकीय चलनांचा तसेच भांडवलाचा तुटवडा, नैसगिर्क प्रतिकूल परिस्थिती यामुळे मंद प्रगती झाली. चौथ्या योजनेत (सन १९६९–१९७४) निर्यातीला प्रोत्साहन व आयात कमीतकमी करणे यादृष्टीने औद्योगिक प्रगतीसाठी प्रयत्न करण्यात आले. पाचव्या पंचवार्षिक योजनेत (सन १९७४–१९७९) गरीबी निर्मूलनाला आणि आत्मनिर्भरतेला प्राधान्य देण्यात आले. या योजनेत २४% खर्च औद्योगिक विकासावर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. सहाव्या पंचवार्षिक योजनेत (सन १९८०–१९८५) आर्थिक उदारीकरणाच्या धोरणास सुरुवात झाली. या काळात लोकसंख्या वाढीला आळा घालणे, तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलीकम्युनिकेशन या उद्योगास प्राधान्य देण्यात आले. सातव्या पंचवार्षिक योजनेच्या (सन १९८५–१९९०) काळात आर्थिक उत्पादकता वाढविणे, अन्नधान्य उत्पादन वाढविणे आणि रोजगार वाढविणे हे प्रमुख उद्देश होते. सन १९८९ ते १९९१ हा काळ भारतासाठी आर्थिक अस्थैर्याचा होता. परदेशी चलनाची स्थिती अत्यंत बिकट होती. या काळात पंचवार्षिक योजनेऐवजी केवळ वार्षिक योजना राबविण्यात आल्या. या आर्थिक अस्थैर्याच्या काळात आठव्या पंचवार्षिक योजनेस (सन १९९२ ते १९९७) सुरुवात झाली. तत्कालीन प्रधानमंत्री श्री. नरसिंहराव व अर्थमंत्री श्री. मनमोहनसिंग यांनी आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारले. याच काळात खाजगीकरणास आणि उदारीकरणास सुरुवात झाली. भारताने जागतिक व्यापार संघटनेचे (W.T.O.) सदस्यत्व दि. १ जानेवारी १९९५ रोजी स्विकारले.[२५] याचा परिणाम भारतीय उद्योगधंदे, तसेच कामगारांवरही झाला. या दोहोंचे सुरक्षा कवच नष्ट झाले. जगातील बाजारपेठेशी त्यांचा थेट संबंध निर्माण झाला. उद्योगांच्या आधुनिकीकरणावर भर देण्यात आला. नवव्या पंचवार्षिक योजनेत (सन १९९७–२००२) आद्योगिकीकरणास चालना देणे, मानव विकास निर्देशांकात वाढ, पूर्णवेळ रोजगार उपलब्धी, गरीबी कमी करणे इ. मुख्य धोरण होते. दहाव्या पंचवार्षिक योजनेत (सन २००२–२००७) २० कलमी कार्यक्रमांद्वारे सर्वांगिण विकासाचे ध्येय ठेवण्यात आले. तर अकराव्या

पंचवार्षिक योजनेत (सन २००७–२०१२) ७० मिलीयन नवीन रोजगार निर्मिती उद्योगांना चालना देणे हे उद्दिष्ट होते. त्याचबरोबर आरोग्य, शिक्षण, महिला व बालकांचे प्रश्न, पर्यावरण, पायाभूत सुविधांची निर्मिती या बाबींवर भर देण्यात आला.[२६]

अशाप्रकारे भारतात स्वातंत्र्योत्तर काळात उद्योगांचे बाबत सुरुवातीच्या काळात शासनाची मालकी ठेऊन साम्यवादी धोरण होते. नंतर खाजगी क्षेत्रातील उद्योगांना वाव देण्यात आला. सन १९९१–९२ पासून खूल्या आर्थिक धोरणामुळे भारतातील कामगार व त्यांचे भविष्य हे जगातील बाजारपेठेशी व घडामोडींशी जोडले गेले. या काळात कामगार कायदे देखील शिथिल करण्यात आले. चीन सारख्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या किंमती तुलनेने अत्यंत कमी असल्यामुळे त्यांची भारतीय बाजारपेठत भारतीय मालापेक्षाही जास्त प्रमाणात विक्री होत आहे. कामगारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. परदेशी उद्योगधंदे भारतात आले. यामुळे आर्थिक उन्नत्ती व रोजगार वाढला आहे. मात्र यामुळे उद्योगधंदे पुन्हा एकदा परकीयांच्या हाती जावून भविष्यात आर्थिक परावलंबित्वाची स्थितीदेखील येऊ शकते आणि याचा दूरगामी परिणाम कामगार वर्गावर होईल. या सर्व पंचवार्षिक योजनांमध्ये कामगारांचा विचार करताना प्रामुख्याने संघटीत स्वरुपात, कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या कल्याणाचा विचार झाला. माथाडी, हमाल, सफाई कामगार, बांधकाम मजूर, शेतमजूर, घरकाम करणाऱ्या महिला, यंत्रमाग कामगार आणि इतर असंघटीत स्वरुपात काम करणाऱ्या कामगारांच्या कल्याणाचा, त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदा करुन त्याची अंमलबजावणी करणे, त्यांच्यासाठी यंत्रणा निर्माण करणे याचा गंभीरपणे विचार नियोजन काळात झाला नाही. यामुळे या असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षितता व अन्य लाभासाठी अद्यापही वारंवार संघर्ष करावा लागत आहे.

## २.५ भारतातील मालक–कामगार संबंध आणि विविध संप व त्यांचा कामगारांवरील परिणाम :

भारतातील मालक–कामगार संबंध हे ब्रिटीशांनी सुरु केलेल्या औद्योगिकीकरणाशी निगडीत आहेत. भारतात आधुनिक उद्योगधंद्यांना सुरुवात झाल्यावर या उद्योगांमध्ये काम करण्यासाठी प्रामुख्याने ग्रामीण भागातील बेकार शेतमजूर शहरात आले. तेथील स्थानिक परिस्थतीशी जुळवून घेत त्यांनी कारखान्यात कामाला सुरुवात केली. प्रथमत: आहे तशी परिस्थिती स्विकारणाऱ्या कामगारांनी हळूहळू अन्यायाविरुध्द एकजूट होऊन निवेदने, संप, निदर्शने या माध्यमातून मालकांकडे आपल्या मागण्या मांडण्यास सुरुवात केली.

### २.५.१ मालक–कामगार संबंधाचे उद्योग आणि जनजीवनावरील परिणाम :

मालक व कामगार यांच्यातील संबंध सुदृढ राहिल्यास राष्ट्राचा औद्योगिक व सामाजिक विकास जलद होतो.[२७] मालकांचा उद्देश कामगारांचे श्रमासह सर्वच घटकांचा कमी मोबदल्यात जास्तीत जास्त वापर करुन शक्य तितका नफा कमाविणे हा असतो. त्यामुळे कामगारांमध्ये त्यांचेवर अन्याय होत असल्याची भावना निर्माण होते. यातूनच संप, टाळेबंदी, आंदोलने इत्यादी समस्या निर्माण होतात. यातून औद्योगिक कलह व अशांतता निर्माण होते आणि मालक व कामगारातील संबंध दुरावतात. उत्पादनात खंड पडतो, राष्ट्रीय संपत्तीची हानी होते.

संघटीत कामगारांना कामगार कायद्यातील तरतूदींनुसार बहुतांश लाभ मिळतात, मात्र माथाडी कामगार व अन्य असंघटीत कामगारांना कायद्याच्या तरतूदी निर्माण करुन घेणे आणि कालानुरुप त्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी वारंवार संघर्ष करावा लागतो.प्रयत्नांची शिकस्त करावी लागते.[२८] हे कामगार मुलत: अशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे त्यांचा प्रभावी दबाव गट निर्माण होत नाही. त्यामुळे त्यांच्या मागण्या लगेच मान्य होत नाहीत. संघटीत कामगारांपेक्षा असंघटीत कामगारांच्या संपाचा सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर जास्त परिणाम होतो व जीवनावश्यक सेवा विस्कळीत होतात.[२९] संघटित कामगार प्रामुख्याने वस्तूंच्या उत्पादनाचे

काम करतात तर असंघटित कामगार कच्चा माल कारखान्यापर्यंत पोहचविणे आणि उत्पादित वस्तू गिऱ्हाईकापर्यंत पोहोचविण्याचे काम करतात. असंघटित कामगार संपावर गेल्यास या साखळीतील सुरुवातीचा व शेवटचा दुवा बंद पडतो आणि सर्वसामान्यांना जीवनावश्यक वस्तू मिळणे बंद होते. मात्र या असंघटित कामगारांच्या बिकट सामाजिक व आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी एकत्रित येवून आपल्या मागण्यांसाठी मालकाकडे तसेच शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणे त्यांना परवडणारे व सहज शक्यही नसते. त्यामुळे अशा कामगारांच्या लढ्याचा इतिहास मांडणे महत्त्वपूर्ण ठरते.

### २.५.२ भारतातील आद्योगिक कलह व त्यांचे परिणाम :

भारतात औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीच्या काळापासून कमी जास्त प्रमाणात औद्योगिक कलह निर्माण झाले आहेत. पहिल्या महायुध्दापूर्वी हे प्रमाण किरकोळ मागण्यांपोटी होते. मात्र, युध्दानंतर संपाचे प्रमाण वाढले. संप प्रामुख्याने कामगारांच्या वैयक्तिक मागण्यांपोटी झालेले असले तरी भारतीय स्वातंत्र्य लढ्याला पाठिंबा देण्यासाठी देखील संप झालेले आहेत. भारतातील औद्योगिक कलहाचे पुढीलप्रमाणे ढोबळ मानाने कालानुक्रमे वर्गीकरण करता येईल.[३०]

१. पहिल्या महायुद्धा दरम्यानच्या काळातील औद्योगिक कलह.

२. सन १९२९ ते सन १९३९ या कालखंडातील औद्योगिक कलह.

३. दुसऱ्या महायुध्दा दरम्यानच्या काळातील औद्योगिक कलह.

४. पंचवार्षिक नियोजनाच्या पहिल्या टप्प्यातील काळ (सन १९५० ते सन १९७५)

५. पंचवार्षिक नियोजनाच्या दुसऱ्या टप्प्यातील काळ (सन १९७५ ते सन १९९२)

६. आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्विकारल्यानंतरचा काळ (सन १९९२ पासून)

सुरुवातीला सर्वच कामगार असंघटीत होते, कामगार संघटना नव्हत्या. त्यामुळे या सुरुवातीच्या काळातील एकाच प्रकारच्या कारखान्यातील किंवा उद्योगातील असंघटित कामगारांनी हळूहळू संघटित होत कल्याणकारी सुविधा मिळविण्यासाठी अणि वेतनवाढीसाठी केलेला संघर्ष आणि ब्रिटीश राजवटीच्या नंतरच्या काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील माथाडी हमाल आणि

इतर असंघटीत कामगारांचा संघर्ष यामध्ये बरेच साम्य आहे. हे दोन्ही प्रकारचे कामगार समान सामाजिक व आर्थिक परिस्थितीतून आलेले तसेच असंघटितपणे काम करणारे, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटकच होते. त्यामुळे भारतातील औद्योजिक कलहाचा या अनुषंगाने पूर्वीपासूनचा इतिहास पाहणे आवश्यक वाटते.

### २.५.२.१ पहिल्या महायुध्दा दरम्यानच्या काळातील औद्योगिक कलह :

भारतातील अशिक्षित व असंघटीत कामगारांना एकत्र आणून 'बॉम्बे मील हॅन्ड असोसिएशन' ही भारतातील पहिली कामगार संघटना आद्य कामगार नेते श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी सन १८८४ मध्ये स्थापन केली.[३१] फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी दि. २३ सप्टेंबर १८८४ रोजी सुपारीबाग, परळ येथे ४००० कामगारांच्या उपस्थितीत तसेच दि. २६ सप्टेंबर १८८४ रोजी भायखळा येथे कामगारांची प्रचंड सभा घेतली. दि. १५ ऑक्टोबर १८८४ रोजी त्यांनी ५५०० कामगारांच्या सह्यांचे मागण्यांचे ठराव कलेक्टर डब्ल्यु. बी. मुलक यांचे अध्यक्षतेखालील आयोगाला दिले. पुन्हा दि. २४ एप्रिल १८९० रोजी त्यांनी याच मागण्यांसाठी रेसकोर्स मैदानावर १०००० कामगारांची सभा घेतली. दर रविवारी सुट्टी द्यावी, जेवणासाठी अर्धा तास सुट्टी, कामाची वेळ निश्चित करावी, पगार १५ तारखेपर्यंत द्यावा, जखमी कामगाराला पूर्ण पगार आणि मृत्यू झाल्यास कुटुंबाला पेन्शन द्यावी अशा त्यांनी मागण्या केल्या. त्यांच्या प्रयत्नामुळे दिनांक १० जून १८९० रोजी दर रविवारी कामगारांना साप्ताहिक सुट्टी देण्याचा निर्णय जाहिर करण्यात आला.[३२] भारतीय कामगार चळवळीचा हा पहिला आणि महत्त्वपूर्ण विजय आहे. यामुळे कामगार चळवळीचा आत्मविश्वास वाढून ही चळवळ अधिक व्यापक व सक्षम झाली. सन १८८८ मध्ये टिळक व आगरकर यांनी बहुजन हिताची भूमिका घेतल्यामुळे श्री. माधवराव बर्गे यांनी दाखल केलेल्या खटल्यात त्यांना १९० दिवसांची शिक्षा झाली. श्री. नारायण लोखंडे यांनी टिळक व आगरकर यांची डोंगरीच्या तुरुंगातून सुटका झाल्यावर कामगारांच्या उपस्थितीत भव्य मिरवणूक काढली. त्यांचा सत्कार करुन त्यांना मानपत्र दिले.[३३] या दोन्ही तरुण संपादकांनी बहुजन हिताचीच भूमिका यापुढेही घ्यावी व त्यासाठी त्यांना लोकांचा पाठिंबा मिळावा हा उद्देश यामागे होता. अशा

प्रकारे श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी अगदी सुरुवातीच्या काळात विधायक मार्गाने कामगारांच्या हितासाठी काम केले. त्यांनी ज्या मागण्या ब्रिटीश शासनाकडे मांडून ६ वर्षात सहजासहजी मान्य करुन घेतल्या, तशाच मागण्या स्वातंत्र्योत्तर काळात आपल्याच शासनाकडून मान्य करुन घेण्यासाठी माथाडी कामगारांना सन १९४७ ते सन १९६९ अशी २२ वर्षे लागली. सन १८९७ मध्ये मुंबईच्या कापड उद्योगातही पगार पध्दतीवरुन संप झाला. प्लेगच्या साथीत दररोज पगार देण्याची पध्दत होती ती बंद करुन पुन्हा मासिक पगार देण्याची पध्दत सुरु केल्यामुळे हा संप करण्यात आला होता.[३४] मुंबईमध्ये सन १९१८ मध्ये गिरणी कामगारांचा संप झाला. यामध्ये जवळपास १,२०,००० कामगार सहभागी झाले होते. ब्रिटीश सैनिकांनी संपकऱ्यांवर केलेल्या गोळीबारात जवळपास २०० कामगार मृत्यूमुखी पडले होते. अशा प्रकारे आपल्याच कष्टाचा पगार आपल्या अपेक्षेनुसार वेळेत मिळावा, या मागणीसाठी गिरणी कामगारांना प्राण गमवावे लागले आहेत.

एकंदरीत पहिल्या महायुध्दापूर्वी कमी प्रमाणात औद्योगिक कलह निर्माण झाले. हा भारतीय औद्योगिकीकरणाच्या सुरुवातीचा काळ होता आणि त्यांच्या संघटीकरणाची प्रक्रीया नुकतीच सुरु झालेली होती. या संपांना सर्वसामान्य जनतेचा पाठिंबा नव्हता तसेच कामगार मोठ्या प्रमाणात मालकांशी एकनिष्ठ होते. त्यांना दीर्घकालीन आर्थिक व इतर फायद्यांसाठी संपाचे महत्वही पटलेले नव्हते. त्यामुळे पहिल्या महायुध्दापूर्वी झालेले जवळपास सर्व संप किरकोळ स्वरुपाचे होते आणि ते अयशस्वी ठरले.

महात्मा गांधींनी स्वदेशीची चळवळ सुरु केल्यानंतर कामगार वर्गांकडून या चळवळीला मोठा प्रतिसाद मिळाला. मुंबई येथे दिनांक १२ डिसेंबर १९३० रोजी विदेशी मालाच्या ट्रकसमोर स्वत:ला झोकून देवून हुतात्मा झालेला बाबु गेनू सैद हा माथाडी कामगार होता.[३५] अशा प्रकारे माथाडी कामगार वर्गाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यात देखिल योगदान दिलेले आहे. मालकांना पहिल्या महायुध्दाच्या काळात मोठ्या प्रमाणात नफा झालेला होता आणि त्यामुळे त्यांनीही कामगारांच्या वेतनाच्या मागण्या मान्य केल्या. मुंबईमध्ये गोदीतील हमाल, माथाडी कामगारांनी सन १९२० मध्ये

आपल्या विविध मागण्यासाठी संप केला होता.[३६] या गोदी कामगारांनी एकजूटीने वारंवार संघर्ष केला.[३७] दरम्यान सन १९२८ मध्ये औद्योगिक अशांतता मोठ्या प्रमाणात वाढली.[३८] या काळात हळूहळू नफ्याचे प्रमाण घटत गेले. मालकांनी मंदीला तोंड देण्यासाठी वेतन घट, कामगार कपात, नवीन उत्पादन पध्दती इत्यादी पर्याय वापरण्यास सुरुवात केली.

### २.५.२.२ सन १९२९ ते १९३९ या कालखंडातील औद्योगिक कलह :

या कालखंडात ब्रिटीश सरकारने औद्योगिक शांततेबाबत अलिप्ततेचे धोरण सोडले. प्रथमच संपाला बंदी करणारे कायदे केले.

या कालखंडाच्या सुरुवातीलाच सन १९२९ चा औद्योगिक कलह कायदा अस्तित्वात आला. सन १९२९ मध्ये 'रॉयल कमिशन ऑन लेबर' नेमण्यात आले. सन १९३० ते सन १९३५ या कालखंडात जीवनावश्यक वस्तूच्या किंमती कमी झाल्यामुळे वेतनवाढीच्या मागण्यांही आपोआपच बंद झाल्या. त्यानंतर सन १९३७ ते सन १९३९ या कालखंडात आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्यामुळे मध्यंतरीच्या काळात केलेली वेतन कपात रद्द करण्याची मागणी व अन्य मागण्याही वाढल्या.[३९] या कालखंडात औद्योगिक शांततेसाठी ब्रिटीशांनी हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. त्यामुळे संपांना आळा घालता आला.

### २.५.२.३ दुसऱ्या महायुध्दादरम्यान काळातील औद्योगिक कलह :

दुसऱ्या महायुद्धादरम्यान औद्योगिक शांतता होती.[४०] कामगार वर्गाने ब्रिटीश सरकारला युध्द प्रयत्नात मदत करण्याची भूमिका या कालावधीत घेतली होती. अत्यावश्यक सेवा उदा. रेल्वे, पोस्ट, टेलिग्राफ यामध्ये संपांना पूर्णपणे बंदी घातली होती. तसेच भारतीय पुढाऱ्यांनीही युध्दकाळात ब्रिटीशांना मदत करण्याची भूमिका घेतली होती. मात्र दुसऱ्या महायुध्दानंतरही ब्रिटीश सरकारने कामगारांच्यासह सर्वच भारतीयांच्या अपेक्षेचा भंग केला तसेच युध्दामुळे जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ झाली. त्यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला. त्यामुळे सन १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत कामगारांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

सन १९४६ ते सन १९५० च्या कालखंडात मोठ्या प्रमाणात औद्योगिक अशांतता होती. स्वातंत्र्यप्राप्ती बरोबरच आपल्या परिस्थितीतही सुधारणा होतील अशी कामगारांना अपेक्षा होती.[४१] मात्र वाढत्या घाऊक निर्देशांकानुसार कामगारांच्या वेतनात मात्र त्याप्रमाणात वाढ झाली नाही. कामगारांवर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव पडू लागला होता. सप्टेंबर १९४७ मध्ये मुंबईतील एकूण ५८ कापड गिरण्यांतील कामगारांनी सार्वत्रिक संप केला. या संपाचा उत्पादन प्रक्रियेवर अनिष्ट परिणाम झाला. नोव्हेंबर १९४७ मध्ये मुंबई गोदीतील हमाल व इतर कामगारांनी कंत्राटी पध्दत बंद करावी या मागणीसाठी श्री. डिमेलो यांच्या नेतृत्त्वाखाली संप केला.[४२] हा संप यशस्वी होऊन मुंबई बंदरातील कंत्राटी कामगार पध्दती बंद झाली. इंग्लंडमध्ये रॉयल कमिशन ऑफ लेबरच्या शिफारशीनुसार तेथील कामगारांसाठी केलेल्या कायद्याप्रमाणे या गोदी कामगारांसाठी डॉक लेबर वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट) ॲक्ट, १९४८ हा कायदा करण्यात आला. या कायद्यात महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार कायद्याची बीजे आहेत.

सन १९४६ ते सन १९५० या काळात घाऊक किंमत निर्देशांकात झालेली ३० टक्के पर्यंतची वाढ, देशाची झालेली फाळणी आणि स्थित्यंतराची स्थिती, साम्यवादाचा वाढता प्रभाव, कामगारांना त्यांच्या हक्काची झालेली जाणीव, स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या शासनाप्रती असलेल्या अपेक्षा ही वरीलप्रमाणे औद्योगिक कलहाची तिव्रता वाढण्याची प्रमुख कारणे होती.

### २.५.२.४ पंचवार्षिक नियोजनाच्या सुरुवातीच्या टप्प्यातील काळ(सन १९५० ते १९७५):

सन १९५१ ते १९५४ या कालखंडात औद्योगिक शांतता चांगल्याप्रकारे होती. सन १९५५ ते १९६२ या कालखंडात औद्योगिक कलहांची संख्या वाढली. चीनचे सन १९६० चे आक्रमण आणि सन १९६५ मधील पाकिस्तानशी झालेल्या युध्दानंतरच्या कालखंडात किंमतीमुळे सतत औद्योगिक अशांतता राहिली. मात्र, युध्द काळात देशाची गरज लक्षात घेऊन कामगार व मालक या दोघांनीही औद्योगिक शांतता कायम ठेवून परकीय शक्ती विरुध्द लढा देण्यास मदत करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. मात्र स्वतंत्र भारताकडून कामगारांची अपेक्षा पूर्ती न झाल्यामुळे औद्योगिक अशांतता वाढत गेली.[४३] यामध्ये महाराष्ट्रातील माथाडी कामगारांचा देखील समावेश

होता. सन १९६० ते सन १९७० या दशकात या माथाडी कामगारांनी एकत्र येवून स्वतंत्र अधिनियमाची मागणी करुन ती मान्य करुन घेतली व त्यामधून सामाजिक सुरक्षितता व आर्थिक लाभ हे हक्क मिळविले.

### २.५.२.५ पंचवार्षिक नियोजनाच्या नंतरच्या टप्प्यातील काळ(सन १९७५ ते सन १९९२):

या काळातील प्रमुख संप म्हणजे डॉ. दत्ता सामंत यांच्या नेतृत्त्वाखालील मुंबईतील गिरणी कामगारांचा दि. १८ जानेवारी १९८२ रोजी सुरु झालेला संप होय. हा संप प्रदीर्घ काळ लांबला. अद्यापही कागदोपत्री हा संप तांत्रिकदृष्ट्या सुरुच आहे. संपामुळे अनेक कापड गिरण्या बंद पडल्या, त्यातील कामगार बेकार झाले. त्यांचे एकंदरीत परिणाम कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक जीवनावर झाला.[४४] संपाचा कालावधी आणि त्याचा कामगारांवरील परिणाम पाहता कामगार नेत्यांनी संपाबाबत कसे तारतम्य ठेवले पाहिजे याची शिकवण या संपाने दिली.

या काळात असंघटीत, असुरक्षित व ग्रामीण कामगारांच्या संघटना बांधल्या गेल्या आणि या माध्यमातून या कामगारांच्या सामाजिक सुरक्षिततेसाठी आंदोलने सुरु झाली.[४५] ग्रामीण भागातील शेतमजुर, रोजगार हमीच्या कामावरील हजेरी सहाय्यक, मिस्त्री, वनकामगार, अंगणवाडी कर्मचारी इत्यादींना हिंद मजदूर संघटनेने संघटीत केले. डॉ. बाबा आढाव यांनी हमाल पंचायतीच्या माध्यमातून राज्यभरात माथाडी मंडळांची स्थापना व्हावी यासाठी काम सुरु केले. आंदोलने, विधानभवनावर मोर्चा या माध्यमातून त्यांच्या मागण्या शासनाकडे मांडण्यास सुरुवात केली. सांगली, कोल्हापूर परिसरात बापू मगदूम यांनी हमाल मापाडी कामगार, हळद कामगार, मैला मजदूर, बांधकाम कामगार यांना संघटीत करुन यांच्या मजूरी व नोकरी यांची शाश्वती तसेच भविष्याची सुरक्षितता यासाठी प्रयत्न सुरु केले. अन्नधान्य गोदामातील कामगारांसाठी वाहतूक आणि गोदी कामगार युनियनचे श्री. मनोहर कोतवाल, श्री. एस. आर. कुलकर्णी, श्री. एन. डी. कांबळे यांनी राज्यभर आंदोलने केली. यामुळे या कामगारांना नोकरीत कायम करण्यात आले.

लासलगांव, पिंपळगांव बसवंत येथे नाफेडच्या कांदा कामगारांची कंत्राटी पध्दतीतून मुक्तता करण्याच्या मागणीसाठी सन १९८४ मध्ये १४७ दिवसांचा संप करण्यात आला. या संपास मुंबईच्या गोदीतील कामगारांनी नाफेडच्या मालावर बहिष्कार टाकून पाठिंबा दिला. यामुळे हा संप यशस्वी झाला. याच कालावधीत राज्यभरात माथाडी कामगार मंडळे स्थापन व्हावी यासाठी संघर्ष सुरु होता, त्यातून बहुतांश जिल्ह्यात माथाडी कामगार मंडळे कार्यान्वित झाली.

**२.५.२.६ आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्या नंतर सन १९९२ पुढील कालखंड :**

मुक्त आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतरचा हा काळ आहे. भारताने सन १९९२ मध्ये जागतिकीकरणाचे मुक्त आर्थिक धोरण स्वीकारले. या धोरणामुळे औद्योगिकरणाला प्रोत्साहन देण्यात आले. त्यासाठी कामगार कायद्याची बंधने शिथिल करण्यात आली.[४६] भारताची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक झाली होती. परकीय चलनाचा साठा संपत आला होता. देशातील सोने गहाण ठेवण्याइतकी बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. ती परिस्थिती सुधारण्यासाठी अशी उपाययोजना अत्यावश्यक होती. या काळात सुरुवातीला मोठ्या प्रमाणात औद्योगिक अशांतता निर्माण झाली.[४७] त्याचबरोबर ही परिस्थिती अपरिहार्य असून ती स्वीकारणे कालानुरुप गरजेचे असल्याचे तत्कालीन कामगार पुढारी व कामगार या दोघांच्याही लक्षात आले. त्यामुळे उद्योगधंद्यात बऱ्यापैकी शांतता राहिली. उद्योगवाढीस चालना मिळाली. जागतिकीकरणाचा परिणाम संघटीत व असंघटीत अशा दोन्ही प्रकारच्या कामगारांवर झाला. कामगार कायदे शिथिल झाल्यामुळे कामगारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. यांत्रिकीकरणामुळे माथाडी कामगारांसह सर्वच कामगार मोठ्या प्रमाणात रोजगाच्या संधीपासून वंचित होण्याची भिती निर्माण झाली.[४८] सातत्याने शारीरिक कष्टाचे काम कणाऱ्या या अकुशल अशिक्षित कामगारांना यंत्राच्या मदतीने काम करणे अवघड होते. तसेच एक यंत्र अनेक कामगारांचे काम अत्यंत कमी वेळेत करु लागले. तथापि बदलत्या परिस्थितीनुसार कॉलसेंटर्स, खाजगी सुरक्षा रक्षक, झेरॉक्स ऑपरेटर्स, विविध प्रकारच्या मशीन ऑपरेटर्स ही यंत्रे दुरुस्त करणारे इत्यादी नवीन प्रकारचे रोजगार निर्माण झाले.[४९] त्यासाठी बऱ्याच जणांनी याचे कौशल्यही मिळविले. मात्र ज्यांना अशा प्रकारचे कौशल्य मिळविणे शक्य झाले

नाही अशा असंघटित, अशिक्षित कामगारांवर बेकार होण्याची पाळी आली. या कालावधीत राज्यातील उर्वरित जिल्ह्यात विशेषत: विदर्भ आणि मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात माथाडी कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी वेळोवेळी संप, निदर्शने, मोर्चे इत्यादींचा अवलंब करण्यात आला. त्यामुळे या कालावधीत राज्यातील उर्वरित सर्वच जिल्ह्यात माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.

## २.६ औद्योगिक कलहांची कारण मिमांसा :

कलहांची सुरुवात आर्थिक व सामाजिक अन्यायाच्या भावनेतून होते. भांडवलदार अथवा उद्योगपती मोठ्या प्रमाणात नफा कमवितात. कामगारांना नफ्याच्या तुलनेत कमी वेतन मिळते. यातून पिळवणूक करुन घेतले जात असल्याची भावना निर्माण होवून औद्योगिक कलहांची सुरुवात होते.[५०] भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांचे शोषण होते तर समाजवादी अर्थव्यवस्थेत शासन व कामगार यांच्यामध्ये संघर्ष होतो. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या राज्यव्यवस्थेत अथवा अर्थव्यवस्थेत संघर्ष अटळ आहे.

भारतातील औद्योगिक कलह प्रामुख्याने आर्थिक हितसंबंतांशी निगडीत आहेत. काही प्रमाणात तात्विक राजकीय, बाबींशीदेखील संबंधित आहेत. सन १९४७ पूर्वी कामगारांच्या प्रमुख मागण्या वेतन व बोनस संदर्भात होत्या. सन १९४७ नंतरच्या भारतातील औद्योगिक कलहांचे कारणपरत्वे वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे.[५१]

| अ.क्र. | कारणे | १९४७ | १९५१ | १९५६ | १९६१ | १९६६ | १९७० | १९७५ | २००९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मजूरी व भत्ते | ३२.० | २९.४ | २८.३ | ३०.४ | ३५.८ | ३७.१ | ३२.० | २३.६ |
| २ | बोनस | १०.९ | ६.८ | ८.८ | ६.९ | १३.२ | १०.६ | ८.० | ४.४ |
| ३ | नोकरवर्ग व नोकरकपात | १९.५ | २९.५ | ३९.७ | २९.३ | २५.३ | २५.६ | २९.८ | ०.३ |
| ४ | रजा आणि कामाचे तास | ५.२ | ८.२ | ५.७ | ३.० | २.४ | २.१ | २.३ | ०.३ |
| ५ | इतर कारणे | ३२.४ | २६.३ | १७.५ | ३०.४ | २३.३ | २४.६ | २७.९ | |

| एकूण | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० | १००.० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

संदर्भ : Indian Labour Year Books. 2011

भारतातील औद्योगिक कलहांची कारणे पाहता मजूरीचे दर आणि बोनस फार कमी असणे हे भारतातील औद्योगिक कलहाचे सर्वात महत्वाचे कारण आहे. मुख्यत: कमी वेतन, वेतन कपात, नोकर कपात, कामाच्या ठिकाणी असह्य परिस्थिती, विनाकारण दंड व शिक्षा, अयोग्य वागणूक ही संपाची प्रमुख कारणे आहेत. मालक व कामगार यांच्यात योग्य समन्वयाचा अभाव, बोनस, व्यवस्थापन प्रक्रियेत कामगारांच्या सहभागाचा अभाव, कामगारांच्या मुलभूत मानवी गरजांकडे दुर्लक्ष, सुट्ट्या, कामाचे तास, रजा, वैद्यकीय व इतर सुविधांचा अभाव ही देखील संपाची कारणे आहेत.[५२] शासनाचा एखादा दूरगामी परिणाम करणारा अप्रिय निर्णय किंवा एखाद्या कामगार कल्याण विषयक बाबीवर शासनाने निर्णय न घेणे, पोलिसांचा वा अन्य शासकीय यंत्रणेचा हस्तक्षेप यांचा निषेध करण्यासाठी देखील संप होतात. ही कारण मिमांसा संघटीत कामगारांप्रमाणेच किंबहुना त्यांच्यापेक्षा अधिक प्रमाणात हमाल, माथाडी आणि इतर असंघटीत कामगारांबाबत लागू होते.

## २.७ औद्योगिक कलहांचे परिणाम :

संप किंवा टाळेबंदी यामुळे उत्पादन प्रक्रिया खंडीत होते. कामगारांना वेतन मिळत नाही. कामगारांची आर्थिक स्थिती व परिणाम स्वरुप राहणीमानाचा दर्जा खालावतो. उपभोक्त्यांना वस्तू आणि सेवा न मिळाल्याने गैरसोय होते. त्याचा परिणाम अन्य उद्योगांच्या उत्पादनावरही होतो.[५३] उत्पादन क्षेत्रातील कामगारांपेक्षा सेवा क्षेत्रातील कामगारांच्या संपाचा परिणाम लगेचच जाणवतो. माल व प्रवासी वाहतुक, सफाई कामगार, माथाडी–माल वाहतूक कामगार, घरेलू कामगार इत्यादीचे संपामुळे लगेचच जनजीवन विस्कळीत होते. मात्र असे संप वारंवार आणि प्रदीर्घ काळ करण्याची सामाजिक व आर्थिक ताकद असंघटित कामगारांमध्ये नसते. उलट रोजगार बुडून त्यांची आर्थिक हानी होते. तसेच त्यांना कामावरुन काढून टाकण्याची शक्यता जास्त असते.

औद्योगिक हितसंबंध चांगले राहावेत. त्यातून उपभोक्त्यांना चांगल्या प्रतीचे व नियमित उत्पादन आणि सेवा मिळावी, कामगारांचेही हितसंबंध अबाधित रहावेत तसेच उत्पादकाचे नफ्याचे योग्य प्रमाण राहून उद्योगांची प्रगती होणे आवश्यक आहे. यासाठी शासनाला विविध कायदे, नियम करावे लागतात. काही वेळा हस्तक्षेप करावा लागतो. भारत सुरुवातीला औद्योगिकदृष्ट्या अविकसित स्थितीत होता. सध्या विकसनशील देश आहे. सुरुवातीला औद्योगिक कलह मिटविण्यासाठी कोणताच कायदा अस्तित्वात नसणे, यापासून कालांतराने विविध कायदे करणे, यंत्रणा अस्तित्वात आणणे त्याच बरोबर देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी पोषक असे औद्योगिक संबंध निर्माण करणे यासाठी कार्यवाही झालेली आहे. भारतात सन १९२९ पूर्वी औद्योगिक कलह मिटविण्यासाठी कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता. ब्रिटीशांचा मुख्य उद्देश नफा कमाविणे हा होता. त्यामुळे त्यांचे कालखंडात सुरुवातीला इंग्लंडच्या व्यापारी हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी कामगार कायदे केले. त्यानंतरच्या काळात हळूहळू सामाजिक व राजकीय दबावामुळे आणि कामगार संघाच्या विकासामुळे ब्रिटीश शासनाला कामगारांच्या हिताचाही विचार करावा लागला. स्वातंत्र्योत्तर काळात देशाचा जलद औद्योगिक विकास आणि कामगार कल्याण या दोहोंचाही विचार करण्यात आला. त्यादृष्टीने कायदे करण्यात आले व धोरण राबविण्यात आले.

## २.८ भारतातील औद्योगिक कलहविषयक कायदे व त्या अंतर्गतच्या यंत्रणा :

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात औद्योगिक कलहाचे प्रमाण वाढले. आणीबाणीच्या परिस्थितीत जलदरितीने हे कलह मिटविण्यासाठी सन १९२९ चा कायदा अपुरा ठरु लागला. अशा परिस्थितीत ब्रिटीश सरकारला सन १९४२ च्या भारत संरक्षण कायदया –प्रमाणे संप व टाळेबंदी विशिष्ट मुदतीसाठी बेकायदेशीर ठरविण्याचा हक्क मिळाला. याबाबतचा संक्षिप्त तपशील पुढील प्रमाणे आहे.

### २.८.१ सन १९४७ चा औद्योगिक कलह कायदा :

(The Industrial Disputes Act. 1947)

सन १९२९ चा कायदा रद्द करुन हा सन १९४७ चा नवीन कायदा ब्रिटीश सरकारने केला. औद्योगिक संबंध सुधारण्यासाठी ब्रिटीश सरकारने केलेला हा व्यापक प्रयत्न आहे.[५४] या कायद्यातील कारखाना समिती, समेट अधिकारी, समेट मंडळ, औद्योगिक न्यायाधिकार, चौकशी मंडळ तसेच सक्तीचा अभिनिर्णय या तरतूदींमुळे या कायद्याचा उपयोग औद्योगिक शांतता कायम राहण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरला. या कायद्यात माथाडी–हमाल यासारख्या असंघटित कामगारांच्या कलहाचा कोणताही विचार केलेला नव्हता.

### २.८.२ १९५० चा औद्योगिक कलह (कामगार पुनर्विचार न्यायालय) कायदा :

(Industrial Disputes [Labour Appellate Tribunal] Act)

सन १९४७ च्या कायद्यानुसार औद्योगिक न्यायाधिकरणे स्थापन करण्यात आलेली होती. एकाच प्रश्नाबाबत निरनिराळे व प्रसंगी परस्परविरोधी असे निकाल विविध राज्यातील औद्योगिक न्यायाधिकरणांनी दिले. त्यामुळे औद्योगिक संबंधात सर्व देशभर सुसूत्रता राहिली नाही. या अडचणीतून बाहेर पडण्यासाठी सन १९५० चा औद्योगिक कलह (कामगार पुर्नविचार न्यायालय) कायदा संमत करण्यात आला. त्यानुसार कामगार पुर्नविचार न्यायालय ही यंत्रणा स्थापन करण्यात आली.[५५]यामध्ये देखिल असंघटित कामगारांच्या कलहांचा विचार केलेला नव्हता.

### २.८.३ सन १९५६ चा औद्योगिक कलह कायदा

(Industrial Disputes Act of 1956) :

सन १९५० च्या कायद्यानुसार निर्माण झालेल्या कामगार पुर्नविचार न्यायालय यंत्रणेला कामगार संघांनी विरोध केला. शासनाने तसेच १९४७ च्या कायद्यातही दुरुस्त करावयाची होती. त्यानुसार सन १९५६ मध्ये औद्योगिक कलह (दुरुस्ती आणि इतर तरतूदी) कायदा संमत करण्यात आला. या कायद्यानुसार स्थापन झालेले कामगार पुनर्विचार न्यायालय रद्द झाले.[५६]

अशा प्रकारे मालकांचे हित जपण्यासाठी कायदे करण्यास सुरुवात होवून नंतरच्या कालावधीत कामगारांचे हित जपण्यासाठी विविध कायदे व त्या अंतर्गत यंत्रणा निर्माण करण्यात आल्या. मात्र यामध्ये असंघटीत कामगारांच्या कलहांचा फारसा विचार केला गेला नाही. अशा

कामगारांबाबत काही समस्या निर्माण झाल्यास कामगार आयुक्त कार्यालयामार्फत त्यावर मालक–कामगार यांचेशी चर्चा करुन उपाय योजना केल्या जात. कोणत्याही प्रकारची कायदेशीर यंत्रणा असंघटित कामगारांसाठी उपरोक्त औद्योगिक कलह कायद्यांतर्गत केलेली नव्हती.

## २.९ **राष्ट्रीय कामगार चौकशी आयोग** (सन १९६६–६९) :

### २.९.१ राष्ट्रीय कामगार चौकशी आयोगाची स्थापना :

स्वातंत्र्योत्तर काळात कामगारांच्या परिस्थितीत कोणते बदल झाले व त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी काय करता येईल, यासाठी राष्ट्रीय कामगार चौकशी आयोग नेमण्यात आला. दि. २४ डिसेंबर १९६६ रोजी भारत सरकारने न्यायमूर्ती श्री. पी. बी. गजेंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली १६ सभासद असलेल्या चौकशी आयोगाची नियुक्ती केली. आयोगाने दि. ८ ऑगस्ट १९६९ रोजी अहवाल शासनास सादर केला. भारतातील श्रमिकांच्या समस्यांचा सर्वकष अभ्यास करणारा हा अत्यंत महत्वाचा अहवाल आहे. आयोगाने प्रामुख्याने निष्कर्ष काढला की स्वातंत्र्योत्तर काळात कामगार वर्ग औद्योगिक क्षेत्रात अधिकाधिक स्थिर झाला. त्यांचा दृष्टिकोन आधुनिक बनला. खेडेगावाशी असलेला त्याचा संबंध कमी झाला. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे महत्व वाढले. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या कुटुंबातून कारखान्यातील रोजगार हा वंशपरंपरागत होत गेला. कामगारांना स्वतंत्र व्यक्तिमत्व व प्रतिष्ठा प्राप्त होऊ लागली. स्वातंत्र्योत्तर कल्याणकारी राज्याचे कमी प्रमाणात परंतु निश्चित स्वरुपात फायदे कामगारांना मिळू लागले. औद्योगिक कामगारांची एक स्वतंत्र संस्कृती व समाज निर्माण झाला. शहरीकरणाचे प्रमाण वाढू लागले. त्यातून कामगारांच्या दृष्टीने निवास, वाहतूक, नागरी सुविधा इ. पुढील महत्वाचे प्रश्न निर्माण झाले.[५७] आयोगाने काढलेले हे निष्कर्ष मुख्यत: औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना नजरेसमोर ठेवून काढल्याचे दिसून येते. यामध्ये असंघटित कामगारांचा विचार करण्यात आलेला नव्हता. मात्र गावाकडून रोजगारासाठी शहरात येणाऱ्या माथाडी–हमाल व इतर

असंघटित कामगारांच्या समस्या या कारखान्यातील कामगारांपेक्षा फारशा वेगळ्या नव्हत्या. किंबहुना या कामागारांना कितीतरी पट अधिक समस्यांना तोंड द्यावे लागत होते.

### २.९.१.१ राष्ट्रीय कामगार चौकशी आयोगाच्या शिफारशी :

राष्ट्रीय कामगार आयोगाने केलेल्या चौकशीनुसार कामगार भरतीच्या पध्दती व व्यवस्था यामध्ये कमश: बदल झाले. शास्त्रशुध्द व वस्तूनिष्ठ भरतीच्या पध्दती वापरात आल्या. पिळवणूकीचे प्रमाण कमी होत गेले. रोजगार विषयक माहिती, सल्ला व मार्गदर्शन, प्रशिक्षण, संशोधन यांची प्रगती झाली.

कामगार सेवाशर्ती व कामाच्या परिस्थितीत सुधारणा करणे, रोजगार विनिमय केंद्राची व्यापकता वाढविणे, अपंग–शेतमजूर यांचेसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, कामगारांचे कामाचे तास साप्ताहिक ४० तास करावे, यांत्रिकीकरणाचा क्रमश: व विवेकपूर्ण वापर, स्त्री कामगारांसाठी प्रसूतीकाळातील लाभाची व्यापकता वाढविणे, वेतन धोरण ठरविणे, कामगारांच्या घरासाठी योजना राबविणे इत्यादी महत्वपूर्ण शिफारशी शासनास केल्या.[५८]

राष्ट्रीय कामगार चौकशी आयोगाने केलेल्या ३०० शिफारशींपैकी शासनाने २१९ शिफारशींचा स्वीकार केलेला आहे. कामगारांच्या मुलभूत प्रश्नांचा आयोगाने बारकाईने विचार करुनच शिफारशी केलेल्या आहेत. या शिफारशींचा प्रभाव पुढील काळातील कामगार कल्याण धोरणावर पडलेला दिसून येतो. कारखान्यातील कामगारासाठी शिफारस केलेल्या या सोयी सुविधा असंघटित कामगारांना देखील मिळणे हा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. याची जाणीव या असंघटित कामगारांमध्ये होवू लागली.

### २.९.१.२ असंघटित कामगारांसाठी केंद्रीय आयोग :

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठीदेखील वाजपेयी सरकारच्या काळात खासदार वर्मा यांचे अध्यक्षतेखाली सन १९९९ मध्ये आयोग नेमला. हा आयोग छोट्या उद्योगातील कामगारांच्या अडचणी समजून घेण्यासाठी नेमला होता. या आयोगाने छत्री कायदा (Ubrella Legislation) सर्वच असंघटित कामगारांसाठी करावा अशी शिफारस करुन या कायद्याचे प्रारुप देखील सादर

केले.[५९] मात्र हा कायदा त्यावेळी पास होवू शकला नाही. त्यानंतर नरसिंहराव सरकारने सन २००४ मध्ये श्री. अर्जुन सेन गुप्ता यांचे अध्यक्षतेखाली आणखी एक आयोग नेमला.[६०] या आयोगाने सामाजिक सुरक्षितता अधिनियम करण्याची शिफारस केली. त्यानुसार केंद्र शासनाने सन २००८ मध्ये असंघटित कामगारांसाठी सदर कायदा पास केला. त्याची अंमलबजावणी अद्याप सुरु झालेली नाही. मात्र या पूर्वीच सन १९६० ते १९७० च्या दशकात महाराष्ट्रातील माथाडी कामगारांनी देखील वेळोवेळी यातील बहुतेक प्रकारचे लाभ मिळविण्यासाठी मागणी केली आहे आणि ती शासनाकडून मान्य करुन घेतली आहे.

## २.१० कामगार कल्याण आणि असंघटित कामगार :

विश्रांती, करमणूक, उपहारगृहे, आरोग्य विषयक व इतर वैद्यकीय सोयी, वाहतूकीच्या सोयी व निवासाची सोय इ. गोष्टींचा कामगार कल्याण यात समावेश होतो. कामगारांतील निराशा जावी, कौटुंबिक चिंता नष्ट होवून आरोग्यात, व्यक्तिमत्वात सुधारणा व्हावी हे यामागे उद्देश आहेत. यामुळे कार्यक्षमता, उत्पादकता वाढते. कारखान्यात व कारखान्याबाहेरही हे उपाय आवश्यक आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे देखील कामगार कल्याण हे उद्दिष्ट आहे. 'पुरेसा आहार, निवास, करमणूकीची साधने व संस्कृती' या गोष्टी कामगारांना मिळवून देण्यासाठी ही संघटना सतत प्रयत्नशील आहे.[६१]

कामगार कल्याणासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार व मालक वर्ग, स्वयंसेवी संस्था यांनी सतत प्रयत्न केले आहेत. फॅक्टरीज ॲक्ट १९४८, राज्य कामगार विमा योजना, केंद्रीय भविष्य निर्वाह निधी कायदा, औद्योगिक कामगारांच्यासाठी करण्यात आलेले निवास विषयक कायदे इ. तसेच कोळशाच्या व अभ्रकाच्या खाणीतील कामगारांसाठी कामगार कल्याण निधीच्या माध्यमातून दवाखाने, करमणूकीची केंद्र इ. तरतूदी केंद्र शासनाने केल्या आहेत.[६२] राज्य सरकारने कामगार कल्याण केंद्र स्थापन केलेली आहेत. शिक्षण, करमणूक, सांस्कृतिक कार्य इ. कार्यक्रम ही केंद्रे घेतात. महाराष्ट्रात १९५३ मध्ये कामगार कल्याण मंडळ तसेच कामगार कल्याण निधी स्थापन

करण्यात आला.[६३] महाराष्ट्रात ३५ जिल्ह्यात २३२ कामगार कल्याण केंद्र सुरु आहे. त्या अंतर्गत मैदानी व बैठ्या खेळांची सोय करण्यात आली आहे. मुलांसाठी क्रिडांगणाची सोयही आहे. या केंद्रातून चित्रपट, नाटके व इतरही करमणूकीचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

कामगार कल्याणासाठी अत्यंत प्रगत अशी व्यवस्था आपल्याकडे नाही तरी तिचा संघटित कामगारांसाठी विकास चालू आहे. कामगार कल्याण विषयक कार्यामुळे औद्योगिक संबंध व उत्पादन क्षमता यांच्यावर चांगला परिणाम झालेला आहे. मात्र असंघटीत कामगारांना वेतन आणि पुरेसे काम हेच मुळात मिळत नाही. त्यामुळे कामगार कल्याणाच्या बाबी दूरच राहतात.

## २.११ असंघटीत कामगार आणि त्यांच्यासाठीच्या उपाययोजना :

औद्योगिक क्रांतीनंतर कामगार कारखान्यात काम करु लागले. बहुधा कामगार एकाच कारखान्यात तात्पुरते किंवा कायमस्वरुपी काम करत. अशा कारखान्यात ते काम करत असल्याची नोंद व दररोजची हजेरीही ठेवली जात असे. मात्र असेही बहुतांश कामगार आहेत की, जे कामगार एका विशिष्ट कामाच्या ठिकाणी अथवा एका विशिष्ट मालकाकडे नियमितपणे, ठराविक मजूरी दराने कायमस्वरुपी काम करीत नाहीत व जेथे कामगार मालक असे नाते निर्माण होऊ शकत नाही अशा कामगारांना असंघटीत कामगार म्हटले जाते. यामध्ये प्रामुख्याने मजूर, स्वयंरोजगार करणारे, घरगुती स्वरुपात उत्पान करणारे यांचा समावेश होतो.[६४] महाराष्ट्र राज्यात सुमारे ४.१२ कोटी कामगार विविध उद्योग व व्यवसायात कार्यरत आहेत. त्यापैकी ३.८ कोटी कामगार असंघटीत क्षेत्रात आहेत. शेती, बांधकाम, हातमाग, यंत्रमाग, विटभट्टी, घरकाम इत्यादी व्यवसायात असंघटीत कामगार आहेत. या कामगारांसाठी केंद्र व राज्य शासनाने पुढील प्रमाणे उपाय योजना केल्या आहेत.

### २.११.१ **विकास आयुक्त** (असंघटीत कामगार) **कार्यालय :**

असंघटीत क्षेत्रातील सर्वच कामगारांचा दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींकरीता असलेल्या कल्याणकारी योजनामध्ये समावेश होत नाही. तसेच त्यांच्याबाबतची वस्तूनिष्ठ सांख्यिकी माहिती नसल्याने, या कामगारांसाठी योजना आखून ती अंमलात आणणे शक्य झालेले नाही. त्यांचे

सर्वेक्षण करणे त्यांचेसाठी योजना तयार करुन अंमलबजावणी करणे या उद्देशाने विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालयाची स्थापना महाराष्ट्र शासनाने केली आहे.[६५] तथापि, राजकीय इच्छाशक्ती व मनुष्यबळाअभावी आणि अद्यापही वस्तूनिष्ठ सांख्यिकी माहिती उपलब्ध होऊ न शकल्याने विकास आयुक्त (असंघटीत कामगार) कार्यालय जनश्री विमा योजना व राष्ट्रीय स्वास्थ्य विमा योजना वगळता अन्य कोणतीही योजना राबवू शकलेले नाही. यातून या कामगारांप्रती राज्य शासनाची उदासिन भूमिका दिसून येते.

### २.११.२ असंघटीत कामगारांसाठीचा सामाजिक सुरक्षितता अधिनियम, २००८ :

केंद्र सरकारने असंघटीत कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता अधिनियम, २००८ (The Unorganised Workers Social Security Act, 2008) हा कायदा पारीत केला आहे.[६६] त्यानुसार असंघटीत कामगारांसाठी राज्यस्तरावर मा. मंत्री (कामगार) यांचे अध्यक्षतेखाली कल्याणकारी मंडळ स्थापन करावयाचे आहे. त्या मंडळामार्फत असंघटीत कामगारांना भविष्य निर्वाह निधी, अपघात व अंत्यसंस्कार सहाय्य, त्यांच्या मुलांकरीता शिक्षण सुविधा देणे, आवास योजना, वृध्दापकालीन निवारा या सारख्या योजना राबवावयाच्या आहेत.[६७]

तथापि, महाराष्ट्र शासनाने अद्यापही सदर सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन केलेले नाही. त्यामुळे या असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षिततेचे लाभ मिळू शकले नाहीत.

### २.११.३ इमारत व इतर बांधकाम कामगार :

केंद्र सरकारने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनिमय व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ लागू केला आहे.[६८] सदर कायदा बांधकाम व्यवसायातील असंघटीत कामगारांच्या सुरक्षितता व कल्याणाकरीता आहे. महाराष्ट्र शासनाने मालक, कामगार व शासन प्रतिनिधींचा समावेश असलेल्या त्रिपक्षिय इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना दिनांक १ मे २०११ रोजी केली.[६९] या मंडळाने बांधकाम कामगाराच्या कल्याणासाठी १५ कल्याणकारी योजना मंजूर केल्या आहेत. लाभार्थ्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती, स्वास्थ्य व अपघात विमा योजना, सामाजिक सुरक्षा योजना तसेच महिला लाभार्थ्यासाठी प्रसूती सहाय्य इत्यादी

योजना आहेत. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत १,३८,००० कामगारांची नोंद करण्यात आली असून रु. १६०० कोटी इतकी अधिभाराची रक्कम बांधकाम करणाऱ्या मालकांकडून या कामगारांसाठी विविध योजना राबविण्यासाठी मंडळाकडे जमा झालेली आहे.[७०] यातून या कामगारांना कल्याणाकारी योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

जरी बांधकाम कामगारांसाठीचा सदर कायदा सन १९९६ साली झालेला असला तरी अद्यापही या मंडळामार्फत कामगारांना भरीव लाभ देण्यात आलेले नाहीत. मुळातच बांधकाम कामगारांसाठीचे त्रिपक्षीय परिपूर्ण मंडळ कायदा पारित झाल्यानंतर १५ वर्षांनी सन २०११ मध्ये स्थापन करण्यात आले. अधिभार गोळा करण्यासंबंधीच्या सविस्तर सूचनाही याच दरम्यान देण्यात आल्या. मंडळासाठी पुरेसा कर्मचारी अद्यापही नेमलेले नाहीत. तसेच या कामगारांचे कामाचे ठिकाण सतत बदलत राहते. इत्यादी बाबींमुळे बांधकाम कामगारांना भरिव प्रमाणात लाभ देता आलेले नाहीत.

### २.११.४ घरेलू कामगार :

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण अधिनियम सन २००९ मध्ये विधानमंडळात पारित केला आहे.[७१] त्यानुसार या कामगारांसाठी मालक, कामगार व शासन प्रतिनिधींचे मंडळ स्थापन करुन त्यांना विविध सेवा सुविधा व लाभ द्यावयाचे आहेत. तसेच त्या अंतर्गत मंडळाची स्थापना दि. १२ ऑगस्ट २०११ रोजी केली आहे.[७२] राज्यातील घरकाम करणाऱ्या असंघटीत कामगारांच्या सामाजिक सुरक्षितता व कल्याणाकरीता सदर मंडळ आहे. या मंडळाने घरेलू कामगारांसाठी कल्याणकारी योजना मंजूर केल्या आहेत. लाभार्थ्यांच्या मुलांसाठी शिक्षण योजना, स्वास्थ्य विमा योजना, अपघात विमा योजना, जनश्री विमा योजना तसेच महिला लाभार्थ्यांसाठी प्रसूती सहाय्य योजना इत्यादी मंजूर केल्या आहेत.[७३] अशा प्रकारे घरकाम करणाऱ्या महिलांसाठी स्वतंत्र कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सध्या तर अशा प्रकारच्या सर्व कामगारांना पेन्शन देण्यासाठीचे प्रयत्न सुरु असलेले दिसतात. याबाबतही महाराष्ट्र आघाडीवर आहे.

## २.१२ महाराष्ट्रातील माथाडी कामगार चळवळ–महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ ची पार्श्वभूमी :

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर असंघटीत कामगार अधिनियम, १९६९ पारित होण्यासाठी कारणीभूत असलेल्या परिस्थितीचा व घटनांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

### २.१२.१ मुंबई गोदीतील हमाल माथाडी कामगारांची चळवळ :

पूर्वी बहुतांश परदेशी व्यापार जलमार्गानेच होत असे. जलमार्गाने वाहतुक स्वस्त व तुलनेने जलद होत असल्यामुळे ब्रिटीशांनी बंदरांचा विकास केला. यामध्ये मुंबई बंदर हे एक मुख्य बंदर होते. परदेशातून आलेला माल जहाजातून उतरवून वाहनांमध्ये भरणे आणि परदेशी जाणारा माल वाहनांतून उतरवून जहाजात भरणे ही शारीरिक कष्टाची कामे गोदीतील हमाल अंग मेहनतीने करत. स्वातंत्र्यपूर्व काळात माथाडी हमाल कामगारांची आर्थिक व सामाजिक स्थिती बिकट होती. परिणाम स्वरुप त्यांच्या राहणीमानाचा दर्जा निम्न स्तराचा होता. त्यातच त्यांना कोणतीही सामाजिक सुरक्षितता नव्हती. मात्र मालकाकडून पिळवणूक होत होती. प्रसंगी अपमान होत असे. संपूर्ण राज्यात विशेषत: मुंबई परिसरात हे कामगार विखुरलेल्या स्वरुपात मिळेल तेथे काम करत. हे कामगार मुंबई गोदीमध्ये इतर ठिकाणच्या तुलनेने मोठ्या संख्येने काम करत होते. त्यांनी दि. ३ मे १९२० रोजी श्री. ना. म. जोशी यांच्या नेतृत्वाखाली बी.पी.टी. एम्प्लॉईज युनियनची स्थापना केली.[७४] मुंबई बंदरातील कामगारांनी दि. २० जानेवारी १९२० रोजी पगारवाढ, वाढीव महागाई भत्ता इत्यादी मागण्यांसाठी संप केला. चर्चेद्वारे मागण्या मान्य होऊन कामगार १५ दिवसानंतर पुन्हा कामावर रुजू झाले. तसेच या कामगारांनी पुन्हा सन १९४७ मध्ये राहणीमानाचा दर्जा किमान राखण्यासाठीच्या आवश्यक मागण्यांसाठी संप केला. गोदीत लष्कर बोलवावे लागले. संपावर गेलेल्या हजारो कामगारांना बडतर्फ केल्याचे जाहिर केले गेले. या संपाला मुंबईतील सर्वच कामगार

वर्गाने जाहिर पाठिंबा दिला. श्री. जयप्रकाश नारायण, श्री. अच्युतराव पटवर्धन, डॉ. शांती पटेल यांनी महात्मा गांधी यांची भेट घेवून त्यांना या कामगाराच्या प्रश्नात लक्ष घालण्याची विनंती केली. शेवटी वास्तविकतेची जाणीव होवून शासनाने गोदी कामगारांच्या मागण्या मान्य केल्या आणि ४७ दिवस चाललेला हा संप मिटला.[७५] या संपातून गोदीतील हमाल माथाडी व इतर कामगारांसाठी 'डॉक वर्कर्स ॲक्ट'हा कायदा करण्यात आला. गोदीतील कंत्राटी कामगार (टोळीवाला) पध्दत बंद झाली. सर्व कामगारांना कायम करण्यात आले. या कायद्यामुळे गोदी कामगारांना नोकरीची शाश्वती व आर्थिक लाभ मिळाले त्यामुळे गोदी कामगारांप्रमाणेच माथाडी कामगारांसाठी ही स्वतंत्र कायदा करण्याची मागणी करण्यात येऊ लागली.

### २.१२.२ महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ पूर्वीची स्थिती व कायदा होण्यासाठीचे प्रयत्न :

माथाडी–हमालांची स्वतंत्र अशी कामगार संघटना नव्हती. त्यांना प्रबळ राजकीय नेतृत्त्व नव्हते, राजकीय पाठिंबा नव्हता. त्यामुळे या कामगारांना स्वतंत्र कायदा पास करुन घेताना मालक व शासन या दोघांशीही संघर्ष करावा लागला. तसेच या संघर्षाची दखल घेवून शासनाने देखील या कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी सकारात्मक प्रयत्न केले; याचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

#### २.१२.२.१ हमाल माथाडी कामगारांची कामाची परिस्थिती व संघटना बांधण्यातील अडचणी :

कारखाने व संघटीत औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना कामाचे तास, ज्यादा कामाबद्दल भत्ता, सुट्ट्या व इतर कल्याणकारी सवलती निरनिराळ्या कामगार विषयक कायद्यान्वये मिळत होत्या. परंतू माथाडी हमाल, लोखंडी जथा कामगार इत्यादींना अशा कायद्यांचे फायदे मिळत नव्हते. एकच कामगार अनेक ठिकाणी व अनेक मालकांकडे काम करत असे, कामाचे तास, प्रमाण व मोबदला निश्चित नव्हता कायदेशीर नोंदणी नव्हती.[७६] प्रचलित कामगार कायद्याच्या कक्षेत ते बसू शकत नव्हते. त्यामुळे त्यांची संघटना बांधणे कामगार नेत्यांना देखील अवघड जात होते. अशा क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना आपल्या परिस्थितीमध्ये सुधारणा करुन घेण्यासाठी एकत्र येवून संप, निषेध मोर्चा इत्यादी शिवाय अन्य उपाय नव्हते. मालक हमालांची दिशाभूल करत. संघटना

केल्यास आपले संबंध बिघडतील, संघटनेचे नेते गुंड असतात आणि ते मजुरीतील रक्कम वर्गणी म्हणून घेतात, यामुळे तुमचे नुकसान होऊन तुम्हाला त्रासच होईल असे कामगारांना सांगत.[७७] यामुळे हमालांच्या मनामध्ये चलबिचल होवून त्याचा परिणाम त्यांचे संघटित होण्यावर होत असे.

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम व त्या अंतर्गत योजना आणि माथाडी मंडळे अस्तित्वात येण्यापूर्वी माथाडी कामगार टोळ्या टोळ्यांनी काम करीत असत. प्रत्येक टोळीत सुमारे २ पासून ९० पर्यंत कामगारांचा भरणा असे. प्रत्येक टोळी दर दिवशी काम करीत असे आणि त्यापासून मिळणारा कामाचा मोबदला एकत्रित करण्याची व्यवस्था करीत. जमा केलेली रक्कम टोळीला सोईस्कर होईल अशा दिवशी वाटण्यात येत असे. रजेची अशी काही नियमित पध्दत नव्हती. कामगार वाटेल तेव्हा गावी जात. पुष्कळसे कामगार लग्नाच्या सराईत, सणाच्या आणि जत्रेच्या दिवसात तसेच पिकांच्या हंगामात रजा घेत असत. त्यांच्या रजेचा कालावधी अनिश्चित असे आणि त्यांच्यावर नियंत्रण करण्याची कोणतीही पध्दत नसल्यामुळे दरवर्षी एप्रिल, मे आणि जून महिन्यात कामगारांचा तुटवडा पडे.[७८] या पध्दतीत काही दोष होते. कामगार मालकांच्या गोदामामध्ये वास्तव्य करीत असत. कामाच्या वेळात एखाद्या कामगाराला मार लागला तर त्याला नुकसान भरपाई देण्याची नियमित पध्दत नव्हती. वैद्यकीय उपचाराचा खर्च व्यक्तीशः दिला जाई. पुष्कळशा बाबतीत त्यांना अशी नुकसान भरपाई मालकाकडून दिली जात नसे.[७९] कित्येकदा तर कामगारांच्या आजाराच्या वेळी स्वत:ची आर्थिक परिस्थिती नसतानाही स्वखर्चाने उपचार करुन घ्यावे लागत असत. त्याला आजारपणाच्या कालावधीत रजेचा पगार मिळत नसे. यावर नियंत्रण करण्याची कोणतीही यंत्रणा नव्हती.

### २.१२.२.२ महाराष्ट्रातील पहिल्या माथाडी हमाल कामगारांच्या संघटनेची स्थापना :

मुंबई गोदीतील बी.पी.टी. एम्प्लॉईज युनियन ही गोदीतील हमाल व इतर कामगारांनी स्थापन केलेली संघटना होय. गोदी व्यतिरीक्त इतरत्र अशा प्रकारचे काम करणाऱ्या कामगारांची एकत्रित संघटना नव्हती.[८०] श्री. अण्णासाहेब पांडूरंग पाटील हे गोदीमध्ये हमालीचे काम करत असताना तेथील न्यु नॅशनल डॉक वर्कर्स युनियनचे काम देखील करत. तथापि, श्री. के. एस. राव,

सरचिटणीस यांनी त्यांना या संघटनेतून काढून टाकल्यानंतर त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना एकत्रित केले आणि गोदीतील तसेच मुंबई परिसरातील इतरत्र हमालीचे काम करणाऱ्या कामगारांची संघटना सन १९५६ च्या सुमारास स्थापन केली. त्यानंतर दि. १५ डिसेंबर १९६३ रोजी महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन या नावाने संघटनेची धर्मादाय आयुक्तांकडे रितसर नोंदणी केली.[८१] त्यामुळे या संघटनेला कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले. त्यामुळे संघटनेला मान्यता मिळून शासन स्तरावर, न्यायालयात अधिक सहजतेने काम करता येऊ लागले. सर्वश्री यशवंतराव चव्हाण, नरेंद्र तिडके, शरद पवार, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, बाळासाहेब देसाई यांनी या माथाडी कामगारांना वेळोवेळी मदत व मार्गदर्शन केले आहे.[८२]

अशा प्रकारे विखुरलेल्या अवस्थेत मुंबईभर काम करणाऱ्या माथाडी हमालांसारख्या अशिक्षित कामगारांना एकत्र आणण्याचा पहिला यशस्वी प्रयत्न श्री. अण्णासाहेब पाटील यांनी केला. याला तत्कालीन राजकिय नेत्यांनी पाठबळ दिल्यामुळे हा लढा यशस्वी होण्यास मदत झाली.

### २.१२.२.३ माथाडी हमाल कामगारांसाठीच्या स्वतंत्र कायदा व इतर मागण्यांसाठीचे संप व आंदोलने :

सन १९५६ मध्ये माथाडी हमाल कामगारांची संघटना बांधल्यावर या कामगारांच्या विविध मागण्यासांठी लहान–मोठे संप, निदर्शने मुंबईत करण्यात आली. यामुळे या दुर्लक्षित व उपेक्षित घटकांच्या न्याय मागण्या शासनापर्यंत पोहोचण्यास मदत झाली.

सन १९६२ च्या आसपास कामगारांकडून शासनाकडे मोठ्या प्रमाणात तक्रारी व निवेदने सादर होऊ लागली. कामगार आयुक्तांच्या कार्यालयाने औद्योगिक–विवाद निवारण यंत्रणेद्वारे उभय पक्षामध्ये मध्यस्थीने तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न केले. परंतू या उपाययोजना तात्पुरती औद्योगिक शांतता प्रस्थापित करण्यास मदत करीत. त्यामुळे या असंघटीत माथाडी कामगारांच्या समस्या कायम सुटतील अशी व्यवस्था होत नव्हती.[८३] सन १९६० च्या सुरुवातीपासून माथाडी कामगारांनी संघटित होऊन आपल्या मागण्या शासनाकडे मांडण्यास सुरुवात केली. या दरम्यान

दि. २७ डिसेंबर १९६२ रोजी न्यू नॅशनल डॉक वर्कर्स युनियन, मुंबई यांनी शासनाला माथाडी कामगारांच्या मागण्यांचे निवेदन दिले.[८४] माथाडी कामगारांना नियमित काम व मजूरी, अर्जित रजा, बोनस, भविष्य निर्वाह निधी, उपदान, वैद्यकीय सुविधा, भरपाई अनुदान तसेच पेन्शन देण्याची मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. श्री. अण्णासाहेब पाटील यांनी देखिल गोदीशिवाय इतरत्र काम करणाऱ्या माथाडी हमाल कामगारांना एकत्रित करुन त्यांची संघटना बांधली. या महाराष्ट्र माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन संघटनेने माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करुन घेण्यापासून ते या कायद्याची राज्यभर अंमलबजावणी आणि कायद्यात वेळोवेळी आवश्यक सुधारणा होण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. दि. ९ ऑगस्ट १९६२ या क्रांती दिनाच्या दिवशी माथाडी कामगारांनी सचिवालयावर मोर्चा नेला. माथाडी कामगारांना कामाचा योग्य मोबदला मिळावा आणि माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी या मोर्चाच्या डोंगरी येथील मैदानावर झालेल्या सभेत करण्यात आली.[८५] या सभेत अण्णासाहेब पाटील यांनी आपल्या भाषणात सांगीतले की,

> 'आम्ही डोक्यावरुन, पाठीवरुन व हातगाडीवरुन बोजा वाहतो. आम्ही शारीरिक कष्टाची कामे करतो. पण आम्ही देखील माणसेच आहोत. आम्हालाही मन आहे, भावना आहेत. आम्हाला तुमची मेहरबानी नको आहे. आमचे म्हणणे इतकेच आहे की, तुम्ही आमच्याकडून काम करुन घ्या, पण त्या कामाचा रास्त मोबदला द्या.'

हा मोर्चा यशस्वी होऊ नये म्हणून व्यापारी वर्गाने सर्व तऱ्हेचे प्रयत्न केले होते. मोर्चा यशस्वी झाल्याने त्यांच्यामध्ये अस्वस्थता पसरली. हे कामगार संघटीत होऊन त्यांच्या मागण्या मान्य झाल्यास आपल्यावर आर्थिक भार पडेल, कामगार आपल्याला हवे तसे काम करणार नाहीत, अशी भिती व्यापाऱ्यांमध्ये पसरली मालकांनी कामगारांना कामावरुन काढून टाकण्याच्या धमक्या देण्यास सुरुवात केली.[८६] कामगारांच्या मागण्या मान्य न झाल्याने पुन्हा दिनांक ९ सप्टेंबर १९६२ रोजी संघटनेने केसरबाग, मुंबई येथे सभा घेऊन दिनांक १० सप्टेंबर १९६२ पासून बेमुदत संपाची घोषणा केली. या संपामुळे मुंबईतील सर्व व्यवसाय थंडावले आणि त्याचा परिणाम मुंबईतील

जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर झाला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तत्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी पुरवठा मंत्री श्री. होमी तल्यारखान यांस संपात तडजोड घडवून आणण्यास सांगीतले.[८७] त्यानुसार श्री. तल्यारखान यांचे उपस्थिती चर्चा होवून हा संप काही तासातच दुपारी ३.०० वाजता मागे घेण्यात आला. दि. २० सप्टेंबर १०६२ रोजी झालेल्या करारानुसार कामगारांना मजूरीत २५ टक्के वाढ मिळाली, गोणीची थप्पी २५ वरुन १६ पोत्यांपर्यंत खाली आणली गेली. तसेच वस्तूस्थितीची जाणीव होऊन व्यापाऱ्यांनी माथाडी कामगार व त्यांच्या संप विरोधी कारवाया कमी केल्या. हमालांना मजूरीत वाढ मिळाली, तसेच उंच गोणीच्या थप्पीमुळे लागणारे अतिरीक्त शारीरिक कष्ट आणि पोती अंगावर पडून होणाऱ्या अपघातांचा धोका कमी झाला.

सन १९६३ च्या अखेरीस या संघटनेने पुन्हा एक दिवसाचा संप करुन सचिवालयावर मोर्चा काढला. कामाची शाश्वती आणि वेळेचे बंधन या प्रमुख मागण्यांचे निवेदन मजूरमंत्री बॅ. माधवराव माने यांना ऑक्टोबर १९६३ मध्ये दिले.[८८] शासनाने इंडस्ट्रियल लवादावरील श्री. के. आर. पोवार यांचे अध्यक्षतेखाली एक त्रिपक्षीय समिती दि. २२ ऑक्टोबर १९६२ रोजी नेमली होती. या समितीचे कामकाज सुरु असतानाच पुन्हा एकदा माथाडी कामगारांनी दि. १७ फेब्रुवारी १९६४ रोजी मजूरीत वाढ करावी आणि माथाडींसाठी स्वतंत्र कायदा करावा या मागणीसाठी एक दिवस काम बंद ठेवून व्यापारी संघटनेचे कार्यालय आणि या समितीच्या कामकाजाच्या ठिकाणी मोर्चा काढला. मजूरीच्या दरवाढीची मागणी मान्य न झाल्याने पुन्हा दि. १ एप्रिल १९६४ रोजी माथाडी कामगारांनी बेमुदत संपाची घोषणा दिली आणि दि. ३ एप्रिल रोजी विधानभवनावर मोर्चा नेला. तसेच सामुदायिक सत्याग्रह करण्याची इशाराही दिला. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी मध्यस्थी केली. दि. ४ एप्रिल १९६४ रोजी मुख्यमंत्री, कामगार मंत्री आणि पुरवठा मंत्री यांचे समवेत माथाडी कामगार नेते सर्वश्री अण्णासाहेब पाटील, तुषार पवार, कोलते आणि मालकांचे प्रतिनिधी यांचेत झालेल्या करारानुसार दि. ६ एप्रिल १९६४ पासून मजूरीत १२½ टक्के वाढ दिली.[८९] ट्रान्सपोर्ट कंपन्यांनी ही वाढ दिली नाही. त्यामुळे

माथाडी कामगारांनी दि. १ जुलै १९६४ रोजी संपाचा इशारा दिला. त्यानंतर मजूरमंत्री श्री. नरेंद्र तिडके यांच्या मध्यस्थीने ९.५ टक्के मजूरीत वाढ दिली.[९०] सन १९६५–६६ मध्ये महागाई मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे मजूरीत देखील वाढ मिळावी म्हणून माथाडी कामगारांनी दि. २ नोव्हेंबर १९६६ पासून बेमुदत संप केला. या संपा दरम्यान मालकांनी कामगारांना त्रास देणे सुरु केल्यामुळे श्री. अण्णासाहेब पाटील यांनी उपोषणास सुरुवात केली. त्यामुळे दि. ९ नोव्हेंबर १९६६ रोजी कामगार आयुक्त यांनी घडवून आणलेल्या तडजोडीनुसार माथाडी कामगारांना मजूरीत १५ टक्के वाढ मिळाली. तसेच भविष्यातील मजूरीतील वाढ महागाई निर्देशांकाशी जोडण्याचे मान्य झाले.[९१] या निर्णयामुळे माथाडी कामगारांच्या डोक्यावर सतत असणारी महागाई वाढीची भीती कमी झाली. ज्याप्रमाणे महागाई निर्देशांकात वाढ होते, त्या प्रमाणात माथाडी कामगारांचा पगारही वाढतो.

### २.१२.३ असंरक्षित मजुरांसाठी चौकशी समितीची स्थापना :

माथाडी कामगार आणि त्यांचे संघटनेचा सततचा पाठपुरावा यामुळे शासनाने बृहन्मुबंईतील माथाडी कामगारांची परिस्थिती आणि त्यांना मिळणारी मजूरी याबाबत शीघ्र अभ्यास करण्यासाठी कामगार आयुक्त तथा संचालक, रोजगार यांना सांगीतले. त्यानुसार सर्व्हेक्षण करुन जुलै १९६३ मध्ये त्यांनी शासनाला अहवाल सादर केला. सदर अहवाल आणि माथाडी कामगारांची निवेदने, त्यांच्या मागण्या यांचा विचार करुन शासनाने या कामगारांच्या कामाच्या परिस्थितीचा आणखी सखोल अभ्यास करुन त्यावर उपाय योजना सुचविण्यासाठी समिती नेमण्याचा विचार केला.

#### २.१२.३.१ के. आर. पोवार समिती :

माथाडी कामगारांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे शासनाने बृहन्मुंबईतील माथाडी कामगारांच्या कामाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी इंडस्ट्रियल ट्रिब्युनलचे न्यायाधिश के. आर.पोवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ ऑक्टोबर १९६२ रोजी त्रिपक्षीय समिती नेमली.[९२] यामध्ये इंडियन मर्चंट चेंबरचे श्री. सी. एल. घीवाला आणि राष्ट्रीय मील मजदूर संघाचे श्री. एन. एस. देशपांडे हे सदस्य होते. तर श्री. जी. के. जोशी, सहाय्यक कामगार आयुक्त हे या समितीचे सचिव होते. या समितीने माथाडी कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना

सुचवाव्यात आणि विशेषत: त्यांच्या कामाचे प्रमाण आणि मजूरी याचा अभ्यास करुन या कामगारांना प्रचलित कामगार कायद्याच्या आधारे काही लाभ देता येईल का, जर अशा प्रकारे लाभ देता येत नसेल तर कोणत्या मार्गाने लाभ देता येईल याचा विचार करावा अशी समितीची कार्यकक्षा होती.

बृहन्मुंबईत त्यावेळी १८००० ते २०००० माथाडी कामगार ९०० मालकांकडे काम करत असल्याचे समितीने नमूद केले आहे. या समितीने कामगार संघटना, मालक संघटना, मील व कारखाने, व्यक्तीश: काही कामगार, व्यापारी आणि डिलर यांचेकडून प्रश्नावली व प्रत्यक्ष मुलाखतीच्या माध्यमातून माहिती घेतली आणि दिनांक १२ जानेवारी १९६५ रोजी अहवाल सादर केला. या समितीने प्रमुख ३ शिफारशी केल्या शासनाने या कामगारांना विविध कल्याणकारी लाभ मिळावेत, म्हणून एक वेगळा व स्वतंत्र महाराष्ट्र माथाडी कामगार कायदा करावा किंवा कारखाने अधिनियम, १९४८ मधील कामगारांची व्याख्या आणि औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील वर्कमॅनच्या व्याख्येत सुधारणा करुन माथाडी कामगारांचा त्यात अंतर्भाव करावा जेणेकरुन माथाडी कामगारांना या प्रचलित कामगार कायद्यांचे लाभ मिळतील. याबरोबरच माथाडी कामगारांच्या सहकारी सोसायट्या स्थापन करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचीही शिफारस या समितीने केली.[९३]

या समितीवर माथाडी कामगारांचा असा कोणताही स्वतंत्र प्रतिनिधी नसतानाही समितीने माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची केलेली शिफारस महत्वपूर्ण आहे. प्रचलित कायद्याच्या कामगार व्याख्येमध्ये अंतर्भाव करणे आणि सहकारी सोसायट्या स्थापन करणेबाबत केलेल्या शिफारशी तितक्याशा व्यवहार्य नव्हत्या. त्यामुळे भविष्यात माथाडींसाठी स्वतंत्र कायदा करण्याबाबत माथाडी कामगारांनी केलेल्या मागणीला पाठबळ मिळाले.

### २.१२.३.२ लोखंडी जथ्था कामगार चौकशी समिती :

सन १९६४ साली बृहन्मुंबईतील लोखंड आणि पोलाद या बाजारात लोखंड पोलादाची वाहतूक व अनुषंगिक काम करणाऱ्या कामगारांनी त्यांच्या मजुरीच्या दरात वाढ होण्यासाठी व कामाच्या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी प्रयत्न सुरु केले. हे कामगार लोखंडी जथा कामगार

संघटना व ट्रान्सपोर्ट आणि डॉक वर्कर्स युनियन या संघटनांशी संलग्न होते. या कामगारांनी इतर माथाडी हमाल कामगारांसोबतच संपात वेळोवेळी भाग घेतला व वेळोवेळी त्यास मजुरीत दरवाढ मिळाली. या कामगारांनी दिनांक २ सप्टेंबर १९६४ पासून मजूरी दरवाढीसाठी बेमुदत संपाची घोषणा केली. तथापि, कामगार आयुक्तांच्या मध्यस्थीने संप मागे घेऊन मालक संघटने बरोबर दि. ८ ऑक्टोबर १९६४ रोजी आणि दि. २१ ऑक्टोबर १९६४ करार करण्यात आला.[९४] या करारानुसार शासनाने वर्क मॅन कॉम्पेनसेशनचे सेवानिवृत्त आयुक्त श्री. बी. एस. कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. २९ जानेवारी १९६५ नुसार या कामगारांसाठी त्रिपक्षीय अभ्यास समिती नियुक्त केली. या समितीमध्ये श्री. ताराचंद गुप्ता, श्री. सी. एल. घिवाला, श्री. मदन फडणवीस, श्री. के. खान हे सदस्य होते तर श्री. पी. जे. ओव्हीड, सहाय्यक कामगार आयुक्त हे या समितीचे सचिव होते. लोखंडी जथा कामगारांच्या मजुरीच्या दराबाबत तसेच रोजगाराच्या प्रचलित पध्दती आणि कामाची परिस्थिती याबाबत अभ्यास करणे ही समितीची कार्यकक्षा होती.[९५] सदर समितीने दि. १५ डिसेंबर १९६५ रोजी अहवाल सादर केला. या अहवालात त्यांची शिफारस केली की, शासनाने या कामगारांसाठी खास कायदा करावा आणि बॉम्बे डॉक लेबर बोर्डाच्या धर्तीवर एक मंडळ स्थापन करावे तसेच या कामगारांसाठी एक योजनाही तयार करावी. समितीने आपल्या अहवालासोबत अशा योजनेचा नमूना (प्रारुप) जोडला.[९६]

सदर समितीने लोखंडी जथा कामगारांसाठी डॉक लेबर बोर्डाच्या धर्तीवर योजना तयार करण्याची केलेली शिफारस महत्वपूर्ण आहे. याच प्रकारची शिफारस पुढे असंघटीत कामगारांसाठी नेमलेल्या शिवाजीराव पाटील समितीनेही केली आणि त्याआधारेच माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ तयार करण्यात आला.

### २.१२.३.३. शिवाजीराव पाटील समिती :

वरील दोन समित्या विशेषत: बृहन्मुंबई मधील माथाडी कामगारांशी संबंधीत होत्या. परंतू आणखी ही काही असंरक्षीत व असंघटीत कामगार जसे की हमाल, मासेमारी करणारे कामगार, मिठागरात काम करणारे कामगार, गोदीत किरकोळ काम करणारे कामगार, रिक्षा ओढणारे मजूर

यांच्या समस्या विशेष लक्ष घालून सोडविणे आवश्यक होते. यासाठी शासनाने दि. १५ जुलै १९६५ रोजी त्यावेळचे राज्यमंत्री श्री. शिवाजीराव पाटील, पाटबंधारे आणि वीज यांच्या अध्यक्षतेखाली या वर्गातील कामगारांच्या परिस्थितीचा अभ्यास करुन आवश्यक उपाययोजना सुचविण्यासाठी एक त्रिपक्षीय समिती नियुक्त केली. या समितीमध्ये श्री. व्ही. बी. वरळीकर (माजी महापौर, मुंबई), श्री. सी. के. घिवाला, श्री.एल.सी. भावे, श्री. तुषार पवार (आमदार), श्री.मनोहर कोतवाल, श्री. एच. आर. कोलते या समितीचे सदस्य होते. श्री. एच. ए. साठे, सहाय्यक कामगार आयुक्त या समितीचे सचिव होते.[९७] या समितीने  दि. १७ नोव्हेंबर १९६७ रोजी सादर केलेल्या अहवालात असे सुचविले की, शासनाने अशा प्रकारच्या सर्व असंरक्षित कामगारांना गोदी कामगारांसाठीच्या कायद्याप्रमाणे एक खास कायदा करुन संरक्षित करावे आणि त्यासाठी समितीने महाराष्ट्र असंरक्षित कामगारांचे कल्याण (नोकरीचे नियमन) अधिनियम आणि त्या अंतर्गतच्या एका योजनेचा नमूना (प्रारुप) सादर केला.[९८]

अशा प्रकारे शासनाने माथाडी हमाल व तत्सम कामगारांसह सर्वच असंरक्षित कामगारांच्या परिस्थीतीचा अभ्यास श्री. के. आर.पोवार, श्री. बी. एस. कालेलकर आणि श्री. शिवाजीराव पाटील समितीच्या माध्यमातून केला. या तिनही समित्यांनी या माथाडी हमाल कामगारांची कामाची विशिष्ट पध्दत व परिस्थिती लक्षात घेऊन त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याची गरज असल्याची शिफारस केली, या समित्यांनी सादर केलेला अहवाल, माथाडी संघटनेचा व कामगारांचा सततचा पाठपुरावा यामुळे महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ परिपूर्ण स्वरुपात करता आला.

## २.१३ महाराष्ट्र विधान मंडळातील चर्चा व विधेयकाचे कायद्यात रुपांतर :

शासनाने माथाडी व इतर असंरक्षित कामगारांसाठी सन १९६२ ते सन १९६७ या ५ वर्षांच्या कालावधीत एकूण ३ समित्या नेमल्या. तसेच शिवाजीराव पाटील समितीने जरी आपला अहवाल दि. १७ नोव्हेंबर १९६७ रोजी शासनास दिला तरी शासनाने त्यावर बराच काळ कार्यवाही

केली नाही. यामुळे हा अहवाल प्रसिध्द करणे व त्यातील शिफारशीनुसार कायद्याची निर्मिती व्हावी म्हणून माथाडी कामगारांनी पुन्हा संघर्ष व आंदोलने केली.[९९] यामुळे शासनाने माथाडी कामगारांचे व मालकांचे प्रतिनिधींशी चर्चा केली व त्याआधारे कायद्याचा मसूदा तयार केला. त्यामध्ये शासनाच्या वतीने कामगारमंत्री श्री. नरेंद्र तिडके आणि श्री. शरद पवार यांनी महत्वाची भूमिका पार पाडली.

**२.१३.१ विधेयकाचे विधानमंडळात सादरीकरण व चर्चा :**

एखाद्या बाबीवर कायदा करावयाचा असल्यास त्याला राज्यघटनेनुसार एक विशिष्ट कार्यपध्दती आहे. त्यानुसार प्रस्तावित कायद्याच्या मसुद्याला विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही विधानमंडळ सभागृहांची मान्यता लागते. या दोन्ही सभागृहामध्ये कायद्याचा मसुदा पास झाल्यावर त्याला राज्यपालांची मान्यता घ्यावी लागते. तसेच जे विषय केंद्र शासनाच्या नियंत्रणाखाली आहेत, अशा विषयांसाठी राष्ट्रपतींची सुध्दा मान्यता घ्यावी लागते. त्यानंतरच कायद्याच्या मसुद्याला घटनात्मक स्वरुप प्राप्त होवून त्याची कायदा म्हणून अंमलबजावणी करता येते. शासनाने दिनांक २६ डिसेंबर १९६८ रोजी नागपूर हिवाळी अधिवेशनात माथाडी कामगारांसाठीच्या या कायद्याचे प्रारुप विधानमंडळाच्या मान्यतेसाठी सादर केले.[१००] त्यावर विधानसभेत चर्चा झाली. अशा प्रकारचा कायदा पहिल्यांदा होत असल्यामुळे यामध्ये काही अडचणी असतील तर त्याचा पुन्हा सखोल विचार होऊन त्या दूर व्हाव्यात व कायदा परिपूर्ण व्हावा म्हणून हे कायद्याचे प्रारुप विधानसभा आणि विधान परिषदेच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे दिनांक २७ डिसेंबर १९६८ रोजी सादर करण्यात आले. या समितीचे अध्यक्ष कामगारमंत्री होते.[१०१] संयुक्त समितीने शासनाने सादर केलेल्या मसुद्याचा बारकाईने विचार केला. असंरक्षित मजूरांची व्याख्या सुस्पष्ट करणे, माथाडी मंडळाचा अहवाल राज्य विधानमंडळास सादर करणे, मूळ मूसद्यानुसार एखाद्या मंडळाची योजना रद्द करण्याचे अधिकार शासनाला होते. त्याऐवजी केवळ योजना सुधारण्याचे किंवा बदलण्याचे अधिकार ठेवावे हे आणि इतर महत्त्वपूर्ण बदल समितीने सुचविले. या संयुक्त समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल दि. ७ मार्च १९६९ रोजी दिला. तो अहवाल शासनाने दि. १० मार्च १९६९ रोजी विधानमंडळास सादर केला.[१०२] मूळ

सादर केलेले कायद्याचे प्रारुप, त्यावर संयुक्त समितीने केलेल्या शिफारशींचा विचार करुन शासनाने सुधारित कायद्याचे प्रारुप तयार केले. सदर सुधारित कायद्याचे प्रारुप दिनांक २५ मार्च १९६९ रोजी विधान सभेत सादर करण्यात आले.[१०३] श्री. नरेंद्र तिडके (कामगारमंत्री) यांनी या कायद्याचे महत्त्व आणि पार्श्वभूमी सभागृहातील आमदारांसमोर मांडून हा कायदा पास करण्याची विनंती केली. सर्वश्री वि. रा. काळदाते (लातूर), हा. शु. अडवाणी (चेंबूर), लिलाधर शाह (घाटकोपर), बा. कृ. देशमुख (नगर अकोला), ए. पि. साळवे (चंद्रपूर), कृ. गं. देसाई (परळ), या. रा. देवगडे (नागपूर), आर. बी. चौधरी (धुळे दक्षिण), आ. ना. फाळके (कोरेगाव) या आमदारांनी विधान सभेतील चर्चेत भाग घेवून कायद्याला पाठिंबा दिला. माथाडी हमाल यासारख्या असंरक्षित कामगारांना सामाजिक सुरक्षितता देणारा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य असल्याचे कामगार मंत्री यांनी हे विधेयक सादर करताना स्पष्ट केले.[१०४] यावर चर्चेत भाग घेतलेल्या सदस्यांनी शासनाचे अभिनंदन केले. या कायद्याच्या तरतूदींवर विधानसभेत सखोल चर्चा झाली. सभागृहाने दिनांक २६ मार्च १९६९ रोजी त्यास मान्यता दिली.[१०५] विधानसभेच्या मान्यतेनंतर विधेयक विधान परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करावे लागते. त्यानुसार दि. ३१ मार्च १९६९ या दिवशी हे प्रारुप विधान परिषदेतही सादर करण्यात आले.[१०६] विधान परिषदेतही या मसूद्यावर सविस्तर चर्चा झाली. या चर्चेत श्री. रामजीवन चौधरी श्रीमती मनीबेन देसाई, श्री. ग. प्र. प्रधान, श्री. वि. घ. देशपांडे, श्री. एम. बी. हॅरिस, श्री. वा. पा. बापट, श्री. न. वा. लिमये, श्री. प्र. बा. वैद्य या आमदारांनी भाग घेतला. मंगळवार दिनांक १ एप्रिल १९६९ रोजी विधानपरिषदेनेही त्यास मान्यता दिली.[१०७] दोन्ही सभागृहातील चर्चेच्या दरम्यान सर्व सदस्यांनी या कायद्याचे स्वागत केले आणि त्यास पाठिंबा दर्शविला. विधानमंडळ सदस्यांनी या कायद्याची अंमलबजावणी काळजीपूर्वक व लवकरात लवकर करण्याची मागणी केली.

एखादा कायदा पास होण्यासाठीची प्रक्रिया गुंतागुंतीची आणि वेळखाऊ असते. मात्र आपल्या राज्यातील सर्व राजकीय पक्षाच्या आमदारांनी असंघटित कामगारांचे हित लक्षात घेवून २

दिवसांमध्ये विधानसभेत आणि २ दिवसातच विधान परिषदेत हा कायदा मंजूर केला, ही बाब ऐतिहासिक व राज्याला अभिमानास्पद आहे.

### २.१३.२ विधेयकाचे कायद्यात रुपांतर :

महाराष्ट्र विधानमंडळाने पास केल्यानंतर राज्यपालांच्या मान्यतेने सदर कायदा राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. त्यावेळचे मा. उपराष्ट्रपती श्री. व्ही. व्ही. गिरी यांनी राष्ट्रपती पदाचे अतिरिक्त काम पाहताना दि. ५ जून १९६९ रोजी त्यास मान्यता दिली. नंतर महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ अस्तित्वात आला. सदर कायद्याला राज्य शासनाने असाधारण राजपत्र दि. १३ जून १९६९ अन्वये सार्वत्रिक प्रसिध्दी दिली.[१०८] अशाप्रकारे राज्यातील माथाडी हमाल कामगारांसाठीचा स्वतंत्र कायदा अस्तित्वात येवून त्याच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा झाला. अशा प्रकारचा कायदा भारतात पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्याने केला असल्यामुळे भारताच्या कामगार चळवळीतील ही एक ऐतिहासिक घटना आहे. तसेच असंघटित कामगार चळवळतील एक महत्त्वपूर्ण टप्पा होय.

### २.१३.३ कायद्याची प्रमुख वैशिष्ट्ये :

माल वाहतूक करणाऱ्या माथाडी कामगारांच्या नोकऱ्यांचे नियमन करणे व त्यांच्या सामाजिक सुरक्षिततेची तरतूद करण्यासाठी हा कायदा केलेला आहे. या कायद्यात आवश्यकतेनुरुप कल्याणकारी योजना करण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे नोकरीच्या प्रकारानुसार एक किंवा अधिक रोजगारासाठी आणि एक किंवा अधिक क्षेत्रासाठी आवश्यकतेनुसार मंडळाची स्थापना करण्याची कायद्यात तरतूद आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीतून निर्माण होणाऱ्या परिस्थितीबाबत शासनाला सल्ला देण्यासाठी व निरनिराळ्या मंडळांच्या कामात सुसूत्रता आणण्यासाठी राज्य सल्लागार समितीची तरतूद केली आहे. या कायद्यात एकूण तेरा प्रकारच्या नोकऱ्यांसाठी मंडळे स्थापन करण्याची तरतूद आहे. तसेच त्यात वाढ करण्याचे अधिकार ह्या

कायद्याने शासनाला दिले आहेत.[१०९] अशा प्रकारे कायद्याची जास्तीत जास्त चांगली आणि व्यवहार्य दृष्टीने अंमलबजावणी होण्यासाठी तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दि. १.१२.१९६९ रोजी शासनाचे ३ प्रतिनिधी, राज्य विधानमंडळाचे ३ प्रतिनिधी, मालकाचे ३ प्रतिनिधी, कामगारांचे ३ प्रतिनिधी मिळून एक सल्लागार समिती नियुक्त केली. सल्लागार समितीची प्रथम बैठक दिनांक ६ डिसेंबर १९६९ रोजी मुंबईत झाली. या बैठकीत किराणा बाजार आणि दुकाने या रोजगारातील माथाडी कामगारांसाठीच्या कल्याणकारी योजनेवर विचार विनिमय झाला. योजनेच्या कच्च्या मसूद्याला मान्यता देण्यात आली. किराणा बाजार व दुकाने मंडळाच्या योजनेसाठी महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम १९६९ या कायद्याच्या तरतूदी बृहन्मुबंईच्या मर्यादेत व्हावी असे सुचविण्यात आले.[११०] महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दिनांक १२.१२.१९६९ रोजी सर्व संबंधीत व्यक्तींना सूचना व हरकती कळविण्यासाठी आवाहन करण्यास आले आणि तशा प्रकारची वर्तमानपत्राद्वारे प्रसिध्दी देण्यात आली. तद्नंतर योजना अंतिम करण्यात आली व किराणा बाजार व दुकाने मंडळाचे काम सुरु झाले.[१११] अशा प्रकारे महाराष्ट्रातील पहिल्या माथाडी मंडळाची स्थापना होवून त्याचे कामकाज सुरु झाले. कालांतराने विविध प्रकारच्या नोकऱ्यांसाठी माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली व टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीचा विस्तार करण्यात आला.

### २.१३.३.१ अधिनियमातील विविध व्याख्या :

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ या कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये स्पष्टता यावी म्हणून सुरुवातीलाच या कायद्यात वापरलेल्या विविध शब्दांचे अर्थ दिलेले आहेत. यातील काही महत्वाच्या शब्दांचे अर्थ पुढील प्रमाणे आहेत.[११२]

१) 'मंडळ' याचा अर्थ, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाच्या कलम ६ अन्वये माथाडी कायदा व नियम आणि त्या अनुषंगाने विविध योजना राबविण्यासाठी स्थापन केलेले मंडळ असा आहे.

२) 'आस्थापना' याचा अर्थ नोकरी ज्या ठिकाणी किंवा ज्या जागेत किंवा ज्या ठिकाणच्या किंवा जागेच्या कोणत्याही भागात कायद्या सोबतच्या परिशिष्टातील करण्यात येत असेल किंवा सामान्यपणे करण्यात येत असेल ते ठिकाण किंवा ती जागा असा आहे व त्यात त्यांच्या आवाराचाही समावेश होतो.

३) 'अनुसूचीत' नोकरी याचा अर्थ, अधिनियमा सोबतच्या परिशिष्टात दिलेली कोणतीही नोकरी किंवा अशा नोकरीचे अंग असणारी कोणतीही प्रक्रिया किंवा कामाची शाखा असा आहे.

४) 'असंरक्षित' कामगार याचा अर्थ ज्याला कोणत्याही अनुसूचित नोकरीतील कामावर ठेवले असेल किंवा कामावर ठेवावयाचे असेल, असा कष्टाचे काम करणारा कामगार असा आहे.

माथाडी कामगार एकाच ठिकाणी, एकाच मालकाकडे काम करत नाहीत. त्यामुळे कारखाने किंवा अशा प्रकारच्या इतर कामाच्या ठिकाणी ज्याप्रमाणे मालक व कामगार असे कायम नाते तयार होते व त्यामुळे त्या कामगारांना विविध कल्याणकारी लाभ त्या मालकांकडून देणे शक्य होते, त्याप्रमाणे माथाडी कामगारांचे बाबतीत होऊ शकत नव्हते. त्यांना त्यावेळच्या कामगार कायद्याच्या तरतूदीत बसवून लाभ देणे शक्य नव्हते. त्यामुळे वरीलप्रमाणे विविध संज्ञांचा अर्थ निश्चित करुन त्या आधारे एक वेगळ्या प्रकारे कायदा व योजना बनवून माथाडी कामगारांना माथाडी मंडळाच्या माध्यमातून कल्याणकारी लाभ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### २.१३.३.२ महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम १९६९ ची ठळक वैशिष्ट्ये व व्याप्ती :

नेहमीचे कामगार कायदे, उद्योग, आस्थापना व त्यामध्ये नियमित कार्यरत असलेल्या कामगारांना लागू होतात. तथापि, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या तरतूदी या अधिनियमाच्या परिशिष्टात नमूद केलेल्या नोकऱ्यांनाच लागू होतात. तसेच या कामगारांचे कामाचे विशिष्ट स्वरुप लक्षात घेवून त्यांचेसाठी कल्याणकारी योजना राबविण्यासाठी एक विशिष्ट प्रकारची यंत्रणा व प्रशासकिय रचना तयार करावी लागली आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीची वाटचाल अभ्यासताना ही रचना व यंत्रणा समजून घेणे आवश्यक वाटते. त्यानुसार यातील महत्वाच्या व ठळक तरतूदी पुढील प्रमाणे आहेत.

१) **लेव्ही :**

माथाडी मंडळात नोंदीत असलेल्या कामगारांना संबंधित मंडळाकडून दरमहा त्यांचे पगाराचे वाटप नियमितपणे केले जाते. तसेच माथाडी मंडळात नोंदीत असलेल्या मालकास त्यांच्याकडे कामे करीत असलेल्या कामगारांची मजूरी व मजूरीवर ठरविण्यात आलेली विशिष्ट टक्के रक्कम दरमहा मंडळाकडे भरावी लागते. या मजूरी व्यतिरिक्त भरावयाच्या रकमेस लेव्ही म्हणतात. सध्या कार्यरत असलेल्या निरनिराळ्या माथाडी मंडळाची किमान लेव्ही ३० टक्के ते कमाल लेव्ही ५० टक्के इतकी आहे.[११३] मंडळास प्राप्त होणारी लेव्हीची रक्कम राष्ट्रीयकृत बँकांमध्ये दीर्घमुदतीच्या कालावधीसाठी गुंतविली जाते. लेव्हीच्या मिळणाऱ्या रक्कमेतून नोंदीत माथाडी कामगारांना भविष्य निर्वाह निधी, सानुग्रह अनुदान, भरपगारी रजा, सवेतन सुट्ट्या, वैद्यकीय सवलती, प्रवास भत्ता, घरभाडे भत्ता, अपघात नुकसान भरपाई इत्यादी लाभ दिले जातात.[११४]

माथाडी कामगारांचे कामाचे ठिकाण व मालक कायमस्वरुपी एक नसतो. त्यामुळे या कामगारांना वेतन व अन्य कल्याणकारी लाभ देणे व त्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे एक मोठे आव्हान होते. तथापि, मालकांकडून माथाडी कामगारांच्या दररोजच्या मजूरीच्या रक्कमेवर ठराविक दराने आकारलेली लेव्हीची रक्कम मंडळात जमा करुन, या लेव्हीच्या

एकत्रित रक्कमेतून मंडळाचा प्रशासन खर्च तसेच माथाडी कामगारांच्या कल्याणकारी योजनांवरील खर्च भागविणे शक्य झालेले आहे.

**२) शासनाचे अधिकार :**

या अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाला काही विशेष अधिकार दिलेले आहेत.[११५] या कायद्याच्या तरतूदी विविध व्यापार उद्योगांसाठी आणि क्षेत्रांसाठी लागू करणे, माथाडी मंडळाची स्थापना करणे, मंडळाच्या योजनांना मान्यता देणे, मंडळाचे लेखापरिक्षण अहवाल विधानमंडळाच्या सभागृहांपुढे ठेवणे, राज्य सल्लागार समिती नेमणे, माथाडी मंडळांना आवश्यकतेनुरुप एखादी बाब करण्याचे निर्देश देणे हे या कायद्यानुसार शासनाला अधिकार दिलेले आहेत.

## २.१४ **महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार** (नोकरीचे नियमन व कल्याण) **अधिनियम, १९६९ या अधिनियमाची अंमलबजावणी करणारे घटक :**

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी शासन आणि प्रशासन स्तरावर खालील घटक कायद्यातील तरतूदीनुसार काम करतात.

### २.१४.१ शासन :

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ या अधिनियमातील तरतूदींमध्ये सुधारणा करणे, मंडळाच्या योजनांना मान्यता देणे, वेळोवेळी आवश्यकतेनुरुप मंडळांना लेखी निर्देश देणे, मंडळाचे वार्षिक लेखापरिक्षण अहवाल विधानमंडळासमोर मांडणे ही कामे शासन स्तरावर होतात.

## २.१४.२ मा. कामगारमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्य सल्लागार समिती :

राज्य सल्लागार समिती राज्य शासनाला वेळोवेळी आवश्यकतेनुरुप अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करते. तसेच या कायद्याच्या किंवा या कायद्यानुसार करण्यात आलेल्या कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीतून किंवा संरक्षित कामगार व मालक यांच्या कोणत्याही विशिष्ट वर्गास या अधिनियमाच्या तरतूदी लागू करण्यासंबंधात तसेच विविध मंडळांच्या कामाचा समन्वय करण्यासंबंधात आणि शासनाकडून सल्ल्यासाठी पाठविण्यात येणाऱ्या बाबींसंबंधी सल्लागार समिती शासनास सल्ला देते.[११६]

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९६९ व त्या अंतर्गत तयार केलेल्या संबंधित मंडळाच्या योजना प्रामुख्याने सन १९७० ते सन १९७४ या कालावधीत तयार केल्या आहेत. सदर कालावधीतील हा कायदा लागू असलेल्या नोकरीतील कामाची त्यावेळची कार्यपध्दती व आजची कामाची कार्यपध्दती यामध्ये काही प्रमाणात बदल झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ व त्या अंतर्गत तयार केलेल्या मंडळाच्या योजना यामध्ये आजच्या कामाची पध्दती लक्षात घेता सुधारणा करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने राज्य सल्लागार समितीच्या सल्ल्यानुसार वेळोवेळी कामगार संघटना, मालक प्रतिनिधी यांच्याशी विचार विनिमय करुन शासन आवश्यक सुधारणा करते, जेणे करुन या कामगारांना देय लाभ अधिक प्रमाणात व अधिक प्रभावीरित्या मिळणे शक्य होते.

## २.१४.३ मंत्रालयातील कामगार विभाग :

प्रधान सचिव (कामगार) हे भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी मंत्रालयातील कामगार विभागाचे प्रमुख आहेत. त्यांचे मदतीला उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी व इतर कर्मचारी आहेत.[११७] ते माथाडी मंडळाचे शासन स्तरावरील कामकाज पाहतात. माथाडी मंडळाच्या प्रस्तावांवर इतर मंत्रालयीन विभागाची मान्यता घेणे, याबाबतचे धोरणात्मक निर्णय घेणे, शासनाला व राज्य सल्लागार समितीला मदत करणे इत्यादी कामे मंत्रालयातील कामगार विभागाकडून केली

जातात. यासाठी मंत्रालयात कार्यासन कामगार–५ या स्वतंत्र कार्यसनाची निर्मिती केली आहे. या कार्यासनामार्फत पूर्णपणे माथाडी कामगारांशी व माथाडी कायद्याशी संबंधित कामकाज पाहिले जाते. अशा प्रकारे माथाडी कामगारांविषयीच्या प्रश्नासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्याची मागणी डॉ. बाबा आढाव यांचे अध्यक्षतेखालील समितीने तसेच अनेक कामगार नेत्यांनी केलेली होती.

**२.१४.४ कामगार आयुक्त :**

कामगार आयुक्त भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी असतात. कामगार आयुक्तांचे कार्यालयातील माथाडी कक्ष कामगार आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली काम करतो.

**२.१४.५ माथाडी कक्ष :**

माथाडी मंडळाच्या कामकाजाची व्याप्ती लक्षात घेता त्यामध्ये सुधारणा करणे, देखरेख ठेवणे, त्यांचे कामकाज कार्यक्षम पध्दतीने चालविणे इत्यादीसाठी दिनांक १९.१२.२००० च्या शासन निर्णयानुसार कामगार आयुक्तांच्या कार्यालयात स्वतंत्र माथाडी कक्ष निर्माण केला आहे.[११८]

माथाडी कक्षाची स्थापना झाल्यानंतर या कक्षाला निरीक्षणाच्या वेळी आढळून आलेल्या त्रुटींबाबत मंडळास वेळीच योग्य मार्गदर्शन केल्यामुळे मंडळाचा कारभार कार्यक्षम पध्दतीने चालविण्यास या कक्षाकडून हातभार लागला आहे.

**२.१४.६ माथाडी मंडळाचा अध्यक्ष :**

मुंबई येथे कार्यरत असलेल्या माथाडी मंडळावर अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यासाठी कामगार आयुक्तांच्या आस्थापनेवरील कार्यरत सहाय्यक कामगार आयुक्त अथवा कामगार उपायुक्त या दर्जाचा अधिकारी नेमण्यात येतो.

मुंबई येथे कार्यरत असलेल्या भाजीपाला मंडळ, खोका व टिंबर मंडळ, क्लिअरींग व फॉरवर्डींग गोदी मंडळ या मंडळासाठी अध्यक्षांची पदे निर्माण केली नाहीत. तथापि, कामगार आयुक्त कार्यालयात कार्यरत असलेल्या सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे या मंडळाचा अध्यक्ष पदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

महाराष्ट्रात उर्वरीत जिल्ह्यामध्ये मंडळावर कामगार आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवरील त्या–त्या जिल्ह्यातील कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांकडे अध्यक्षपदाचा अतिरीक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.[११९] अशा प्रकारे माथाडी मंडळाचा अध्यक्षांच्या वेतनावर होणाऱ्या खर्चाची बचत होते. यामुळे माथाडी मंडळे आर्थिक दृष्ट्या सक्षम राहण्यास मदत झालेली आहे. तसेच मंडळाच्या दैनंदिन कारभारावर शासनाचे नियंत्रण ठेवणे शक्य झालेले आहे.

### २.१४.७ माथाडी मंडळाचा सचिव :

महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या निरनिराळ्या माथाडी मंडळांवर कामगार आयुक्त यांचे आस्थापनेवरील सरकारी कामगार अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांची मंडळाचे सचिव म्हणून नेमणूक करण्यात येते.[१२०] मंडळाचा सचिव मंडळाचे दैनंदिन कामकाज पाहतो.

माथाडी मंडळाच्या दैनंदिन कारभारात मंडळाचे अध्यक्ष आणि सचिव व कर्मचारी यांची भूमिका महत्वाची असते. माथाडी कामगारांना कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यामध्ये या दोन घटकांचे काम महत्वपूर्ण ठरते. शासनाचे अधिकारी मंडळावर नेमल्यामुळे शासनाला या मंडळावर प्रभावी नियंत्रण ठेवणे तसेच कामगारांसाठीच्या योजना परिणामकारकरित्या राबविणे शक्य झाले आहे.

### २.१४.८ माथाडी मंडळ कर्मचारी :

प्रत्येक माथाडी मंडळाची योजना राबविण्यासाठी लिपिक, वरिष्ठ लिपिक, निरीक्षक, कार्मिक अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, लेखापाल, मुख्य लेखापाल आणि रोखपाल या संवर्गातील कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात येते. माथाडी मंडळावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासन परिपत्रक दिनांक १०.१०.२००२ नुसार राज्यशासनाचे महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात आले आहेत.[१२१]

अशा प्रकारे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमांतर्गत गठीत सर्वच माथाडी मंडळाच्या कर्मचाऱ्यास शासनाच्या कर्मचाऱ्यांना लागू असलेले महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात आलेले आहेत.

यामुळे माथाडी मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या कामाचे नियमन करणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे शक्य झालेले आहे.

## २.१५ माथाडी मंडळाची रचना, कार्यकक्षा आणि अधिकार व कर्तव्य :

माथाडी मंडळाची माथाडी कामगारांच्या कल्याण विषयक कार्यक्रमात आणि या कायद्याच्या अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे या मंडळामध्ये कामगारांच्या तसेच मालकांच्या आणि शासनाच्या प्रतिनिधींचाही समावेश असणे आवश्यक आहे. यामुळे सर्व घटकांच्या मतांचा विचार करुन निर्णय घेता येतो. तसेच माथाडी कामगारांच्या कल्याणासाठी या मंडळास अंमलबजावणीतही अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे या माथाडी मंडळाची रचना, त्यांची कार्यकक्षा, अधिकार आणि कर्तव्ये यांचा तपशिल पाहणे गरजेचे आहे.

### २.१५.१ माथाडी मंडळाची रचना व प्रशासन :

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम ६ नुसार स्थापन करण्यात आलेल्या मंडळावर मालक व माथाडी कामगार यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या समान असते. राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या एकुण सदस्य संख्येच्या एक तृतियांश इतक्या मर्यादेपर्यंत असते. शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची मंडळाचा अध्यक्ष म्हणून शासनाकडून नियुक्ती केली जाते. अशा तऱ्हेने स्थापन करण्यात आलेल्या मंडळांकडून मंडळाचा प्रशासकीय कारभार तसेच अधिनियम व अधिनियमांतर्गत तयार करण्यात आलेल्या योजनांची अंमलबजावणी केली जाते.[१२२] मंडळाचा अध्यक्ष हा मंडळाचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असतो. मंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अध्यक्षावर आहे.

मालकांनी किंवा माथाडी कामगारांनी आपले प्रतिनिधि दिले नाहीत अथवा इतर काही कारणाने त्रिपक्षीय मंडळ गठीत करणे शक्य नसल्यास राज्य शासनास एका अधिकाऱ्याची मंडळावर नेमणूक करता येते व अशा रितीने नेमणूक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे मिळून मंडळ गठीत

झाल्याचे मानण्यात येते. तो अधिकारी मंडळास प्रदान करण्यास आलेल्या सर्व अधिकाराचा वापर करतो.[१२३] अशा प्रकारे गठीत केलेल्या एका सदस्यीय मंडळास महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमातील तरतूदी आणि कल्याणकारी योजना राबविण्याचे परिपूर्ण अधिकार आहेत. या तरतूदीमुळे परिपूर्ण मंडळ गठित न झाल्यामुळे माथाडी कामगार लाभांपासून वंचित राहण्याचा धोका राहिलेला नाही.

### २.१५.२ माथाडी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमाच्या तरतूदीनुसार मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढील प्रमाणे आहेत.[१२४]

१) कामगारांची व मालकांची नोंद मंडळात करणे, मालकांनी नोंद न केल्यास त्यांचेवर कारवाई करणे.

२) मालकांकडून मजूरीची रक्कम घेवून ती कामगारांना वेळेत वाटप करणे. लेव्हीची रक्कम जमा करुन त्यातून कामगारांना पगारी रजा, उपदान, प्रॉव्हिडंड फंड, वैद्यकीय सुविधा, अपघात समयी मदत, विमा लाभ इ. लाभ देणे.

३) मजूरीची रक्कम व लेव्ही वेळेत न भरणाऱ्या मालकांवर कारवाई करणे, खटले दाखल करणे.

४) हिशोब व इतर अभिलेख ठेवणे, ताळेबंद व वार्षिक विवरण पत्र तयार करणे.

५) मालक व कामगार यांचेतील मतभेद सामोपचाराने सोडविणे.

६) कामगारांना नियमित काम मिळेल तसेच मालकांना कामगारांचा नियमित व पुरेसा पुरवठा होईल अशा पध्दतीने नियोजन करणे.

७) योजनेद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन योजनेच्या अंमलबजावणीसाठी योग्य उपाययोजना करणे.

अशा प्रकारे माथाडी मंडळास कायद्याच्या तरतूदी आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या कल्याणकारी योजनेच्या अंमलबजावणीचे अधिकार आहेत. याचा योग्य वापर करुन मंडळे कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ प्रभावीपणे देऊ शकतात.

## २.१६ माथाडी अधिनियम व त्या अंतर्गत मंडळाची आवश्यकता :

माथाडी व इतर श्रमजीवी या सारख्या असंघटीत कामगारांना कायस्वरुपी एकच मालक व आस्थापना नसल्यामुळे प्रचलित कामगार कायद्याचे संरक्षण मिळणे शक्य होत नाही. जर कायद्याचे अधिष्ठान नसेल तर शासनाने सुरु केलेली कोणतीही योजना, तरतूदी प्रभावीपणे राबविणे शक्य होत नाही. लाभ न देणाऱ्या मालकांवर कारवाई करणे व कामगारांना लाभ मिळवून देणे शक्य होत नाही. कायदा असल्यास कामगारांना लाभ मिळवून देण्यासाठीची यंत्रणा निर्माण करणे या कायद्यान्वये शक्य होते. त्यानुसार माथाडी अधिनियम व त्या अंतर्गत मंडळाची आवश्यकता पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

### २.१६.१ कल्याणकारी तरतूदींना कायद्याचे अधिष्ठान देणे :

जर कायद्याचे पाठबळ नसेल तर कल्याणकारी तरतूदी व्यर्थ ठरतात. मालक वर्गावर वचक राहत नाही. तसेचमालकांनी कायद्याचे पालन न केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करणे शक्य होणार नाही. यासाठी कल्याणकारी तरतूदींना कायद्याचे अधिष्ठान असणे आवश्यक आहे.

### २.१६.२ माथाडी मंडळाची स्थापना करणे :

माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी कायदेशीर यंत्रणा असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम, १९६९ या अधिनियमातील तरतूदीनुसार माथाडी मंडळे स्थापन करण्याची तरतूद केलेली आहे. या मंडळामध्ये मालक व कामगार दोघांचीही नोंद करण्यात

येते. तसेच कामगारांच्या पगाराची रक्कम व त्यावरील लेव्हीची रक्कम मालक मंडळाकडे भरणा करतात. यातून माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देता येतो.

### २.१६.३ कामगारांसाठी कल्याणकारी योजना तयार करणे व राबविणे :

माथाडी कामगारांसाठीच्या विविध कल्याणकारी योजना जसे की, भविष्य निर्वाह निधी, उपदान, सानुग्रह, अनुदान, रजा भरपाई, सुट्ट्या, वैद्यकीय सवलती, प्रवास भत्ता, घरभाडे भत्ता, अपघात नुकसान भरपाई इत्यादीसाठी कल्याणकारी योजना तयार करणे, त्यास मंडळाची मान्यता घेणे व त्याचा लाभ कामगारांना देणे हे महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम १९६९ या अधिनियमातील तरतूदींनुसार मंडळाच्या माध्यमातून शक्य होते.

### २.१६.४ निश्चित काम व निश्चित कामगार उपलब्धता :

कामगारांना निश्चित स्वरुपाच्या कामाची उपलब्धता व्हावी तसेच मालकांना वेळच्या वेळी कामगार उपलब्ध व्हावे यासाठी माथाडी मंडळाची यंत्रणा आवश्यक आहे.

### २.१६.५ मालक व कामगारांतील मतभेद सामोपचाराने सोडविणे :

मालकांच्या समस्या व कामगारांच्या मागण्या यावर चर्चा व सामोपचार तोडगा काढणे आवश्यक असते. यासाठी या अधिनियमातील तरतूदीनुसार मंडळ व शासनाच्या माध्यमातून कार्यवाही करता येते.

### २.१६.६ शासनाचे माथाडी मंडळावर नियंत्रण ठेवणे :

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन आणि कल्याण) अधिनियम १९६९ या अधिनियमाच्या माध्यमातून कायद्यातील तरतूदींचे पालन न करणाऱ्या

मालक, अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांवर शासनाला नियंत्रण ठेवता येते व कामगारांचे हित जपता येते.

### २.१६.७ शासनाला सल्ला देण्यासाठी सल्लागार समिती :

सल्लागार समितीच्या माध्यमातून या अधिनियमाची अंमलबजावणी, कायद्यातील त्रुटी इत्यादीबाबत शासनाला सल्ला देण्याची तरतूद आहे. त्यामुळे कामगारांसाठी अधिक कल्याणकारी योजना अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य होते.

अशा प्रकारे भारतातील एकूणच कामगार चळवळीत माथाडी कामगार चळवळ महत्त्वपूर्ण आहे; स्वातंत्र्योत्तर काळात माथाडी कायद्याने इतर असंघटित कामगारांना एक वेगळी आशा व दिशा दर्शविली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील माथाडी कामगारांसाठी हा स्वतंत्र कायदा करुन आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक यंत्रणा निर्माण करुन माथाडी कामगारांना कल्याणकारी सुविधा मिळण्याची व्यवस्था केली आहे.

# संदर्भ सूची


१. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती,दि. १५ फेब्रुवारी २०११, पृ. १७५.

२. Punekar S. D., Deodhar S. B., Sankaran Saraswathi, Labour Welfare Trade Unionism and Industrial Relations, Himalaya Publishing House, Bombay, First Edition, March 1978, Pg. 4.

३. Punekar S. D., Deodhar S. B., Sankaran S., As Above, Pg. 5.

४. भिलारे ज्ञानेश्वर, कार्याध्यक्ष, राष्ट्रीय मिल मजदूर संघ, मुंबई, 'कामगार चळवळ : काल, आज आणि उद्या', नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विशेषांक, ना. म. लोखंडे, श्रमविज्ञान संस्था, मुंबई (संपादक), दि. ९ फेब्रुवारी २०१२, पृ. १९.

५. कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. १७६.

६. गुप्ते वि. प., कामगार चळवळ, एस. एस. जोशी सोशालिस्ट फाऊंडेशन व नानासाहेब गोरे अकादमी, पुणे (प्रकाशक), प्रथमावृत्ती, एप्रिल १९९७, पृ. १०.

७. कोठेकर शांता, उपरोक्त, पृ. १७७.

८. गुप्ते वि. प., उपरोक्त, पृ. क्र. ११.

९. भेंडे सुभाष, मराठी विश्वकोश खंड–३, www.marathivishwakosh.in

१०. दौंड अविनाश, कार्याध्यक्ष–गव्हर्नमेंट प्रेस एम्प्लॉईज फेडरेशन, 'कामगार चळवळ : काल, आज आणि उद्या', ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त पृ. ४२.

११. बागल सुर्यकांत, जनरल सेक्रेटरी–हिंदू मजदूर सभा, 'भारतीय कामगार चळवळ : काल, आज आणि उद्या', ना. मे. लोखंडे, स्मृती विशेषांक, उपरोक्त, पृ. २६.

१२. www.history.com, Falls of the Soviet Union

१३. Encyclopedia Britannica, www.britannica.com China Economic Policies, Pg. 15.

१४. कुलकर्णी एस. आर., अध्यक्ष, अखिल भारतीय बंदर व गोदी कामगार महासंघ व ट्रान्सपोर्ट ॲण्ड डॉक वर्कस् युनियन, मुंबई, 'कामगार चळवळ : काल, आज आणि उद्या', ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, कै. ना. मे. लोखंडे महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था, मुंबई (प्रकाशक), पृ. १७.

१५. प्राची, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (१८१८ ते १९२०), प्राची प्रकाशन, सौ. संध्या मणेरीकर (प्रकाशिका), मुंबई, द्वितीय आवृत्ती, फेब्रुवारी २००८, पृ. ३६ व ४१.

१६. कित्ता ,पृ. ३८.

१७. Government of India, Indian Industrial Commission Report 1916-1918, Chapter-I, Dt. 19 May 1916, Pg. 1.

१८. प्राची, उपरोक्त, पृ. ४३.

१९. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., भारतीय कामगार समस्या, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, दि. २६ जानेवारी १९७९, पृ. २

२०. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. ३

२१. Govt. of India, Indian Industrial Comm. Report, As Above, Pg. 8.

२२. आंबेडकर भीमराव (अध्यक्ष, मसुदा समिती), भारतीय संविधान, भाग–४ राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे, पृ. १८

२३. Punekar S. D., Deodhar S. B., Sankaran S., As above, Pg. 15.

२४. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. ६ व ७.

२५. कुलकर्णी एस. आर., उपरोक्त, पृ. १७.

२६. Government of India, Planning Commission, Website-Planning Commission.nic.in

२७. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २११.

२८. आढाव बाबा (संपादकीय), हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन पेन्शन विशेषांक, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ, पुणे (प्रकाशक), फेब्रुवारी २०१२, संपादकीय लेख.

२९. पाटील व्ही. पी., दि ग्रेट माथाडी–अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन, कराड (सातारा), पृ. ५५.

३०. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २१२.

३१. तुंगारे राजन, संचालक, ना. मे. लोखंडे, महाराष्ट्र श्रमविज्ञान सस्था, मुंबई, गोरगरीब कष्टकऱ्यांचे कैवारी–नारायण मेघाडी लोखंडे, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त, पृ. १.

३२. कित्ता, पृ. २, ३.

३३. शेलार नामदेव, अध्यक्ष, नारायण मेघाजी लोखंडे प्रतिष्ठान, भारतीय कामगार चळवळीचे जनक–रावबहादूर ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त, पृ. ५.

३४. अंबर्डेकर ना. श., उपरोक्त, पृ. २१२.

३५. बागल सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २६.

३६. विश्वासराव मारुती, कार्यकारी संपादक, पोर्ट ट्रस्ट कामगार, 'कामगार चळवळ मजबूत करण्यासाठी श्रमशक्तीच्या एकजुटीची गरज', कै. ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ३९, ४०.

३७. कोतवाल मनोहर, 'माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, महाराष्ट्र हमाल–माथाडी महामंडळ, पृ. २५

३८. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २१२, २१३.

३९. कित्ता, पृ. २१३.

४०. कित्ता, पृ. २१४.

४१. कित्ता, पृ. २१५.

४२. बागल सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २७.

४३. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २१६, २१७.

४४. बागल सुर्यकांत, उपरोक्त, पृ. २९.

४५. कित्ता, पृ. २९.

४६. पटेल शांती, जेष्ठ कामगार नेते व स्वातंत्र्य सेनानी; स्वातंत्र्यपूर्व व नंतरची कामगार चळवळ; ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त, पृ. १५.

४७. बागल सुर्यकांत, जनरल सेक्रेटरी हिंद मजदूर सभा, उपरोक्त, पृ. ३०.

४८. कुलकर्णी एस. आर. उपरोक्त, पृ. १७.

४९. खांदेवाले श्रीनिवास, संचालक, रुईकर इन्स्टिटट्यूट ऑफ लेबर स्टडीज, नागपूर; जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात श्रमिक संघापुढील संघटनात्मक आव्हाने, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त पृ. १०.

५०. गुप्ते वि. प., उपरोक्त, पृ. ९.

५१. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त पृ. २२१ आणि Indian Labour Year Book, 2011, Pg. 115.

५२. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २२०.

५३. कित्ता, पृ. २२१.

५४. Government of India, Industrial Disput Act, 1947, Act No. 14/1947 Dt. 11 March 1947.

५५. Government of India, Industrial Disput (Labour Appellate Tribunal) Act, 1950, Dt. 20/5/1950.

५६. Government of India, Industrial Disput Act, 1956

५७. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २४३.

५८. कित्ता, पृ. २४४.

५९. Government of India, Report of the National Commission on Labour Annexure I, Resolution Dt. 15/10/1999.

६०. Government of India, Report of National Commission for Enterprises in the Unorganised Sector, Dt. 07/07/07, Appendix 3, Pg. 143.

६१. अंबर्डेकर ना. श., पाटील ज. फा., उपरोक्त, पृ. २६७, २६८.

६२. कित्ता, पृ. २६८.

६३. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ संदर्भ पुस्तिका, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ (प्रकाशक), मुंबई, प्रथम आवृत्ती, दि. २२ नोव्हेंबर २०१२, पृ. ७.

६४. Sarth Davala, Assistant Professor, I.I.M., Banglore (Editor), Unprotected Labour in India-Issues of Concerns, Friedrich Ebert Stiffing, New Delhi (Publisher), First Edition, 1994, Pg. 3.

६५. महाराष्ट्र शासन, कार्यासन–कामगार ७ अ यांची कार्यालयीन टिप्पणी

६६. Government of India, Extra ordinary Gazette Part – 2; Act No. 331/2008, The Unorganised Workers Social Security Act, 2008.

६७. Government of India, Extra Ordinary Gazette Part – 2, Act No. 331/2008, As Above, Pg. 2, 3.

६८. Governemet of India, Extra Ordinary Gazette, Act. No. 27/1996, Dt. 19 August 1996.

६९. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र, भाग १–एल., उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १ मे २०११.

७०. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग कार्यासन–कामगार ७ अ यांची कार्यालयीन टिप्पणी, एप्रिल २०१४.

७१. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग आठ, महाराष्ट्र कायदा क्र.१/२००९ दि. ६ जानेवारी २००९.

७२. महाराष्ट्र शासन, अधिसूचना,दि. १२.८.२०१२.

७३. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी.

७४. विश्वासराव मारुती, कार्यकारी संपादक, पोर्ट ट्रस्ट कामगार, कामगार चळवळ मजबूत करण्यासाठी श्रमशक्तीच्या एकजुटीची गरज, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, उपरोक्त, पृ. ३९.

७५. विश्वासराव मारुती, उपरोक्त पृ. ४०.

७६. महाराष्ट्र शासन, पाटील शिवाजीराव (अध्यक्ष), असंरक्षित कामगारांसाठी नेमलेल्या समितीचा अहवाल, दि. १७ नोव्हेंबर १९६७. पृ. १३, १५.

७७. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. २५, ३०, ७३.

७८. किराणा बाजार व दुकाने मंडळ, बृहन्मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९७०–७१ दि. २८ फेब्रुवारी १९७२, पृ. ९.

७९. पाटील व्ही. पी., उपरोक्त पृ. प्र. ६० ते ६३.

८०. ओवीद पी. जे., 'श्री. अण्णासाहेब पाटील–एक महान कामगार पुढारी', महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन–रौप्य महोत्सव विशेषांक, सप्टेंबर १९८८, पृ. २७.

८१. पाटील व्ही. पी., दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन, सातारा, रणजित पाटील (प्रकाशक), प्रथमावृत्ती, सप्टेबर १९९८, पृ. २४.

८२. रामिष्टे बाबुराव, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, माथाडी कामगार संघटना रौप्य महोत्सवी वाटचाल; उपरोक्त, सप्टेंबर १९८८, पृ. ७.

८३. किराणा बाजार आणि दुकाने मंडळ (बृहन्मुंबईसाठी) प्रथम वार्षिक अहवाल, १९७०–७१, दि. २८.२.१९७२, पृ. ६.

८४. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष), माथाडी कामगार चौकशी समिती अहवाल, बृहन्मुंबई दि. १२ जानेवारी १९६५, पृ. १.

८५. पाटील व्ही. पी., उपरोक्त पृ. २४, २५.

८६. कित्ता, पृ. २५.

८७. पाटील अण्णासाहेब, संस्थापक–सरचिटणीस महाराष्ट्र राज्य माथाडी हमाल आणि ट्रान्सपोर्ट कामगार युनियन, माथाडी युनियनची दिड तपाची वाटचाल–(किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई, पाऊण तपपुर्ती १९७९ सभारंभाचेवेळी प्रकाशित स्मरणीकेतून

पुनर्मुद्रित); माथाडी मित्र विशेषांक १९८३; ॲड. काशिनाथ वळवईकर (संपा.) २३ मार्च १९८३,पृ. २, ३.

८८. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. २७.

८९. कित्ता, पृ. २८.

९०. कित्ता, पृ. २८.

९१. कित्ता, पृ. ३१.

९२. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. १.

९३. कित्ता, पृ. १, २, ६, ३२.

९४. महाराष्ट्र शासन, कालेलकर बी. एस. (अध्यक्ष), लोखंडी जथा कामगार चौकशी समिती अहवाल,दि. १५ डिसेंबर १९६५, पृ. १.

९५. कित्ता, पृ. २, ३.

९६. कित्ता, पृ. ८५, ८७.

९७. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग, क्र. MSC 70264-LAB-II, सचिवालय, मुंबई, दि. १५ जुलै १९६५.

९८. महाराष्ट्र शासन, पाटील शिवाजीराव (अध्यक्ष), असंरक्षित कामगारांच्या कामाच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल, मुंबई, दि. १७ नोव्हेंबर १९६७, पृ. २७, ३३ ते ८७.

९९. पाटील अण्णासाहेब, उपरोक्त, पृ. ३, ४.

१००. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग ५, महाराष्ट्र विधानसभेत व विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके, ११ मार्च १९६९, पृ. ३.

१०१. कित्ता, पृ. २ ते ३.

१०२. कित्ता, पृ. १,३ ते ६.

१०३. तिडके न. म. (माजी कामगार मंत्री), विधानसभा कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई, दि. २५ मार्च १९६९, पृ. ४१७.

१०४. कित्ता, पृ. ४३०.

१०५. तिडके न. म., (माजी कामगारमंत्री), विधानपरिषद कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई, दि. ३१ मार्च १९६९, पृ. ४०८.

१०६. कित्ता, पृ. ४०८.

१०७. तिडके न. म. (माजी कामगार मंत्री), विधान परिषद कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई दि. १ एप्रिल १९६९, पृ. ४६५.

१०८. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र अधिनियम १९६९, असाधारण राजपत्र, भाग ४, दि. १३ जून १९६९.

१०९. कित्ता, पृ. ८३४३, ८३४३A, C, ८३४४.

११०. महाराष्ट्र शासन, राज्य सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त, मुंबई, दि. ६.१२.१९६९,पृ. २.

१११. किराणा बाजार व दुकाने मंडळ, बृहन्मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल १९७०–७१ दि. २८ फेब्रुवारी १९७२, पृ. ५, १०.

११२. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र अधिनियम १९६९, उपरोक्त पृ. ८३४३C.

११३. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, कार्यासन कामगार–५, दि. २६ मार्च २०११

११४. आढाव बाबा (अध्यक्ष), महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार सल्लागार समितीने नेमलेल्या उपसमितीचा अहवाल, ऑगस्ट १९८८, पृ. ६.

११५. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र अधिनियम १९६९ मधील कलम ३, ४, ५, ६, ६(अ), ७, २२ व २३.

११६. डिंगरे चित्तरंजन, विधिज्ञ; माथाडी कायद्याची पार्श्वभूमी, कायदा व अपेक्षित बदल, पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, रामचंद्र पाटील (संपा.), सप्टेंबर २०००, पृ. १४.

११७. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (खुद्द) कार्यक्रम अंदाजपत्रक २०१३–१४, पृ. २.

११८. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १९ डिसेंबर २०००.

११९. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्ष यांची कार्यालयीन टिप्पणी.

१२०. माथाडी मंडळ योजना, कलम ५ व ६.

१२१. महाराष्ट्र शासन, परिपत्रक, क्र.एसजीए१५००२(३७८३)काम–५,दि.१०.१०.२००२.

१२२. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र अधिनियम क्र. ३०/१९६९, कलम ६, ७, व ८ पृ. ८३४६B, ८३४७.

१२३. कित्ता, कलम ६A, पृ. ८३४६A.

१२४. कित्ता, कलम ७ व ८, पृ. ८३४६B, ८३४७.

# प्रकरण ३ रे

# महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ ची अंमलबजावणी–माथाडी मंडळांची स्थापना आणि प्रगती

## ३.१ कायद्याची अंमलबजावणी सुरु होण्यासाठीचे प्रयत्न :

राज्य विधानमंडळाने पास केलेल्या महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार कायद्यास मा. राष्ट्रपतींनी दि. ५ जून १९६९ रोजी मान्यता दिली.[१] राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यावर त्याला वैधानिक स्वरुप प्राप्त झाले. यानंतर दि. १३ जून १९६९ रोजी महाराष्ट्र शासनाने हा कायदा अधिसूचना काढून राजपत्रात प्रसिध्द केला.[२] अशा प्रकारे माथाडी कामगारांसाठीच्या या कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला. या कायद्यावर विधानसभा आणि विधानपरिषदेत चर्चा सुरु असताना अनेक आमदारांनी कायद्याची अंमलबजावणी राज्यभर लवकरात लवकर करण्याची आणि हा कायदा जास्तीत जास्त असंघटीत कामगारांना लागू करण्याची मागणी होती.[३] यामध्ये सर्वश्री हशु अडवाणी, बा. कृ. देशमुख, या. रा. देवगडे, ग. प्र. प्रधान, एम. बी. हॅरिस या आमदारांचा प्रामुख्याने समावेश होता. श्री. तुषार पवार, आमदार यांनी १ मे १९६९ या कामगार दिनापासून कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती.[४] अशा प्रकारे या कायद्याचा लाभ लवकरात लवकर माथाडी–हमाल कामगारांना मिळावा अशी लोकप्रतिनिधींची मागणी होती. तथापि कायद्याला मा. राष्ट्रपतींची मान्यता जून १९६९ मध्ये मिळाली. त्यामुळे कामगार दिनी त्याची अंमलबजावणी होवू शकली नाही.

या कायद्याच्या तरतूदीनुसार वेगवेगळ्या उद्योगधंद्यात आणि व्यापाराच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांसाठी त्यांचे कामाचे स्वरुपानुसार योजना तयार करणे तसेच कामगार, मालक आणि शासन यांच्या प्रतिनिधींचे मंडळ स्थापन करणे आवश्यक होते. यासाठी काहीसा वेळ लागला होता. मात्र या विलंबामुळे माथाडी कामगारांमध्ये अस्वस्थता पसरली आणि कायद्याच्या अंमलबजावणीबद्दल त्यांच्या मनात शंका निर्माण होवू लागली. याचा गैरफायदा मालक वर्गाने घेण्यास

सुरुवात केली. माथाडी कामगारांना कामावरुन काढून टाकणे, दररोज कामगार बदलणे तसेच कामगारांना सांगणे की या कायद्यामुळे तुमचे नुकसान होईल, मिळणारी मजूरी अनेक कामगारांमध्ये विभागली जावून कमी मूजरी मिळेल असा प्रचार सुरु केला.[५] त्यामुळे अशिक्षित माथाडी कामगारांमध्ये मानसिक चलबिचल सुरु होणे साहजिकच होते. तसेच तुमचे काम देखील जाईल, कामगार संघटनेचे पदाधिकारी गुंड असतात, ते तुमच्या मजूरीतून वर्गणी म्हणून सतत पैसे घेत राहतील असे मालक वर्ग सांगत असे.[६] त्यामुळे कामगारांमध्ये भीतीचे आणि अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले. माथाडी कामगारांनी पुन्हा संप, मोर्चे, परिषदा, आंदोलने यांचे माध्यमातून कायद्याच्या तात्काळ अंमलबजावणीसाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु केला.[७] महाराष्ट्र राज्य माथाडी, हमाल आणि ट्रान्सपोर्ट युनियनचे श्री. अण्णासाहेब पाटील यांनी २०,००० कामगारांच्या सह्यांचे निवेदन तयार केले आणि तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी मुंबई येथे दौऱ्यावर आल्या असताना राजभवनावर भेटून त्यांना हे निवेदन दिले.[८] तसेच माथाडी कायद्याची अंमलबजावणी लवकरात लवकर होईल असे आश्वासनही प्रधानमंत्री यांचेकडून घेतले. या कामी बॅ. रजनी पटेल यांनी अण्णासाहेबांना मोलाची मदत केली. डॉ. बाबा आढाव यांनी माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी हमाल पंचायतीच्या वतीने वेळोवेळी तत्कालीन मुख्यमंत्री, कामगारमंत्री, सहकारमंत्री, पुरवठामंत्री यांना निवेदने देवून पाठपुरावा केला. त्यांनी दि. ६ फेब्रुवारी १९६८ रोजी तत्कालीन गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची गाडी पुण्यात अडवून तेथेच त्यांना निवेदन दिले आणि माथाडी, हमालांसाठी कायदा करुन तो तातडीने राबविण्याची मागणी केली.[९] मुंबईतील ७ ते ८ हजार माथाडी कामगारांनी दि. २१ सप्टेंबर १९६९ रोजी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची सांताक्रुझ विमानतळावर भेट घेवून श्री. नरेंद्र तिडके, तत्कालीन मजूरमंत्री यांचे उपस्थितीत त्यांस निवेदन दिले.त्यावर श्री. नरेंद्र तिडके यांनी माथाडी कायद्याची अंमलबजावणी १ जानेवारी १९७० पासून करण्यात येईल अशी घोषणा केली.[१०] दरम्यान शासनाने दि. १ डिसेंबर १९६९ रोजीच्या राजपत्रान्वये महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार सल्लागार समितीची स्थापना केली. या सल्लागार समितीने दि. ६ डिसेंबर १९६९ रोजी पहिली बैठक घेतली. कायद्यातील तांत्रिक

बाबींची पूर्तता करणे आवश्यक असल्यामुळे दि. १ जानेवारी १९७० पासून देखील कायद्याची अंमलबजावणी सुरु करता येणार नसल्याचे या बैठकीत स्पष्ट झाले. त्यामुळे दि. २६ जानेवारी १९७० पासून अंमलबजावणी सुरु करावी असे या बैठकीत ठरले.[११] अशा प्रकारे आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी वेळ लागत असल्यामुळे प्रत्यक्ष अंमलबजावणी देखील लांबत होती.

श्री. अण्णासाहेब पाटील आणि त्यांच्या माथाडी कामगार संघटनेने दि. २६ जानेवारी १९७० हा दिवस कायद्याच्या उद्‌घाटनाचा दिवस म्हणून भव्य कार्यक्रमाच्या स्वरुपात साजरा करण्याचे नियोजन केले होते. तथापि या दिवसापर्यंत देखिल कायद्यातील तांत्रिक बाबींची पूर्तता झाली नव्हती. त्यामुळे कायद्याच्या उद्‌घाटनाऐवजी कायद्याचा स्वागत समारंभ या दिवशी साजरा केला. हा कार्यक्रम श्री. नरेंद्र तिडके तत्कालीन मजूरमंत्री यांचे अध्यक्षतेखाली आणि केंद्रीय गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व श्री. वसंतदादा पाटील यांच्या उपस्थिती पार पडला.[१२] त्यानंतर देखिल श्री. अण्णासाहेब पाटील यांनी श्री. नरेंद्र तिडके यांचेकडे वारंवार पाठपुरावा केला. तसेच त्यांनी स्वत: माथाडी मंडळाची रचना, त्याची नियमावली यांचे मसूदे तयार केले. त्याबाबत वेळोवेळी श्री. तिडके यांच्याशी चर्चा करुन मंडळाची रचना व नियमावली अंतिम करण्यासाठी त्यांना मदतही केली.[१३]माथाडी कामगार संघटनांचे प्रतिनिधी, शासकिय अधिकारी आणि त्यावेळचे कामगारमंत्री श्री. नरेंद्र तिडके या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे कायद्यातील तरतुदींची पूर्वतयारी करणे शक्य झाले. त्यानुसार मुंबईत सर्वप्रथम किराणा बाजार दुकाने आणि लोखंड व पोलाद बाजारातील माथाडी कामगारांसाठीचे माथाडी मंडळाचे काम सुरु झाले.[१४] या मंडळात नोंद झालेल्या माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी लाभ मिळण्यास सुरुवात झाली. हा माथाडी कामगारांच्या लढ्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा होय.

अशा प्रकारे महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी अधिनियम १९६९ जरी दि. १३ जून १९६९ रोजी अस्तित्वात आला, तरी तांत्रिक बाबींच्या पूर्ततेसाठी काहीसा वेळ लागल्यामुळे त्याची लगेचच अंमलबजावणी सुरु होवून माथाडी कामगारांना त्यातील फायदे मिळण्यास सुरुवात होवू शकली नाही. शासनाचा कारभार बऱ्याचदा कायदेविषयक तरतूदींची पूर्तता करत करत

संथगतीने सुरु असतो, विशेषत: असंघटित कष्टकरी, गरीब वर्गाला त्याचा प्रभावी दबावगट नसल्यामुळे त्यांच्या हक्कासाठी सतत शासनाकडे पाठपुरावा करावा लागतो, तसाच या कायद्याच्या बाबतीतही माथाडी कामगारांना करावा लागला आहे. देशाच्या पंतप्रधान, गृहमंत्री, राज्याचे मुख्यमंत्री, मजूरमंत्री यांच्याकडे सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळेच केवळ सहा महिन्यांच्या कालावधीत पहिली दोन माथाडी मंडळे स्थापन होवून त्यांचे कामकाज सुरु होवू शकले. कायद्याच्या स्वागत समारंभाच्या कार्यक्रमामुळे देखिल सरकारवरचे नैतिक दडपण वाढले होते. तसेच जर कायद्यातील तरतूदीनुसार मंडळाची शासन अधिसूचनेद्वारे स्थापना करणे, प्रत्येक मंडळांतर्गत योजना तयार करणे, ती वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे, त्यावर संबंधित हितसंबंधितांच्या विशेषत: मालक वर्गाच्या हरकती मागवणे व त्यांचा योजना अंतिम करताना विचार करणे; राज्य सल्लागार समितीची स्थापना करणे आणि त्यांच्या शिफारशीनुसार योजनेस मान्यता देणे या बाबी केल्या नसत्या तर त्यांना वैधानिक स्वरुप मिळाले नसते. मालक वर्ग पहिल्यापासूनच अशा प्रकारे माथाडी कामगारांसाठी मंडळे स्थापन करणे आणि मजूरीबरोबरच लेव्हीची रक्कम मंडळाकडे भरण्यास नाखूष होते. त्यांचा जास्तीत जास्त प्रयत्न ही मंडळे स्थापन होऊ नयेत अथवा मंडळ स्थापन झाल्यास त्यांचे कामकाज सुरु होवून लेव्ही वसूल होवू नये असाच होता. त्यामुळे या कायद्यातील तांत्रिक बाबींची पूर्तता न करता घाईत मंडळे स्थापन करुन लेव्ही वसूल करण्यास सुरुवात केली असती तर मालक वर्ग कोर्टात गेला असता आणि कायद्याची अंमलबजावणी दिर्घकाळ लांबली असती. त्यामुळे कायद्यातील बाबींची पूर्तता करुनच कामकाज सुरु करणे योग्य होते आणि हे लवकरात लवकर होण्यासाठी श्री. अण्णासाहेब पाटील, श्री. मनोहर कोतवाल, डॉ. बाबा आढाव यांनी तसेच माथाडी कामगारांनी केलेले प्रयत्न उपयोगी पडले.

## ३.२ माथाडी मंडळाची स्थापना व कायद्याच्या अंमलबजावणीचा मागोवा :

माथाडी कायद्याची अंमलबजावणीची सुरुवात मुंबई व परिसरापासून होऊन मग हळूहळू राज्यभरात या कायद्याची अंमलबजावणी आता होत आहे. ज्या ज्या उद्योग आणि व्यवसायातील कामगारांनी तसेच ज्या ज्या जिल्ह्यातील कामगारांनी यासाठीची मागणी करुन पाठपुरावा केला त्या

त्या उद्योग व्यवसायातील तसेच जिल्ह्यातील कामगारांसाठी व्यवसायनिहाय अथवा जिल्हानिहाय माथाडी मंडळ स्थापन करुन त्या कामगारांना कायद्यानुसार लाभ देण्यात आले आहेत.[१५] या माथाडी कामगारांची कुठेही नोंद घेतली जात नव्हती. शासन, मालक, प्रशासन त्यांची दखल सुध्दा घेत नव्हते. या कायद्यामुळे माथाडी कामगारांची मंडळात नोंद घेण्यास सुरुवात झाली. त्यांना रोजच्या मजुरीची शाश्वती नव्हती, ते मंडळामार्फत दरमहा पगार घेवू लागले. सेवानिवृत्तीनंतर भविष्य निर्वाह निधी, उपदान याची रक्कम लाखांमध्ये घेवू लागले. या सर्व परिस्थितीचा प्रत्येक मंडळ स्थापन होतानाची संख्यात्मक आकडेवारी आणि आता ४० वर्षानंतरची याबाबतची आकडेवारी या आधारे या कामगारांच्या जीवनावर झालेला परिणाम आणि माथाडी मंडळाची प्रगती मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या माथाडी मंडळांच्या स्थापनेचा व अंमलबजावणीचा महसुली विभागनिहाय आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

१. कोकण विभाग (बृहन्मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग)

२. पुणे विभाग (पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर)

३. नाशिक विभाग (नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार)

४. औरंगाबाद विभाग (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, उस्मानाबाद, नांदेड, लातूर)

५. अमरावती विभाग (अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ)

६. नागपूर विभाग (नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया)

### ३.२.१ कोकण विभागातील माथाडी मंडळाची स्थापना व अंमलबजावणी :

सन १९६५ च्या दरम्यान जवळपास २०००० माथाडी कामगार मुंबईत होते. माथाडी कामगार मोठ्या प्रमाणात मुंबई परिसरात असल्यामुळे माथाडी कामगार चळवळीची सुरुवात देखील मुंबईमध्ये झाली. तसेच सर्वप्रथम मंडळाची स्थापना होऊन कायद्याच्या अंमलबजावणीला देखील मुंबईत सुरुवात झाली. राज्यातील एकूण ३५ माथाडी मंडळांपैकी १० मंडळे मुंबई आणि परिसरात आहेत.[१६] महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी अधिनियम १९६९ अस्तित्वात आल्यानंतर

सर्वप्रथम किराणा बाजार व दुकाने आणि लोखंड व पोलाद बाजार या दोन व्यवसायातील माथाडी कामगारांसाठी दि. १५ डिसेंबर १९६९ रोजी मंडळे स्थापन करण्यात आली.[१७] मुंबईतील या माथाडी मंडळाच्या स्थापनेचा आणि माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीचा मंडळनिहाय इतिहास पुढील प्रमाणे आहे.

### ३.२.१.१ किराणा बाजार आणि दुकाने मंडळ :

किराणा बाजार आणि दुकाने मंडळासाठीची योजना दि. १२ डिसेंबर १९६९ रोजी पूर्व प्रसिध्द करण्यात आली.[१८] त्यावर मालक, कामगार आणि अन्य संबंधित व्यक्तिंच्या सूचना तसेच या योजनेच्या अंमलबजावणीस काही हरकत असल्यास त्यादेखिल लेखी पाठविण्याची विनंती करण्यात आली. तशा प्रकारे वर्तमानपत्राद्वारे जाहिर प्रसिध्दीही देण्यात आली. त्यावर प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करुन दि. ६ एप्रिल १९७० रोजी योजना लागू करण्यात आली.[१९]मंडळाचे कार्यालयासाठी स्वतंत्र जागा नसल्यामुळे मंडळाची पहिली बैठक दि. १९ जानेवारी १९७० रोजी कामगार आयुक्तांच्या कार्यालयात झाली. या बैठकीत मंडळाची कामकाज पध्दत ठरविण्यात आली. तसेच मंडळाच्या कामकाजासाठी रुपये २०००० इतकी रक्कम दीर्घ मुदतीचे कर्ज म्हणून शासनाकडे मागण्यात आली. मंडळात नोंद होणाऱ्या व्यापाऱ्यांकडून त्यांचेकडे काम करणाऱ्या माथाडी कामगारांच्या मजूरीच्या रकमेवर ९ टक्के इतकी रक्कम लेव्ही म्हणून घेण्याचे निश्चित करण्यात आले.[२०] हे मंडळ स्थापन झाल्यानंतर पहिल्या वर्षी मंडळामध्ये ३८३७ कामगारांची आणि ७६२ मालकांची नोंद झाली. या मंडळाचे अध्यक्ष श्री. एच. ए. साठे सहाय्यक कामगार आयुक्त हे होते तर कामगार प्रतिनिधी सर्वश्री अण्णा पांडुरंग पाटील (संस्थापक, सरचिटणीस महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन), ॲड. काशिनाथ वळवईकर (सहसरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन) आणि राघु विठोबा पोफळे (अध्यक्ष, महाराष्ट्र माथाडी युनियन) होते व मालक प्रतिनिधी श्री. पी. एल. ठक्कर (अध्यक्ष, मुदी बाजार किराणा मर्चंट असोसिएशन), श्री. अभेयचंद गांधी (सदस्य, कार्यकारी समिती, बॉम्बे कलर ॲण्ड केमिकल मर्चंट असोसिएशन), श्री. केशवजी धनजी (ऑनररी सेक्रेटरी, ग्रेन राईस ॲण्ड ऑईल

सिडस्, मर्चंट असोसिएशन) हे होते.[२१] यावर्षी नोंदीत मालकांनी रु. ५१,४६,६२४ इतक्या रकमेची मंडळात भरणा केलेली मजूरीची रक्कम मंडळामार्फत कामगारांना देण्यात आली. तसेच मालकांनी रु. ४,७५,२७० इतकी रक्कम लेव्ही म्हणून मंडळात भरली. या रकमेतून मंडळाने रु. ५५,४३८ इतकी रक्कम कामगारांना भरपगारी सणाच्या सुट्ट्या देण्यासाठी वापरात आणली आणि रु. २,३७,६३३ इतकी रक्कम पुढील वर्षात कामगारांना भरपगारी रजा देण्यासाठीची तरतूद म्हणून ठेवली. अपघातग्रस्त कामगारांना नुकसान भरपाईपोटी रु. २६१ इतकी रक्कम देण्यात आली.[२२] अशा प्रकारे इतिहासात प्रथम माथाडी कामगारांना योग्य मोबदला आणि कल्याणकारी लाभ मिळण्यास सुरुवात झाली.

सन २००७–०८ च्या अहवालानुसार किराणा बाजार व दुकाने मंडळात ७१९३ व्यापाऱ्यांची आणि ३९२७५ माथाडी कामगारांची नोंद झालेली आहे. अहवाल वर्षात अपघात नुकसान भरपाई म्हणून रु. ७४,२१,८४८ इतक्या रकमेची मदत अपघातग्रस्त कामगारांना व त्यांच्या कुटुबियांना करण्यात आली. कामगारांना महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन, कै. अण्णासाहेब पाटील जयंती व पुण्यतिथी, दिवाळी (लक्ष्मीपूजन), प्रजासत्ताक दिन, शिवजयंती आणि होळी अशा ८ भरपगारी रजा वर्षभरात देण्यात आल्या. या पोटी रु. ५३,२७,८२० इतक्या रकमेचे कामगारांना वाटप करण्यात आले. माथाडी कामगारांमध्ये गावी जाण्याची प्रवृत्ती अद्यापही आहे. त्यामुळे बुडणाऱ्या रोजगाराची अंशत: भरपाई करण्याच्या दृष्टीने प्रतिवर्षी अर्ध्या पगाराएवढी रक्कम रजेच्या पगारापोटी दिली जाते. अहवाल वर्षात यापोटी रु. ३,७३,२९,३६५ एवढी रक्कम वाटण्यात आली. दि. ०१ ऑगस्ट १९७१ पासून मंडळातील नोंदीत कामगारांसाठी भविष्य निर्वाह निधी योजना लागू केलेली आहे. या योजनेअंतर्गत अहवाल वर्षात सेवानिवृत्त कामगारांना रुपये १३,४६,०१,९८१ रुपये तर उपदानापोटी रु. २,५०,१६,६७६ इतक्या रकमेचे वाटप करण्यात आले. तसेच दिवाळी सानुग्रह अनुदान म्हणून रु. १२,७९,८७,९२६ इतकी रक्कम वाटप करण्यात आली. त्याचप्रमाणे कामगारांना घरभाडे भत्ता (रु. १.७० कोटी) आणि रजेतील प्रवास भत्ता (रु. ५२.९० लक्ष) देखिल देण्यात आला आहे. सन २००७–०८ या वर्षात मंडळाकडे लेव्हीपोटी रु. ३७.९७ कोटी रुपये जमा झाले, तर रु.

९२.६१ कोटी इतकी मजूरीची रक्कम वाटण्यात आली.[२३] अशा प्रकारे सन १९७० मध्ये स्थापन झालेल्या या मंडळामार्फत आता माथाडी कामगारांना करोडो रुपयांचे लाभ आणि सामाजिक सुरक्षितता देण्यात येत आहे.

### ३.२.१.२ मुंबई लोखंड आणि पोलाद बाजार मंडळ :

लोखंड आणि पोलाद बाजार मंडळासाठीची योजना दि. ६ एप्रिल १९७० रोजी प्रसिध्द करुन दि. ७ मे १९७० पासून लागू करण्यात आली.[२४] राज्य सल्लागार समितीच्या दि. ६ डिसेंबर १९६९ रोजी झालेल्या पहिल्या बैठकीत लोखंड आणि पोलाद उद्योगासाठीची सदर योजना विचारात घेवून ही योजना बृहन्मुंबईतील लोखंड व पोलाद दुकाने, रेल्वे यार्डस्, गुडस्, शेडस् आणि कारखाने यांना लागू करण्याची शिफारस केली. या योजनेच्या मसुद्यावर काही सूचना व हरकती असल्यास त्या १० जानेवारी १९७० पर्यंत सादर करण्यात यावे असे दि. १२ डिसेंबर १९६९ च्या राजपत्रान्वये प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानंतर योजनेला अंतीम स्वरुप देवून ती अंमलात आणली.

मंडळाला सुरुवातीला स्वत:ची जागा, कर्मचारी वृंद इत्यादी कोणत्याच सुविधा तसेच उत्पन्नाचा स्त्रोतही नव्हता. त्यामुळे शासनाकडून रु. २०००० आणि रु. ३०००० असे दोन वेळा एकूण ५०००० इतके कर्ज २० वार्षिक हप्त्यात परत करण्याच्या अटीवर घेण्यात आले. त्यातून सुरुवातीचा खर्च भागविण्यात आला. या मंडळाची स्थापना दि. १५ डिसेंबर १९६९ रोजी करण्यात आली.[२५] या मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. ए. एच. साठे, सहाय्यक कामगार आयुक्त हे होते. मंडळाच्या पहिल्या बैठकीत लेव्हीची टक्केवारी १०% ठरविण्यात आली. मंडळ स्थापन झाल्यापासूनच्या पहिल्या आर्थिक अहवाल वर्षात १९७३ मजूरांची तसेच ३७६ मालकांची नोंद करण्यात आली. या मालकांनी मंडळाकडे भरणा केलेली मजूरीची रक्कम रु. ३०,८५,३९१ ही मंडळामार्फत कामगारांना या वर्षात वाटण्यात आली. तसेच मालकांनी लेव्हीपोटी रु. ३,१३,२४१ इतकी रक्कम मंडळाकडे जमा केली. या रकमेतून या अहवाल आर्थिक वर्षात रु.७०,४९९ इतकी रक्कम नोंदणी झालेल्या कामगारांना भरपगारी सणाच्या सुट्ट्या देण्यासाठी वापरण्यात आली. तसेच पुढील वर्षात द्यावयाच्या भरपगारी वार्षिक रजेसाठी रु. १,२५,३०० एवढी तरतूद केली. प्रथम

अहवाल वर्षात रु. ३२८५ इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात आली.[२६] अशा प्रकारे लोखंडी जथ्था कामगारांना आयुष्यात प्रथमच सामाजिक सुरक्षितता, नियमित काम व पगार आणि इतर लाभ मिळू लागले.

आता या मंडळात २००६–०७ च्या वार्षिक अहवालानुसार ३१ मार्च २००७ अखेर एकूण ३५८९ कामगार आणि २०८७ मालकांची नोंद झालेली आहे. लेव्हीचा दर ४२% होता. त्यानुसार मालकांकडून अहवाल वर्षात रु. ६८५.६१ लाख इतकी रक्कम लेव्हीपोटी मंडळात जमा झाली. मंडळ सध्या दरवर्षी ८ दिवस पगारी सुट्ट्या आणि ६ दिवस बिनपगारी सुट्ट्या देते. या वर्षात रु. १९.८२ लक्ष इतकी रक्कम या पगारी सुट्ट्या पोटी वाटण्यात आली. तर वार्षिक भरपगारी रजेपोटी रु. ४०.८१ लाख इतकी रक्कम कामगारांना देण्यात आली. वैद्यकीय भत्ता (रु. ८.९१ लाख), घरभाडे भत्ता (रु. १०.९३ लाख) रजेच्या कलावधीतील प्रवास भत्ता (रु. १६.३२ लक्ष), दिवाळी सानुग्रह अनुदान (रु. २७१.८६ लक्ष) भविष्य निर्वाह निधी, उपदान असे इतर लाभही देण्यात आले. तसेच काम करताना जखमी झालेल्या २२ कामगारांना रु. ५.७९ लक्ष इतकी नुकसान भरपाई देण्यात आली. नियम भंग करणाऱ्या एकूण २६ मालकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले. त्यापैकी २३ मालकांना न्यायालयाने रु. १०० पासून रु. १००० पर्यंत दंड केला. या अहवाल वर्षात माथाडी कामगारांना मजूरीपोटी रु. १४.६२ कोटी इतकी रक्कम वाटण्यात आली.[२७]

ज्या कामगारांना दररोजच्या रोजगाराची काळजी होती, कामाचा काळ, वेळ नव्हती, चांगली वागणूक मिळत नव्हती, कधीही सुट्टी नव्हती अशा माथाडी कामगारांसारख्या असंघटित कामगारांना राज्याच्या नव्हे तर देशाच्या इतिहासात प्रथमच नियमित काम, भरपगारी रजा, सणासाठी सुट्टी आणि अपघात नुकसान भरपाई मिळू लागली. तसेच कामगारांची नोंदणी केलेली असल्यामुळे मालकांनाही मंडळाकडून आवश्यकतेनुसार नियमित कामगार उपलब्ध होवू लागले. त्यामध्ये पुढील कालावधीत प्रगती होत गेली असल्याचे आढळून येते.

### ३.२.१.३ माल वाहतूक कामगार मंडळ, मुंबई :

मालवाहतूक व्यवसायात काम करणाऱ्या माथाडी कामगारांसाठी मालवाहतूक कामगार मंडळ, मुंबई या मंडळाची दि. २५ मार्च १९७१ रोजी स्थापना करण्यात आली.[२८] या मंडळाच्या माध्यमातून माल वाहतूक व अनुषंगिक कामे करणाऱ्या मुंबई व परिसरातील माथाडी कामगारांना नोंद करुन विविध कल्याणकारी लाभ देण्यात आले. माल वाहतूक मंडळासाठीची योजना दि. १ मार्च १९७१ रोजी प्रसिध्द करण्यात आली.या योजनेची अंमलबजावणी दि. १.४.१९७१ पासून सुरु करण्यात आली. सार्वजनिक माल वाहतूकीच्या वाहनात माल भरणे, उतरविणे व त्या अनुषंगिक कामे करणारे कामगार व संबंधित व्यापारी तसेच यातील कमीशन एजंट, लॉरी पुरवठादार, वखारीचे मालक, क्लिअरिंग एजंट यांनाही योजनेच्या तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत. दि. १.१०.१९८८ पासून ठाणे व रायगड जिल्ह्यासाठी ही योजना लागू करण्यात आली.या मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. एच. ए. साठे, सहायक कामगार आयुक्त हेच होते. माल वाहतूक व्यवसायातील नोंद झालेल्या व्यापाऱ्यांकडून १५% लेव्ही घेण्याचे निश्चित करण्यात आले. मंडळ स्थापन झाल्यापासून पहिल्या आर्थिक वर्षात नोंद झालेल्या ३१९९ माथाडी कामगारांना सन १९७२–७३ या वर्षात रु. १.१० कोटी इतकी मजूरीची रक्कम मंडळामार्फत वाटण्यात आली. तसेच नोंद झालेल्या २९४ मालकांनी रु. १५.०८ लक्ष इतकी लेव्हीची रक्कम मंडळात जमा केली. या रकमेतून पहिल्या वर्षी कामगारांना भरपगारी सुट्ट्या, दिवाळी बोहणी, भविष्य निर्वाह निधी इत्यादी लाभ देण्यात आले.[२९] सन २००८–०९ च्या वार्षिक अहवालानुसार मंडळाच्या हजेरीपटावर १७७८४ कामगारांची नोंद असून त्यापैकी १५११४ प्रत्यक्ष कामावर आहेत तर ३९१३ मालकांची नोंद झालेली आहे. मालकांनी भरावयाच्या लेव्हीचा दर ४०% असून अहवाल वर्षात रु. ३३.९२ कोटी इतकी लेव्ही मंडळाकडे जमा झाली. कामगारांना रु. ८४.७९ कोटी इतकी रक्कम मजूरी म्हणून वाटण्यात आली. कामगारांना बिनपगारी आठ आणि भरपगारी ७ सुट्ट्या देण्यात आल्या व भरपगारी रजेपोटी रु. ३६.५२ लक्ष इतका खर्च आला. याखेरिज दिवाळी बोहणी (रु. १२.६७ कोटी), वार्षिक भरपगारी रजा (रु. ३.८१ कोटी), वार्षिक प्रवास भत्ता (रु. ८४.७४ लाख), वार्षिक घरभाडे भत्ता (रु. १.२८ कोटी) हे देखील लाभ देण्यात आले. भविष्य निर्वाह निधीसाठी रु. १०.९७ कोटी,

उपदानासाठी रु. २ कोटी वापरण्यात आले. तसेच जखमी झालेल्या ६२ कामगारांना रु. ५४ लक्ष इतकी नुकसान भरपाई आणि मृत्यू पावलेल्या ५ कामगारांच्या वारसांना रु. १९.७४ लक्ष रक्कम देण्यात आली. कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मोफत औषधोपचार पुरविण्यासाठी २% दराने लेव्हीची रु. १.७० कोटी एवढी रक्कम माथाडी हॉस्पिटल ट्रस्टला देण्यात आली.[३०] या रकमेतून माथाडी हॉस्पीटलचा प्रशासकिय खर्च व कामगारांच्या उपचाराचा खर्च भागविण्यात येतो.

अशा प्रकारे १९७१ मध्ये स्थापन झालेल्या या मंडळाने पुढील काळात सातत्याने प्रगती करत माथाडी कामगारांना योग्य वेतन व सामाजिक सुरक्षिततेचे लाभ दिलेले आहेत.

### ३.२.१.४ कापड बाजार आणि दुकाने मंडळ, बृहन्मुंबई :

कापड बाजार आणि दुकाने व्यवसायातील माथाडी कामगारांसाठीची योजना दि. ११ मार्च १९७१ रोजी प्रसिध्द करण्यात आली.[३१] त्या योजनेची अंमलबजावणी १ मे १९७१ पासून सुरु करण्यात आली. या मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्री. टी. आर. भागवत, कामगार उपआयुक्त यांची नेमणूक करण्यात आली.[३२] मंडळाने दि. १४ जून १९७१ रोजी घेतलेल्या बैठकीत लेव्हीची टक्केवारी ८% ठरवली. या मंडळाकडे पहिल्या आर्थिक वर्षात रु. ८३,९०,१२४ इतकी लेव्हीची आणि मजूरीची रक्कम जमा झाली. या रकमेपैकी मजूरीपोटी रु. ७१,१३,७२५ रुपये कामगारांना देण्यात आले. उर्वरीत लेव्हीच्या रकमेतून कामगारांना भविष्य निर्वाह निधी (६%), अपघात नुकसान भरपाई (१%), उपदान (१%) हे लाभ देण्यात आले. पहिल्या आर्थिक वर्षात या मंडळात ५०९८ मालक आणि ४४११ कामगार नोंद झाले. या माथाडी मंडळाला सुरुवातीलाच कोर्ट केसेस आणि मुकादम व कामगारांच्या समस्यांनाही तोंड द्यावे लागले. मुकादम (कार्टींग एजंट) हे मालकाकडून कंत्राट घेत आणि कमी मजूरीवर कामगारांकडून काम करुन घेत. मंडळ स्थापनेनंतर मजूरीची रक्कम मालकांनी मंडळात भरुन मंडळामार्फत कामगारांना द्यावयाची होती, यामुळे मुकादमांनी विरोध केला आणि उच्च न्यायालयात याचिका क्र. ४७४/१९७१ दाखल केली. तसेच काही कामगारांना मालकाकडून परस्पर मजूरीची रक्कम हवी होती. मालकांनी देखील मा. मुंबई उच्च न्यायालयात सदर माथाडी कायदा आणि कापड बाजार मंडळाच्या योजनेस याचिका क्र.

४५४/१९७१ नुसार आव्हान दिले. मात्र मा. उच्च न्यायालयाने दि. २७ ऑगस्ट १९७१ रोजी या दोन्ही याचिका फेटाळून मंडळाच्या बाजूने निर्णय दिला.[33] यामुळे या मंडळात माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीस सुरुवात करुन मंडळातील कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देणे शक्य झाले.

मार्च २०१३ पर्यंत कापड बाजार आणि दुकाने मंडळात ३७०९४ कामगार आणि ५६४७ इतक्या मालकांची नोंद झालेली आहे. मंडळाचे भिवंडी येथे शाखा कार्यालय सुरु केलेले आहे. कापड गिरण्या बंद झाल्यामुळे, कापड धंद्याचे मुंबईतून स्थलांतर झाल्यामुळे तसेच आर्थिक मंदीमुळे कामगारांच्या मजूरीमध्ये आणि त्यावर मिळणाऱ्या लेव्हीमध्ये घट होत आहे.[34] या मंडळाच्या सन २००९-१० च्या वार्षिक अहवालानुसार आता या मंडळाचे कार्यक्षेत्र ठाणे व रायगड जिल्ह्यातही आहे. मंडळाने कामगार व त्यांचे कुटुंबियासाठी चिंचबंदर, मुंबई येथे आणि सह्याद्रीनगर, कांदीवली (पश्चिम), मुंबई येथे दवाखाने सुरु केलेले आहेत. शासनाने दिलेल्या जमिनीवर कांदिवली येथे राबविण्यात आलेल्या गृहप्रकल्पातील २१५० घरांपैकी १७९९ घरांचे वाटप कामगारांना करण्यात आले आहे. सन २००९-१० या वार्षिक अहवाल काळात ३७% या दराने रु. ७.५७ कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून कामगारांना सानुग्रह अनुदान (रु. २ कोटी), भरपगारी रजा वेतन (रु. ९१ लक्ष), सुट्ट्यांपोटी वेतन (रु. २० लक्ष), अपघाती मृत्यू पावलेल्या १२ कामगारांच्या वारसांना (रु. १.२० लक्ष) वैद्यकीय सुविधेसाठी रु. ४९ लक्ष असे लाभ देण्यात आले. भविष्य निर्वाह निधीपोटी रु. ६.५८ कोटी आणि उपदानापोटी रु. ६२ लक्ष इतकी रक्कम वापरण्यात आली. तसेच कामगारांना शेती कामासाठी आणि मुलांच्या शैक्षणिक खर्चासाठी मदत व्हावी म्हणून ५८.३२ लक्ष रुपयांचे कामगार मदत निधी म्हणून वाटप करण्यात आले. या अहवाल वर्षात रु. २१.४२ कोटी इतकी रक्कम कामगारांना वेतनापोटी वाटप करण्यात आली.[35]

अशा प्रकारे कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई या मंडळाला सुरुवातीला न्यायालयीन प्रकरण, मुकादमांचा रोष अशा प्रसंगांना तोंड द्यावे लागले. तरी श्री. टी. आर. भागवत, यांचे सारखे अनुभवी कामगार उपआयुक्तांनी त्यावर मात करत मंडळाचे कामकाज सुरळीत केले. हे मंडळ सातत्याने माथाडी कामगारांच्या कल्याणासाठी प्रयत्नशील आहे.

शासनाने हळूहळू विविध उद्योग व्यवसायातील माथाडी कामगारांसाठी मंडळे स्थापन करुन त्यांना विविध लाभ देण्यास सन १९७१ मध्ये सुरुवात केल्यानंतर या कामगारांसाठी आणखी काय करता येईल याचा विचार श्री. अण्णासाहेब पाटील, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन यांनी सुरु केला. वाढत्या महागाईनुसार माथाडी कामगारांची मजूरी देखील वाढली पाहिजे ही योग्य मागणी त्यांनी मांडली. यासाठी तत्कालीन कामगार उपआयुक्त श्री. भागवत यांचे अध्यक्षतेखाली मुंबईतील मांडवी भागातील १४ असोशिएशनचे प्रतिनिधी व मंडळाचे अध्यक्ष यांची एकत्रित बैठक घेण्यात आली. ही बैठक चार तास चालली. महागाई निर्देशंकाप्रमाणे माथाडी कामगारांच्या मजूरीत वाढ करण्याची मागणी मान्य करण्यात आली.[३६] हा श्री. अण्णासाहेब पाटील यांच्या धडपडीचा विजय होय.

### ३.२.१.५ कापूस बाजार कामगार मंडळ, मुंबई :

कापूस बाजार या व्यवसायातील कामगारांना कापसाच्या मोठ–मोठ्या आकारमानाच्या कापसाच्या गासड्यांची वाहतूक करावी लागे. मुंबईमध्ये कापड गिरण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे कापड बाजारातील कामगारांनादेखील मोठ्या प्रमाणात काम करावे लागत असे. ब्रिटीश राजवटीत मुंबईत अनेक कापड गिरण्या सुरु झाल्या होत्या. तसेच इंग्रजांनी भारतातील कापूस ब्रिटनला नेवून तेथील गिरण्यात कापड तयार करुन ते भारतात विकण्याचे धोरण ठेवले होते. कापसाची ही निर्यात मुंबई बंदरातून मोठ्या प्रमाणात होत असे. त्यामुळे या उद्योगात काम करणाऱ्या माथाडी व इतर अनुषंगिक कामगारांची संख्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातही मुंबईत बंदर व गिरण परिसरात मोठ्या प्रमाणात होती. त्यामुळे कापड व कापूस बाजार आणि दुकाने येथील कापसाच्या गासड्या चढवणे, उतरवणे, रचून ठेवणे, वाहून नेणे, वजन करणे व इतर अनुषंगिक कामे करणाऱ्या माथाडी कामगारांसाठी माथाडी अधिनियम लागू करण्याचा निर्णय शासनाने दि. २७ जानेवारी १९७१ रोजी घेतला.[३७] त्यानुसार यासाठीची योजना शासनाने दि. ३० मार्च १९७२ रोजी प्रकाशित केली. तद्नंतर योजनेचा विस्तार करुन कॉटन जीनींग व प्रेसिंग फॅक्टऱ्या, कॉटन वेस्ट फॅक्टऱ्या, गोदामे यांनाही लागू केली. तसेच ठाणे व रायगड जिल्ह्यालाही ही योजना लागू केली. या

योजनेअंतर्गत पहिले त्रिपक्षीय मंडळ दि. १९ एप्रिल १९७२ रोजी स्थापन करण्यात आले. सदर मंडळाचे अध्यक्ष श्री. टी. आर.भागवत, कामगार उपआयुक्त होते.मंडळाकडे सुरुवातीला कोणताच आर्थिक स्त्रोत नसल्यामुळे राज्य शासनाने मंडळाला सुरुवातीच्या खर्चासाठी रु. २५००० इतके कर्ज द.सा.द.शे. ६.२५% व्याजाने दिले. मंडळाने लेव्हीचा १०% दर ठरवला. त्यानुसार अहवाल वर्षात रु. ५१२८१८ इतकी रक्कम लेव्हीपोटी मंडळाकडे जमा झाली. त्यातून भविष्य निर्वाह निधी, उपदान व अपघात नुकसान भरपाई हे लाभ कामगारांना देण्यात आले. या अहवाल वर्षात मंडळामध्ये २८७ मालक व १४६१ कामगार नोंद झालेले होते. नोंद झालेल्या कामगारांना रु. ४५४१९०९ इतकी रक्कम वेतनापोटी वाटण्यात आली.[३८]

सद्यस्थितीत मंडळामध्ये १२१ कामगारांची नोंद असून त्यापैकी ३६ कामावर येतात तर ५३७ मालकांची नोंद असून त्यापैकी केवळ २५ कार्यरत आहेत.[३९] हे कामगार पीस रेट (अंगावर घेवून) प्रमाणे काम करतात आणि त्याची मजूरी धनादेशाद्वारे दिली जाते. मुंबईतील अनेक कापड गिरण्या बंद झाल्यामुळे नोंद झालेल्या सर्व कामगारांना पुरेसे काम मिळत नाही. त्यामुळे या मंडळातील कामगारांची व मालकांची संख्या अत्यंत कमी झालेली आहे. सन २०१०–११ च्या वार्षिक अहवालानुसार लेव्हीचा दर ४२% आहे. त्यानुसार रु. ११.२८ लक्ष इतकी रक्कम लेव्हीपोटी मंडळाकडे जमा झाली. त्यातून कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, उपदान, अपघात नुकसान भरपाई आणि प्रसूति लाभ, वैद्यकीय व आयुर्विमा, पगारी रजा, दिवाळी सानुग्रह अनुदान इत्यादी लाभ देण्यात आले. या अहवाल वर्षात कामगारांना रु. २६.४७ लक्ष इतक्या मजूरीचे वाटप करण्यात आले. या माथाडी मंडळाच्या चेतना सहकारी बँक, दादर जनता सहकारी बँक, कॉसमॉस (वैभव) सहकारी बँक आणि कोल्हापूर जनता सहकारी बँक या चार बँकामधील ठेवी या बँका बुडाल्याने मिळू शकल्या नाहीत. त्यामुळे बँकांविरुध्द वसुली दावा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेला आहे.[४०]

### ३.२.१.६ खोका मेकिंग बोर्ड, मुंबई :

विविध वस्तूंच्या पॅकिंगसाठी व वाहतूकीसाठी लाकडी खोक्यांचा वापर पूर्वी मोठ्या प्रमाणात होत असे. या खोका धंद्यातील कामगारांसाठी मंडळ स्थापन करुन या धंद्यातील सर्व कामगारांना या मंडळात सामिल करुन घ्यावे अशी मागणी होती. या बोर्डाला महाराष्ट्र शासनाने संमती दिली होती, मात्र मालकांचा विरोध होता.[४१] त्यामुळे या कामगारांनी सन १९७२ मध्ये बेमुदत संप पुकारला तसेच खोक्यांची वाहतूकही बंद पाडण्याचा जागोजागी प्रयत्न केला. घोडपदेव येथेही कामगारांनी खोक्याची गाडी अडवली होती. त्याचवेळी तेथे श्री. अण्णासाहेब पाटील आले आणि स्वत: गाडी पुढे उभे राहिले. दरम्यान मालकांनी केलेल्या तक्रारीवरुन भायखळा पोलिस स्टेशनचे इन्स्पेक्टर श्री. पाटील पोलिसांसह तेथे आले. त्यांनी श्री. अण्णासाहेब पाटील आणि कामगारांना अटक केली. श्री. अण्णासाहेब पाटील यांना अटक केल्याची बातमी कळताच माथाडी कामगार मोठ्या संख्येने भायखळा पोलिस स्टेशन जवळ जमा झाले. पोलिस आणि माथाडी कामगारांमध्ये संघर्ष झाला. कामगारांनी पोलिसांचे कडे तोडण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी कामगारांना बेदम मारहाण केली आणि मग कामगारांनीही पोलिस स्टेशनवर दगडफेक केली. यात अनेक कामगार गंभीर जखमी झाले तर काही पोलिसांनाही इजा झाली. अनेक कामगारांना अटक करण्यात आली. श्री. तुषार पवार, आमदार यांनी मध्यस्थी करुन श्री. अण्णासाहेब पाटील यांची दुसरे दिवशी जामिनावर सुटका केली. श्री. अण्णासाहेब पाटील या घटनेमुळे प्रचंड चिडलेले होते. या कामगारांच्या पाठीवरील काठ्यांचे वळ आणि माराच्या जखमा यांचे फोटोही श्री. पाटील यांनी काढून घेतले.[४२] मात्र अटक झालेल्या कामगारांवर जर पोलिसांनी खटले भरले गेले तर त्यांचे पुढील आयुष्य उद्ध्वस्त होईल याचा विचार करुन त्यांनी वैयक्तिक अपमान सहन करत दोन पावले माघार घेतली. त्यांनी बिहारच्या दुष्काळ निधीसाठी माथाडी कामगारांकडून मदत देण्याच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करुन या कार्यक्रमास श्री. वसंतराव नाईक, मुख्यमंत्री यांना आमंत्रित केले. माथाडी कामगारांनी हा कार्यक्रम भव्य स्वरुपात आयोजित करुन बिहारच्या दुष्काळासाठी देणगी दिली.[४३] या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी माथाडी कामगारांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचे वचन दिले.तसेच या कार्यक्रमानंतर

पोलीसांनी खोका मार्केट आंदोलन प्रकरणी अटक केलेल्या कामगारांना मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार बिनशर्त सोडून देण्यात आले.

अशा प्रकारे श्री. अण्णासाहेब पाटील या माथाडी कामगार नेत्याने या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कामगारांबरोबरच स्वत:ही कष्ट सहन केले, संघर्ष केला. तसेच कामगारांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करुन स्वत:चा वैयक्तिक स्वाभिमान बाजूला ठेवत अपमान सहन करुन प्रसंगी दोन पावले मागे घेत मुत्सद्दीपणाने अटक झालेल्या कामगारांची सुटका करुन घेतली.

नंतर बृहन्मुंबई व ठाणेमधील लाकडी खोकी तयार करणाऱ्या व्यवसायातील कामगारांसाठी सदर मंडळाची स्थापना दि. ३१ मार्च १९७२ रोजी करण्यात आली.[४४] विविध प्रकारच्या मालाच्या सुरक्षित वाहतूकीसाठी लाकडापासून खोकी तयार करणारे व विकणारे कामगार, या लाकडाच्या वखारीत विविध प्रकारचे काम करणारे कामगार यांना विविध कल्याणकारी सुविधा मिळाव्यात. तसेच या प्रकारचे काम करणाऱ्या व्यवसायिकांनाही आवश्यक कामगारांचा पुरेसा पुरवठा व्हावा या उद्देशाने हे मंडळ स्थापन करण्यात आले. सुरुवातीला मालकांनी या मंडळावर त्यांचे प्रतिनिधींची नावे देण्यास नकार दिल्यामुळे शासनाने दि. १६.६.१९७३ रोजी श्री. एच. ए. साठे, सहायक कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय मंडळाची स्थापना केली. या मंडळासाठीची योजना दि. ३१ जानेवारी १९७२ रोजी जाहिर करण्यात आली.[४५] ही योजना प्रथम बृहन्मुंबई जिल्ह्यासाठी लागू करण्यात आली. नंतर दि. १६.१.१९७५ पासून ठाणे जिल्ह्यासाठी आणि दि. ३.११.१९८७ पासून रायगड जिल्ह्यास लागू करण्यात आली. या व्यवसायातील कामगार प्रामुख्याने सातारा जिल्ह्यातील होते. एका वखारीत सर्वसाधारणपणे एकाच गावातील कामगार काम करत. हे कामगार वखारीतच रहात. त्यांची कुटुंबे गावी राहत.[४६] सुरुवातीला या मंडळाच्या अंमलबजावणीत मालक संघटनांनी विरोध केला. मा. उच्च न्यायालयात रिटपिटीशन क्र. २९०/१९७३ अन्वये वुडन बॉक्स मॅन्युफॅक्चर्स असोशिएशनचे श्री. आर. एन. देसाई यांनी या उद्योगातील कामगारांना हा कायदा लागू करु नये अशी विनंती केली. तसेच लघु उद्योग खोका व्यापारी असोशिएशन यांनी रिट पिटीशन क्र. ४१४/१९७३ नुसार या कायद्याच्या व योजनेच्या घटनात्मक वैधानिकतेला आव्हान दिले.[४७] तथापि

मा. उच्च न्यायालयाने या दोन्ही याचिका फेटाळल्या व सदर कायदा राज्यघटनेनुसार सुसंगत असून तो लागू करण्याचा निर्णय दिला. मंडळाने सुरुवातीला लेव्हीचा दर २२% ठरविला. तथापि पहिल्या आर्थिक वर्षातील दोनच महिने लेव्ही वसूल करता आल्यामुळे केवळ ५३,००० इतकीच लेव्हीची रक्कम मिळू शकली. त्यामुळे मंडळाला पहिल्या वर्षी तोटा झाला. मंडळाला शासनाकडून रु. ४५०० इतके कर्ज सुरुवातीच्या खर्चासाठी मिळाले. पहिल्या वर्षी मंडळात ११० मालक आणि २२३२ कामगारांची नोंदणी झाली. या कामगारांना सणासाठी सुट्ट्या, भरपगारी रजा आणि भविष्य निर्वाह निधी हे लाभ देण्यात आले.[४८]

सध्या या मंडळामध्ये १६३७ मालक आणि ९६४० कामगारांची नोंद झालेली आहे. या मंडळात अंगावर काम करणारे कामगार आणि मासिक पगारदार असे दोन प्रमुख प्रकार आहेत. मासिक पगारदार कामगारांच्या पगारावर २५.२५% आणि अंगावर काम करणारे खोका कामगारांच्या मजूरीवर ४४.७५% तसेच फारयवूड कामगारांच्या मजूरीवर ३८% लेव्ही सद्यस्थितीत आकारली जाते. सन २०१०–११ या आर्थिक वर्षात रु. १५१.६६ लक्ष इतकी रक्कम मजूरी आणि लेव्ही पोटी जमा झाली. त्यातून भरपगारी रजा, सणाच्या सुट्ट्या, सानुग्रह अनुदान, इत्यादी लाभ देण्यात आले. या आर्थिक वर्षात रु. ३९००० इतकी मंडळास आर्थिक तूट आली आहे. सदर मंडळाची आर्थिक स्थिती कमकुवत असून सन २००८–०९ पासून मंडळास सातत्याने तोटा होत आहे. त्यामुळे मंडळाने प्रशासकीय खर्चात जास्तीत जास्त कपात केली आहे. मंडळाने सन १९८९ ते ९२ या कालावधीत सहकारी बँकामध्ये गुंतवलेल्या रकमा या बँका बुडाल्यामुळे परत मिळाल्या नाहीत. त्यासाठी मा. न्यायालयामार्फत प्रयत्न सुरु आहेत.[४९]

### ३.२.१.७ धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई :

मुंबईतील धातू आणि कागद बाजारातील माथाडी कामगारांसाठी मंडळाची स्थापना दि. १८.४.१९७३ रोजी करण्यात आली.[५०] हे कामगार स्टेनलेस स्टिल, स्टील फर्निचर या व्यवसायातील मालाची भराई, उतराई इ. कामे करतात. मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज दि.

१.७.१९७३ पासून सुरु करण्यात आले. मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. ति. रा. भागवत, कामगार, उपआयुक्त हे होते. मंडळाने सुरुवातीचे वर्षी १०% आणि दि. १ जानेवारी १९७४ पासून १४% लेव्हीचा दर ठरविला होता. त्यानुसार सन १९७४–७५ यावर्षी रु. २.४८ लक्ष लेव्ही जमा झाली. त्यातून कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देण्यात आले. या अहवाल वर्षात मंडळात ६८४ मालक आणि १३६१ कामगार नोंद झालेले होते. कामगारांना कापड बाजार मंडळाच्या दवाखान्यामधून वैद्यकीय सुविधा देण्यात येत होत्या. तसेच या वर्षात रु. १७.१९ लक्ष इतकी मजूरी कामगारांना वाटण्यात आली.[५१]

सन २००९–१० या वार्षिक अहवालानुसार मंडळात एकूण ४७४२ मालक आणि ४७८१ कामगारांची नोंद झालेली आहे. तसेच लेव्हीचा दर ३८% असून या वर्षात रु. ६.०८ कोटी लेव्ही जमा झाली. या मंडळामार्फत देखील इतर मंडळाप्रमाणे कामगारांना कल्याणकारी लाभ देण्यात येतात. तसेच रु. १६ कोटी इतकी मजूरी या अहवाल वर्षात वाटप करण्यात आलेली आहे. कापूस बाजार कामगार मंडळ आणि या मंडळाच्या कामगारांकरीता शासनाने एकाच ठिकाणी चेंबूर येथे ६ एकर २० गुंठे जमिन दिलेली असून त्यातील तीन इमारतींचे काम पूर्ण झालेले आहे.[५२]

### ३.२.१.८ दी रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डिंग एस्टाब्लिशमेंटस् लेबर बोर्ड मुंबई :

राज्यातील नव्हे तर देशातील एक प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणून मुंबईचे अनन्यसाधारण महत्त्व पूर्वीही होते आणि आताही आहे. त्यामुळे मुंबईत येणारा माल अथवा मुंबईतून इतरत्र जाणाऱ्या मालाची वाहतूक रेल्वेनेही मोठ्या प्रमाणात होते. हा माल यार्डमध्ये रेल्वेतून उतरवणे अथवा रेल्वेच्या वॅगनमध्ये भरण्याचे काम हे माथाडी कामगार करतात. या व्यवसायातील मालकांनी मंडळात नोंदणी करणे व लेव्ही भरण्याचे टाळले. या व्यवसायातील मालकांना हे स्वतंत्र मंडळ स्थापन होण्यापूर्वी किराणा बाजार व दुकाने मंडळांतर्गत नोंदणी करण्यास सांगण्यात आले होते. आपला व्यवसाय या बाबीशी संबंधित नसल्याचे कारण देत नोंदणीस नकार दिला. त्यावर महाराष्ट्र माथाडी

ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने दि. २४.२.१९७५ पासून संपावर जाण्याचा इशारा दिला तसेच राज्य आणि केंद्र शासनास यात मध्यस्थी करण्याची विनंती केली. तत्कालीन कामगार राज्यमंत्री श्री. रामनाथजी पांडे यांनी घेतलेल्या दि. १८.२.१९७५ च्या बैठकीत या उद्योगासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याचे आणि तो पर्यंत किराणा मंडळात मालकांनी लेव्ही भरण्याचे मान्य केले.[५३]मा. राज्यमंत्र्यांनी घेतलेल्या या बैठकीनंतर कामकाज सुरळीतपणे सुरु झाले. या मंडळासाठीची योजना दि. ३०.९.१९७६ रोजी जाहिर करण्यात आली.तसेच मंडळाची स्थापना दि. १६.१०.१९७६ रोजी करण्यात आली. तथापि या मंडळाच्या प्रत्यक्ष कामास दि. १.६.१९७७ रोजी सुरुवात झाली.[५४]

या माथाडी मंडळाची पहिली बैठक श्री. एच. ए. साठे, सहायक कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली झाली.या बैठकीत मालक व कामगार प्रतिनिधी यांनी मंडळाचे कामकाज नियमितपणे सुरु होणे, नोंदणी व लेव्ही जमा करणे सुरु होणे या दृष्टीने निर्णय घेतले. त्यानुसार मंडळाने सुरुवातीला लेव्हीची टक्केवारी १५% ठरविली. पहिल्या आर्थिक वर्षात नोंद झालेल्या १७२ मालकांकडून रु.५३८९६३ इतकी लेव्हीची रक्कम जमा झाली. तसेच पहिल्या वर्षात रु. ३२१५७२७ इतकी रक्कम कामगारांच्या पगारापोटी मंडळामार्फत वाटली. नोंदणी झालेल्या १३७९ कामगारांना रु. १३४६० इतकी रक्कम या आर्थिक वर्षात भरपगारी आणि सणाच्या सुट्ट्यांपोटी वाटण्यात आली. दिवाळीसाठी सानुग्रह अनुदान मजूरीच्या २% देण्यात आले. नुकसान भरपाईपोटी रु. १८५७७ इतकी रक्कम देण्यात आली.[५५] श्री. कमल मेहबुब, नोंदणी क्र. ८३३ या मृत कामगाराचे वारसास सदर रक्कम देण्यात आली. संबंधित मालकाने या आर्थिक वर्षात केवळ रु. १८६७ इतकी लेव्ही भरली असतानाही त्याचेकडील मृत कामगारांच्या वारसास रु. १८५७७ इतकी भरघोस नुकसान भरपाई मिळू शकली. या घटनेमुळे कामगार आणि मालक दोघांमध्येही मंडळाबद्दल विश्वास निर्माण होवून नोंदणी वाढली. मंडळाकडे नोंद होवून कायदेशीर रक्कम भरल्यास आपल्याला मोठ्या प्रमाणात आर्थिक आणि सामाजिक सुरक्षितता लाभणार असल्याची भावना निर्माण झाली.

ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील या व्यवसायातील कामगारास या अधिनियमाच्या तरतूदी दि. ३.११.१९८७ पासून आणि ही योजना या जिल्ह्यांसाठी दि. २१.३.१९८८ पासून लागू करण्यात आली. सन २०१०–११ या अहवाल वर्षात एकूण १४१९ मालक आणि ४२९८ कामगारांची मंडळात नोंद झालेली आहे. लेव्हीचा दर ४३% असून अहवाल वर्षात एकूण रु. २२.७३ कोटी रक्कम मंडळात जमा झाली. या रकमेतून पगारी सुट्‌ट्या (रु. १९.३७ लक्ष), भरपगारी रजा आणि प्रवास व घरभाडे भत्ता (रु. ३.५६ कोटी), अपघात नुकसान भरपाई (रु.३.३२ लक्ष) इत्यादी लाभ नोंद झालेल्या माथाडी कामगारांना देण्यात आले.[५६] या मंडळाच्या कार्यक्षेत्रातील कर्नाक बंदर व अंधेरी रेल्वे यार्डातील काम बंद आहे, मात्र कल्याण, मुलुंड, तुर्भे व जोगेश्वरी रेल्वे यार्डातील कामात वाढ झाल्यामुळे मजूरी व लेव्हीच्या रकमेत गेल्या काही वर्षात वाढ झालेली आहे.[५७]

### ३.२.१.९ मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई :

मुंबई आणि परिसरातील भाजी मंडई मधील माथाडी कामगारांसाठी दि. २२ जानेवारी १९८५ रोजी माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली.[५८] या मंडळासाठीची योजना दि. २२ जानेवारी १९८५ रोजी जाहिर करण्यात आली होती.[५९] सदर योजना जाहिर करण्यापूर्वी कामगार आयुक्तांच्या अन्वेषण यंत्रणेमार्फत बृहन्मुंबईतील भाजीपाला, फळे व फुले मंडईतील अशा कामगारांच्या जीवनमानाचा आणि कामाचा अभ्यास करण्यात आला. सदर अहवाल दि. २०.११.१९७९ रोजी शासनास सादर करण्यात आला. त्यावर राज्य सल्लागार समितीने विचार करुन या कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार एक योजना तयार करुन सूचना व हरकती मागविण्यासाठी सदर योजना दि. २०.११.१९८२ रोजी पूर्व प्रसिध्द केली. तथापि दि. ३०.११.१९८२ पर्यंत दिलेल्या मुदतीत आणि त्यानंतर दि. १५.३.१९८३ पर्यंत वाढवून दिलेल्या मुदतीत देखील कोणीही हरकती नोंदविली नाही अथवा काही सूचना केल्या नाहीत. त्यामुळे दिनांक २२.१.१९८५ रोजी सदर योजना जाहिर करुन लागू केली. या योजनेमधील मालक आणि कामगारांच्या नोंदणीचे कलम १४ व १५ ची अंमलबजावणी दि. १.३.१९८५ पासून सुरु केली. मात्र कार्यालयीन जागे अभावी व मंडळ सुरु करण्यासाठी

शासनाकडून कर्ज स्वरुपात मदत न मिळाल्याने लगेचच मंडळाचे कामकाज सुरु होवू शकले नाही. शासनाने या मंडळाला जानेवारी १९८६ मध्ये कार्यालयासाठी रु. ४४५०० कर्ज मंजूर केले तसेच खोका मेकिंग ॲण्ड टिबर मार्केट लेबर बोर्ड यांनी फेब्रुवारी १९८६ मध्ये जागा दिली. भाजीपाला, फळे व फुले व्यापाऱ्यांनी मंडळात नोंदणीस नकार देवून असहकार्य केल्यामुळे मंडळ स्थापन होवूनही प्रथम अहवाल वर्षात एकाही मालकाची नोंद होवू शकली नाही. माथाडी कामगार हुंडेकऱ्यांमार्फत काम करत असल्यामुळे त्यांना मालक म्हणून नोंदवावे अशी त्यांची मागणी होती. मात्र हुंडेकरी हे व्यापारी आणि कामगार यांच्यातील मध्यस्थ असल्यामुळे त्यांना मालक म्हणून नोंदविता येत नव्हते. त्यामुळे पहिल्या वर्षी मंडळाला काहीही लेव्ही मिळाली नाही. मात्र प्रशासकिय खर्च व वेतनापोटी झालेल्या खर्चामुळे रु.२७१९२ तोटा झाला.[६०] अशा प्रकारे या मंडळाला सुरुवातीला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले.

या मंडळाचे कार्यक्षेत्र सुरुवातीला बृहन्मुंबई पुरते होते. नंतर ठाणे, रायगड या जिल्ह्यांचाही शासन अधिसूचना दि. ३ जूलै १९९२ नुसार त्यात अंतर्भाव करण्यात आला.[६१] सन २०१०-११ या अहवाल वर्षात भाजीपाला माथाडी मंडळातील एकूण नोंद झालेले कामगार ९०६५ आणि मालक २५०० इतके आहेत. लेव्हीचा दर ४०% असून अहवाल वर्षात मजूरी व लेव्ही मिळून एकूण रु. ३९.७८ कोटी रक्कम मंडळात जमा झाली. त्यातून रु. २८.४२ कोटी रक्कम मजूरीपोटी वाटण्यात आली. उर्वरीत रकमेतून भविष्य निर्वाह निधी (रु. ६.१९ कोटी), उपदान (रु. ९६.१८ लक्ष), अपघात नुकसान भरपाई (रु. ६.४५ लक्ष), दिवाळी बोहणी (रु. ३.७२ कोटी) आणि सणांची रजा, घरभाडे व प्रवास भत्ता (रु. १.७८ कोटी) हे लाभ नोंद झालेल्या कामगारांना देण्यात आले. या मंडळातील एकही प्रकरण न्यायालयात प्रलंबित नाही.[६२]

### ३.२.१.१० क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई :

मुंबई गोदीत ज्या कामगारांना डॉक वर्कर्स रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट ॲक्ट या कायद्याचा लाभ मिळत नव्हता, अशा क्लिअरींग आणि फॉरवर्डींगचे काम करणाऱ्या गोदीतील कामगारांसाठी या

मंडळाची दि. १२.४.१९९१ रोजी स्थापना करण्यात आली.[६३] या मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. बी. के. पाटील, सहाय्यक कामगार आयुक्त होते. मंडळासाठीची योजनादेखील दि. १२.४.१९९१ रोजी जाहिर करण्यात आली.[६४] श्री. बी. के. पाटील, सहायक कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली पहिली सभा दि.२१.५.१९९१ रोजी संपन्न झाली. दि. २७.८.१९९१ रोजीच्या दुसऱ्या बैठकीत मालकांकडून ४०% लेव्ही जमा करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार पहिल्या आर्थिक वर्षात लेव्हीपोटी रु. ७२४०९४ इतकी रक्कम नोंद झालेल्या ३२ मालकांकडून जमा झाली. त्यातून या वर्षी नोंद झालेल्या १७८४ कामगारांना रु. ७२४०६ इतकी रक्कम सणासाठीच्या भरपगारी रजेपोटी वाटण्यात आली. तसेच भविष्य निर्वाह निधी (रु. १.८१ लक्ष), सानुग्रह अनुदान (रु. १.५० लक्ष), घरभाडे भत्ता इत्यादी लाभ देण्यात आले. मात्र मुंबई बंदराच्या विश्वस्तांनी मंडळातील कामगारांची नोंदणी सुरु असतानाच दि.२३.१२.१९९१ पासून या कामगारांना गोदी प्रवेश पत्र देणे बंद केल्यामुळे कामगारांना काम मिळू शकले नाही. याचा मंडळाच्या कामावर विपरित परिणाम होवून मंडळाला रु.१४१३९७ इतके आर्थिक नुकसान सहन करावे लागले.[६५]

आता, सन २००६–०७ च्या प्रसिध्द झालेल्या वार्षिक अहवालानुसार एकुण ३५८० कामगार आणि १२४ मालकांची नोंद झालेली आहे. अहवाल वर्षात लेव्हीचा दर ४५% आणि ४०% होता; या दराने रु. ५८.५१ लक्ष लेव्ही जमा झाली. यातून पगारी सुट्ट्या (रु. १.०७ लक्ष), भरपगारी रजेचा पगार (रु. ४.८१ लक्ष), वैद्यकीय सुविधेपोटी माथाडी कामगार हॉस्पिटल ट्रस्टला रु. २.७० लक्ष, घरभाडे भत्ता (रु. २.१४ लक्ष), रजेच्या कलावधीतील प्रवासभत्ता (रु. १.०७ लक्ष), सानुग्रह अनुदान (रु. १३.९२ लक्ष), भविष्य निर्वाह निधी (रु. २८.५६ लक्ष), उपदान (रु. ६.१३ लक्ष), तसेच एका कामगारास अपघात झाल्याने कामगार नुकसान भरपाई (रु. १.०७ लक्ष) हे लाभ देण्यात आले.[६६]

### ३.२.१.११ रत्नागिरी–सिंधुदुर्ग माथाडी असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी :

कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यात पूर्वी उद्योगांचे प्रमाण अत्यंत कमी होते. तसेच व्यापारी तत्त्वावरील हमालांकडून मालवाहतूकीचे प्रमाणही कमी होते. त्यामुळे माथाडी कायदा

१९६९ मध्ये झाल्यानंतरही ३५ वर्षांनी सन २००४ मध्ये या दोन जिल्ह्यांसाठी माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळासाठीची योजना दि. २२.१.२००४ रोजी प्रकाशित करण्यात आली.[६७] मात्र मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज दि.१.४.२००६ पासून सुरु झाले. दि. ३१.३.२००९ अखेर ३२० कामगारांची आणि १७० मालकांची मंडळात नोंद करण्यात आली. लेव्हीचा दर ३०% ठरविण्यात आला आहे. त्यानुसार रु. ५.२६ लक्ष इतकी रक्कम लेव्हीपोटी मंडळाकडे भरणा करण्यात आली. तसेच रु. १६.८५ लक्ष इतकी रक्कम पगारापोटी कामगारांना वाटण्यात आली. तसेच कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, उपदान, सानुग्रह अनुदान, पगारी सुट्ट्या, अपघात नुकसान भरपाई इत्यादी लाभ देण्यात आले.[६८]

सद्यस्थितीत मंडळात १२०० माथाडी कामगार नोंद असून २७७ मालक नोंद आहेत. माथाडी मंडळात मंडळाचा एकही कर्मचारी नाही. सहाय्यक कामगार आयुक्त, रत्नागिरी यांचे कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडूनच कोणताही अतिरिक्त मोबदला न देता हे काम करण्यात येते. स्वत:चा एकही कर्मचारी नसताना रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग जिल्ह्यातील माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देण्याचे प्रयत्न या मंडळामार्फत सुरु आहेत.[६९]

अशा प्रकारे राज्यातील इतर जिल्ह्याच्या तुलनेने बृहन्मुंबई व परिसरात माथाडी, हमाल कामगारांची संख्या जास्त असल्याने, तसेच येथील कामगारांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे या परिसरातील १० महत्त्वाच्या उद्योग व्यवसायातील कामगारांसाठी स्वतंत्र माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली आणि त्यांना विविध लाभ मिळू लागले. बृहन्मुबंईमधील कामगारांसाठी स्थापन केलेल्या या १० मंडळाच्या कार्यकक्षा हळूहळू कोकणातील ठाणे, नवी मुंबईसह रायगड क्षेत्रापर्यंत वाढविण्यात आल्या. कोकणातील रत्नागिरी व सिंधुदूर्ग या जिल्ह्यामध्ये एका विशिष्ट उद्योग व्यवसायातील माथाडी कामगारांची संख्या पुरेशी नव्हती. त्यामुळे मुंबई प्रमाणे व्यवसायानुसार माथाडी कामगार मंडळे स्थापन करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नव्हते तसेच या दोन्ही जिल्ह्यात माथाडी कामगारांची संख्या तुलनेने कमी असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करुन तेथील मालकांडून लेव्ही गोळा करणे व त्यातून कामगारांना लाभ देणे, प्रशासकीय खर्च

भागविणे शक्य नव्हते. त्यामुळे या दोन जिल्ह्यांसाठी मिळून आणि तेथिल सर्वच उद्योग व्यवसायातील कामगारांसाठी एकच मंडळ स्थापन करण्यात आले. मुंबई व्यतिरिक्त सर्वच जिल्ह्यांसाठी अशाच प्रकारे आर्थिक बाबींचा विचार करुन जिल्हानिहाय स्वतंत्र मंडळे स्थापन करण्यात आली आहेत.

### ३.२.२ पुणे विभाग (पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर) :

पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर हे जिल्हे उद्योग व्यापार आणि कृषी क्षेत्रात तुलनेने विकसित आहेत. या भागात ऊस, हळद यासारखी नगदी पिके तसेच फळ पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. सिंचनाचे तसेच उद्योग धंद्याचेही प्रमाण मोठे आहे. राजकियदृष्ट्या पुणे विभागाने राज्याच्या राजकारणात सातत्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावलेली आहे.

### ३.२.२.१ पुणे जिल्ह्यातील माथाडी मंडळे :

पुणे जिल्ह्यात मार्केटयार्ड, चाकण येथे भाजीपाला व फळे इ. मालाचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो. इतर जिल्ह्यातून देखील येथे शेतीमाल येतो. तसेच पुणे परिसरात रांजणगाव, चाकण, पिंपरी–चिंचवड, कुरकुंभ येथील आद्योगिक क्षेत्रही मोठे आहे. यामुळे या परिसरातही माथाडी कामगारांची संख्या मोठी आहे. या परिसरातील माथाडी मंडळाच्या स्थापनेचा इतिहास पुढील प्रमाणे आहे.

पुणे जिल्ह्यात दोन माथाडी मंडळे आहेत. सर्व प्रथम पुणे जिल्ह्यासाठी एकच माथाडी मंडळ होते. नंतर पिंपरी चिंचवड या क्षेत्रासाठी आणखी एका माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली.

#### ३.२.२.१.१ पुणे माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ, पुणे :

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम सन १९६९ मध्ये अस्तित्वात आला. मात्र शासनाने हा कायदा झाल्यानंतर पाच वर्षांनी दि. ३० मार्च १९७४ रोजी पुण्यास लागू केला.[७०] या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाने

डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्त्वाखाली शासनाकडे वारंवार पाठपुरावा केला. राज्य सल्लागार समितीने हा कायदा जिल्ह्यातील महानगरपालिका हद्दीतील किराणा भुसार बाजारपेठा व उपबाजारपेठा या सर्व ठिकाणी लागू करण्याची शिफारस केली होती. मात्र शासनाने प्रथम ज्या ठिकाणी कामगार जास्त प्रमाणात आहेत अशा ठिकाणी प्रथम अंमलबजावणी करुन आणि मग तेथील अनुभव लक्षात घेवून इतरत्र कायदा राबविण्याचा निर्णय घेतला. दरम्यान पुण्यातील व्यापाऱ्यांनी कोर्टात रिट याचिका दाखल करुन अंमलबजावणीस स्थगिती मिळविली. कोर्टाने या प्रकरणी निर्णय दिल्यानंतर दि. १५ सप्टेंबर १९८० पासून पुण्यात माथाडी कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. माहे डिसेंबर १९८५ पर्यंत लोखंड–पोलाद वाहतूक, भाजीपाला, मालधक्का या ठिकाणी योजना लागू नव्हती. केवळ ठोक व्यापारी आणि ज्यांचेकडे नियमित हमाल नोंदवलेले आहेत, अशांनाच ही योजना लागू होती. या मागचे कारण तांत्रिक स्वरुपाचे होते. शासनाने अधिसूचना काढताना अनावधानाने ही कामाची ठिकाणे त्यातून वगळली होती. त्यात दुरुस्ती केल्यानंतर महानगरपालिका हद्दीत सर्वच ठिकाणी हा कायदा लागू झाला. यासाठी डॉ. बाबा आढाव व पुण्यातील हमाल–माथाडींनी वारंवार सर्व स्तरावर पाठपुरावा केला.[७१]

पुणे जिल्ह्यात या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यावर मंडळात पहिल्या आर्थिक वर्षात ९५३ कामगारांची आणि विविध व्यवसाय उद्योगातील २९३ मालकांची नोंद झाली. मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. चि. बा. डिंगरे, सहायक कामगार आयुक्त हे होते. दि. १२ सप्टेंबर १९८० रोजी झालेल्या बैठकित मंडळाने २०% लेव्ही जमा करण्याचा निर्णय घेतला.त्यानुसार नोंद झालेल्या मालकांकडून पहिल्या वर्षी रु. १७७७३१ इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून नोंद झालेल्या कामगारांना रु. ६३९४८ इतकी रक्कम दिवाळी बोहणी म्हणून वाटण्यात आली. या मंडळाचे सुरुवातीचे कामकाज सुरळीतपणे चालावे म्हणून शासनाने मंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम होईपर्यंत एकूण ४ वेळा मिळून रु.७५००० कर्ज दिले. सदर कर्जाची मंडळाने शासनाला व्याजासकट परतफेड केली आहे.[७२]

सद्यस्थितीत पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळामध्ये १८०९७ कामगार आणि ३७४९ मालकांची नोंद झालेली आहे. लेव्हीचा दर ३५% असून सन २०११–१२ या वर्षात रु. १.९६ कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून भविष्य निर्वाह निधी (१२%), उपदान (५%), दिवाळी बोहणी (११.५०%), रजेचा पगार (१.५०%) भरपगारी सुट्ट्या (१.५०%) आणि अपघात नुकसान भरपाई (१%) हे लाभ देण्यात आले. माथाडी कामगारांना ॲडव्हान्सस्ट्रीट हॉस्पीटल, सॅलिसबरी पार्क आणि साने गुरुजी आरोग्य केंद्र, हडपसर या दोन दवाखान्यातून वैद्यकीय सुविधा पुरविण्यात येतात. तसेच प्रत्येक कामगाराचा दि युनायटेड इंडिया इंश्युरन्स कंपनीच्या माध्यमातून विमा काढण्यात आला आहे. त्यानुसार ३ लाख रुपयाचा विमा, रु. ५०००० पर्यंत औषधोपचार खर्च व उपचारा दरम्यानच्या गैरहजेरीपोटी रु. ५०० नुकसान भरपाई दर आठवड्याला देय आहे. कामगारांच्या इयत्ता ४ थी ते १० वी इयत्तात शिकणाऱ्या मुलांना विनामूल्य वह्यांचे वाटप तसेच गुणवंत पाल्यांना प्रत्येकी रु. १००१ इतके बक्षिसही देण्यात येते. उच्च शिक्षण घेणाऱ्या पाल्यांना रु. ५०००० पर्यंत द.सा.द.शे. ४% या अल्पदराने कर्ज देण्यात येते.[७३]अशा प्रकारे पुणे माथाडी मंडळ माथाडी कामगार आणि त्यांच्या कुटुंबासाठी विविध कल्याणकारी योजना राबवत आहे. यामुळे या कामगारांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता लाभली आहे.

### ३.२.२.१.२ पिंपरी–चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

पुणे जिल्ह्यातील पिंपरी–चिंचवड भागात औद्योगिक क्षेत्र मोठे आहे. या भागाचा सन १९९१ मधील खूल्या आर्थिक धोरणानंतर झपाट्याने मोठा विस्तार झालेला आहे. या भागातील औद्योगिक वसाहतीत अनेक उद्योगधंदे सुरु झाल्याने तेथील माथाडी कामगारांची संख्या वाढली. त्यामुळे पुणे जिल्ह्यात पिंपरी–चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ या आणखी एका मंडळाची योजना दि. ८ जुलै १९९२ रोजी प्रकाशित करण्यात आली.[७४]त्यानुसार पिंपरी चिंचवड परिसरातील

उद्योगांना माथाडी कायदा लागू करण्यात आला. तसेच त्रिपक्षीय मंडळाची स्थापना देखील करण्यात आली. या मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. के. पी. गिते, सहाय्यक कामगार आयुक्त तर सचिव श्री. रविराज इळवे, सरकारी कामगार अधिकारी हे होते. प्रथम वर्षी मंडळात ८१५ कामगार आणि १०१ मालकांची नोंद झाली. तसेच दि. २४.८.१९९२ च्या मंडळाच्या बैठकीत ३०% लेव्ही घेण्याचे ठरले. त्यानुसार प्रथमवर्षी रु. ११२७८९० लेव्ही जमा झाली. त्यातून कामगारांना विविध लाभ दिले गेले.[७५] सन २००६–०७ च्या वार्षिक अहवालानुसार रु. ९.६९ कोटी इतकी मजूरी वाटप करण्यात आली. तसेच लेव्हीपोटी रु. २.९१ कोटी रक्कम जमा झाली. त्यातून भविष्य निर्वाह निधी (१०%), उपदान (४%) दिवाळी बोहणी (८.३३%), रजेचा पगार (४%) आणि नुकसान भरपाई (०.६७%) हे लाभ दिले गेले.[७६]

अशा प्रकारे पुणे जिल्ह्यात दोन माथाडी मंडळे आहेत. ही दोन्ही मंडळे आर्थिकदृष्ट्या सक्षम असून जिल्ह्यातील माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देण्यासाठी कार्यरत आहेत. तसेच हमाल पंचायतीच्या वतीने पुणे जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील हमाल माथाडींना कष्टाची भाकरी या उपक्रमाच्या माध्यमातून सकस व स्वस्त अन्न तसेच सेवाभावी दवाखान्याच्या माध्यमातून आरोग्य सुविधा पुरविण्यात येते.

### ३.२.२.२ कोल्हापूर जिल्ह्यातील माथाडी मंडळे :

कोल्हापूर जिल्ह्यासाठी सुरुवातीला एकाच माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली होती. कालांतराने इचलकरंजी तालुक्यात आणखी एक माथाडी मंडळाची स्थापना सन १९९२ रोजी करण्यात आली. या दोन्ही माथाडी मंडळाच्या स्थापनेचा आणि स्थितीचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

#### ३.२.२.२.१ कोल्हापूर माथाडी मंडळ, कोल्हापूर :

कोल्हापूर माथाडी मंडळासाठीची योजना दि. १५.२.१९७८ रोजी जाहिर करण्यात आली.[७७] सदर योजना दि. १ मे १९७८ पासून प्रत्यक्षात लागू करण्यात आली. तद्नंतर कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक उद्योग–व्यवसायातील माथाडी कामगारांसाठी एकाच माथाडी मंडळाची स्थापना

दि. २९ एप्रिल १९७८ रोजी करण्यात आली.[७८] मात्र प्रत्यक्ष मंडळाचे कामकाज दि. १.५.१९८५ पासून सुरु झाले. मंडळाने सुरुवातीला २०% लेव्ही घेण्याचे ठरविले. त्यानुसार पहिल्या आर्थिक वर्षात नोंद झालेल्या मालकांकडून जमा केलेल्या लेव्हीमधून कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देण्यास सुरुवात केली.

सन २००९–१० या आर्थिक वर्षात लेव्हीचा दर ३०% होता, त्यानुसार या वर्षी रु. ४.०९ कोटी इतकी रक्कम लेव्हीच्या स्वरुपात जमा झाली. यातून कामगारांना सानुग्रह अनुदान (रु.१.०२ कोटी), भरपगारी सुट्ट्या (रु. १८.१९ लक्ष), रजेच्या काळातील पगार (रु. ३८.७७ लक्ष), वैद्यकीय मदत (रु. २१.२७ लक्ष) इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच या अहवाल वर्षात कामगारांना रु. १२.६६ कोटी इतकी मजूरीची रक्कम वाटप करण्यात आली. मंडळात नोंद झालेल्या कामगारांची संख्या ३२८० असून मालकांची संख्या १२४३ आहे. मंडळाने रु. २२.८० कोटी इतकी रक्कम ठेवींच्या स्वरुपात विविध राष्ट्रीयकृत बँकात ठेवलेली आहे. मंडळाच्या कार्यक्षेत्रात ७ कामगार संघटना आणि व्यापारी संघटना कार्यरत आहेत. नोंद झालेल्या माथाडी कामगारांचा दि ओरिएण्टल इंश्युरन्स कंपनीकडे अपघात सुरक्षा विमा उतरविण्यात आलेला आहे. कामगारांचे वेतन बँकेमार्फत करण्यात येते. तसेच मंडळाचे कामकाजाचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. कामगारांच्या मुलांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यात येतात. अशाप्रकारे कोल्हापूर जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठी मंडळ सतत प्रयत्नशील आहे.[७९]

### ३.२.२.२.२ इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी तालुक्यात यंत्रमागाचा मोठा व्यवसाय आहे. या व्यवसायात माथाडी कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या कामगारांचे प्रश्न स्थानिक पातळीवरच सुटावेत आणि त्यांना माथाडी कायद्यानुसार लाभ स्थानिक पातळीवरच मिळावेत म्हणून राज्य शासनाने इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची स्थापना दि. १३ फेब्रुवारी १९९२ रोजी केली.[८०] मंडळाकडे प्रत्यक्ष वेतन व लेव्ही जमा करण्याचे कामकाज ऑक्टोबर १९९४

पासून सुरु झाले. या मंडळाची योजना दि. १३.२.१९९२ रोजी जाहिर करण्यात आली.[८१] मंडळाची पहिली बैठक श्री. आर. एच. पाटील, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. पहिल्या आर्थिक वर्षात नोंद झालेल्या मालकांकडून रु. २.३४ लक्ष इतकी लेव्हीची रक्कम जमा झाली. या रकमेतून नोंद झालेल्या कामगारांना सानुग्रह अनुदान (रु. ६९,७५७), भविष्य निर्वाह निधी (रु. ६९,७५७), उपदान (रु. २५,०९०) पगारी रजा (रु. १६,७४२) सुट्टीचा पगार (रु. ८,३७०), वैद्यकीय सुविधा (रु. ४,२२०) इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच रु. ८.१३ लक्ष इतकी रक्कम कामगारांना वेतनापोटी वाटप करण्यात आली.[८२]

सद्यस्थितीत मंडळामध्ये ६०४ कामगार आणि१०० मालकांची नोंद झालेली आहे. कामगार संघटनांनी या मंडळाचे इचलकरंजी नगरपलिका क्षेत्रापुरते असलेले कार्यक्षेत्र वाढवून ते हातकणंगले व शिरोळे या दोन तालुक्यालाही लागू करण्याची विनंती केली आहे. यामुळे मंडळातील मालक–कामगार नोंद वाढून मंडळ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम होईल. मंडळामार्फत नोंदीत कामगारांना दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनीच्या माध्यमातून जन आरोग्य पॉलिसी, अपघात पॉलिसी यांचा लाभ देण्यात येत आहे.मंडळामध्ये आवश्यकतेपेक्षा कमी कर्मचारी वर्ग आहे, त्यामुळे कामकाजात अडचणी येतात. सद्यस्थितीत लेव्हीचा दर २८% वरुन वाढवून ३०% करण्यात आला आहे. सन २०१०–११ च्या वार्षिक अहवालानुसार लेव्हीपोटी रु. ५४.६० लक्ष इतकी रक्कम जमा झाली. त्यातून कामगारांना भविष्य निर्वाह निधी (रु.१७.३८ लक्ष), भरपगारी सुट्ट्या (रु. १.९२ लक्ष), उपदान (रु. २.६१ लक्ष), वैद्यकीय सुविधा, मुलांना वह्या वाटप (रु. १.७१ लक्ष) हे कल्याणकारी लाभ देण्यात आलेले आहेत.[८३]

अशा प्रकारे इचलकरंजी माथाडी मंडळ त्यांचे कार्यक्षेत्रातील माथाडी कामगारांसाठी सतत कार्यशील आहे. अपुरा कर्मचारी वर्ग असतानाही मंडळ कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देत आहे. यंत्रमाग व कापड उद्योगाचे होणारे यांत्रिकीकरण व स्थलांतरण यामुळे मंडळातील कामगार व मालकांची कमी होणारी संख्याही मंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम राहण्यासाठी व त्याची प्रगती

होण्यासाठी पुरेशी नसल्याचे दिसून येते. बदलत्या काळानुसार या योजनेच्या स्वरुपात सुधारणा करुन कार्यक्षेत्र व व्यवसायांची व्यापकता वाढवणे गरजेचे वाटते.

### ३.२.२.३ सांगली मिरज माथाडी कामगार मंडळ :

सांगली जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठी मंडळाची स्थापना दि. १३ जूलै १९८४ रोजी करण्यात आली.[८४] या मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. एस. पी. सावंत, सहाय्यक कामगार आयुक्त हे होते. मंडळाची योजना दि. १३ जुलै १९८४ रोजी जाहिर करण्यात आली.[८५] या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी दि. १ ऑक्टोबर १९८६ पासून सुरु झाली आणि योजनेच्या व्याप्तीत वाढ करुन सन १९९९ पासून संपूर्ण जिल्ह्यासाठी ही योजना लागू करण्यात आली. मंडळाने लेव्हीची वसुली व कामगार नोंदणी करण्याचे ठरविले. मात्र अध्यक्ष, कृषि उत्पन्न बाजार समिती आणि मालक प्रतिनिधींनी विरोध केल्याने पहिल्या आर्थिक वर्षात एकही मालक–कामगारांची नोंदणी होवू शकली नाही.[८६] मंडळाच्या सुरुवातीच्या कामकाजासाठी मंडळास शासनाने रु. ७०००० कर्ज दिले. त्यातून मंडळाला सुरुवातीचा प्रशासकीय खर्च भागविण्यात आला. सन १९८५–८६ या अहवाल वर्षात संचालक, पणन यांचेकडून लेव्हीच्या वसुलीस मान्यता घेण्यात आली.[८७] या अहवाल वर्षात १५% दराने लेव्ही घेण्याचे ठरविण्यात आले. तसेच ३८३ मालक आणि १२१७ कामगार मंडळात नोंद झाले. सन १९८६–८७ पासून लेव्ही वसुलीस व कामगारांना लाभ देण्यास सुरुवात झाली.[८८] या अहवाल वर्षात रु. १.९४ लक्ष रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. कामगारांना रु. ३१.५४ लक्ष इतकी रक्कम वेतनापोटी वाटण्यात आली.

सद्यस्थितीत मंडळात १९३२ मालकांची तर ५२३१ कामगारांची नोंद झालेली आहे. सन २०१२–१३ या अहवाल वर्षात ३०% या दराने रु. ४.४६ कोटी रक्कम लेव्हीपोटी जमा झालेली आहे. त्यातून कामगारांना पगारी रजा (रु. २९.९४ लक्ष), सानुग्रह अनुदान (रु. १.१८ कोटी), पगारी सुट्ट्या (रु. १४.९७ लक्ष), भविष्य निर्वाह निधी इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच पगारापोटी रु. १४.८४ कोटी रक्कम वाटण्यात आली.[८९]

अशाप्रकारे सांगली जिल्ह्यातील माथाडी मंडळात सुरुवातीला जरी अडचणी आल्या तरी नंतरच्या काळात मंडळाने चांगले काम केलेले आहे.

### ३.२.२.४ सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

सोलापूर जिल्ह्यात कापड गिरण्यांचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात होता. या व्यवसायासह इतर उद्योग–व्यापारातील माथाडी कामगारांसाठी शासनाने दि. १८ ऑगस्ट १९८८ रोजी माथाडी मंडळाची स्थापना केली.[९०] सुरुवातीला केवळ सोलापूर व बार्शी क्षेत्रापुरतेच हे मंडळ होते. दि. ५.२.१९९० पासून सोलापूर येथे आणि १३.२.१९९० पासून बार्शी येथे प्रत्यक्ष अंमलबाजवणीचे काम सुरु झाले. मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. पी. एन. जाधव सहाय्यक कामगार होते. या मंडळाने दि. १८.८.१९८८ रोजी योजना जाहिर केली.[९१] ही योजना १० प्रकारच्या उद्योगांसाठी लागू आहे.दि. १८ सप्टेंबर १९९२ रोजी ही योजना संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला लागू करण्यात आली. मंडळाने लेव्हीची टक्केवारी २०% ठरविली. पहिल्या आर्थिक वर्षात मंडळाकडे ५३२ मालकांनी नोंद केली. तसेच रु.१.५५ लक्ष इतकी रक्कम लेव्हीपोटी भरली. या रकमेतून मंडळात पहिल्या वर्षी नोंद झालेल्या २३४६ कामगारांना रु. ७.७६ लक्ष इतक्या रकमेचे सणांसाठीच्या पगारा पोटी वाटप करण्यात आले. सुरुवातीच्या काळात मंडळाचे कामकाज सुरु करता यावे व प्रशासकीय खर्च भागविता यावा म्हणून शासनाने मंडळास दि. ३०.९.१९८९ रोजी रु.४६,००० कर्ज १०.२५% व्याजाने दिले.[९२] सदर कर्ज मंडळाने हप्त्याहप्त्याने व्याजासह परत केले. मंडळाने जमा झालेल्या लेव्हीतून नोंद झालेल्या कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, नुकसान भरपाई, भरपगारी रजा, सवेतन सुट्टी, दिवाळी बोहणी इत्यादी लाभ देण्यास सुरुवात केली.

सद्यस्थितीत मंडळात ५६२५ कामगार आणि १९०४ मालकांची नोंद झालेली आहे. तसेच दि. १.११.१९९७ पासून ३०% इतका लेव्हीचा दर ठरविण्यात आला आहे. त्यानुसार सन २०१२–१३ या वर्षात रु. ४.३२ कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. तसेच यावर्षी मजूरीपोटी रु. १४.४३ कोटी इतकी रक्कम वाटण्यात आली. कामगारांचे वेतन बँकेमार्फत ऑन लाईन देण्यात येते. वैद्यकीय सुविधा व प्रसूती लाभ, अपघात विमा, मोठ्या शस्त्रक्रियेसाठी अनुदान, पाल्यांना

शिष्यवृत्ती, क्रिडा क्षेत्रातील कामगिरीसाठी बक्षिस योजना आणि बँकेमार्फत कर्ज पुरवठा इत्यादी इतर लाभ सुध्दा मंडळामार्फत देण्यात येतात.[९३]

अशा प्रकारे सोलापूर जिल्ह्यातील माथाडी कामगारांना या मंडळामार्फत विविध लाभ देण्यात येत आहेत. तसेच मंडळाच्या स्थापनेपासून उत्तरोत्तर यामध्ये वाढच होत आहे.

### ३.२.२.५ सातारा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

सातारा जिल्हा आणि माथाडी कायदा यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. मुंबईत माथाडी काम करणाऱ्या कामगारांपैकी बहुतांश कामगार सातारा जिल्ह्यातील आहेत. तसेच या कायद्याच्या निर्मितीसाठी अविरत कष्ट घेतलेले श्री. अण्णासाहेब पाटील आणि त्यांचे बहुतांश पदाधिकारी व माथाडी कामगार सहकारी हे सातारा जिल्ह्यातीलच होते. मात्र या जिल्ह्यात माथाडी कायद्याची अंमलबजावणी सुरु होण्यास तब्बल २१ वर्षे लागली. सन १९८५–८६ पासून जिल्ह्यातील विविध कामगार संघटनांनी शासनाकडे सातारा जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठी मंडळ स्थापनेची मागणी सुरु केली होती. हरिभाऊ लोखंडे (सातारा), एम. पी. भगत (फलटण), बाळासाहेब बागवान (लोणंद), बापू मगदूम (सांगली), अरुण शेळके (कराड), प्रा. शामराव राऊत (कोरेगाव) या माथाडी कामगार प्रतिनिधींनी शासनाकडे याबाबत सातत्याने पाठपुरावा केला. सहाय्यक कामगार आयुक्त सातारा यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे आधारे शासनाने सातारा जिल्ह्यातील ९ उद्योगांसाठी हा कायदा दि. ९ मे १९८९ पासून लागू केला.तसेच या साठीच्या योजनेचा मसुदाही दि. ९ मे १९८९ रोजी पूर्व प्रकाशित केला. काही सूचना व हरकती असल्यास दि. १० जुलै १९८९ पर्यंत पाठविण्याचे आवाहन केले. त्यावरील सूचना व हरकतींचा विचार करुन शासनाने सदर योजना २५ मार्च १९९१ पासून लागू केली. या योजनेनुसार मंडळाची कार्यपध्दती, कामगारांना द्यावयाचे विविध लाभ आणि त्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली. तसेच त्रिपक्षीय मंडळाची स्थापना देखील दि. २५ मार्च १९९१ रोजी केली. मंडळाने लेव्हीची टक्केवारी २२% इतकी ठरविली. त्यानुसार पहिल्या आर्थिक वर्षात नोंद झालेल्या ८३ मालकांनी लेव्हीची रक्कम मंडळाकडे जमा केली. तसेच नोंद झालेल्या ८०३ कामगारांच्या पगाराची रक्कम वर्षभरात मंडळाकडे भरली.

लेव्हीच्या रकमेतून कामगारांना सणासाठीची भरपगारी रजा, दिवाणी बोहणी, भविष्य निर्वाह निधी, उपदान इत्यादी लाभ देण्यास सुरुवात करण्यात आली.[९४]

अशा प्रकारे पुणे विभागातील पाच जिल्ह्यामध्ये एकूण ७ माथाडी मंडळे कार्यरत आहेत. हे पाचही जिल्हे शेती, उद्योग तसेच सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या प्रगत असल्याने येथील माथाडी कामगार, त्यांच्या संघटना आणि पदाधिकारीही कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सतत सजग असतात. हमाल माथाडींसाठी काम करणारे डॉ. बाबा आढाव आणि हमाल मापाडी महामंडळाचे मुख्यालय पुण्यात आहे. राज्याच्या आतापर्यंतच्या एकूण मुख्यमंत्र्यांपैकी श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. वसंतदादा पाटील, श्री. शरद पवार, श्री. पृथ्वीराज चव्हाण हे मुख्यमंत्री पश्चिम महाराष्ट्रातील आहेत. आद्य माथाडी नेते श्री. अण्णासाहेब पाटील सातारा जिल्ह्यातील होते. तसेच त्यांना राजकीय पाठबळ देणारे नेते देखील पश्चिम महाराष्ट्रातील नेते होत. त्यामुळे मुंबई पाठोपाठ पुणे विभागात या माथाडी अधिनियमांची अंमलबजावणी प्रभावीपणे होवू शकली.

### ३.२.३ नाशिक विभाग :

नाशिक विभागात नाशिकसह धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहमदनगर हे पाच जिल्हे येतात. या विभागाचे महसूली मुख्यालय नाशिक येथे आहे.कांद्याच्या व्यापारासाठी नाशिक जिल्हा प्रसिध्द आहे. नंदुरबार हा आदिवासी जिल्हा आहे. धुळे–जळगाव पट्टा केळीसाठी प्रसिध्द आहे, अहमदनगरचा काही भाग ओलिताखालील असून तेथे साखर कारखाने आहेत तर बराचसा भाग दुष्काळी, कोरडवाहू आहे. या भागात तुलनेने उद्योगांचे प्रमाण कमी आहे.या भागात पहिले माथाडी मंडळ नाशिक जिल्ह्यात १९८८ मध्ये स्थापन झाले. या भागातील मंडळाच्या स्थापनेचा आणि अंमलबजावणीचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

#### ३.२.३.१ नाशिक जिल्हातील माथाडी मंडळे :

नाशिक जिल्ह्यात सुरुवातीला नाशिक माथाडी आणि असंरक्षित मंडळाची स्थापना करण्यात आली. तद्नंतर लासलगाव येथे आणखी एका माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

### ३.२.३.१.१ नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

नाशिक जिल्हा मंडळासाठी श्री. अण्णासाहेब पाटील यांनी त्यांचे माथाडी संघटनेचे वतीने एप्रिल १९८१ मध्ये नाशिक येथे सभा घेवून मार्गदर्शन केले होते.[९५] मुंबई बाहेरील जिल्ह्यात माथाडी मंडळासाठी या संघटनेने अशा प्रकारे प्रथमच मागणी व प्रयत्न करण्याची सुरुवात नाशिक जिल्ह्यापासून केल्याचे आढळून येते. त्यानंतर तब्बल ७ वर्षांनी शासनाने या जिल्ह्यासाठी माथाडी मंडळाची स्थापना केली.

नाशिक जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठीची योजना शासनाने दि. २३ मार्च १९८४ रोजी अंतिमत: प्रकाशित केली आणि या जिल्ह्याला माथाडी कायदा लागू झाला. तसेच या जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठी त्रिपक्षीय मंडळाची स्थापना दि. २८ डिसेंबर १९८८ रोजी करण्यात आली. सुरुवातीला नाशिक जिल्हा माथाडी मंडळ हे एक सदस्यिय मंडळ होते. त्याचे अध्यक्ष श्री. इक्बाल शेख, सहायक कामगार आयुक्त हे होते. दि. २८ डिसेंबर १९८८ रोजी शासनाने कामगार, मालक व शासन प्रतिनिधींचे त्रिपक्षिय मंडळ स्थापन झाल्यावर या मंडळाच्या कामकाजास खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. मंडळाचे प्रशासकीय कामकाजासाठी आणि सुरुवातीचा खर्च भागविण्यासाठी मंडळाने शासनाकडून एकूण रु. ४५,००० कर्ज स्वरुपात मदत घेतली. सन १९८८–८९ या आर्थिक वर्षापासून मंडळाने नोंद झालेल्या मालकांकडून २२% दराने लेव्ही घेण्याचा निर्णय दि. १२ जानेवारी १९८९ च्या बैठकीत घेतला. त्यानुसार सन १९८८–८९ या आर्थिक वर्षात रु. १५९३४६ इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून कामगारांना भरपगारी रजा (रु. १४४३२), सानुग्रह अनुदान (रु. ३६०८) इत्यादी लाभ देण्यात आले.[९६]

सन २००४ पासून मंडळाच्या कामकाजाचे संगणकीकरण झालेले असून माथाडी कामगारांचे वेतन सन १९९४ पासून बँकेमार्फत देण्यात येते.[९७] यामुळे मंडळाच्या कामकाजात सुलभता, सुसुत्रीकरण तसेच पारदर्शकता आलेली आहे. तसेच रोख रक्कम हाताळण्यातील धोकाही कमी झालेला आहे. सद्यस्थितीत मंडळामध्ये मार्च २०१२ अखेर २४७५ कामगार आणि ६३९ मालक नोंद झालेले आहेत. सन २०११–१२ या आर्थिक वर्षात लेव्हीचा दर ३५% होता. त्यानुसार रु. ५.४६

कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून कामगारांना विविध कल्याणकारी व सामाजिक सुरक्षिततेचे लाभ देण्यात आले. या आर्थिक वर्षात रु. १६.२२ कोटी इतकी रक्कम मजूरीपोटी मंडळामार्फत वाटण्यात आली. कृषि उत्पन्न बाजार समितीतील मजूरीवरील लेव्ही कोणी द्यावी याबाबतचा वाद न्यायप्रविष्ठ आहे.[९८] शेतकऱ्यांकडून सदर लेव्ही वसूल करण्यास मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्थगिती दिली आहे, तर मालक किंवा आडते लेव्ही भरण्यास तयार नाहीत. त्यांनी देखील कोर्टात दावा दाखल केला आहे. त्यावर कोर्टाने लेव्हीच्या वसुलीस स्थगिती दिली आहे.

### ३.२.३.१.२ नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव :

नाशिक जिल्ह्यातील लासलगाव आणि परिसरातील कामगार विभागाच्या सर्व्हेक्षणाचे आधारे दि. २४ एप्रिल १९८९ रोजी नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव या आणखी एका माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली.[९९] त्यानुसार या माथाडी मंडळाची कार्यकक्षा मालेगाव व मनमाड नगरपालिका आणि लासलगाव व पिंपळगाव ग्रामपंचायत क्षेत्रापुरती होती. त्यामध्ये दि. १५ सप्टेंबर १९८९ रोजी निफाड, नांदगाव, मालेगाव, सटाणा, कळवण, चांदवड आणि येवला या सात तालुक्यांचा समावेश करण्यात आला.[१००] मंडळाची पहिली बैठक श्री. एम. बी. गजरे, कामगार उपआयुक्त नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दि. १२.१२.१९८९ रोजी झाली. मंडळाने योजनेच्या अंमलबजावणीची सुरुवात दि. २६ जानेवारी १९९० पासून करण्याचा आणि १७% लेव्ही आकारण्याचा निर्णय घेतला. मंडळ स्थापन झाल्यापासून पहिल्या अहवाल वर्षात ५५०० कामगार आणि २९० मालकांनी मंडळात नोंदणी केली. मालकांकडून प्राप्त झालेली रु. ९७००४२ इतकी पगाराची रक्कम कामगारांना पहिल्या वर्षी वाटण्यात आली. तसेच लेव्हीपोटी रु. १,७३,५१९ इतकी रक्कम जमा झाली. सदर रकमेचा विनियोग भविष्य निर्वाह निधी, दिवाळी बोहणी, अपघात नुकसान भरपाई आणि प्रशासकीय खर्च याबाबींसाठी करण्यात आला.[१०१]

सद्यस्थितीत सन २०११–१२ च्या वार्षिक अहवालानुसार मंडळात एकूण १३२४ मालक आणि ५३९० कामगार नोंद झालेले आहेत. सद्यस्थितीत लेव्हीचा दर ३४% असून त्यानुसार रु.

१.५६ कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली आहे. त्यातून कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देण्यात आले. कृषि उत्पन्न बाजार समितीतील व्यापारी व अडत्यांनी लेव्ही देण्यास विरोध करुन न्यायालयात प्रकरण दाखल केले. त्यावर मा.दिवाणी न्यायालय, निफाड यांनी लेव्ही वसुलीस स्थगिती दिल्यामुळे मंडळ आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले आहे. रु. ३.९६ कोटी लेव्हीची रक्कम मंडळास मिळू शकली नाही. या अहवाल वर्षात रु. ११.४९ कोटी इतकी मजूरीची रक्कम माथाडी कामगारांना वाटण्यात आली.[१०२]

अशा प्रकारे नाशिक जिल्ह्यातील दोन्ही माथाडी मंडळे त्यांचे कार्यक्षेत्रातील माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देत आहेत. मात्र मालकवर्ग न्यायालयात गेल्यामुळे लेव्हीच्या वसूलीवर त्याचा विपरित परिणाम झाल्यामुळे माथाडी कामगार लाभापासून वंचित रहात आहेत. न्यायालयाचा निर्णय लवकरात लवकर लागल्यास प्रश्न सुटू शकेल.

### ३.२.३.२ धुळे–नंदुरबार माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

धुळे जिल्ह्यातील माथाडी हमाल कामगारांसाठी माथाडी मंडळाची स्थापना दि. १२ जानेवारी १९८९ रोजी करण्यात आली. मंडळाच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात जानेवारी, १९९४ रोजी झाली. त्यावेळी नंदूरबार हा धुळे जिल्ह्याचाच भाग होता. तद्नंतर दि. ०१ जुलै १९९८ रोजी नंदुरबार जिल्हा वेगळा करण्यात आला असला तरी धुळे–नंदुरबारसाठी एकच माथाडी मंडळ आहे. डॉ. बाबा आढाव यांच्या प्रयत्नामुळे नंदुरबारला माथाडी कायद्याची अंमलबजावणी होण्यास मदत झाली.[१०३] या मंडळासाठीची योजना पूर्वप्रकाशित करण्यात आली आणि नंतर सूचना व हरकतींचा विचार करुन अंतिमरित्या प्रसिध्द करण्यात आली. सन २००८–०९ च्या अहवालानुसार मंडळात २८२९ कामगारांची आणि ७६२ मालकांची नोंद झालेली आहे. तसेच लेव्हीपोटी रु. २५ लक्ष रक्कम जमा झाली. त्यातून कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, सानुग्रह अनुदान, भरपगारी रजा, भरपगारी सुट्टी, अपघात नुकसान भरपाई हे लाभ देण्यात आले.[१०४] नोंद झालेल्या कामगारांसाठी समुहविमा योजना, वैयक्तिक अपघात विमा योजना व जनता अपघात विमा योजना हे लाभ देण्यात

आले आहेत. या मंडळाचे कामकाज धुळे नंदुरबार सारख्या आदिवासी व दुर्गम भागात असूनही मंडळ माथाडी कामगारांना विविध लाभ देण्यास प्रयत्नशील आहे.

### ३.२.३.३ अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

अहमदनगर जिल्ह्यासाठीचे माथाडी मंडळ दि. ४ मे १९९१ रोजी स्थापन करण्यात आले. तसेच मंडळासाठीची योजना देखिल दि. ४ मे १९९१ याच दिवशी जाहिर करण्यात आली. मंडळाची पहिली बैठक श्री. पी. आर. शिंदे, सहायक कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली झाली. मंडळाने २२% दराने लेव्ही घेण्याचा निर्णय दि. २२.७.१९९१ रोजी झालेल्या दुसऱ्या बैठकीत घेतला.त्यानुसार पहिल्या आर्थिक वर्षात रु. ८.१३ लक्ष इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. मंडळाने रकमेचा विनियोग भविष्य निर्वाह निधी (८.३३%), सानुग्रह अनुदान (४.६७%) अपघात नुकासन भरपाई (१%) आणि प्रशासकीय खर्च (४%) या बाबींवर करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या वर्षी ८५० कामगार आणि २८६ मालक मंडळामध्ये नोंद झाले.[१०५]

अहमदनगर जिल्ह्यातील हमाल–माथाडींसाठी श्री. आप्पा कोरपे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी वेळोवेळी मोर्चा, निदर्शने, संप, निवेदने यांचे माध्यमातून काम केलेले आहे.[१०६] अहमदनगरच्या हमाल पंचायतीने हमाल आणि त्यांच्या कुटुंबासाठी स्वतंत्र हॉस्पीटल सुरु केले आहे. यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी रु. १५ लक्ष आर्थिक सहाय्यही दिले. तसेच अहमदनगर जिल्ह्यात हमाल–माथाडी कामगारांनी स्वतंत्र पतपेढी, कष्टाची भाकरी हे उपक्रमदेखील सुरु केलेले आहेत.[१०७]

सन २००९–१० या आर्थिक वर्षात या माथाडी मंडळात रु. १५.३७ कोटी इतकी रक्कम पगार आणि लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून रु. ११.८२ कोटी इतकी रक्कम माथाडी कामगारांना पगारापोटी वाटण्यात आली. उर्वरीत लेव्हीच्या रकमेतून कामगारांना भविष्य निर्वाह निधी, दिवाळी बोहणी, भरपगारी रजा, उपदान, अपघात व आरोग्य विमा या सुविधा देण्यात आल्या.[१०८]

सद्यस्थितीत मंडळात ८३१३ कामगार आणि ७३६ मालक नोंद झालेले आहेत. मंडळाची राष्ट्रीयकृत बँकेत एकूण गुंतवणूक रु. २४.०६ कोटी आहे. लेव्हीचा दर ३२% आहे.[१०९]

### ३.२.३.४ जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

जळगाव जिल्ह्यातील ९ व्यवसायातील माथाडी कामगारांसाठी शासनाने माथाडी मंडळाची योजना दि. २६ मार्च १९९२ रोजी जाहिर केली.[११०] तसेच माथाडी मंडळाची स्थापना देखिल दि. २६ मार्च १९९२ याच दिवशी करण्यात आली.जळगाव जिल्ह्यात योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी दि. १.७.१९९३ पासून सुरु झाली. सर्व प्रथम मेरिको इंडस्ट्रीजमधील कामगारांना माथाडी कायदा लागू करण्यात आला. तद्नंतर वखार महमंडळ, कृषि उत्पन्न बाजार समित्या, इत्यादी कामाचे ठिकाणी हा कायदा लागू करण्यात आला. शासनाने मंडळाचा सुरुवातीचा खर्च भाविण्यासाठी रु. १ लक्ष इतके कर्ज दिले. मंडळाची पहिली बैठक श्री. बी. टी. पाटील, सहायक कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली झाली. मंडळाने २३% लेव्ही लागू करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या आर्थिक अहवाल वर्षात १५४० कामगारांची आणि २०४ मालकांची नोंदणी झाली. पहिल्या वर्षी लेव्हीची व मजूरीची काहीही रक्कम मंडळात जमा झाली नाही. सन १९९३–९४ मध्ये मालकांकडून रु. १०.१३ लक्ष इतकी रक्कम पगारापोटी मंडळामार्फत माथाडी कामगारांना वाटण्यात आली. तर लेव्हीपोटी रु. १०.१३ लक्ष इतकी रक्कम जमा झाली. त्याचा वापर भविष्य निर्वाह निधी (८.३३%), भरपगारी रजा (१%), सानुग्रह अनुदान (४%), अपघात नुकसान भरपाई (१.५%) आणि प्रशासकीय खर्च (४%) या बाबींसाठी करण्यात आला.[१११]

सन २००७–०८ या आर्थिक वर्षाअखेर माथाडी मंडळात ५७३ मालक आणि २६५९ कामगारांची नोंद झाली. रु.४ कोटी इतकी रक्कम कामगारांना मजूरीपोटी वाटण्यात आली. तसेच रु. १ कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. त्यातून कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, उपदान, आरोग्य व आयुर्विमा, दिवाळी बोहणी, भरपगारी रजा इत्यादी लाभ देण्यात आले.[११२]

सद्यस्थितीत मंडळात ३४६ मालक आणि १७११ कामगार नोंद झालेले आहेत. लेव्हीची टक्केवारी ३०% आहे. सन २०१२–१३ मध्ये रु. ४.४८ कोटी मजूरीपोटी आणि रु. १.३५ कोटी लेव्हीपोटी जमा झालेले आहेत. सन २०११–१२ मध्ये हीच रक्कम अनुक्रमे ४.७२ कोटी आणि रु. १.४७ कोटी होती.[११३]

अशा प्रकारे मंडळामध्ये सन २००७–०८ च्या तुलनेत कामगारांची व मालकांची संख्या कमी झालेली आहे. तसेच लेव्ही व मजूरीची रक्कम देखील सन २०११–१२ च्या तुलनेत कमी जमा झालेली आहे. मंडळाने सतत प्रगतशील राहण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष व सचिव यांनी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची आवश्यकता वाटते.

अशा प्रकारे नाशिक विभागातील ५ जिल्ह्यांसाठी ५ माथाडी मंडळे कार्यरत आहेत. यापैकी नाशिक जिल्ह्यात २ मंडळे आहेत, तर धुळे आणि नंदुरबार या दोन जिल्ह्यांसाठी एकच मंडळ आहे. धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात उद्योगधंद्यांची संख्या तुलनेने कमी असल्यामुळे साहजिकच माथाडी कामगारांचीही संख्या तुलनेने कमी आहे. त्यामुळे आहे त्या उद्योगधंद्यावर जास्तीत जास्त लक्ष केंद्रीत करुन लेव्हीच्या वसूलीत वाढ करणे गरजेचे आहे.

### ३.२.४ औरंगाबाद विभाग :

औरंगाबाद विभागात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, उस्मानाबाद, नांदेड, लातूर या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. औरंगाबाद जिल्हा वगळता इतरत्र उद्योगांचे प्रमाण कमी आहे. मात्र कापूस पिकाचे प्रमाण या विभागात जास्त आहे. बीड, उस्मानाबाद जिल्ह्यात ऊस तोडणी करणाऱ्या स्थलांतरीत कामगारांचे प्रमाण मोठे आहे.

#### ३.२.४.१ जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

जालना जिल्ह्यातील कामगारांसाठी माथाडी मंडळाची स्थापना दि. १९ जुलै १९८८ रोजी करण्यात आली. मंडळासाठीची योजना देखील दि. १९ जुलै १९८८ रोजी जाहिर करण्यात आली. मंडळाचे पहिले अध्यक्ष म्हणुन श्री. पी. बी. बने, कामगार उपआयुक्त यांची नेमणूक करण्यात आली. मंडळाने ३०% दराने लेव्ही जमा करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील ५५७ कामगार आणि २१२ मालकांची नोंद झाली. मात्र लेव्हीपोटी काहीही रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे कामगारांना कोणतेच कल्याणकारी लाभ देता आले नाही. सदर मंडळ जागे अभावी आणि आर्थिक मदती अभावी सुरुवातीला लगेचच कामकाज सुरु करु शकले नाही. मंडळाला सुरुवातीचा प्रशासकीय खर्च भागवता यावा म्हणुन शासनाने दि. १८ फेब्रुवारी १९८९ रोजी

रु.४०,४४४ कर्ज द.सा.द.शे. १०.२५% दराने दिले. तसेच सरकारी कामगार अधिकारी, जालना यांचे कार्यालयातील काही जागा मंडळास तात्पुरत्या स्वरुपात मिळाली. सुरुवातीला मालकांनी नोंदणीस प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले.[११४]

सुरुवातीला मंडळाचे कार्यक्षेत्र केवळ जालना नगरपालिका हद्दीपर्यंतच होते. दि.२० फेब्रुवारी २००४ च्या अधिसुचनेने ते संपूर्ण जालना जिल्हा करण्यात आले. आता लेव्हीचा दर ३०% असून सन २०११–१२ या आर्थिक वर्षात रु. १.३१ कोटी इतकी लेव्ही ५१३ मालकांकडून जमा झाली. त्यातून भविष्य निर्वाह निधी, उपदान, अपघात नुकसान भरपाई, दिवाळी बोहणी, पगारी सुट्ट्या इत्यादी लाभ २५१४ माथाडी कामगारांना देण्यात आले. तसेच या वर्षात रु. ३.९४ कोटी इतकी रक्कम मजूरीपोटी वाटण्यात आली. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून कामगारांची विमा पॉलिसी काढण्यात आली आहे.[११५]

अशा प्रकारे औरंगाबाद विभागात प्रथम जालना जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठी मंडळ स्थापन करण्यात आले. या मंडळाच्या माध्यमातून मराठवाड्यातील माथाडी कामगारांना विविध कल्याणकारी लाभ मिळण्यास सुरुवात झाली.

### ३.२.४.२ लातूर–उस्मानाबाद जिल्हा असंरक्षित कामगार मंडळ :

लातूर–उस्मानाबाद माथाडी मंडळासाठीची योजना शासनाने दि. १ सप्टेंबर १९९० रोजी जाहिर केली.[११६] या योजनेचा मसुदा दि. २३.१.१९८९ रोजी पूर्व प्रकाशित करण्यात आला होता. त्यानुसार ही योजना प्रथम लातूर जिल्ह्यास लागू करण्यात आली. त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्याचा समावेश शासन अधिसूचना दि. १३.२.२००४ नुसार करुन मंडळाची व्याप्ती लातूर व उस्मानाबाद दोन्ही जिल्ह्यांसाठी लागू करण्यात आली.[११७] मंडळाचा सुरुवातीचा लेव्हीचा दर १३% होता. आता तो ३०% आहे. या माथाडी मंडळाची स्थापना दि. १ सप्टेंबर १९९० रोजी करण्यात आली.[११८] पहिल्या आर्थिक वर्षात मंडळामध्ये ११७३ कामगारांनी आणि २९३ मालकांनी नोंदणी केली. पहिल्या वर्षात मंडळाकडे लेव्हीची रक्कम जमा होवू शकली नाही व त्यामुळे मंडळाला रु. १६८७० इतका तोटा झाला. त्यापुढील वर्षी मात्र मंडळ रु. ३३८७० इतक्या नफ्यात होते. या वर्षीच्या

लेव्हीचा वापर भविष्य निर्वाह निधी, भरपगारी रजा, सानुग्रह अनुदान, अपघात नुकसान भरपाई प्रशासकीय खर्च या बाबीसाठी करण्यात आला. सद्यस्थितीत दोन्ही जिल्ह्यात मिळून २५२८ मालक आणि १३४३८ कामगार आहेत. यापैकी उस्मानाबाद जिल्ह्यामधील २३८ मालक आणि १३३३ कामगार आहेत. त्यामुळे ही मालक व कामगारांची कमी संख्या पाहता उस्मानाबाद जिल्ह्यासाठी स्वतंत्र मंडळ आर्थिकदृष्ट्या सक्षम ठरु शकणार नाही हे स्पष्ट होते. सन २०१२–१३ या आर्थिक वर्षात रु. २७.१७ लक्ष लेव्हीची रक्कम जमा झाली. तर मजूरीपोटी रु. ७६.८६ लक्ष कामगारांना वाटण्यात आले. मंडळातील कामगारांना बागडे हॉस्पीटलच्या माध्यमातून वैद्यकीय सुविधा देण्यात येते. स्त्री कामगारांना दोन बाळंतपणासाठी रु. १००० वैद्यकीय मदत देण्यात येते. न्यू इंडिया इन्श्युरन्स कंपनीमार्फत कामगारांचा विमा उतरवलेला आहे. दुखापत झाल्यास कामगारांना रु. ५०० तातडीची आर्थिक मदत देण्यात येते.[११९] सदर रक्कम वाढविणे आवश्यक वाटते. तसेच दोन्ही जिल्ह्यासाठी एकच हॉस्पीटल आहे; त्याऐवजी दोन्ही जिल्हा मुख्यालयाचे ठिकाणी स्वतंत्र दवाखाने प्राथमिक उपचारासाठी आवश्यक आहेत.

### ३.२.४.३ नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

नांदेड जिल्ह्यासाठी माथाडी मंडळ दि. १ ऑगस्ट १९९२ रोजी स्थापन करण्यात आले तसेच याच दिवशी या माथाडी मंडळासाठीची योजना जाहिर करण्यात आली.[१२०] त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील ९ उद्योग धंद्यामधील कामगारांसाठी माथाडी कायदा लागू करण्यात आला. सन १९९२–९३ या पहिल्या आर्थिक वर्षात मालकांनी लेव्हीपोटी रु. ५.०९ लक्ष इतकी रक्कम मंडळात भरली. त्यातून कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, भरपगारी रजा, वैद्यकिय सुविधा इत्यादी लाभ देण्यास सुरुवात झाली. तसेच रु. ५.०९ लक्ष इतकी रक्कम त्यांनी केलेल्या मजुरीपोटी पहिल्या वर्षी मंडळामार्फत वाटण्यात आली.[१२१]

सद्यस्थितीत नांदेड माथाडी मंडळाचा लेव्हीचा दर २७% आहे. त्यातून माथाडी कामगारांना भविष्य निर्वाह निधी (१०% सानग्रह अनुदान (६%) उपदान (४%), अपघात नुकसान भरपाई (१%) भरपगारी रजा (१%) हे लाभ देण्यात येतात. सन २००८–०९ या आर्थिक वर्षात रु.

६३.५५ लक्ष इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. तर रु. २.२४ कोटी इतकी रक्कम माथाडी कामगारांना मजूरीपोटी वाटण्यात आली.[१२२]

### ३.२.४.४ औरंगाबाद माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ :

मराठवाड्यातील औरंगाबाद हा जिल्हा महसूली विभागाचे मुख्यालय असूनही तेथे माथाडी कायदा झाल्यापासून २३ वर्षांनी माथाडी मंडळाची स्थापना करण्यात आली. औरंगाबाद जिल्ह्यासाठी माथाडी मंडळाची स्थापना दि. १९ ऑगस्ट १९९२ रोजी करण्यात आली. या मंडळासाठीची योजना देखील दि. १९ ऑगस्ट १९९२ रोजी जाहिर करण्यात आली. मात्र मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज दि. १.४.१९९४ पासून सुरु झाले. मंडळ स्थापनेच्या पहिल्या वर्षात ६१८ कामगारांनी आणि १२४ मालकांनी नोंदणी केली. मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. ब. दा. राठोड, कामगार उपआयुक्त होते. दि. ९.९.१९९२ च्या बैठकीत मंडळाने सुरुवातीच्या खर्चासाठी निधी मिळावा म्हणून शासनाकडे रु. १ लक्षचा कर्ज प्रस्ताव पाठविण्याचा ठराव केला आणि दि. २९.३.१९९३ च्या बैठकीत तूर्त मजूरीची रक्कम वसूल न करता केवळ लेव्ही वसूल करावी असा निर्णय घेण्यात आला.[१२३]

सन २०१०–११ या आर्थिक वर्षात ५२५ मालक आणि ६२३२ कामगारांची मंडळात नोंद होती. तसेच लेव्हीचा दर २५% होता. त्यानुसार रु. २.९१ कोटी इतकी रक्कम लेव्हीपोटी मंडळाकडे जमा झाली. त्यातून भविष्य निर्वाहनिधी, उपदान, रजेचा पगार, दिवाळी बोहणी, नुकसान भरपाई इ. लाभ कामगारांना देण्यात आले. तसेच या अहवाल वर्षात रु. ९.४८ कोटी इतकी रक्कम कामगारांना मजूरीपोटी वाटण्यात आली. या कामगारांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेमार्फत वाटप केले जाते. तसेच मंडळाचे कामकाजाचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे. अपघात सुरक्षित विमा योजनेअंतर्गत कामगारांची विमा पॉलिसी काढण्यात आलेली आहे. माथाडी कायद्यातील तरतूदींचे पालन न करणाऱ्या १४ मालकांविरुध्द कामगार न्यायालयात खटले दाखल केलेले आहेत.[१२४]

सद्यस्थितीत या मंडळात डिसेंबर २०१३ अखेर ७३३ मालक व ७१३६ कामगारांची नोंद आहे. अशा प्रकारे सदर मंडळाच्या नोंदणी व आर्थिक उलाढालीत वाढ होत आहे आणि त्याचा लाभ जास्तीत जास्त कामगारांना होत असल्याचे दिसून येते.

### ३.२.४.५ परभणी–हिंगोली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

परभणी जिल्ह्यातील कामगारांसाठी माथाडी मंडळाची स्थापना दि. ३.२.२००४ रोजी करण्यात आली आणि मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज दि. ५.११.२००४ पासून सुरु झाले हिंगोली हा पूर्वी परभणी जिल्ह्याचाच भाग होता. दि. १ मे १९९९ रोजी हिंगोली हा वेगळा जिल्हा स्थापन करण्यात आला. तसेच दोन्ही जिल्ह्यातील कामगार व मालकांची संख्या लक्षात घेवून परभणी व हिंगोली जिल्ह्यासाठी एकच माथाडी मंडळ आहे. सद्यस्थितीत मंडळात १३८३ कामगार आणि ६८ मालकांनी नोंदणी केली आहे. या जिल्ह्यातील वखार महामंडळ, बियाणे महामंडळ, सर्व शासकिय तहसिल गोदाम, भारतीय कपास निगम, कापूस उत्पादक पणन महासंघ हे अंमलबजावणीचे क्षेत्र आहे. लेव्हीची टक्केवारी ३०% असून त्यामधून नोंद झालेल्या कामगारांना भविष्य निर्वाह निधी (१२%) दिवाळी बोहणी (७%) उपदान (३%), विमा संरक्षण (१%) हे लाभ दिले जातात.[१२५]

### ३.२.४.६ बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

बीड जिल्ह्यासाठी माथाडी योजना दि. १४ मार्च १९९६ रोजी जाहिर करण्यात आली.[१२६] जिल्ह्यातील उद्योग व्यवसायामधील माथाडी कामगारांसाठी ही योजना लागू करण्यात आली. मालक आणि कामगारांची नोंदणी दि. १४ एप्रिल १९९६ पासुन सुरु करण्यात आली आणि कामगारांना विविध लाभ दि. १४ मे १९९६ पासुन देण्यास सुरुवात झाली. तसेच दि. १४.३.१९९६ रोजीच माथाडी मंडळाची स्थापना देखील करण्यात आली.[१२७]मंडळाचे पहिले अध्यक्ष श्री. जी. व्ही. कामडी, सहायक कामगार आयुक्त होते. मंडळाचे कामकाजास प्रत्यक्ष सुरुवात फेब्रुवारी १९९८ मध्ये झाली. पहिल्या वर्षात मंडळामध्ये सर्व मार्गांनी मिळालेली रक्कम रु. १०,९१२ इतकीच होती. त्यातून देखील कामगारांना दिवाळी बोहणी, उपदान, भविष्य निर्वाह निधी, विमा, भरपगारी रजा इत्यादी लाभ देण्यास सुरुवात करण्यात आली. सुरुवातीच्या खर्चासाठी स्वत: मंडळाचे अध्यक्षांनी रु.

३५०० इतकी रक्कम मंडळास कर्जावू देऊ केली होती.[१२८] बीड जिल्ह्यातील शासकीय गोदामातील माथाडी–हमालांची मंडळात नोंदणी होवून त्यांना माथाडी कायद्याचे संरक्षण मिळावे तसचे योग्य मजूरीदर मिळण्यासाठी श्री. राजकुमार घायाळ वारंवार पाठपुरावा केलेला आहे. यासाठी त्यांनी अन्न व नागरी विभागाचे मा. मंत्री, विभागाचे सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा पुरवठा अधिकारी या सर्व स्तरावर वारंपवार पाठपुरावा केलेला आहे. त्यामुळे या कामगारांना आता काही प्रमाणात संरक्षण मिळालेले आहे.

सद्यस्थितीत या माथाडी मंडळात २१८६ कामगार आणि ३४९ मालकांची नोंद झालेली आहे. लेव्हीचा दर ३०% आहे. यातून कामगारांना भविष्य निर्वाह निधी (१२%), उपदान (३%), दिवाळी बोहणी (८७%), पगारी रजा (१%), विमा (१%) हे लाभ देण्यात येतात. तसेच माथाडी कामगारांसाठी जनता व्यक्तीगत दुर्घटना विमा पॉलिसी, रस्ता सुरक्षा अपघात विमा पॉलिसी आणि जनश्री आयुर्विमा पॉलिसी यांचा लाभ देण्यात येत आहे. माथाडी कायद्याचे पालन न करणाऱ्या एकूण २५ मालकांविरुध्द खटले दाखल केलेले असून त्या पैकी १५ प्रकरणी मालकांना दोषी ठरवून दंड झालेला आहे. १० खटले प्रलंबित आहेत.[१२९]

अशा प्रकारे औरंगाबाद विभागातील ८ जिल्ह्यांमध्ये एकूण ६ माथाडी मंडळे कार्यरत आहेत. ही सर्व मंडळे १९८८ नंतर स्थापन करण्यात आली आहेत. परभणी–हिंगोली आणि लातूर–उस्मानाबाद या जिल्ह्यांसाठी दोन जिल्हे मिळून एक मंडळ आहे. या मंडळामार्फत या विभागातील माथाडी व इतर असंरक्षित कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, भरपगारी रजा इत्यादी कल्याणकारी लाभ तसेच नियमित रोजगार व योग्य मजूरी मिळत आहे. या कामी हमाल मापाडी महामंडळाचे श्री. राजकुमार घायाळ, बीड यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

### ३.२.५. अमरावती विभाग :

अमरावती महसूली विभागात अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम, बुलढाणा, या ५ जिल्ह्यांचा समावेश होतो. अमरावती विभागात जंगल आणि कोळसा खाणीचे प्रमाण अधिक आहे.

तसेच कापूस, डाळी इ. पिकांचे प्रमाणही जास्त आहे. या विभागातील यवतमाळ जिल्ह्यात आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तसेच मेळघाट सारखा दुर्गम आदिवासी भागही याच विभागात आहे. या विभागातील माथाडी मंडळाच्या स्थापनेचा आणि कामकाजाचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

### ३.२.५.१ अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ :

अमरावती जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठीची योजना शासनाने दि. ११ जानेवारी १९९१ रोजी जाहिर केली.[१३०] मात्र योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी ऑक्टोबर १९९५ पासून सुरु झाली. मालकांचे सुरुवातीच्या काळातील असहकाराचे धोरण आणि याबाबतच्या न्यायालयीन दाव्यांमुळे हा विलंब लागला. मंडळाची स्थापना दि. ११.१.१९९१ रोजी झाली. यासाठी श्री. जनक कडू व त्यांचे सहकाऱ्यांनी सतत प्रयत्न केले.[१३१] मंडळ स्थापन झाल्यानंतर सन १९९१–९२ ते १९९४–९५ या पहिल्या अहवाल कालावधीत ११३९ कामगारांनी आणि १० मालकांनी नोंदणी केली. तसेच या मालकांनी रु. १ लक्ष इतकी रक्कम ३०% दराने लेव्हीपोटी मंडळाकडे जमा केली. मंडळाला सुरुवातीच्या काळात आस्थापना तसेच प्रशासकीय खर्च भागविणे शक्य व्हावे म्हणून शासनाने रु. ५०००० कर्ज दिले. या प्रथम अहवाल काळात मंडळाने कामगारांना मजूरी वाटप केल्याची अथवा कल्याणकारी लाभ दिल्याची नोंद अहवालात नाही.[१३२]

सन २००९–१० या आर्थिक वर्षात मंडळात ३६४२ कामगारांची आणि ५२४ मालकांची नोंद झालेली होती. या कालावधीत मालकांनी ३०% प्रमाणे रु. ४.४० कोटी लेव्ही जमा केली.त्यातून कामगारांना भविष्य निर्वाह निधी, उपदान, सानुग्रह अनुदान व पगारी रजा, वैद्यकीय सुविधा इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच नोंद झालेल्या कामगारांना जनश्री विमा योजना आणि आम आदमी विमा योजनेचा लाभ देण्यात आला. या कालावधीत रु. ४.४१ कोटी इतकी मजूरीची रक्कम वाटण्यात आली.[१३३]

सद्यस्थितीत मंडळात ४१३० माथाडी कामगार आणि ५४९ मालकांची नोंदणी करण्यात आलेली आहे. सन २०१२–१३ या वर्षात ६.६६ कोटी रक्कम वेतनापोटी वाटण्यात आली. एकूण ३० प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आली होती, त्यापैकी केवळ १ प्रकरण प्रलंबित आहे.

अशा प्रकारे सुरुवातीच्या काळात अडचणी येवूनही अमरावती माथाडी मंडळाने पुढील कालावधीत चांगली प्रगती केली आहे.

### ३.२.५.२ अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ अकोला :

अकोला या जिल्ह्यातील माथाडी मंडळासाठीची योजना शासनाने दि.२१.१.१९९१ रोजी जाहिर केली.[१३४] त्यानुसार केवळ अकोला जिल्ह्यातील एकूण ७ उद्योगातील माथाडी कामगारांना ही योजना लागू होती. तद्नंतर वाशिम जिल्ह्याचा या मंडळात समावेश करण्यासाठी दि. १.८.२००२ रोजी मसूदा अधिसूचना काढण्यात आली. सदर मसूदा अंतिम करताना त्यात बुलढाणा जिल्ह्याचा ही समावेश करुन दि. १२.११.२००३ रोजी अंतिम अधिसूचना काढण्यात आली.[१३५] अशा प्रकारे अकोला, वाशिम आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांसाठी एकच माथाडी मंडळ आहे. या मंडळाचे मुख्यालय अकोला येथे आहे.

अकोला जिल्हा माथाडी मंडळाची स्थापना दि. २१ जानेवारी १९९१ रोजी करण्यात आली व प्रत्यक्ष कामकाजास दि. १.५.१९९१ पासून सुरुवात झाली. लेव्हीचा दर १८% ठरविण्यात आला. त्यानुसार नोंद झालेल्या मालकांकडून सन १९९१–९२ या वर्षात रु. ५९,३६८ इतकी रक्कम लेव्हीपोटी जमा झाली. यातून नोंद झालेल्या १२३ कामगारांना भविष्य निर्वाह निधी, सानुग्रह अनुदान, वैद्यकीय सुविधा, सवेतन सुट्ट्या इत्यादी लाभ देण्यात आले. तसेच रु. २.५४ लक्ष इतकी रक्कम मजूरीपोटी वाटण्यात आली. मंडळातील माथाडी कामगारांना उपचार घेता यावेत म्हणून डॉ. सुशिल अग्रवाल यांना मानवसेवी वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमण्यात आले.[१३६] अशाप्रकारे अकोला जिल्ह्यातील कामगारांना प्रथमच विविध कल्याणकारी लाभ आणि वैद्यकीय सुविधा देण्यात आली.

सन २००८–०९ या आर्थिक वर्षात ६१४ मालक आणि २९०० कामगारांची मंडळात नोंद झाली होती. यावर्षी रु. ७७.८३ लक्ष इतकी रक्कम २५% दराने लेव्ही पोटी जमा झाली.[१३७]

सद्यस्थितीत या मंडळात १००२ मालक व ४०१६ कामगार नोंद आहेत आणि लेव्हीची टक्केवारी ३०% आहे. मा. कामगार न्यायालय, अकोला येथे १२२ प्रकरणे न्याय प्रविष्ठ आहेत. अशा प्रकारे सदर मंडळाचे कार्यक्षेत्र ३ जिल्ह्यात पसरलेले असूनही उपलब्ध कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून तसेच मालकांच्या असहकार्यामुळे अनेक प्रकरणे न्यायालयीन असतानाही मंडळाने कामकाजात चांगली प्रगती केलेली आहे.[१३८] माथाडी कामगारांना जास्तीत जास्त लाभ देण्याचे प्रयत्न मंडळामार्फत करण्यात येत आहेत.

### ३.२.५.३ यवतमाळ असंरक्षित आणि माथाडी मंडळ यवतमाळ :

यवतमाळ जिल्ह्यातील माथाडी कामगारांसाठीची योजना दि. ३ मे २००६ रोजी प्रसिध्द करुन लागू करण्यात आली आहे.[१३९] मात्र बराच कालावधी उलटून गेला तरी शासनाने या जिल्ह्यासाठी माथाडी मंडळाची स्थापना केली नव्हती. आता पत्र दि.१८.२.२०१४ अन्वये माथाडी मंडळासाठी सचिवाची नेमणूक केलेली आहे.[१४०] मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्री. रा. भा. जाधव, सहायक कामगार आयुक्त यांची नेमणूक शासनाने केली आहे. मात्र मंडळाला कोणत्याही पायाभूत सुविधा नाहीत, कार्यालय नाही, कर्मचारी नाहीत. सहायक कामगार आयुक्तांच्या कर्मचाऱ्यांमार्फतच कामकाजाला सुरुवात करण्यात आलेली आहे. अद्याप एकही कामगार अथवा मालकांची मंडळात नोंद झालेली नाही. वास्तविक यवतमाळ हा महाराष्ट्रातील सर्वाधिक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा जिल्हा आहे. तरी देखील राज्यात सर्वात शेवटी आणि कायदा झाल्यानंतर तब्बल ४५ वर्षांनी या जिल्ह्यात माथाडी मंडळाची स्थापना केलेली आहे.

अशा प्रकारे अमरावती विभागातील ५ जिल्ह्यांसाठी ३ मंडळे आहेत. अकोला–वाशिम–बुलढाणा हे तीन जिल्हे मिळून एक मंडळ आहे तर यवतमाळसाठीचे मंडळ अद्याप पूर्णपणे

कार्यान्वित झालेले नाही. एकूणच अमरावती विभागात माथाडी कायद्याची अंमलबजावणी समाधानकारक दिसून येत नाही.

### ३.२.६ नागपूर विभाग :

नागपूर ही राज्याची उपराजधानी आहे. माथाडी कायदा विधानमंडळाच्या मंजूरीसाठी सर्व प्रथम दि. २६ डिसेंबर १९६८ रोजी नापूर येथील अधिवेशनातच मांडण्यात आला होता. त्यामुळे माथाडी कायदा आणि नागपूर यांचे संबंध अत्यंत जवळचे आहेत. नागपूर जिल्हा संत्र्यांसाठी प्रसिध्द असून महाराष्ट्रातील सर्वात जास्त जंगल क्षेत्र याच महसूली भागात आहे. गडचिरोली जिल्ह्यात ७४% जंगल व्याप्त क्षेत्र आहे, तसेच चंद्रपूर परिसरात कोळसा खाणी व औष्णिक विद्युत केंद्र आहे. या विभागातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया हे नक्षलग्रस्त जिल्हे आहेत. या भागातील माथाडी मंडळाच्या स्थापनेचा व अंमलबजावणीचा मागोवा पुढीलप्रमाणे घेता येईल.

#### ३.२.६.१ नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर :

नागपूर जिल्ह्यासाठी माथाडी मंडळाची योजना शासनाने दि.२९ मार्च १९७४ रोजी जाहिर केली. तथापि स्थानिक व्यापारी कोर्टात गेल्यामुळे सन १९९१ पर्यंत माथाडी कायद्याची अंमलबजावणी नागपूरमध्ये होवू शकली नाही. डॉ. हरीश धुरट व इतरांनी ठेकेदारांची दादागिरी व कोर्ट केस यांना तोंड देत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत कायदा लवकरात लवकर लागू करण्यासाठी सतत प्रयत्न केले. यामुळे सन १९९१ पासून नागपूर जिल्ह्यात माथाडी कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली.[१४१] नागपूर येथे या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सतत संघर्ष सुरु आहे. हरिहर मंदिर पसिरातला बाजार कळमणा येथे गेल्यामुळे माथाडी कामगारांना कायद्याचा लाभ मिळणे बंद झाले. कृषि उत्पन्न समित्यांमधील मातेरंवाली (धान्यातील घाण साफ करणारी), हारेवाली (पाटीमधून माल वाहणारी), पाणीवाली इत्यादी कामे करणाऱ्या महिला कामगारांना कायद्याचा लाभ मिळवून देण्यासाठी सतत संघर्ष सुरु आहे. सावनेरच्या बाजारातील महिला महार समाजाच्या असल्यामुळे त्यांना काम देणे बंद केले होते. यावर श्री. हरीश धुरट व इतरांनी ५ दिवस

बाजार बंद ठेवल्यावर या महिला कामगारांना परवाना व पूर्ववत काम मिळाले. बाल विकास प्रकल्प, बँकेमार्फत वेतन, व्यसनमुक्ती यासारखे उपक्रम देखील नागपूरमधील माथाडी कामगारांसाठी राबविण्यात आले.[१४२] वर्धा जिल्हा नागपूरला लागूनच असल्यामुळे वर्धा जिल्ह्याचा समावेश दि.२३.१२.२००३ रोजी या मंडळात करण्यात आला आहे.[१४३]

कृषि उत्पन्न बाजार समिती, पंडित जवाहरलाल नेहरु मार्केट यार्ड, नागपूर येथे योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी सन १९९१ पासून प्रयत्न सुरु आहेत. यासाठी मा.मंत्री (कामगार) यांचेसह विविध स्तरावर बैठका घेण्यात आल्या. नागपूर जिल्ह्यात १९५ मालकांविरुध्द खटले भरण्यात आले. ४६ खटले निकाली निघाले. त्यापैकी ३५ खटल्यामध्ये रु. ५०० प्रत्येकी दंड व कोर्ट उठेपर्यंत सजा, ७ खटल्यात प्रत्येकी रु. ३० दंड व ४ खटल्यात रु. २०० इतका प्रत्येकी दंड न्यायालयाने व्यापाऱ्यांना ठोठावला आहे.

सद्यस्थितीत या मंडळात १८३० मालक आणि ७८७९ कामगार नोंद झालेले आहेत. तसेच लेव्हीचा दर ३० % आहे. सन २०११, २०१२ आणि २०१३ अखेर मंडळामार्फत अनुक्रमे रु. २९.३४ कोटी, ३५.४० कोटी आणि ४२.६९ कोटी इतकी रक्कम मजूरीपोटी वाटण्यात आली आहे तर लेव्हीची रक्कम रु. ६६.४७ लक्ष व ८९.४९ लक्ष आणि १.३९ कोटी इतकी आहे. यातून कामगारांना विविध कल्याणकारी लाभ देण्यात आले आहेत.[१४४] नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी मंडळ सातत्याने प्रगती करत असल्याचे दिसून येते.

**३.२.६.२ भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ :**

सन १९९९ पूर्वी भंडारा हा एकच जिल्हा होता. त्याचे विभाजन होवून भंडारा व गोंदिया हे दोन जिल्हे झाले. या जिल्ह्यातील माथाडी मंडळासाठीची योजना दि.५.२.२००४ रोजी जाहिर करण्यात आली.[१४५] त्यानुसार या दोन्ही जिल्ह्यातील एकूण ११ व्यवसायातील कामगारांना ही योजना लागू करण्यात आली. तसेच माथाडी मंडळ दि. ५.२.२००४ रोजी स्थापन करण्यात आले. मात्र मंडळाचे प्रत्यक्ष कामकाज दि. ४.८.२००४ पासून सुरु झाले. पहिल्या वर्षी १०४ कामगारांनी आणि ६ मालकांनी मंडळात नोंद केली. तसेच ३५% दराने मालकांनी लेव्हीपोटी ७५,३०७ आणि

कामगारांच्या पगारापोटी ३.२१ लक्ष इतकी रक्कम मंडळात भरली. या रकमेतून नोंद झालेल्या माथाडी कामगारांना भरपगारी रजा, सानुग्रह अनुदान इत्यादी लाभ देण्यास सुरुवात झाली.[१४६] सद्यस्थितीत मंडळात १६ मालक व ११३९ कामगार नोंद झालेले आहेत. यापैकी कार्यरत कामगार केवळ ४२६ आहेत. हे कामगार बहुतांश शासकीय अथवा निमशासकीय आस्थापनातील आहेत. दरमहा रु ४ लक्ष लेव्ही मंडळाकडे जमा होते.[१४७]सदर भाग बहुतांश जंगलव्याप्त आहे. काही नक्षलग्रस्त आहे. तसेच मंडळाकडे स्वत:चा कर्मचारी वृंद नाही, तरीदेखील सहायक कामगार आयुक्ताच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या मदतीने मंडळाचे कामकाजाची हळूहळू प्रगती सुरु आहे.

### ३.२.६.३ चंद्रपूर–गडचिरोली माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ :

चंद्रपूर–गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये ७०% पेक्षा जास्त जंगलांचे प्रमाण आहे. त्यामुळे आधूनिक उद्योगधंद्यांचे प्रमाण देखील कमी आहे. सद्यस्थितीत चंद्रपूर व गडचिरोली माथाडी मंडळामध्ये २३ इतके मालक नोंदीत असून १२४८ इतके कामगार नोंद झालेले आहेत. या कामगारांना या मंडळाच्या माध्यमातून विविध कल्याणकारी लाभ देण्यात येतात.[१४८.]

अशाप्रकारे विदर्भातील सदर माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीस उशिराने सुरुवात झाली. विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यामध्ये मिळून सहा माथाडी मंडळे स्थापन करण्यात आली आहेत. राज्यातील शेवटच्या जिल्ह्यासाठीचे म्हणजेच यवतमाळ जिल्ह्यासाठी नुकतेच मंडळ स्थापन झालेले आहे. विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. त्यामुळे विदर्भात सर्वत्र माथाडी कायद्याची विस्तृत स्वरुपात अंमलबजावणी केली तर काही प्रमाणात चांगला रोजगार व आर्थिक उपलब्धता होवून आत्महत्येचे प्रमाण कमी होवू शकेल. तसेच गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यात जंगलाचे प्रमाण जास्त असल्यामुळे जंगलातील वन व पिके गोळा करणे, तेंदूपत्ता, बांबू कटाई या सारख्या उद्योगांचाही माथाडी कायद्यात समावेश केल्यास येथील आदिवासींची प्रगती होण्यास मदत होईल.

# संदर्भ सूची

१. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, पृ. १.

२. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग–IV दि. १३ जून १९६९.

३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानसभा इतिवृत्त पृ. क्र. ४१९, ४२१, ४२३, ४२५ दि. २५ मार्च १९६९ आणि विधान परिषद इतिवृत्त दि. १ एप्रिल १९६९ पृ.क्र. ४४५ ते ४५०.

४. पवार तुषार, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान परिषद इतिवृत्त दि. १ एप्रिल १९६९ पृ. ४५३.

५. पाटील अण्णासाहेब (संस्थापक, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी कामगार संघटना), माथाडी मित्र पाक्षिक, ॲड. काशिनाथ वळवईकर (संपादक) दि. २३ मार्च १९८३, पृ. क्र. ३. (पुनर्मुद्रित–किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई, पाऊण तपपूर्ती १९७९ समारंभाचे वेळी प्रकाशित स्मरणिकामधून)

६. पाटील व्ही. पी., दि ग्रेट माथाडी अण्णासाहेब पाटील, जय जगदिश प्रकाशन (कराड), सातारा, प्रथम आवृत्ती, सप्टेंबर १९९८, पृ. क्र. ७३.

७. रामिष्टे बाबुराव हरी, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, माथाडी कामगार संघटना–रौप्य महोत्सवी वाटचाल, रौप्य महोत्सव विशेषांक, संपादकीय, दि. २५ सप्टेंबर १९८८.

८. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण (लेखक व प्रकाशक), निश्चयाचा महामेरु, प्रथमावृत्ती दि. २३ मार्च १९८४, पृ. १५.

९. आढाव बाबा, 'माथाडी कायद्याची वाटचाल', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ (प्रकाशक), पुणे, १९९४ पृ. ३९.

१०. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण, उपरोक्त, पृ. क्र. १५.

११. महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार राज्य सल्लागार समितीचे प्रथम बैठकीचे इतिवृत्त, मुंबई, दि. ६.१२.१९६९, पृ. २.

१२. पाटील अण्णासाहेब, उपरोक्त, पृ. क्र. ४.

१३. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण, उपरोक्त, पृ. क्र. १७.

१४. महाराष्ट्र शासन, कामगार आयुक्त कार्यालय–माथाडी कक्ष, कार्यालयीन टिप्पणी.

१५. धुरट हरिष, 'विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७५.

१६. महाराष्ट्र शासन, कामगार आयुक्त कार्यालय–माथाडी कक्षाची कार्यालयीन टिप्पणी.

१७. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा (अध्यक्ष),माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार सल्लागार समितीने नेमलेल्या उपसमितीचा अहवाल, १९८८, पृ. क्र.३, परिशिष्ट अ

१८. किराणा बाजार व दुकाने मंडळ (बृहन्मुंबई), प्रथम वार्षिक अहवाल सन१९७०–७१ दि. २८ फेब्रुवारी १९७२ पृ. क्र. ८.

१९. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA 1469 (GR) 160783/LAB-IV,सचिवालय, मुंबई दि. ६ एप्रिल १९७०.

२०. किराणा बाजार व दुकाने मंडळ, उपरोक्त, पृ. क्र. ११.

२१. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग राजपत्र भाग–१ MGGक्र. ४३ अधिसूचना क्र. UWA 1369/(Grocery)/LAB-IV दि. १५ डिसेंबर १९६९ (उपरोक्त प्रथम वार्षिक अहवालासोबत पुर्नमुद्रित केलेली)

२२. किराणा बाजार व दुकाने मंडळ, उपरोक्त, पृ. क्र. १२.

२३. किराणा बाजार व दुकाने मंडळ, बृहन्मुंबई, अडतिसावा वार्षिक अहवाल, सन २००७–०८, दि.१ मार्च २०१०, पृ. क्र. २, ३, ४ व ५.

२४. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, उद्योग व कामगार विभाग, सचिवालय, भागI-L सोमवार दि. ६ एप्रिल, १९७०

२५. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग I-L, MGG Sr.No. 38 क्र. UWA 1369/ Iron & Steel, LBA/4, उद्योग व कामगार विभाग, सचिवालय दि. १५.१२.१९६९.

२६. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, सचिवालय, प्रथम वार्षिक अहवाल (१९७०–७१) दि. ६ सप्टेंबर १९७६ पृ. क्र. ५, ६, ८.

२७. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, सदतिसावा वार्षिक अहवाल भडोच स्ट्रीट मुंबई, (सन २००६–०७) कळंबोली जि. रायगड दि. निरंक पृ. २ ते ६.

२८. माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी.

२९. माल वाहतूक कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, बृहन्मुंबई सन १९७२–७३,.

३०. माल वाहतूक व कामगार मंडळ, बृहन्मुंबई, अडतिसावा वार्षिक अहवाल (सन २००८–०९) दि. ९.७.२०१० पृ. क्र. २, ४ ते ७.

३१. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उद्योग व कामगार विभाग क्र. UWA 1471 (GL)/102307 LAB IV सचिवालय, मुंबई दि. ११ मार्च १९७१.

३२. कापड बाजार आणि दुकाने मंडळ, बृहन्मुंबई प्रथम वार्षिक अहवाल (१९७१–७२) दि. ८ फेब्रुवारी १९७३ पृ. क्र. २ व ३.

३३. कित्ता, पृ. क्र. ७, १२, १९.

३४. कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी, डिसेंबर २०१३.

३५. कापड बाजार आणि दुकाने मंडळ, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सन २००९–१० भुलेश्वर, मुंबई दि. ५ जानेवारी २०१२ पृ. क्र. ८, १०, ११.

३६. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण, उपरोक्त पृ. क्र. १८.

३७. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उद्योग आणि कामगार विभाग क्र.UWA/ 272/ 101763/ Lab IV सचिवालय, मुंबई दि. ३० मार्च १९७२.

३८. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, पृ. क्र. ४, ७, ८, ९.

३९. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी दि. २४.१.२०१४.

४०. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सन २०१०–११, दि. २१.१२.२०११, पृ. क्र. २, ३, ४, ७.

४१. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण, उपरोक्त, पृ. क्र. २०.

४२. कित्ता, पृ. क्र. २३.

४३. कित्ता, पृ. क्र. २२, २३.

४४. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई, पहिला वार्षिक अहवाल, सन १९७३–७४, दि. ५ डिसेंबर १९७९, पृ. क्र. २.

४५. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1472/ 152991/ Lab IV दि. ३१.१.१९७३.

४६. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई, पहिला वार्षिक अहवाल, उपरोक्त, पृ. क्र. ३.

४७. कित्ता, पृ. क्र. ४.

४८. कित्ता, पृ. क्र. ६, ९, १०, १२.

४९. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई, अडतीसावा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, मुंबई फलटण रोड दि. २३.५.२०११, पृ. क्र. ४ ते ९.

५०. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी, जानेवारी २०१४.

५१. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई द्वितीय वार्षिक अहवाल १९७४–७५, दि. ३० ऑगस्ट १९७६.

५२. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई,३७ वा वार्षिक अहवाल, सन २००९–१०, दि. ३०.५.२०११.

५३. दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड फॉर ग्रेटर बॉम्बे, प्रथम वार्षिक अहवाल, पृ. क्र. २, ३.

५४. कित्ता, पृ. १.

५५. कित्ता, पृ. क्र. ५, ७, ८, ११.

५६. दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड फॉर ग्रेटर बॉम्बे, वार्षिक अहवाल, सन २०१०–११, दि. ९.५.२०१२, पृ. क्र. ६.

५७. कित्ता, पृ. क्र. ८.

५८. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९८५–८६, दि. ७.७.१९८८, पृ. क्र. १.

५९. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल; उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. २२.१.१९८५.

६०. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, उपरोक्त, पृ. क्र. ५, ६, ७.

६१. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, कार्यालयीन टिप्पणी, पृ. क्र. १.

६२. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, सव्वीसावा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, पृ. ३, ५, ८.

६३. क्लिअरींग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९१–९२, दि. २३.१०.१९९२, पृ. क्र. २.

६४. Goverment of Maharashtra, Notificatio, Industries, Energy Labour Department, Dt 12/4/1991

६५. क्लिअरींग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, उपरोक्त, पृ. क्र. ६, ७, ८, ९.

६६. क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई सोळावा वार्षिक अहवाल, २००६–२९९७, दि. निरंक, पृ. ४, ५, ६, ८.

६७. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. डब्ल्युए १४/२००२/(९८/६)/ काम–५, दि. २२.१.२००४.

६८. दि रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंटस् लेबर बोर्ड मुंबई मंडळ, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, २००८–०९

६९. रत्नागिरी–सिंधुदूर्ग माथाडी असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी मंडळ, रत्नागिरी यांची कार्यालयीन टिप्पणी माहे जानेवारी २०१४.

७०. देशपांडे व. द., हमाल संबंधीचे कायदे आणि योजना, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. २१.

७१. आढाव बाबा, माथाडी कामगार वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ३९, ४०.

७२. पुणे माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल सन १९८०–८१ दि. २९.१२.१९८४, पृ. क्र. २, ७, १४.

७३. पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, श्रमशक्ती भवन, मार्केटयार्ड पुणे यांची कार्यालयीन टिप्पणी दि. डिसेंबर २०१३.

७४. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.UWA 1386/CR (11109) LAB-5दि. ८ जुलै १९९२.

७५. पिंपरी चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, पुणे, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९२–९३, पृ. क्र. २.

७६. पिंपरी चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, पंधरावा वार्षिक अहवाल, सन २००६–०७, चिंचवड, पुणे दि. निरंक, पृ. क्र. २ व ३.

७७. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार कोल्हापूर मंडळ, बारावा वार्षिक अहवाल, सन १९९६–९७ पृ. क्र. १

७८. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी

७९. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सन २००९–१० चा वार्षिक अहवाल दि. निरंक, पृ. क्र. २.

८०. महाराष्ट्र शासन,राजपत्र क्र.UWA 1087 (11460) LAB-5 उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १३ फेब्रुवारी १९९२.

८१. महाराष्ट्र शासन,राजपत्र असाधारण,भाग एक–ल; उद्योग, उर्जा व कामगार विभाग दि. १३ फेब्रुवारी १९९२.

८२. इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९३–९४ पृ. १ व ४.

८३. इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची कार्यालयीन टिप्पणी दि. जानेवारी २०१४.

८४. सांगली मिरज माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सांगली, पहिला वार्षिक अहवाल सन १९८४–८५ दि.२९.१.१९९२ पृ. क्र. ३.

८५. महाराष्ट्र शासन,असाधारण राजपत्र, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 1087 (11460) LAB-5 मंत्रालय, मुंबई दि. १३ जुलै १९८४.

८६. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, उपरोक्त,पृ.५,२.

८७. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, द्वितीय वार्षिक अहवाल,१९८५–८६ दि.१७.२.१९८८ उपरोक्त पृ.४,६.

८८. सांगली मिरज माथाडी व कामगार मंडळ, तृतीय वार्षिक अहवाल,१९८६–८७. पृ.क्र. २, ३.

८९. सांगली मिरज माथाडी व कामगार मंडळ, वार्षिक अहवाल,२०१२–१३ पृ.१,२.

९०. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 488 CR (11699) LAB-5 मंत्रालय मुंबई दि. १८ ऑगस्ट १९८८.

९१. महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक–ल, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 1484 CR (10408) LAB-5 दि. १८.८.१९८८

९२. सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल सन १९८९–९० पृ. क्र. १ व २.

९३. सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. ३१.१.२०१४.

९४. सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, पृ. क्र. १, २, ४, ६.

९५. अण्णासाहेब पाटील, 'नाशिक जिल्ह्यातील असुरक्षित कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळावे म्हणून माथाडी युनियनची नाशिक जिल्ह्याकडे धाव', माथाडी मित्र पाक्षिक, कामगार व महाराष्ट्र दिन विशेषांक, मे १९८१.

९६. नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक पहिला वार्षिक अहवाल सन १९८५–८६, पृ. क्र. १

९७. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांची कार्यालयीन टिप्पणी.

९८. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा वार्षिक अहवाल सन २०११–१२, पृ. २, ३८.

९९. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1389/ 11965/ काम–५ दि. २४ एप्रिल १९८९.

१००. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1487/ 11490/ काम–५ दि. १५.९.१९८९.

१०१. नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव, पहिला वार्षिक अहवाल, सन १९८९–९० दि. १.४.१९९२, पृ. क्र. २, ५, ३.

१०२. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव, २३ वा वार्षिक अहवाल, सन २०११–१२, दि. २५.४.२०१३, पृ. क्र. ४, ५, १०, १६.

१०३. आरडे अशोक रावसाहेब, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ८३.

१०४. दाभाडे गुलाबवराव, अध्यक्ष, धुळे–नंदुरबार माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, धुळे, यांची मुलाखत.

१०५. अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९१–९२, दि. ३१.८.१९९४, पृ. क्र. ३ ते ८.

१०६. कोरपे अप्पा, 'मी तो हमाल', रुपाली प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, १९९२, पृ. क्र. ११७ ते १२२.

१०७. कोरपे अप्पा, घुले शंकरराव, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. १३.

१०८. अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, सन २००९–१०, दि. २७ मे २०१३.

१०९. अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर कार्यालयीन टिप्पणी, दि. १.१.२०१४.

११०. महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग एक–ल, दि. २६ मार्च १९९२.

१११. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम त्रैवार्षिक अहवाल, सन १९९२–९३, ९३–९४, ९४–९५, दि. २५.११.१९९७, पृ. ३ ते ५.

११२. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, सन २००७–०८, दि. ९ डिसेंबर २०१३.

११३. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी, सन २०१२–१३.

११४. जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, जालना, प्रथम वार्षिक अहवाल, १९.७.१९८८ ते ३१.३.१९९०; दि. १८.८.१९९०, पृ. क्र. ३ ते ६.

११५. जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ,जालना, २२ वा वार्षिक अहवाल, सन २०११–१२, दि. ६.६.२०१२, पृ. ३, ४, ९.

११६. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 1387/ CR11639/ Lab5 मंत्रालय, मुंबई दि. १ सप्टेंबर १९९०

११७. महाराष्ट्र शासन अधिसूचना, ऊर्जा, व उद्योग व कामगार विभाग क्र;. UWA/ 142002/ 148/8, दि. १३.२.२००४.

११८. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उ. ऊ. व का. वि. दि. १ सप्टेंबर १९९०.

११९. लातूर–उस्मानाबाद जिल्हा असंरक्षित कामगार मंडळाची कार्यालयीन टिप्पणी.

१२०. महाराष्ट्र शासन, अ. सा. राजपत्र, भाग एक–एल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १ ऑगस्ट १९९२.

१२१. नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड, लेखापरिक्षण अहवाल, सन १९९२–९३, दि. २८.४.१९९४.

१२२. नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड, वार्षिक लेखापरिक्षण अहवाल, सन २००८–०९, दि. २२.७.२०११.

१२३. औरंगाबाद माथाडी आणि इतर कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९२–९३, दि. १७.११.१९९४, पृ. क्र. ३, ४.

१२४. औरंगाबाद माथाडी आणि इतर कामगार मंडळ, १९ वा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, दि. १८.६.२०११, पृ. क्र. ५, ६, ७, ९.

१२५. परभणी–हिंगोली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. २.४.२०१४.

१२६. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १४.३.१९९६.

१२७. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १४.३.१९९६.

१२८. बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, बीड, दि. ३१.३.१९९८ रोजीचे बॅलन्स शीट, दि. ९.७.१९९९.

१२९. बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांची कार्यालयीन टिप्पणी

१३०. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 1588/ (11855)/ Labs-5 मंत्रालय, मुंबई, दि.२१.१.१९९१.

१३१. धुरट हरिष, 'विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७५.

१३२. अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती, पहिला वार्षिक अहवाल, सन १९९१–९२ ते १९९४–९५, दि. २४ जुलै २०००, पृ. २, ३, ५.

१३३. अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती, वार्षिक अहवाल, सन २००९–१०, दि. १५ सप्टेंबर २०१०, पृ. क्र. ४, ५, ६.

१३४. अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांची कार्यालयीन टिप्पणी, माहे डिसेंबर २०१३.

१३५. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 142002/(97/6) कामगार–५, दि. १२.११.२००३.

१३६. अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, सन १९९१–९२ व १९९२–९३ चा वार्षिक अहवाल, दि.८.११.१९९५, पृ. क्र. २, ३, ४, ६.

१३७. अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, वार्षिक अहवाल, सन २००६,०७, २००७–०८, २००८–०९, दि.६.५.२०११, पृ. क्र. १, २, ६, ३८.

१३८. अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी, डिसेंबर २०१३.

१३९. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. ३ मे २००६.

१४०. अध्यक्ष, माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, यवतमाळ यांचे पत्र दि.१८.२.२०१४.

१४१. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. UWA/ 1487/ CR (11600)/Lab-5, दि. २१ जून १९९१.

१४२. धुरट हरिष, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ७५.

१४३. नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी.

१४४. नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी

१४५. महाराष्ट्र शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 142002/(130/7)/कामगार–५, दि. ५.२.२००४.

१४६. भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा, लेखापरिक्षण व वार्षिक अहवाल, सन २००५–०६, दि. १.१०.२०१०, पृ. क्र. १ ते ५, ११.

१४७. भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा, कार्यालयीन टिप्पणी.

१४८. चंद्रपूर–गडचिरोली माथाडी मंडळाची कार्यालयीन टिप्पणी.

# प्रकरण ४ थे

# माथाडी कामगार चळवळीचा माथाडी कामगार आणि मालक व शासन यांचेमधील परस्पर संबंधांवरील परिणाम

माथाडी कामगार चळवळ म्हणजे आहे रे आणि नाही रे या दोन सामाजिक गटातील संघर्ष आहे. मालक वर्ग सधन आहे, त्याचा उद्देश जास्तीत जास्त नफा कमविणे आहे. त्यासाठी कामगारांना कमीत कमी मजूरी व अन्य सोयी सुविधा देण्याची प्रवृत्ती त्याचेमध्ये असते. तर माथाडी कामगारांकडे फक्त शारीरिक श्रम असतात. या श्रमाच्या बदल्यात मालक वर्गाकडून पुरेशी मजूरी आणि किमान सोयी सुविधा मिळाव्यात अशी कामगारांची अपेक्षा असते. कामगारांना त्यांच्या मागण्या मांडणे आणि त्या मान्य करुन घेण्यासाठी एकत्र येवून संघर्ष करावा लागतो, तर मालकवर्गाचा शासनावर दबाव असल्यामुळे कामगारांच्या मागण्या सहजासहजी मान्य होत नाहीत. या परिस्थितीतून मार्ग काढत माथाडी कामगारांनी स्वत:साठी स्वतंत्र कायद्याची निर्मिती करुन घेतली तसेच त्याची राज्यभर अंमलबजावणी व्हावी यासाठी सतत प्रयत्न केले. या सर्वांचा साहजिकच शासन, मालक आणि माथाडी कामगार यांचेतील परस्पर संबंधावरही परिणाम झाला आहे.

## ४.१ महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार कायद्यापूर्वीचे मालक– माथाडी कामगार संबंध :

महाराष्ट्र शासनाने माथाडी कायदा करण्यापूर्वीची हमाल माथाडी कामगारांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती आपण यापूर्वीच्या प्रकरणांत पाहिलेली आहे.मालक आणि कामगार दोन्ही घटकांच्या आर्थिक आणि सामाजिक स्तरात फार मोठा फरक होता. त्याचा परिणाम या दोघांनी एकमेकांशी वागण्या बोलण्यातही जाणवत असे. सन १९६० पूर्वी माथाडी कामगार पूर्णत: असंघटित होते. हळूहळू संघटित होत त्यांनी आपल्या न्याय मागण्या मालकांकडे तसेच

शासनाकडे माडण्यास सुरुवात केली. या घटनांचा परिणाम देखील मालक–कामगार संबंधावर होत गेला. या काळाची विभागणी सन १९६० पूर्वीचा काळ आणि सन १९६० ते माथाडी कायदा पास होण्याचा काळ या दोन टप्प्यात करता येईल.

### ४.१.१ सुरुवातीचे सन १९६० पूर्वीचे मालक आणि माथाडी कामगारांचे संबंध:

माथाडी कायद्यापूर्वी माथाडी कामगार आणि मालक यांचे वैधानिकदृष्ट्या कोणत्याही प्रकारचे संबंध नव्हते.[१] या कामगारांचा ते काम करत असलेल्या ठिकाणांशी किंवा मालकांशी संबंध प्रस्थापित करणारा एकही कामगार कायदा त्यावेळी अस्तित्वात नव्हता. मालक मुकादमाला काम देत आणि मुकादम कामगारांकडून ते काम करुन घेत. एवढेच नव्हे तर हमाल, माथाडी हे आमचे नोकरच नाहीत अशी भूमिका व्यापाऱ्यांची होती.[२] हमाल हा गिऱ्हाईकांनी विकत घेतलेला माल दुकानापासून गिऱ्हाईकांच्या सांगण्यानुसार वाहनांपर्यंत अथवा इतरत्र वाहून नेत असल्यामुळे व्यापारी त्यांना नोकर मानत नसत. अशा आशयाचे बोर्ड देखील काही व्यापारी दुकानाबाहेर लावत. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ च्या तरतूदींनुसार हे हमाल दुकान मालकांचे नोकर नसल्याचे शासनाने दि. ३ नोव्हेंबर १९५९ च्या पत्रान्वये स्पष्ट करुन मालकांच्याच भूमिकेला पाठिंबा दिला.[३] हमालाचे दुकानदाराबरोबर जोपर्यंत पटेल तो पर्यंत त्यांनी काम करावयाचे आहे. दुकानदाराशी न पटल्यास दुकानदाराला दुसरे इसमामार्फत हमालीचे काम करुन घेता येईल व त्यास पूर्वीच्या हमालांनी अडथळा व अडवणूक करु नये, असे पत्र श्री. आर. ए. ओसवाल, दि पुना होलसेल जॉगरी ॲण्ड ग्रोसरी मर्चंटस असोशिएशन लि. यांनी चेअरमन, दि ॲग्रीकल्चर प्रोड्युस मार्केट कमिटी, पुणे यांच्या दि. ७.९.१९६४ च्या पत्राला उत्तर देताना लिहिले आहे.[४] अशा प्रकारे व्यापाऱ्यांची माथाडी कामगारांप्रती,काम करुन घेण्याचे केवळ एक साधन अशी भूमिका होती.

व्यापारी मालक माथाडी कामगारांची कोणत्याही प्रकारे जबाबदारी घेत नव्हते.[५] वेळचेवेळी वाहतूकीसाठी हमाल–माथाडी उपलब्ध व्हावेत आणि आपल्या व्यापारात कुठलाही अडथळा येवू नये, केवळ याचीच काळजी व्यापारी घेत. जर एखाद्या कामगाराने किंवा कामगाराच्या टोळीने

काही विचारणा केली, मागणी केली किंवा व्यापारी सांगेल त्यावेळी ते काम लगेचच केले नाही तर त्या कामगारांना व्यापारी काम देत नसत. अशा कामगारांवर बेकार राहण्याची पाळी येत असे. तसेच जर एखादा कामगार गावी जावून परत आला, तर तो पर्यंत त्याचे जागी दुसरा कामगार मालकाने नेमलेला असे.[६] मालकांची त्यांचेप्रती कोणतीही बांधिलकी नव्हती. मालक माथाडी कामगारांना अत्यंत तुच्छतेची वागणूक देत. कामगारांनी केलेल्या कामाचा पुरेसा मोबदला त्यांना मालकांकडून देण्यात येत नसे. मजूरीचे ठराविक दर नव्हते. माथाडी हमालांना कोणतेही इतर लाभ व सुविधा देण्यात येत नव्हत्या.[७] एखाद्या हमालाला अपघात झाला किंवा तो आजारी पडला तर त्याबाबतही व्यापारी जबाबदारी घेत नसत.

काही तुरळक ठिकाणी मात्र एकाच मालकांकडे वर्षानुवर्षे विनातक्रार मालवाहतूक करणारे माथाडी कामगार होते.[८] असे कामगार आणि व्यापारी यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होत. अशा कामगारांवर व्यापारी विश्वास टाकून गोदामाच्या चाव्या त्यांच्याचकडे ठेवत. काही कामगार इतर ठिकाणी रहायची सोय नसल्यामुळे बऱ्याचदा गोदामातच झोपत आणि तेथेच राहत.[९] गोदामांची सुरक्षा, कामगारांची २४ तास उपलब्धता आणि कामगारांची सोय होत असल्यामुळे व्यापारी अशा प्रकारे कामगारांना गोदामाचा राहण्यासाठी वापर करु देत. अशा काही माथाडी कामगार आणि मालकांमध्ये परस्पर विश्वास आणि आदर होता. काही ठिकाणी माथाडी कामगारांच्या अनेक पिढ्या त्याच व्यापाऱ्यांकडे काम करत.मात्र अशा प्रकारची परिस्थिती अत्यंत कमी ठिकाणी होती. बहुतांश व्यापारी वर्ग माथाडी कामगारांकडे केवळ नफा कमविण्याचे साधन म्हणून पहात, त्यांचे दृष्टीने माथाडी कामगारांना कोणतीही किंमत नव्हती. एका ऐवजी दुसरा कोणीही कामगार कामासाठी असला म्हणजे पुरेसा, ही माथाडी कामगाराप्रती भावना होती. काही तुरळक ठिकाणी मात्र कामगार आणि मालक यांचे चांगले संबंध होते. मात्र, या कामगारांना मालक अडचणीच्यावेळी समजून घेत आणि क्वचित प्रसंगी आर्थिक मदतही करत असले तरी त्याला कोणत्याही कायद्याचे पाठबळ नव्हते.

## ४.१.२ माथाडी कामगारांच्या एकत्रिकरणाच्या काळातील सन १९६० ते सन १९६९ दरम्यानचे मालक–माथाडी कामगार संबंध :

श्री. अण्णासाहेब पाटील यांनी मुंबई गोदीच्या बाहेर इतरत्र काम करणाऱ्या हमाल–माथाडींना एकत्र करुन संघटना बांधणीस सुरुवात केल्यावर माथाडी कामगार आणि मालकांमधील संबंध जास्त तणावपूर्ण होवू लागले.[१०] जो माथाडी कामगार वर्षानुवर्षे मुकपणे मिळेल त्या मजूरीवर,मिळेल ते काम करत असे, प्रसंगी अपमान सहन करत जगत होता; त्याने संघटित होवून शासनाकडे मजूरीत दरवाढ, कामाच्या ठिकाणी किमान सोयी सुविधा आणि स्वतंत्र कायदा या मागण्या मांडण्यास सुरुवात केली. त्यामुळे मालकांमध्ये अस्वस्थता पसरली. कामगारांनी यासाठी मोर्चे, निवेदने, उपोषणे, निदर्शने, घेराव, कामबंद, प्रसंगी संप या मार्गाचा अवलंब करण्यास सुरुवात केली. तथापि व्यापारी वर्गाच्या शासनावरील दबावामुळे माथाडी कामगारांची आणि त्यांच्या नेत्यांची मागणी मान्य करुन घेताना दमछाक होत होती.[११] व्यापारी सधन व सुशिक्षित असल्यामुळे राज्यकर्त्यांशी, स्थानिक प्रशासनाशी त्यांचे जवळचे संबंध असत. माथाडी कामगार मात्र असंघटित होते; त्यांना कोणी समर्थ नेता नव्हता. त्यामुळे त्यांची बाजू शासनाकडे मांडणे शक्य होत नसे. त्यामुळे शक्यतो मालकांशी, शासनाशी चर्चा करुन सामोपचाराने मागण्या मान्य करुन घेण्याचा प्रयत्न होत असे. माथाडी कामगार मुळातच आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे संप करण्यापूर्वी माथाडी कामगार संघटनेला फार विचार करावा लागे. जितके दिवस संप चालू राहिल तितके दिवसांची मजूरी बुडून माथाडी कामगारांना पैशाअभावी उपाशीपोटी रहावे लागत असे. यातून व्यापारी मालकांनी कामगारांना पैशाचे किंवा कामाचे अमिष दाखवून संप देखिल फुटण्याची शक्यता राहत असे. तसेच मालक वर्गदेखील संप काळात वस्तूंची भाववाढ करुन, त्यासाठी माथाडी कामगारांचा संप जबाबदार असल्याचे भासवत. त्यामुळे शासन आणि सर्व सामान्य जनतेच्या रोषाला माथाडी कामगारांना बळी पडावे लागत असे. मालक वर्गाचा हा प्रयत्न यशस्वी होवू नये म्हणून कामगार संघटनेला देखील काळजी घ्यावी लागे. माथाडी कामगारांच्या मागण्या कशा न्याय व रास्त आहेत; संपावर

जाण्यापूर्वी सामोपचाराने या मागण्या होण्यासाठी कसे प्रयत्न केले गेले याबाबतची माहिती वर्तमानपत्राद्वारे सर्वसामान्य जनतेला देण्यात येत असे. तसेच प्रत्यक्ष सभा, मेळावे यांचे माध्यामातून कामगारांना याबाबत माहिती देवून यांचे मनोबल कायम राखण्यात येत असे. शासनाला देखील याबाबतची सर्व सूचना दिली जात असे तसेच मध्यस्थी करण्याची विनंती केली जात असे.[१२] शक्यतो कामगारांची बाजू सर्वत्र मांडून मालक, शासन आणि जनता यांचे संबंध सुरळीत राहतील यासाठी माथाडी कामगार आणि त्यांची संघटना प्रयत्नशील रहात असे. प्रत्यक्ष संप सुरु झाल्यावर कामगारांनी पैशाअभावी व्यापाऱ्यांच्या अमिषाला बळी पडू नये अथवा त्यांची उपासमार होवू नये म्हणून माथाडी कामगार संघटना अशा कामगारांना आर्थिक मदतही करत असे.[१३] संप निष्फळ ठरावा आणि त्याचा व्यापारावर परिणाम जाणवू नये म्हणून व्यापारी बाहेरच्या कामगारांना जास्त दराने मजूरी देवून त्यांचेकडून काम करुन घेण्याचा प्रयत्न करत. असे होवू नये म्हणून माथाडी कामगार कामाचे ठिकाणी दिवसरात्र जागता पहारा देत. बाहेरच्या कामगारांकडून काम करुन घेण्याचा प्रयत्न झाल्यास माथाडी कामगार व संघटनेचे कार्यकर्ते भर उन्हात मुंबईतील डांबरी रस्त्यावर आडवे पडून वाहने आडवत आणि मालाची वाहतूक होवू देत नसत.[१४] अशावेळी मालकवर्ग पोलीस स्टेशनला तक्रार करत आणि पोलीस माथाडी कामगार व त्यांच्या कार्यकर्त्यांना अटक करत. असे झाले तरी मालक व कामगारांचे संबंध बिघडू नयेत म्हणून संप हे शांततेच्या मार्गानेच झाले पाहिजेत याची दक्षता माथाडी संघटना घेत असे. चर्चा होवून संप मिटल्यावर मालक व कामगार यांचेतील संबंधावर त्याचा कोणताही विपरित परिणाम भविष्यात होवू नये, याची देखील काळजी माथाडी कामगार संघटनेचे नेते घेत. चर्चेनंतर संप मागे घेतल्यावर कामगारांचा मेळावा घेतला जाई.[१५] या मेळाव्यास मालकांच्या प्रतिनिधींना सन्मापूर्वक बोलावून कामगारांच्या मागण्या मान्य केल्या, म्हणून त्यांचा सत्कार केला जाई. यामुळे मालकांच्या आणि माथाडी कामगारांच्या मनात परस्परांविषयी राग राहत नसे. पुन्हा परस्पर विश्वासाने ते कामाला लागत. मुकादम हा मालक आणि माथाडी कामगारांमधील महत्त्वाचा दुवा आहे. मालक व कामगारांचे परस्पर संबंध चांगले–वाईट राहण्यात मुकादमांचा देखील महत्त्वाचा

वाटा आहे.[१६] या मुकादमांच्या समस्यांचेही निराकरण व्हावे आणि त्यातून मालक व माथाडी कामगारांचे संबंध चांगले रहावेत यासाठी माथाडी कामगार संघटना मुकादमांसाठी देखील स्वतंत्र शिबीर व अभ्यासवर्ग घेत असे.

महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनने दि. ९ ऑगस्ट १९६२ रोजी सचिवालयावर भव्य मोर्चा काढला होता. या मोर्चाच्या सभेत श्री. अण्णासाहेब पाटील यांनी मालक वर्गाला उद्देशून आव्हान केले की,

> 'आम्ही डोक्यावरुन, पाठीवरुन व हातगाडी वरुन बोजा वाहतो. आम्ही शारीरिक कष्टाची कामे करतो. पण आम्ही देखील माणसेच आहोत. आम्हालाही मन आहे, भावना आहेत. आम्हाला तुमची मेहेरबानी नको आहे. आमचे म्हणणे इतकेच आहे की तुम्ही आमच्याकडून काम करुन घ्या, पण त्या कामाचा रास्त मोबदला द्या.'[१६]

या मोर्चाच्या यशामुळे मुंबईतील व्यापारी वर्गात अस्वस्थता पसरली. माथाडी कामगार असेच एकजूट होत राहिले तर डोईजड होतील आणि त्यांना कसेही राबवून घेता येणार नाही, असे मालक वर्गाला वाटू लागले. काही व्यापाऱ्यांचे भाडोत्री गुंड कामगारांमध्ये दहशतही निर्माण करत होते. संघटनेमुळे तुमचे नुकसानच होईल असा प्रचार ते करु लागले. मालकवर्ग देखील स्वतंत्रपणे बैठका घेवून कामगार कसे एकत्र येणार नाहीत यासाठी प्रयत्न करु लागले. त्यानुसार ठरवून व्यापाऱ्यांनी त्यांच्या दुकान, गोदामात काम करणाऱ्या कामगारांना हेतुपुरस्सर त्रास देण्यास, कामावरुन काढून टाकण्याच्या धमकया देण्यास सुरुवात केली. त्यामुळे दि. १० सप्टेंबर १९६२ पासून मुंबईतील सर्व माथाडी कामगारांनी बेमुदत संप सुरु केला.[१७] या संपामुळे व्यापाऱ्यांची गोदामे आणि दुकानात काम करण्यासाठी एकही माथाडी कामगार नव्हता. सर्व माल आहे त्या ठिकाणीच गोदामात, ट्रकमध्ये, वॅगनमध्ये पडून राहिला. मुंबईत आलेला भाजीपाला देखील उतरवून घेण्यास माथाडी कामगार नव्हते. या संपामुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. तसेच मुंबईतील सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत होण्याची लक्षणे दिसू लागली. व्यापार बंद राहिल्यामुळे मालक वर्गाचेही प्रचंड नुकसान होवू लागले. त्यांना देखील माथाडी

कामगारांच्या एकत्रित शक्तीची जाणीव निर्माण झाली. तत्कालीन पुरवठामंत्री श्री. होमी तल्यार खान यांनी पुढाकार घेताच व्यापारी चर्चेला तयार झाले आणि मजूरी दरवाढीचा करार केला.[१८] या संपामुळे व्यापाऱ्यांनी माथाडी कामगारांना तुच्छ लेखणे, हेतुपुरस्सर त्रास देणे याबाबी बंद केल्या आणि माथाडी कामगार व मालक हे संबंध अधिक सुदृढ झाले. तरी देखील भविष्य काळातही काही व्यापाऱ्यांनी कामगारांना त्रास देणे सुरुच ठेवले. विशेषत: दि. २ नोव्हेंबर १९६६ पासून मजूरीतील दरवाढ आणि इतर मागण्यांसाठी माथाडी कामगारांनी बेमुदत संप सुरु केल्यावर व्यापाऱ्यांनी कामगारांना गोदामात झोपण्याची परवानगी नाकारली, पाणी देणे बंद केले.[१९] या मुळे श्री. अण्णासाहेब पाटील यांनी बेमुदत उपोषणास सुरुवात केली. यामुळे व्यापारी, शासन या दोघांवरही दबाव निर्माण होवून दि. ९ नोव्हेंबर १९६६ च्या तडजोडीनुसार माथाडी कामगारांना १५% महागाई भत्ता वाढ मिळाली तसेच पुढील काळात मजूरीतील वाढ किंवा घट महागाई निर्देशांकातील वाढ किंवा घट यांचे प्रमाणात देण्याचे सुत्र मान्य करण्यात आले.[२०] यामुळे मजूरीच्या दरात वाढ मिळण्यावरुन मालक-कामगार यांचे संबंधात वारंवार येणारे तणाव दूर होण्यास मदत झाली.

महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार अधिनियम दि. १३ जून १९६९ पासून लागू झाला. मात्र त्याची अंमलबजावणी होण्यास त्यानंतर काही काळ लागला. यामुळे माथाडी कामगारांच्या मनात कायद्याविषयी शंका निर्माण व्हायला लागल्या. याचा गैरफायदा मालकांनीही घेण्यास सुरुवात केली. या कायद्यामुळे तुमची मजूरी विभागली जाईल, संघटनेचे नेते तुमच्या मजूरीतून वर्गणीच्या स्वरुपात पैसे घेतील, यामुळे तुमचे नुकसानच होईल, त्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीचा आग्रह धरु नका असे मालकवर्ग कामगारांना सांगू लागले.[२१] मात्र श्री. अण्णासाहेब पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी माथाडी कायद्याचे महत्त्व कामगारांना पटवून त्यांच्या मनातील संभ्रम दूर केला. या कालावधीत मालक व कामगार यांचे संबंध पुन्हा परस्पर अविश्वासाचे आणि अस्थिर बनले होते. मात्र माथाडी कायद्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात सुरु झाल्यावर त्याला एक स्थिरता आली.

### ४.१.३ महाराष्ट्र माथाडी हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ पारित झाल्यानंतरच्या काळातील मालक–माथाडी कामगार संबंध :

किराणा बाजार व दुकाने आणि लोखंड व पोलाद व्यवसाय यामधील माथाडी कामगारांसाठीच्या माथाडी कामगार मंडळाची स्थापना दि. १५ डिसेंबर १९६९ रोजी झाली.[२२] मात्र त्याचे प्रत्यक्ष कामकाज सन १९७० मध्ये सुरु झाले. राज्य सरकारने हा कायदा कोणत्या क्षेत्राला आणि कोणत्या व्यवसायाला लागू करावयाचा याचे अधिकार स्वत:कडे ठेवले होते. त्यामुळे ज्या क्षेत्रात आणि ज्या माथाडी कामगारांसाठी मंडळाची स्थापना होवून कामगारांना लाभ मिळू लागले तेथील मालक व कामगार यांचे संबंध काहिसे स्थिरावले. मात्र जेथे अशी मंडळे स्थापन झालेली नव्हती, त्या ठिकाणच्या विविध व्यवसायातील माथाडी कामगारांनी मंडळाच्या स्थापनेसाठी आणि माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सातत्याने आग्रह धरला आणि त्यांचे मालकांशी असलेले संबंध सातत्याने तणावपूर्ण राहिले आहेत.[२३] यवतमाळ जिल्ह्यामध्ये माथाडी मंडळ स्थापन होवूनही या जिल्ह्यामधील माथाडी कामगारांना तसेच कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये अद्याप माथाडी कायद्याचा लाभ हमाल–माथाडींना मिळत नाही. तेथे सतत कामगारांचा मालक व शासन यांच्याशी संघर्ष सुरु आहे.

शासनाने माथाडी कायद्याची अंमलबजावणी सुरु करण्याचा निर्णय घेतल्यावरही मालक वर्गाकडून कायद्यास विरोध झाला.[२४] पुणे तसेच इतरत्रही व्यापारी कोर्टात गेले. यामुळे व्यापाऱ्यांना आपले न्याय हक्क देण्याची ईच्छा नाही अशी अन्यायाची भावना तेथील माथाडी कामगारांमध्ये निर्माण झाली. अशा परिस्थितीत न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निर्णय दिल्यावरही आणि कायद्याची त्यानुसार अंमलबजावणी सुरु झाल्यावर मालक व कामगारांचे संबंध पुर्णत: सलोख्याचे राहत नसत.

ज्या माथाडी मंडळात माथाडी कायद्याची अंमलबजावणी सुरु होवून कामगारांना नियमित काम आणि नियमित पगार तसेच लेव्हीच्या रकमेतून अन्य कल्याणकारी लाभ मिळू लागले, तेथील कामगार काहीसा निर्धास्त झाला.[२५] त्याचा देखील कामगार मालक संबंधावर वेगळाच

परिणाम झाल्याचे दिसून येते. कामाच्या शाश्वतीमुळे अणि कामावरुन काढून टाकण्याची भीती न राहिल्याने माथाडी कामगारांच्या गैरहजेरीचे प्रमाण वाढले. त्यामुळे मालकांना कामगारांचा अपुरा पुरवठा होवून वेळेवर कामे होत नाहीत. तसेच माथाडी मंडळाच्या परवानगी शिवाय नोंद नसलेल्या इतर कामगारांकडून कामे करुन घेता येत नाहीत.[२६] एकदा नोंदणी झाल्यावर कामगारांमधील शिस्त कमी झाल्याचे तसेच त्यांचे कामावर पूर्वीसारखे लक्ष नसल्याचे दिसून येते. पूर्वी पगार मालक देत, आता पगार मंडळामार्फत होत असल्यामुळे कामगार मालकाला जुमानत नसल्याची भावना मालकांत निर्माण झाली आहे. जुन्या कामगारांना आणि मालकांना परस्पराबद्दल काहिसा आदर आणि विश्वास होता.[२७] जसजशी माथाडी मंडळे स्थापन झाली आणि जुने कामगार निवृत्त अथवा कालवश झाले, तसतसे मालक व कामगारांमधील परस्पराबद्दलचा आदर व विश्वास कमी झाला आहे. नवीन पिढीतील माथाडी कामगारांचा साहजिकच माथाडी मंडळाकडे ओढा आहे. कारण त्याला सर्वसोयी सुविधा व पगार मंडळाकडून मिळतो. मालकाने कामगारांच्या बाबत मंडळाकडे तक्रार केल्यास माथाडी मंडळ आणि युनियन दोघेही कामगारांच्या बाजूने उभे राहतात, अशी मालकांची भावना आहे.[२८] याचा परिणाम मालक – कामगार संबंधावर विपरितपणे होतो. काही कामगारांच्या टोळ्या त्यांचेतील कामगार मोठ्या प्रमाणावर गैरहजर असल्यास दुसऱ्या टोळीतील कामगारांना काम जावू नये म्हणून मंडळात नोंद नसलेल्या बाहेरच्या कामगारांकडून कमी मजूरीने काम करुन घेतात.[२९] नोंद झालेल्या काही कामगारांना कष्टाचे काम नको वाटते, असे कामगार नोंद नसलेल्या मंडळाबाहेरील कामगाराकडून मजूरीचा काही भाग देवून काम करुन घेतात आणि मजूरीचा बराचसा भाग स्वत:ला ठेवून त्या कामगाराचे शोषण करतात. मालकाचे काम वेळेत होत असल्याने ते देखील याबाबत तक्रार करत नाहीत. मात्र जर मालकाने नोंद न झालेल्या कामगाराकडून काम करुन घेतल्यास संघर्ष निर्माण होतो. यामुळे मालक व माथाडी कामगारांचे संबंध बिघडतात.

काही मालक देखील काहीवेळा परस्पर बाहेरच्या कामगारांकडून कमी मजूरी दराने काम करुन घेतात.[३०] नोंद असलेल्या कामगारांना वेळचे वेळी काम देत नाहीत, मजूरीचे पैसे

वेळचेवेळी मंडळात भरत नाहीत, कामगारांनी केलेल्या कामाचे फॉर्म त्यांना वेळेवर देत नाहीत. यामुळे देखील मालक व माथाडी कामगारांचे संबंध बिघडतात. काही मालक मुद्दामहून मंडळाकडे कामगारांबद्दल खोट्या तक्रारी करतात, अशी कामगारांची धारणा असते.[३१] जर गोदामात किंवा दुकानात चोरी झाली तर पहिला संशय माथाडी कामगारांवरच घेतला जातो. याचा देखील त्यांचे परस्पर संबंध सुरळीत राहण्यावर परिणाम होतो. मालकांनी मजूरीची रक्कम अथवा लेव्हीची रक्कम मंडळात वेळीच न भरणे, नोटीस दिल्यावर मंडळात हजर न राहणे, मंडळात नोंद होण्यास टाळाटाळ करणे यामुळे संबंधित माथाडी कामगार न्याय लाभांपासून वंचित राहतात.[३२] त्यांचे मनात अशा मालकांबद्दल द्वेषाची भावना निर्माण होवून परस्परांमधील संबंध चांगले राहत नाहीत. अहमदनगर जिल्ह्यात दि. ८ एप्रिल १९९५ रोजी माथाडी कामगारांनी मजूरीच्या दरवाढीसाठी संप केला असता मालकांनी स्वत: हमालीचे काम करण्यास सुरुवात केली. काम करताना त्यांनी बैठक घेत असलेल्या माथाडी कामगारांना पाहून टिंगलटवाळी केली. यातून पुढे दगडफेकीचा प्रकार दोघांकडूनही घडला. व्यापाऱ्यांनी पोलिसांत तक्रार केल्यावर माथाडी कामगारांना अटक झाली. कामगारांनी उच्च न्यायालयात जावून मालकांनी हमाली काम करु नये अशी स्टे ऑर्डर मिळवली. पुढे जिल्हाधिकारी यांचे समक्ष चर्चा होवून २५% दरवाढ सह अन्य मुद्द्यांवर एकमत होवून संप मागे घेण्यात आला.[३३] अशा प्रकारच्या घटना या पुढील काळात देखील घडतच आल्या आहेत. या घटनांचा परिणाम कामगार व मालकांचे मनावर दीर्घकाळ राहतो आणि बिघडलेले संबंध सुरळीत होण्यास बराच कालावधी जातो.

मालकांचा उद्देश हा जास्तीत जास्त नफा कमविणे हा असतो तर माथाडी कामगारांचा उद्देश किमान सोयी सुविधा आणि मजूरीचा दर मिळविणे हा असतो. या दोन्ही घटकांचे हे उद्देश परस्पर विरोधी आहेत. त्यामुळे त्यांच्यातील संबंध नेहमीच कमी अधिक तणावपूर्ण राहिलेले आहेत. सन १९६० पूर्वी माथाडी कामगार पूर्णत: असंघटित आणि विखुरलेला होता. त्यावेळी मालकवर्ग कामगारांना हवी तशी हीन वागणूक देत. त्यांची कामगारांवर पकड होती. मात्र जसजसे कामगार संघटित होवू लागले, आपल्या न्याय हक्कांसाठी झगडू लागले तसतसे व्यापारीही

अस्वस्थ झाले. त्यांची कामगारांवरील पकड हळूहळू कमी होवू लागली आणि माथाडी कामगार संघटनेचा कामगारांवरील प्रभाव वाढला. या सन १९६० ते सन १९७० च्या दशकात मालक आणि माथाडी कामगारांचे संबंध बऱ्याचदा तणावपूर्ण राहिले. श्री. अण्णासाहेब पाटील यांनी हे संबंध सलोख्याचे रहावेत म्हणून सतत प्रयत्न केले. माथाडी अधिनियमाची सन १९६९ मध्ये निर्मिती झाल्यानंतर हळूहळू माथाडी मंडळाची स्थापना आणि कायद्याची अधिक चांगली अंमलबजावणी यासाठीही माथाडी कामगार प्रयत्नशील राहिले. यामुळे देखील कामगार व मालकांमधील संबंध कमी अधिक तणावपूर्ण राहिले. माथाडी मंडळाची स्थापना होवून मंडळामार्फत पगार मिळू लागल्यावर मात्र मालकांचे कामगारावरील नियंत्रण जवळपास पूर्णत: संपुष्टात आले. कामगारांना सोयी सुविधा मंडळामार्फत मिळू लागल्या, त्या न मिळाल्यास मंडळाकडे त्यांना दाद मागता येवू लागली. त्यामुळे माथाडी कामगार मालकांना महत्त्व देईनासे झाले. मालक देखील हतबल झाले. कामगारांविरुध्द मंडळाकडे तक्रार केल्यास माथाडी मंडळ आणि माथाडी युनियनची सहानुभूती देखील दुर्बल घटक म्हणून कामगारांकडेच असते.

कामगारांनी या कायद्यापूर्वीची त्यांची परिस्थिती आणि सध्याची सुस्थिती याचा विचार करुन तसेच व्यापाऱ्यांनीही कामगारांचा, त्यांच्या कष्टाचा विचार करुन आणि त्यांच्या नफ्यातील कामगाराच्या वाट्याचा विचार करुन वागल्यास परस्परांचे अधिक चांगले संबंध राहतील आणि ती काळाची गरज आहे.

## ४.२ शासनाची माथाडी कामगार कल्याण विषयक भूमिका आणि शासन व माथाडी कामगार यांचे परस्पर संबंध :

शासनाने एखाद्या घटकाप्रती ठेवलेला दृष्टिकोन आणि शासनाची त्या घटकाबाबतची ध्येय धोरणे याचा त्या घटकाच्या आर्थिक सामाजिक प्रगतीत फार मोठा वाटा असतो. विशेषत: कामगार आणि त्यातही माथाडी कामगारांसारख्या अशिक्षित, असंघटित अशा दुर्बल घटकासाठी शासनाची त्यांचे कल्याणाबाबतची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. विविध सामाजिक, राजकिय

बाबींच्या आधारे शासनाचे हे धोरण ठरते आणि त्या धोरणावरच मग शासन आणि माथाडी कामगारांसारखा दुर्बल घटक यांचे परस्पर संबंध अवलंबून असतात. बदलत्या काळानुसार आणि राजकिय व सामाजिक परिस्थितीनुसारही शासनाच्या भूमिकेत बदल होत राहतो. माथाडी कामगार विषयक राज्य शासनाची भूमिका आणि या दोन घटकांचे परस्पर संबंध यांतील चढउतार पुढील प्रमाणे मांडता येतील.

### ४.२.१ माथाडी कामगार संघटित होण्यापूर्वी सन १९६० पूर्वीचा काळ :

इ.सन १९६० पूर्वी मुंबई गोदीतील हमाल वगळता इतरत्र हमाल विखुरलेल्या स्वरुपात काम करत. गोदीतील हमाल मोठ्या संख्येने एकत्र काम करत असल्यामुळे त्यांनी एकत्र येवून नॅशनल डॉक वर्कस् युनियन ही संघटना स्थापन केली होती. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी सन १९२० मध्ये संप केला. यातून त्यांचे वेतन व सेवाविषयक इतर मागण्या मान्य करण्यात आल्या. तसेच सन १९४७ मधील डॉक वर्कर्स रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट हा कायदा पुढील काळात करण्यात आला.[३४] त्यामुळे गोदीत कामगारांचे कंत्राटी पध्दतीने होणारे शोषण थांबले. या गोदी कामगारांच्या संघटित प्रयत्नामुळेच शासनाला त्यांचे प्रती भूमिका निश्चित करुन त्यांचे कल्याणाचे निर्णय घ्यावे लागले. मात्र गोदीबाहेरील हमाल संघटित नसल्यामुळे शासनाने त्यांचेकडे लक्ष दिले नाही तसेच हे हमालही आपली गाऱ्हाणी, मागण्या शासनापुढे मांडू शकले नाहीत. माथाडी कामगारांचा सामाजिक अथवा राजकीय दबाव गट नसल्यामुळे शासनाने माथाडी कामगारांच्या कल्याणाकडे या काळात कधीही लक्ष दिले नाही. हे कामगार भिवंडी – कल्याणपासून बोरीबंदर पर्यंत अनेक मालकांकडे, जसे काम उपलब्ध असेल तसे करत. त्यांच्या राहण्याचे एकत्रित ठिकाण नव्हते, ते अशिक्षित होते, मालकांकडे काही मागण्या मांडल्यास आहे ती नोकरी जाण्याचीही भीती होती. त्यामुळे त्यावेळचे कोणतेही कामगार नेते व कामगार संघटनादेखील या विखुरलेल्या अशिक्षित माथाडी कामगारांची संघटना बांधून, त्यांच्या न्याय मागण्या शासनाकडे मांडून, शासनाला त्यांचे कल्याणाची भूमिका घेण्यास भाग पाडत नव्हत्या.[३५]

अशा प्रकारे माथाडी कामगार संघटित होण्यापूर्वीच्या काळात त्यांचे कल्याणविषयक शासनाची कोणतीही ठोस भूमिका नव्हती आणि शासन व माथाडी हमाल कामगार यांचे परस्पर संबंधही प्रस्थापित झालेले नव्हते. शासन स्तरावर या कामगारांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी कोणतेही विशेष धोरण व योजना नव्हत्या.

### ४.२.२ माथाडी कामगार संघटित झाल्यानंतर सन १९६० ते १९६९ मध्ये माथाडी कायदा पास होईपर्यंतचा काळ :

श्री. अण्णासाहेब पाटील गोदीत हमालीचे आणि नंतर क्रेन ड्रायव्हर म्हणून काम करत होते. हे काम करताना तेथील कामगार संघटनेतही सक्रिय काम करत होते. संघटनेतील प्रस्थापित पदाधिकाऱ्यांनी श्री. अण्णासाहेब पाटलांचा वाढता प्रभाव पाहून त्यांना संघटनेतून काढून टाकले.[३६] या घटनेमुळे श्री. अण्णासाहेब पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह गोदीतील तसेच गोदीबाहेरील हमालांना दुसऱ्याच दिवशी एकत्रित करण्यास सुरुवात केली आणि ४००–५०० हमालांची सभा घेतली. हे सर्व हमाल कामगार सातारा व पश्चिम महाराष्ट्र परिसरातून मुंबईत नोकरीसाठी आलेले होते. पुढे दि. १५ डिसेंबर १९६३ रोजी त्यांनी या संघटनेची महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन या नावाने रितसर नोंदणीही केली.[३७] अशा प्रकारे माथाडी कामगार संघटित होवून त्यांनी मागण्या मांडल्यावर शासनाला त्यांची दखल घ्यावी लागली. श्री. यशवंतराव चव्हाण हे द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाल्यावर माथाडी कामगारांचे वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी त्यांनी कामगारांविषयीची शासनाची भूमिका मांडताना आपल्या भाषणात नमूद केले की, “हे सरकार कामगार वर्गावर अन्याय होवू देणार नाही. या राज्यात कामगारांना न्याय मिळेल याची खात्री बाळगा.”[३८]

यानंतर पुन्हा माथाडी कामगार संघटनेचे पदाधिकारी, जावळीचे माजी आमदार श्री. भिलारे गुरुजी, श्री. काकासाहेब थोरात यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची भेट घेवून हमाल कामगारांच्या व्यथा मांडला. त्यावेळी श्री. यशवंत चव्हाण यांनी त्यांचे म्हणणे मान्य केले. मात्र, त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राचा लढा सुरु असल्यामुळे थोडाकाळ वाट पाहण्यास

सांगीतले आणि दरम्यान माथाडी कामगारांना जास्तीत जास्त संख्येने एकत्र आणून माथाडी कामगार संघटना मजबूत करण्याचा सल्ला दिला.[३९] दि. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची स्थापना होवून श्री. यशवंतराव चव्हाण हेच मुख्यमंत्री झाले. मुंबईतील दाणा बंदर भागात मांडवी स्ट्रीट माथाडी कामगार संघटनेने आयोजित केलेल्या समारंभात त्यांचा सत्कार केला. या सत्कार समारंभास हजारो हमाल माथाडी कामगार उपस्थित होते. या सत्कार समारंभाच्या भाषणात त्यांनी नमूद केले की,

> "कालचे सरकार व आजचे सरकार या मध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. कालपर्यंत मी द्विभाषिक राज्याचा मुख्यमंत्री होतो तर आज मी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे. कामगारांच्या हिताचे जे जे काही असेल ते सर्व तुम्ही करा. माझा तुम्हाला पूर्ण पाठिंबा राहिल."[४०]

अशा प्रकारे माथाडी कामगार संघटित होवून शासनाकडे आपली स्थिती मांडू लागल्यावर शासनानेही तात्काळ आपली सकारात्मक भूमिका स्पष्ट केली. तसेच माथाडी कामगारांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी या संघटनेच्या नेत्यांना व माथाडी कामगारांना पूर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले.

दि. ९ सप्टेंबर १९६२ रोजी माथाडी कामगार संघटनेने मोर्चा काढून महाराष्ट्र शासनाने माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची मागणी केली. सन १९६२ ते १९६९ या कालावधीत स्वतंत्र कायदा आणि पगारवाढ व इतर मागण्यांसाठी अनेक वेळा संप, निदर्शने, उपोषणे केली.[४१] या दरम्यान शासनाने माथाडी कामगारांच्या हिताची भूमिका घेवून वेळोवेळी मदतच केली आहे. तसेच काही वेळा आवश्यकतेनुरुप बिकट परिस्थितीतही हस्तक्षेप करुन व्यापाऱ्यांना चर्चेस भाग पाडले. दि. १० सप्टेंबर १९६२ पासून मुंबईतील सर्व माथाडी कामगारांनी बेमुदत संप सुरु केला. सर्व व्यापार ठप्प होवून जनजीवनावर त्याचा विपरित परिणाम दिसू लागताच तत्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी पुरवठामंत्री श्री. तल्यारखान यांस

संपात मध्यस्थी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार कामगारांच्या मागण्या मान्य होवून संप मागे घेण्यात आला.[४२]

दि. १ एप्रिल १९६४ रोजी महिला व माथाडी कामगारांनी मजूरीतील दरवाढीसाठी बेमूदत संप सुरु केला. तसेच ३ एप्रिल १९६४ रोजी सामुदायिक सत्याग्रह करण्याचा इशारा दिला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी संपात मध्यस्थी घडवून आणली.[४३] माथाडी कामगारांना मजूरीत १२% वाढ मिळाली. ट्रान्सपोर्ट व्यवसायातील मालकांनी ही दरवाढ माथाडी कामगारांना न दिल्याने पुन्हा दि. १ जुलै १९६४ रोजी संपाचा इशारा दिला असता तत्कालीन मजूरमंत्री श्री. नरेंद्र तिडके यांनी मध्यस्थी करुन ही वाढ मिळवून दिली. दि. २ नोव्हेंबर १९६६ रोजी मजूरीतील दरवाढीसाठी माथाडी कामगार संघटनेने पुन्हा संप केला. यावेळी कामगार आयुक्त यांनी मध्यस्थी करुन १५% महागाई वाढ मिळाली. तसेच माथाडी कामगारांचे वेतनाची महागाई निर्देशांकाशी सांगड घालण्याचे तत्व मान्य करण्यात आले.[४४]

अशा प्रकारे माथाडी कामगारांनी केलेल्या न्याय मागण्यांना शासनाने वेळोवेळी प्रतिसाद दिला. माथाडी कामगारांना प्रचलित कामगार कायदे लागू होत नसल्यामुळे त्यांचे वेतनाबाबत निश्चित असे धोरण नव्हते. त्यामुळे त्यांना मजूरतील दरवाढीसाठी वारंवार संप करावे लागले. या संपादरम्यान शासनाने वेळोवेळी मध्यस्थी करुन मजूरीत दरवाढ मिळवून दिली.

### ४.२.३ माथाडी कायदा पारित झाल्यानंतरचा सन १९६९ नंतरचा काळ :

सन १९६३ ते १९६५ या कालावधीत शासनाने श्री. के. आर. पोवार, न्या. बी. एस. कालेलकर आणि श्री. शिवाजीराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली तीन वेगवगेळ्या अभ्यास समिती नेमून मुंबई परिसरातील माथाडी कामगार, लोखंडी जथा कामगार आणि असंघटित कामगारांची परिस्थिती सध्या काय आहे आणि यामध्ये काय सुधारणा करता येतील याची माहिती घेतली. या समितीच्या शिफारशींच्या आधारावर शासनाने माथाडी कामगार आणि मालकांच्या संघटनांशी

चर्चा करुन महाराष्ट्र माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाचे प्रारुप तयार केले. सदर प्रारुप विधानमंडळात सादर करुन, त्यामध्ये संयुक्त विधानमंडळ समितीच्या शिफारशींनुसार सुधारणा करुन शासनाने त्याचे कायद्यात रुपांतर केले.[४५] अशा प्रकारचा माथाडी कामगारांसाठी कायदा करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. माथाडी कामगारांप्रती असलेल्या सकारात्मक भूमिकेमुळेच राज्य शासनाने हा क्रांतीकारी कायदा करुन माथाडी कामगारांना नियमित रोजगार, श्रमाचा योग्य मोबदला आणि इतर सोयी सुविधा तसेच त्यायोगे समाजात सन्मान मिळवून दिला. तसेच या माथाडी मंडळाचे काम व्यवस्थित सुरु व्हावे म्हणुन सुरुवातीला प्रत्येक मंडळांना गरजेनुरुप कर्ज रुपात आर्थिक मदतसुध्दा दिली. याबाबतची कृतज्ञता म्हणून माथाडी कामगारांनी सन १९६९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री आणि मजूरमंत्री यांचा जाहिर सत्कार केला. तसेच दि. २६ जानेवारी १९७० रोजी माथाडी कायद्याचा स्वागत समारंभही तत्कालीन संरक्षणमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक, मजूरमंत्री श्री. नरेंद्र तिडके, गृहराज्यमंत्री श्री. शरद पवार इत्यादी शासन प्रतिनिधींच्या उपस्थितीत आयोजित केला होता.[४६]

अशा प्रकारे माथाडी कामगारांनी वेळोवेळी शासनाने त्यांचेप्रती ठेवलेल्या सकारात्मक भूमिकेची जाण ठेवली आहे. तसेच हे संबंध वृध्दींगत करण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला आहे.

माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान माथाडी कामगारांना वेळोवेळी शासनाशी संघर्षाची भूमिकाही घ्यावी लागली. सन १९७२ मधील खोका कामगारांच्या संपादरम्यान दगडफेक आणि लाठीमार झाला. श्री. अण्णासाहेब पाटील यांचेसह १५० कामगारांना अटक झाली होती.[४७] त्यावेळी कामगार व पोलीस प्रशासनाचे संबंध कमालीचे ताणले गेले होते. तसेच अहमदनगर येथील सन १९९५ च्या संपादरम्यान देखील दगडफेक होवून कामगारांना अटक झाली होती. सुरुवातीला केवळ मुंबईत आणि तद्नंतर पुणे, नाशिक, नागपूर यांसारख्या मोठ्या शहारातच माथाडी कायदा लागू करुन मंडळे स्थापन करण्यात आली होती. त्यामुळे राज्यातील उर्वरित जिल्ह्यातून देखील माथाडी मंडळे स्थापन करण्याची मागणी शासनाकडे वारंवार होत

होती. त्यासाठी अनेकवेळा संप, निदर्शने, मोर्चे आयोजित केले जात होते. माथाडी कामगारांच्या मंडळ स्थापनेच्या मागणीच्या तीव्रतेनुसार आणि स्थानिक परिस्थितीनुसार म्हणजे माथाडी कामगार व व्यापारी संख्या, जमा होवू शकणारी लेव्हीची संभाव्य रक्कम, मंडळाचे प्रशासन आणि कामगारांना द्यावयाचे लाभ यासाठी ही लेव्हीची रक्कम पुरेशी होईल का, या बाबींचा विचार करुन शासनाने राज्यात जिल्हावार माथाडी मंडळे स्थापन केली आहेत. केवळ यवतमाळ जिल्ह्यात माथाडी मंडळाची स्थापना होणे बाकी होते. तथापि या जिल्ह्यात देखील नुकतीच माथाडी मंडळाची स्थापना झाली असून मंडळाच्या व अध्यक्षांचीही नेमणूक आता झाली आहे.[४८] कामगारांची व मालकांची नोंद करणे व त्यांना विविध लाभ देणे आता सुरु होईल. कृषि उत्पन्न बाजार समिती आवारात माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीचा प्रश्न सतत उद्‌भवतो. मात्र माथाडी कामगार व शासन यांच्या सामंजस्याच्या भूमिकेने या प्रश्नावरही मात करण्यात येत आहे. तथापि अशी उदाहरणे वगळता माथाडी कामगार आणि शासन व प्रशासनाचे संबंध नेहमीच सामंजस्याचे राहिले आहेत. माथाडी कामगार नेत्यांनी कामगारांच्या कल्याणासाठी आवश्यकतेनुसार शासनाविरुध्द आक्रमक भूमिका घेतली आहे. मात्र कामगारांचे हित लक्षात घेवून काही वेळा दोन पावले माघार देखील घेतली आहे.[४९] सन १९७२ च्या खोका कामगारांचे आंदोलनादरम्यान श्री. अण्णासाहेब पाटील यांस अटक होवूनही आणि अनेक माथाडी कामगारांना पोलीस लाठीमारात मार लागूनही केवळ अटक झालेल्या कामगारांवर गुन्हे दाखल होवून त्यांचे पुढील आयुष्याचे नुकसान होवू नये म्हणून श्री. अण्णासाहेब पाटील यांनी अपमान सहन करत युक्तीचा वापर करुन कामगारांची सुटका करुन घेतली. त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना बिहारमधील दुष्काळग्रस्तांना माथाडी कामगारांकडून मदत निधी देण्याच्या कार्यक्रमाला बोलावले. याच्या परिणाम स्वरुप, अडचणीतील देशबांधवांना मदत करण्याचा माथाडी कामगारांचा दृष्टिकोन पाहून मा.मुख्यमंत्री महोदयांनी अटक झालेल्या कामगारांना सोडण्याचे आदेश दिले. माथाडी कामगारांनी शासनातील मंत्री, सचिव, कामगार आयुक्त, मंडळाचे अध्यक्ष, प्रशासनातील अधिकारी यांचेशी नेहमीच सलोख्याचे संबंध राहतील याची

काळजी घेतली. त्यांनी मुख्यमंत्री, मंत्री, शासकीय अधिकारी यांचा सार्वजनिक कार्यक्रमातून नेहमीच आदर सत्कार केला आहे.[५०] असे सत्कार प्रमुख्याने माथाडी युनियनच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते न करता सर्वसामान्य माथाडी कामगारांच्या हस्ते करण्यात येत. यामुळे माथाडी कामगार आणि शासन प्रतिनिधी यांचेत एक सृदृढ संबंध निर्माण झाले आहेत.

माथाडी कामगारांनी देशावरील परकीय आक्रमणाचे वेळी नेहमीच मदतीचा हात दिलेला आहे.[५१] सन १९६२ चे चीनी आक्रमण, सन १९६५ चे पाकिस्तान बरोबरचे युध्द आणि सन १९७१ च्या बांगलादेश बरोबरच्या युध्दाच्यावेळी माथाडी कामगारांनी रक्तदान करुन सिमेवरील जखमी जवानांचे प्राण वाचविलेले आहेत. तसेच बांगलादेश बरोबरच्या युध्दात अमेरिकेच्या भारत विरोधी धोरणाचा निषेध म्हणून २५०० माथाडी कामगारांनी अमेरिकन वकालातीवर निषेध मोर्चा नेला होता. त्याचवेळी या युध्दात रशियाने केलेल्या मदतीबद्दल रशियन वकालीतीवर जावून कृतज्ञता व्यक्त केली होती.[५२] अशा प्रकारे माथाडी कामगारांनी नेहमीच आपले देशप्रेम व्यक्त केले आहे. डिसेंबर १९६७ मध्ये झालेल्या कोयनानगर भूकंपातील दुर्घटनाग्रस्त बांधवांना आर्थिक व इतरही मदत माथाडी कामगारांनी दिलेली आहे. त्याचबरोबर मोरवी, गुजरात येथील पुरग्रस्त, आंध्रप्रदेशातील चक्रीवादळाने बाधीत झालेले देश बांधव यांनाही माथाडी कामगारांनी मदत केली आहे.[५३] अशा प्रकारे परकीय आक्रमणासोबतच नैसर्गिक आपत्तीचे वेळी देखील होता होईल तितका मदतीचा हात आपल्या देशबांधवांना दिला आहे. सन १९७७ च्या आणीबाणी मध्ये तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी राष्ट्रीय उत्पादन वाढीसाठी आवाहन केले होते. याला प्रतिसाद म्हणून माथाडी कामगारांनी सुट्टीच्या दिवशीदेखील काम करण्याचा निर्णय घेतला होता.[५४] यातून आपल्या राष्ट्रीय नेत्याला अडचणीचे वेळी आपल्या परीने प्रतिसाद देवून मदत करण्याचा माथाडी कामगारांचा आणि त्यांच्या नेत्यांचा दृष्टिकोन दिसून येतो. तसेच माथाडी कामगारांच्या वतीने राष्ट्रीय महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी, राष्ट्रीय सण नियमितपणे साजरे केले जात.[५५] ती परंपरा आजही सुरु आहे. माथाडी कामगारांमध्ये राष्ट्रीय भावनेची व एकात्मतेची जाणीव सतत रहावी हा यामागे उद्देश होता.

माथाडी कामगारांचा घरांचा मुलभूत प्रश्न लक्षात घेवून शासनाने माथाडी कामगारांच्या घरांसाठी भूखंड तसेच म्हाडा आणि सिडकोकडून तयार सदनिका अल्प किंमतीत दिलेल्या आहेत.[५६] अशा प्रकारच्या माथाडी कामगारांच्या वसाहती कांदिवली, कुर्ला, मुलुंड, कोपरखैरणे, वडाळा, चेंबुर, पुणे, नागपूर येथे निर्माण झालेल्या आहेत.

अशा प्रकारे शासनाने माथाडी कामगारांप्रती नेहमीच कल्याणकारी भूमिका ठेवलेली आहे. तसेच माथाडी कामगारांनी आपल्या न्याय मागण्यांसाठी शासनाबरोबर वेळोवेळी संघर्ष केला असला तरी सर्वसाधारणत: सलोख्याचेच संबंध ठेवलेले आहेत. शासनाशी सलोख्याचे संबंध ठेवून माथाडी कामगारांचे जास्तीत जास्त प्रश्न सोडविण्यावर माथाडी कामगार नेत्यांनी भर दिला आहे. सुरुवातीच्या महाराष्ट्र माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन आणि तद्नंतर या मातृसंघटननेतून अलग झालेल्या अन्य संघटनांनी काँग्रेस सत्ताधारी पक्षाची किंवा त्यातून विलग झालेल्या राजकीय पक्षाशी जवळीक ठेवली आहे. हमाल पंचायत, पुणे या संघटनेने माथाडी कायद्याच्या राज्यभर अंमलबजावणीसाठी सातत्याने शांततामय मार्गाने प्रयत्न केले आहेत. डॉ. बाबा आढाव यांचे कामामुळे शासनाकडून तसेच शासकीय अधिकाऱ्यांकडून त्यांना नेहमीच कृतज्ञतेची आणि सन्मापूर्वक वागणूक देण्यात आलेली आहे. यामुळे देखील हमाल माथाडी कामगारांचे प्रश्न शासन स्तरावर मांडणे व त्यावर उपाययोजना करणे सुलभ होते. माथाडी चळवळ सुरु करणारे माथाडी पदाधिकारी तसेच बहुतांश माथाडी कामगार पश्चिम महाराष्ट्रातील विशेषत: सातारा, सांगली, पुणे जिल्ह्यातील होते. तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, श्री. वसंतदादा पाटील, श्री. शरद पवार हे देखील याच जिल्ह्यामधील होते. त्यामुळे माथाडी चळवळीतील नेते आणि राज्यकर्ते यांचे बहुतांश सलोख्याचे संबंध राहून त्याचा फायदा राज्यातील माथाडी कामगारांना सोयी सुविधा मिळण्यात झाला.

### ४.२.४ महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियमाच्या अधिक चांगल्या अंमलबजावणीसाठी शासनाने नेमलेल्या समित्या :

राज्यशासनाने माथाडी अधिनियमाची अंमलबजावणी सुरु केल्यावर विविध माथाडी मंडळाच्या कामकाजाचा अभ्यास करणे आणि त्यांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणणे तसेच कायद्याच्या अंमलबजावणीत आलेल्या अडचणी, त्रुटी काही विशिष्ट घटना यांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी शासनाने वेळोवेळी तज्ञ व अनुभवी व्यक्तींच्या अध्यक्षतेखाली समिती नेमल्या. त्यांच्या शिफारशींचा विचार करुन माथाडी मंडळाच्या कामकाजात सुधारणा घडवून आणल्या. या समित्या पुढील प्रमाणे आहेत.

**४.२.४.१ राज्य सल्लागार समितीची पहिली उपसमिती :**

राज्य माथाडी सल्लागार समितीच्या दि. ३ नोव्हेंबर १९७६ रोजी झालेल्या १५ व्या बैठकीत श्री. गजानन लो. के., माजी आमदार यांचे अध्यक्षतेखाली उपसमिती नेमण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शासनाने दि. ४ मार्च १९७७ रोजी उपसमिती नेमली.[५७] या उपसमितीने सर्व माथाडी मंडळाच्या कामाचा अभ्यास करुन त्यात सुधारणा व्हावी या दृष्टीने काही मार्गदर्शक तत्त्वे ठरवून द्यावी अशी उपसमितीची कार्यकक्षा होती.

या उपसमितीने विशेष काही कार्यवाही केली नाही.

**४.२.४.२ राज्य सल्लागार समितीची दुसरी उपसमिती :**

श्री. गजानन लो. के. यांचे अध्यक्षतेखालील उपसमितीने नेमून दिलेल्या कार्यकक्षेबाबत विशेष कार्यवाही न केल्याने श्री. अण्णासाहेब पाटील, महाराष्ट्र राज्य माथाडी आणि जनरल ट्रान्सपोर्ट युनियनचे सरचिटणीस यांचे अध्यक्षतेखाली दि. ३१ मे १९७९ रोजी दुसरी उपसमिती नेमली.[५८] तथापि श्री. अण्णासाहेब पाटील यांचे अकाली निधनामुळे व अन्य कारणास्तव ही दुसरी उपसमितीदेखील अहवाल सादर करु शकली नाही.

**४.२.४.३ राज्य सल्लागार समितीची तिसरी उपसमिती :**

राज्य सल्लागार समितीच्या ३५ व्या बैठकीत डॉ. बाबा आढाव यांचे अध्यक्षतेखालील एक त्रिपक्षीय समिती स्थापन करण्यात आली. श्री. एस. पी. खोसला, मालक प्रतिनिधी आणि श्री. बाबुराव हरी रामिष्टे, कामगार प्रतिनिधी या उपसमितीचे सदस्य होते. माथाडी मंडळाच्या

कामाचा अभ्यास करुन मंडळात एकसुत्रीपणा कसा येईल याबाबत शिफारशी करणे ही या उपसमितीची कार्यकक्षा होती. या समितीने दि.२६.८.१९८८ रोजी एक अंतरिम अहवाल आणि तद्नंतर अंतीम अहवाल सादर केला.[५९] या समितीने आपल्या अहवालात एकूण ५५ शिफारशी केल्या. त्यापैकी काही प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१) प्रत्येक माथाडी मंडळात सुरुवातीस किमान २६ ते ३० % लेव्ही ठेवावी.

२) माथाडी कामगारास कामावर ठेवताना वयाची किमान १८ वर्षांची अट असावी. तसेच सेवानिवृत्तीची मर्यादा कमाल ७० वर्षे असावी.

३) जी अनुषंगिक कामे स्त्री कामगार करतात अशा कामांचा अधिनियमात समावेश करुन स्त्री कामगारांनाही माथाडी कायद्याचा लाभ द्यावा.

४) सरकारी व निमसरकारी संस्थांना माथाडी मंडळामध्ये नोंद करुन घेवून त्यांचे अंतर्गत काम करणाऱ्या माथाडी कामगारांना या कायद्याचा लाभ मिळवून देणे.

५) कायदा लागू करण्याबाबत प्रकरण न्याय प्रविष्ट असले तरी मंडळाच्या अस्तित्वापासूनच मालकाने लेव्हीची रक्कम भरावी. अशी न्यायालयात मंडळाने बाजू मांडावी.

६) कृषि उत्पन्न बाजार समिती कायदा आणि माथाडी कायदा यांचेतील संघर्षाबाबत अजित निंबाळकर समितीच्या शिफारशींनुसार जिल्हा व राज्य स्तरावर समन्वय समिती नेमण्यात याव्या.

७) राज्य पातळीवर माथाडी बँक स्थापन करावी व तिच्या शाखा प्रत्येक बोर्डाच्या ठिकाणी उघडाव्यात.

८) माथाडी मंडळावर पूर्ण वेळ अध्यक्ष व सचिव तसेच अन्य कर्मचारी नेमणे. या सर्वांना आवश्यक प्रशिक्षण देणे. कर्मचाऱ्यांच्या अधिभाराचा अभ्यास करण्यासाठी सक्षम अधिकारी नेमणे.

९) स्वतंत्र माथाडी कक्ष कामगार आयुक्त कार्यालयात सुरु करणे.

१०) माथाडी कामगारांची न्यायालयीन प्रकरणे जलद गतीने हाताळण्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करणे.

११) माथाडी अधिनियम आणि माथाडी योजनांत सुधारणा करणे.

तसेच त्रिपक्षीय मंडळाची पुनर्रचना होईपर्यंत जुन्या मंडळास काळजीवाहू मंडळ म्हणून कायम ठेवणे, दंडाची किमान मर्यादा रु. ५०० पेक्षा जास्त करणे, इत्यादी सुधारणांबाबत शिफारशी करण्यात आल्या.[६०]

अशा प्रकारे आढाव समितीने माथाडी मंडळाच्या कामकाज पध्दतीचा पूर्णत: अभ्यास करुन शिफारशी केल्या आहेत. यापैकी स्वतंत्र माथाडी कक्ष स्थापन करणे, मंडळाचे कामाचे अनुषंगाने कर्मचारी वृंदाची आवश्यकता, अधिकारी–कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, दंडाची मर्यादा वाढविणे इ. शिफारशींची अंमलबजावणी शासनाने केलेली आहे.

### ४.२.४.४ डी. बी. देव समिती :

माथाडी मंडळातील कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध आणि सेवेच्या इतर शर्ती यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने दि. २९ ऑक्टोबर १९९० रोजी श्री. डी. बी. देव यांची एक सदस्यीय समिती नेमली.[६१] या समितीने दि. ८ फेब्रुवारी १९९१ रोजी अहवाल सादर केला. या समितीने राज्यभरातील माथाडी मंडळाचा त्यांच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन तेथील कर्मचारी संख्या, अधिकाऱ्यांच्या नेमणूका, कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती व पदोन्नती याबाबत प्रामुख्याने शिफारशी केल्या आहेत.[६२] माथाडी कामगारांना चांगले लाभ द्यावयाचे असतील तर माथाडी मंडळे प्रशासकीयदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. मंडळाचा कर्मचारी वर्ग पुरेसा आणि प्रशिक्षित असणे आवश्यक आहे. याबाबी लक्षात घेता देव समितीच्या शिफारशी महत्त्वपूर्ण आहेत.

### ४.२.४.५ रत्नाकर गायकवाड समिती :

सन १९९० च्या दरम्यान माथाडी मंडळाच्या काही बँकातील ठेवी बँक घोटाळा प्रकरणामुळे बुडाल्या तसेच काही मंडळातील आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दि. १ मार्च १९९४ रोजीच्या बैठकीत याबाबत तातडीने काही

शिफारशी करण्याचे निर्देश तत्कालीन कामगार आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड यांना दिले. त्यानुसार कामगार आयुक्त यांनी कामगार संघटना, मालक प्रतिनिधी, मंडळाचे अध्यक्ष, डॉ. बाबा आढाव आणि श्री. डी. बी. देव समितीच्या शिफारशी या सर्वांचा साकल्याने विचार करुन दि. ७ एप्रिल १९९४ रोजी आपला अहवाल सादर केला.[६३] या अहवालातील काही प्रमुख शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

१) माथाडी मंडळावर वित्त व लेखा विभागाचे वर्ग २ व ३ चे कर्मचारी नेमणे.

२) लेखा मार्गदर्शिका (अकाऊंट मॅन्युअल) तयार करणे.

३) देयक (बील) पध्दत लागू करणे, मजूरी व लेव्ही वेळेवर आणि पूर्णपणे मिळावी या करीता शासनाने सदर पध्दती सर्व माथाडी मंडळांना लागू करावी.

४) नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन धनादेशाद्वारे किंवा बँकाद्वारे देणे.

५) मंडळाची आर्थिक हिशोब तपासणी ही संचालक, लेखा व वित्त यांचे अधिनस्थ वरीष्ठ लेखा परिक्षकाकडून करुन घ्यावी.

६) कामगार आयुक्त कार्यालयातील माथाडी कक्ष अधिक सक्षम करावा, तेथे भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी नेमावा.

७) मंडळाचे कर्मचारी सक्तीने सेवा योजना किंवा दुय्यम सेवा मंडळामार्फत भरावे.

८) ३००० कामगार नोंद असणाऱ्या मंडळावर पूर्णवेळ अध्यक्ष, सचिव नेमावा.

९) मंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य नागरी सेवा नियम लागू करावेत.

१०) कामगार आयुक्तांना अंमलबजावणीचे अधिकार द्यावेत.

११) स्वतंत्र दंडाधिकारी न्यायालय निर्माण करावे.[६४]

अशा प्रकारे श्री. रत्नाकर गायकवाड, तत्कालीन कामगार आयुक्त यांनी मंडळाच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचे दृष्टीने महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या.

**४.२.४.६ दिनकर पगार समिती :**

माथाडी मंडळे आणि सुरक्षा रक्षक मंडळाच्या बुडीत बँकातील ठेवींबाबत चौकशी व तपासणी करण्यासाठी प्रधान सचिव (कामगार) यांचे नियंत्रणाखाली सदर उपसमिती नेमली होती. तत्कालीन कामगारमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी विधानमंडळात सन २००९ च्या हिवाळी अधिवेशनात श्री. शशीकांत शिंदे, आमदार यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान दिलेल्या आश्वासनानुसार सदर समिती नेमली होती. शासन निर्णय दि. ५.१०.२०१० अन्वये सदर समिती नेमली होती.[६५] या उपसमितीने सन २०११ मध्ये अहवाल सादर केला. उपसमितीने आपल्या अहवालात बँकनिहाय आणि माथाडी मंडळ निहाय बुडीत रकमा, याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश, मंडळावरील तत्कालीन शासकीय व अशासकीय सदस्य, या प्रकरणी शासनाने अधिकाऱ्यांवर केलेली कारवाई आणि याबाबत न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या बाजूने दिलेले निर्णय या सर्व बाबींचे तपशिलवार संकलन केले आहे.[६६]

शासनाने माथाडी अधिनियम तयार करण्यापूर्वी तसेच या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाल्यावरही मंडळाच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी वेळोवेळी समित्या व उपसमिती नेमून त्यांचे शिफारशीनुसार आवश्यक कार्यवाही केलेली आहे. अशा प्रकारे शासनाने माथाडी कायद्याची जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे कशी अंमलबजावणी करता येईल याचा विचार केलेला आहे.

**४.२.४.७ अजित निंबाळकर समिती :**

माथाडी अधिनियम व कृषि उत्पन्न बाजार समिती अधिनियम यांच्या काही तरतूदींची अंमलबजावणी करताना या तरतूदी दोहोंपैकी कोणत्या संस्थेने राबवाव्यात यावरुन संघर्ष होत होता. यावर राज्य माथाडी सल्लागार समितीच्या बैठकीतही वारंवार चर्चा होत असते. दि. ७.७.१९८४ रोजीच्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संबंधित विभाग प्रमुख आणि या विषयाशी संबंधित असलेल्या तज्ञांची एक समिती नेमण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार श्री. अजित निंबाळकर, सचिव कृषि व सहकार विभाग यांचे अध्यक्षतेखाली आणि कामगार आयुक्त श्री. पी.

जे. ओविड, पणन संचालक श्री. द. आ. दळवी, कामगार नेते डॉ. बाबा आढाव व श्री. काशीनाथ वळवईकर आणि मालक प्रतिनिधी श्री. वांद्रे संचेती आणि श्री अभयकुमार कासलीवाल यांचा समावेश असलेली समिती नेमण्यात आली.[६७]

माथाडी कामगारांची नोंदणी, हमालीचे, तोलाईचे दर ठरवणे, लेव्ही वसूल करणे आणि माथाडी कामगारांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करणे या चार मुद्द्यांबद्दलची कार्यवाही माथाडी मंडळाने करावी की कृषि उत्पन्न बाजार समितीने करावी हे संघर्षाचे मूळ आहे. यावर दि. ३.११.१९८५ रोजी समितीने सविस्तर चर्चा केली. स्थानिक पातळीवरील कृषि उत्पन्न बाजार समिती आणि माथाडी मंडळ यांची एक समन्वय समिती नेमण्यात यावी. या समितीद्वारे वाद न मिटल्यास राज्य पातळीवरील नेमलेल्या समन्वय संयुक्तीकडे हे वाद सोपवावेत. या समितीने शक्यतो तीन महिन्यात निर्णय द्यावा आणि निर्णयाची सर्व संबंधितांनी सन्मानपूर्वक अंमलबजावणी करावी, अशा शिफारशी समितीने दि.१९.१.१९८५ रोजी सादर केलेल्या अहवालाद्वारे केल्या.[६८]

या समितीच्या शिफारशी व दोन्ही अधिनियमातील तरतूदींचा विचार करुन याबाबत शासनाने दि. ७ जून १९८८ आणि दि. १९ फेब्रुवारी १९९० च्यापत्रान्वये सर्व संबंधितांना निर्णय कळविला की माथाडी कायदा हा असंरक्षित कामगारांच्या हितासाठी तयार करण्यात आलेला एक विशेष कायदा असल्यामुळे त्याच्याच तरतूदी वादांच्या मुद्द्यावर अंतिमत: वैध राहील. निंबाळकर समितीने शिफारस केल्यानुसार समन्वय समिती स्थापन करण्याची आवश्यकता नाही.[६९] अशा प्रकारे शासनाने या विषयी देखील माथाडी कामगारांच्याच कल्याणाची भूमिका घेतली आहे.

## ४.३ माथाडी कामगार संघटनांचे कल्याणकारी काम :

माथाडी कामगारांसाठी कार्यरत असणाऱ्या कामगार संघटनांनी सुरुवातीपासूनच माथाडी कामगारांच्या सर्वांगिण विकासासाठी अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. माथाडी कामगार हे अशिक्षित, ग्रामीण भागातील, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल असल्यामुळे त्यांना नियमित

रोजगार, योग्य वेतन मिळण्याबरोबरच यांच्या मानसिकतेत बदल घडविणे, त्यांच्या आयोग्याची काळजी घेणे, त्यांचे प्रबोधन करणे याबाबी देखील तितक्याच महत्त्वाच्या आहेत. याची जाणीव या कामगार संघटनांना होती आणि म्हणूनच त्यांनी विविध उपक्रम सुरु केले. याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### ४.३.१ महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनचे उपक्रम :

राज्यातील मुंबई गोदीबाहेरील सर्व माथाडी कामगारांची स्थापन करण्यात आलेली ही पहिली संघटना आहे. या संघटनेने सुरुवातीच्या काळात सुरु केलेल्या उपक्रमांचा माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर मोठा परिणाम झाला, त्यामुळे या संघटनेने सुरु केलेले उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतात. या संघटनेने पुढील उपक्रम सुरु केले.

#### ४.३.१.१ बृहन्मुंबई माथाडी कामगार सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई :

माथाडी कामगारांना मिळणारी मजूरी पुरेशी नव्हती. त्यामुळे त्यांना घरातील लग्न, आजारपण अथवा अन्य तातडीच्या कामासाठी एकतर सावकाराकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घ्यावे लागे किंवा मालकाकडून आगावू पैसे किंवा उचल घ्यावी लागे. या दोन्ही प्रसंगामुळे माथाडी कामगार आयुष्यभर कर्जबाजारी राहत असे किंवा मालकापुढे लाचार होत असे. यावर उपाययोजना करण्यासाठी दि. ८ जुलै १९६९ रोजी बृहन्मुंबई माथाडी कामगार सहकारी पतपेढीची स्थापना करण्यात आली.[७०] या पतपेढीचे उद्घाटन मा. श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी केले. माथाडी कामगारांना गरजेवेळी कमी दराने कर्ज उपबल्ध करुन देणे तसेच त्यांना बचतीची सवय लावणे या दोन हेतूने या पतपेढीची स्थापन करण्यात आली. श्री. साहेबराव शेलार यांनी या पतपेढीची संपूर्ण जबाबदारी पहिल्यापासून विश्वासपूर्वक पार पाडली. सुरुवातीच्या काळात पतपेढीची सभासद संख्या ३८३ होती. आता ३५९३७ इतकी सदस्य संख्या आहेत. तसेच सुरुवातीचे भागभांडवल रु. ३९९३०/– इतके होते. ते आता रुपये ५० कोटी इतके आहे.[७१]

या पतपेढीमुळे माथाडी कामगारांची सावकाराकडून कर्ज घेण्यापासून सुटका झाली. तसेच त्यांना बचतीची सवय लागली आहे. या पतपेढीमुळे माथाडी कामगारांचे आर्थिक जीवन संरक्षित होवून ते स्वाभिमानाने जगू लागले.

### ४.३.१.२ माथाडी हॉस्पीटल :

माथाडी कामगारांचे काम मुख्यत: शारीरिक कष्टाचे काम असते. त्याला सातत्याने ५० किलो किंवा त्यापेक्षा जास्त वजनाचे ओझे उचलावे लागते. तसेच त्यांना आरोग्याला हानीकारक अशा वातावरणात सतत काम करावे लागते. त्यामुळे त्यांना मणक्याचे, सांध्याचे, श्वसनाचे, त्वचेचे आजार अशा अनेक प्रकारच्या आजारांना तोंड द्यावे लागते.[७२] तसेच अचानक होणारे अपघात आणि त्यातून होणाऱ्या दुखापती यासाठी वारंवार तोंड द्यावे लागते. हे सर्व आजार आणि अपघात कसे टाळता येतील या बाबतची जाणीव जागृती माथाडी कामगारांमध्ये करणे आवश्यक होते. तसेच जर आजार किंवा अपघात झालाच तर त्यावर वेळीच आणि वाजवी दरात उपचार होणे हे देखील आवश्यक होते. त्यामुळे श्री. अण्णासाहेब पाटील यांनी माथाडी हॉस्पीटलची उभारणी केली.[७३]

सर्वप्रथम किराणा बाजार व दुकाने मंडळ, बृहन्मुंबई यांनी दि. १ जुलै १९७६ रोजी दवाखाना सुरु केला.[७४] डॉ. के. आर. तोरस्कर या दवाखान्याचे काम सुरुवातीला पहात. हा दवाखाना अर्धवेळच असायचा. पुढे सन १९७८ मध्ये बॉम्बे हॉस्पीटलचे डॉ.नाईक यांनी श्री. अण्णासाहेब पाटलांच्या विनंतीवरुन आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि माथाडी हॉस्पीटलची पूर्णवेळ जबाबदारी स्वीकारली.[७५] डॉ. नाईक आज देखील या हॉस्पीटलचे कामकाज तळमळीने पहात आहेत. दि. ९ डिसेंबर १९७९ रोजी माथाडी शुश्रुषा गृह असे या हॉस्पीटलचे नामकरण करण्यात आले. तसेच त्याची रितसर नोंदणीही धर्मदाय आयुक्तांकडे करण्यात आली. मुंबईतील वेगवेगळ्या माथाडी मंडळातील कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना नाममात्र वर्गणी घेवून सर्व वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात. माथाडी मंडळाच्या लेव्हीतील ठरावीक रकमेमधून या

हॉस्पीटलचा खर्च भागविला जातो. या हॉस्पीटलच्या अलिबाग, रसायनी, पनवेल, चेंबुर, मुलुंड या ठिकाणी शाखाही आहेत. कामगारांवर आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात तसेच औषधेही विनामूल्य दिली जातात. सद्यस्थितीत या हॉस्पीटलमध्ये २७ पूर्णवेळ डॉक्टर आहेत तसेच १२ व्हिजीटींग डॉक्टरही आहेत.[७६]

माथाडी कामगारांचे कामाचे स्वरुप आणि त्यातून त्यांना होणारे विशिष्ट आजार लक्षात घेवून हॉस्पीटलने याविशिष्टआजारांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असणारी उपकरणे घेतलेली आहेत. तसेच माथाडी कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना आजार होवू नयेत यासाठी शिबीरे, व्याख्याने, प्रदर्शने इत्यादी माध्यमातून त्यांचेत जागृती केली जाते.[७७]

अहमदनगर येथे देखील हमाल पंचायतीने शासनाच्या मदतीने स्वतंत्र हॉस्पीटल उभारले आहे.[७८] या हॉस्पीटलचे उद्‌घाटन त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी केले. तसेच शासनाचा सहभाग म्हणून रुपये १५ लक्ष आर्थिक मदतही दिली. डॉ. बाबा आढाव यांनी देखील पुणे माथाडी मंडळ आणि हमाल पंचायतीच्या माध्यमातून पुणे रेल्वे यार्डात दवाखाना सुरु केला आहे.[७९]

अशा प्रकारे सन १९७० पूर्वी ज्या माथाडी कामगाराला गंभीर अपघात झाल्यावरही उपचार मिळत नसत, जर अपंग होवून जगलाच तर त्याच परिस्थितीत उर्वरीत आयुष्य जगावे लागे, त्या माथाडी कामगाराला आता त्याच्या हक्काच्या दवाखान्यात तात्काळ मदत मिळते. तसेच कामगारावर तातडीने उपचार होत असल्यामुळे कामगार शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहतात व मालकांच्या कामातही खंड पडत नाही. या दवाखान्यासाठी मालकांची देखील सहमती व सहकार्य आहे. याचा परिणाम मालक कामगार यांचे संबंध चांगल्या प्रकारे राहण्यावर होत आहे.

### ४.३.१.३ माथाडी ग्राहक भांडार :

माथाडी कामगारांची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे त्यांना दैनंदिन गरजेसाठी तसेच संसारोपयोगी विविध वस्तू उधारीवरच घ्याव्या लागत. त्यामुळे त्याला दर्जा व किंमत याबाबत आग्रही राहता येत नसे. तसेच उधारीमुळे दुकानदार अधिक दराने आणि हलक्या

दर्जाच्या वस्तू देत. यातून माथाडी कामगारांची फसवणूक होत असे. माथाडी कामगारांनी आणीबाणीच्या काळात,सन १९७६ मध्ये त्यावेळच्या प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या आवाहानाला प्रतिसाद देवून उत्पादन वाढीसाठी सुट्टीच्या दिवशीही काम केले.[८०] या सुट्टीच्या दिवसाचे वेतन त्यांनी माथाडी कामगार संघटनेकडे जमा केले आणि त्याचा वापर सहकारी ग्राहक सोसायटीच्या उभारणीसाठी भागभांडवल म्हणून करण्याचा निर्णय घेतला. यातूनच दि. ३० सप्टेंबर १९७६ रोजी माथाडी कामगार ग्राहक सोसायटी मर्यादित मुंबई या संस्थेची उभारणी झाली.[८१] किराणा माल, कापड, साड्या, छत्र्या, रेनकोट, स्कूलबॅग्ज इत्यादी वस्तूही सोसायटी माथाडी कामगारांना वाजवी दरात व उधारीवरही पुरवते. सुरुवातीला या संस्थेची सभासद संख्या ५१०९ होती तर भागभांडवल ४.८८ लक्ष होते. यामध्ये हळूहळू वाढ होत गेली.[८२] ग्राहक भांडाराची मुख्य शाखा मस्जिद बंदर येथे आहे. तसेच वाशी आणि कळंबोली येथेही दोन शाखा उघडण्यात आल्या आहेत.

अशा प्रकारे माथाडी कामगारांची प्राथमिक गरज लक्षात घेवून ग्राहक भांडाराची स्थापना करण्यात आली आहे. यामुळे आता माथाडी कामगार स्वाभीमानाने आवश्यक त्या वस्तू ग्राहक भांडारातून घेत आहेत. तसेच त्यांना योग्य दर्जाच्या व योग्य दराने वस्तू मिळत आहेत.

### ४.३.१.४ माथाडी कामगारांच्या गृहबांधणी योजनांसाठी प्रयत्न :

मुंबईतील घराचा प्रश्न ही गंभीर समस्या आहे. त्यामुळे माथाडी कामगारांना आयुष्यभर मुंबईत कष्ट करावे लागे आणि त्यांची कुटुंबे गावी राहत. त्यामुळे कौटुंबिक सहवास तर नव्हताच मात्र मुलांचे शिक्षण, करीयर यावरही लक्ष देता येत नसे. त्यामुळे श्री. अण्णासाहेब पाटील, श्री. काकासाहेब थोरात यांनी पहिल्यापासून माथाडी कामगारांच्या घरांसाठी प्रयत्न केले.

श्री. काकासाहेब थोरात यांनी वाडी बंदर व कर्नाक बंदर येथील कामगारांसाठी शासनाकडून एकशेसाठ गाळे मालकी हक्काने मिळवले.[८३] अशाच प्रकारे नंतरच्या काळात कापड बाजार, किराणा बाजार, कापूस बाजार, धातू व कागद बाजार, लोखंड व पोलाद बाजार, माल वाहतूक इत्यादी मंडळातील कामगारांसाठी चारकोपर, कांदिवली, वाशी, तुर्भे, नेरुळ गाव, मुलुंड,

कुर्ला येथे सहकारी गृहनिर्माण सोसायटी स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच पनवेल, कळंबोली, नवी मुंबई परिसरात सिडकोची तयार घरे मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.[८४]

पुणे येथील माथाडी कामगारांसाठी 'हमाल नगर' योजना राबविण्यात येत आहे. यामुळे पुण्यातील हमाल–माथाडींना हक्काची घरे मिळाली आहेत.[८५] अशाच प्रकारचे प्रयत्न नागपूर आणि कोल्हापूर येथेही होत आहेत. निवारा ही मानवाच्या मूलभूत तीन गरजांपैकी एक गरज आहे. एकेकाळी मुंबईतील माथाडी कामगार फूटपाथ, गॅलरी, गोदाम येथे असहाय्यपणे झोपत असे. आता या गृहनिर्माण योजनांच्या माध्यमातून त्यांच्या स्वतःच्या घराचे स्वप्न प्रत्यक्षात आले आहे.

**४.३.१.५ तळमळ रजिस्टर :**

काही माथाडी कामगारांच्या दारु, मटका, जुगार इ. व्यसनांमुळे त्यांच्या कुटुंबावर उपसमारीची वेळ येत असे. व्यसनी कामगार सर्व पैसा आपल्या व्यसनांतच संपवून टाकत. याबाबतच्या तक्रारी श्री. अण्णासाहेब पाटील यांचेकडे या कामगारांचे कुटुंब घेवून येत. त्यामुळे अशा व्यसनी कामगारांचे एक वेगळे रजिस्टर बनविण्यात आले. त्यांचा पगार पतसंस्थेतील त्यांच्या खात्यात जमा करण्यात येवू लागला. यापैकी थोडी रक्कम कामगाराला देवून उर्वरीत रक्कम मनीऑर्डरने त्यांच्या कुटुंबाला पाठविण्यात येत असे. याबाबतचे अधिकारपत्र देखील कामगारांकडून लिहून घेतले जाई. या व्यसनी कामगारांच्या रजिस्टला बेवडा रजिस्टर असेही नाव दिले असले तरी त्यातून श्री. अण्णासाहेब पाटील यांची कामगारांच्या प्रगतीची तळमळच व्यक्त होते.[८६] नंतर अशा व्यसनी कामगारांना आपले नाव या रजिस्टरमध्ये जाणे अपमानास्पद वाटू लागल्याने बऱ्याच जणांनी व्यसन सोडून दिले.

अशा प्रकारे एखादा प्रश्न व्यवहार्य पध्दतीने कायद्याच्या चौकटीत बसवून प्रसंगी साम, दंड याचाही वापर करुन सोडविण्याचे धोरण सुरुवातीच्या काळातील माथाडी कामगार नेत्यांनी ठेवले होते.

### ४.३.२ हमाल पंचायत, पुणे :

हमाल पंचायतीच्या माध्यमातून इतर असंघटित कामगारांबरोबरच माथाडी–हमाल कामगारांसाठीही अनेक कल्याणकारी योजना व कार्यक्रम राबविले आहेत. राज्यात सर्वत्र माथाडी मंडळे स्थापन होवून माथाडी कामगारांना त्याचा लाभ मिळावा यासाठी वेळोवेळी प्रयत्न केले आहेत. तसेच समूह विमा योजना, पाल्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन योजना, कष्टाची भाकरी या उपक्रमातून स्वच्छ, सकस, स्वस्त आहार उपलब्ध करुन दिला आहे, लग्न कार्यासाठी माफक दरात हमाल भवन उपलब्ध करुन दिले आहे. हमाल कामगार नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली आहे. या माध्यमातून हमाल माथाडींना गरजेनुसार आर्थिक कर्ज सहाय्य उपलब्ध करुन दिले जाते.[८७] हमालनगर येथे बालवाडी चालविली जाते. तसेच हमाल भवन येथे हमाल पंचायत संचलित कष्टकरी विद्यालय सुरु करण्यात आले आहे. सध्या ५ वी ते १० वी च्या वर्गाने सुरुवात झाली आहे. सन २०१०–११ यावर्षी १० वी चा निकाल ९०.३८% लागला आहे. सर्वांना मोफत शिक्षण देण्यात येते.[८८] इतर असंघटित कामगारांना माथाडी कामगार कायद्यासारखे लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न हमाल पंचायत करत आहे.

### ४.३.३ आखिल भारतीय माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, मुंबई :

या माथाडी कामगार संघटनेनेही विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. माथाडी कामगारांसाठी आरोग्य शिबिरे, त्यांचे मुलांना शिक्षणासाठी मदत, रक्तदान शिबिरे इत्यादी उप्रकम राबविले आहेत. तसेच शिवसागर सहकारी पतपेढी ही संस्था देखील माथाडी कामगारांच्या आर्थिक गरजांची वेळचे वेळी पूर्तता करण्यासाठी सुरु केलेली आहे. माथाडी कामगारांच्या घरांसाठी देखिल ही संघटना पाठपुरावा करत आहे. राज्यातील इतरही माथाडी कामगार संघटना असे विविध उपक्रम माथाडी कामगारांसाठी राबवित आहेत.[८९]

अशा प्रकारे माथाडी हमाल कामगार संघटनांनी या कामगारांना नियमित रोजगार आणि योग्य मजूरी मिळावी याबरोबरच त्यांच्या सर्वांगिण सामाजिक आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न केले आहेत. माथाडी कामगारांबरोबरच त्यांच्या कुटुंबाकडेही लक्ष दिले आहे, त्यांच्या मुलांच्या

शैक्षणिक प्रगतीसाठी कामगार संघटना तसेच शासनानेही सर्वतोपरी प्रोत्साहन दिलेले आहे. या कामगारांचे व त्यांचे कुटुंबियांच्या आयोग्याची काळजी माथाडी हॉस्पीटल व दवाखान्याच्या माध्यमातून घेतलेली आहे.

## ४.४ यांत्रिकीकरणाचा माथाडी कामगारांवर परिणाम :

प्रत्येक क्षेत्रात नवनवे शोथ लागत आहेत. उत्पादनाच्या व इतर क्षेत्रात अंगमेहनतीने करावयाच्या अनेक कामांमध्ये देखील कमीत कमी मानवी श्रम लागतील अशी किंवा पूर्णपणे स्वयंचलित अशी यंत्रे वापरात येत आहे. याचा परिणाम त्या प्रक्रियेत उपलब्ध होणाऱ्या रोजगारावर होतो. पूर्वी कापड गिरण्यांमध्ये एका मागावर एक कामगार काम करत असे, त्याचा मॅन मशीन रेशो १:१ होता. यांत्रिकीकरणामुळे ४० यंत्रे एकत्र जोडून एकच माणूस या ४० यंत्राचे नियंत्रण करतो. यामुळे ३९ लोक बेकार होतात.[९०] अशाच प्रकारे यांत्रिकीकरणाचा परिणाम उपलब्ध रोजगारावर होतो, वाहतूकीच्या क्षेत्रात देखील बेकारी वाढते. स्वयंचलित क्रेन, कन्व्हेअर बेल्ट, पॅकिंग व लोडींग मशीन इत्यादी यंत्राचा वापर वाढत आहे.[९१] पूर्वी माथाडी कामगार पोती प्रत्यक्ष वाहून नेत. आता कन्व्हेअर बेल्टवर पोत्याची वाहतूक होते. यारीने माल अथवा पोती हवी तेथे एकावर एक रचून ठेवता येतात. पूर्वी पोती प्रत्यक्ष कामगार शिवत, आता मशीनने हजारो पोती कमी वेळेत शिवून होतात. वजन मापे करण्यासाठी प्रत्यक्ष माल कामगारांकडून पारड्यात टाकला जात असे. आता स्वयंचलित वजन काट्यावर मालाची गाडी नेताच वजन कळते. या यांत्रिकीकरणाचा सर्वात पहिला परिणाम कामगारांवर होत आहे. यंत्राद्वारे काम किमान निम्म्या खर्चात आणि कमी वेळेत होते.[९२]बंजारा समिती, बारामती आणि जुन्नर येथे धान्य साफ करणारी रु. ०.४० लक्ष किंमतीची यंत्रे बसविण्यात आली आहेत. ज्या कामासाठी ६ ते १० रुपये मजूरी द्यावी लागे, तीच कामे या यंत्रामार्फत ३ ते ४ रुपयांत व निम्म्या वेळेत अधिक गुणवत्तापूर्वक केली जातात. जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकून

राहण्यासाठी माथाडी स्वरुपाच्या कामात देखील आधुनिकीकरण व यांत्रिकीकरणचा वापर वाढत आहे. यामुळे काही अंशी का होईना माथाडी कामगारांना उपलब्ध होणाऱ्या कामावर परिणाम संभव आहे.[९३] आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आवश्यक असणारी उत्पादनाची गुणवत्ता टिकवून ठेवणे व आंतरराष्ट्रीय बाजारपेढेतील मागणी वेळचेवेळी पूर्ण करण्यासाठी बऱ्याचदा यांत्रिकीकरण आवश्यक ठरते. काही उद्योगाचे यांत्रिकीकरण झाल्यामुळे काही माथाडी मंडळातील कामगारांना कमी प्रमाणात काम मिळत आहे.[९४] कापड बाजार व दुकाने मंडळ, मालवाहतूक मंडळ, रेल्वे गुडस् मंडळ येथील कामगारांवर परिणाम झाला आहे. परंतु याचे प्रमाण मोठे नसल्याचे राज्य शासनाला आढळून आले आहे. यांत्रिकीकरणामुळे काही क्षेत्रात रोजगार उपलब्धतेच्या संधी कमी झाल्या तरी सर्वत्रच यांत्रिकीकरण होईल असे नाही. मुक्त व्यापार धोरणामुळे आयात-निर्यात वाढून माल चढविण्याच्या व उतरविण्याच्या कामासाठी अधिक मनुष्यबळ लागण्याची शक्यता आहे.[९५] त्या प्रमाणात अधिक कामगारांना माथाडी कायद्याच्या संरक्षणाचा लाभ मिळू शकेल.

यांत्रिकीकरणासाठी मालकांना एकदाच मोठी रक्कम गुंतवावी लागते. मात्र भविष्यात वेळेची व पैशाची होणारी बचत, माथाडी कामगारांकडून काम करुन घेताना येणाऱ्या काही अडचणी याचा विचार करता ज्यांना शक्य आहे असे मालक किंवा आर.सी.एफ. चेंबूर सारख्या मोठ्या आस्थापना यांत्रिकीकरणाला प्राधान्य देतात.

यांत्रिकीकरणाचा जरी माथाडी कामगारांना उपलब्ध होणाऱ्या कामावर कमी अधिक परिणम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत असली तरी प्रत्यक्षात त्याचा फारसा परिणाम जाणवलेला नाही. माथाडी कामगार व त्यांच्या संघटना याबाबतीत अत्यंत जागरुक आहेत असे केल्यास औद्योगिक अशांतता निर्माण होईल, याची कल्पना मालक व व्यापारी वर्गालाही आहे. त्यामुळे जुन्या उद्योगधंद्यामध्ये माथाडी कामगारांच्या कामावर प्रत्यक्ष फार मोठा परिणाम जाणवलेला नाही. मात्र नवीन होवू घातलेल्या कारखाने आणि उद्योगातील यांत्रिकीकरणामुळे माथाडी कामगारांचे काम किती प्रमाणात यंत्राद्वारे होत आहे आणि त्यामुळे माथाडी व अनुषंगीक कामात निर्माण होणारा किती रोजगार प्रत्यक्षात निर्माण होवू शकलेला आहे याचा अभ्यास

होण्याची गरज आहे. आधुनिकीकरणामुळे अंगमेहनतीने करावयाच्या कामावर परिणाम झाला तरी काही नवे रोजगार निर्माण होत आहेत. या यंत्राच्या विक्रीची केंद्र, दुरुस्ती व देखभाल केंद्रे ही यंत्रे चालविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ या क्षेत्रात नवनवीन रोजगार निर्माण होत आहेत. माथाडी कामगारांनी आयुष्यभर ओझी वाहण्याचे काम केले असले तरी यातील सुशिक्षित कामगारांनी तसेच माथाडी कामगारांच्या पुढील पिढ्यांनी हेच काम न करता नव्याने उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधीचा लाभ घेतला पाहिजे आणि आपले आर्थिक व सामाजिक जीवनाचा स्तर अधिक उंचावला पाहिजे.

## ४.५ माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यानच्या अनुचित घटना व प्रथा :

माल वाहतूकीसाठी माथाडी–हमाल कामगारांचा पुरेसा आणि नियमित पुरवठा व्हावा आणि त्यांच्या मजूरी, कामाच्या वेळा, इतर कल्याणकारी लाभ यांचे नियमन व्हावे या उदात्त हेतून महाराष्ट्र राज्याने हा कायदा आणला. या कायद्यानुसार मंडळे स्थापन झाली. या मंडळामध्ये कोट्यावधी रुपयांची लेव्ही व मजूरी जमा होवू लागली. ही रक्कम ठराविक बँकात ठेवून त्यातून लाभ मिळवण्याचा प्रयत्न काही लोभी अधिकारी, कर्मचारी करु लागले.[९६] एका अधिकाऱ्याने परदेशवारीच्या अमिषाने, तर एकाने स्वत:च्या मुलाला बँकेत नोकरी लावण्याच्या अमिषापोटी विशिष्ट बँकेत पैसे ठेवले होते. पुढे त्यांचेवर कारवाई झाली. धातु व कागद बाजाराच्या अध्यक्षांनी मंडळाचे पैसे बँकेत ठेवून त्यावर वैयक्तिक गरजेसाठी कर्ज घेतले तसेच मंडळाच्या कर्मचाऱ्यांची खोटी प्रवास बीले दाखवून पैसे हडप केले.[९७]

सन १९८९–९० ते सन १९९१–९२ च्या दरम्यान आर्थिक डबघाईमुळे अनेक बँका बुडाल्या. अशा सहकारी बँकामध्ये ठेवलेली धातू व कागद बाजार, भाजीपाला, लोखंड व पोलाद, कापूस बाजार आणि खोका मेकींग माथाडी मंडळाची करोडो रुपयांच्या ठेवीची रक्कम बुडाली.[९८] या प्रकरणी राज्य शासनाने संबंधित मंडळाच्या अध्यक्षांची विभागीय चौकशीही केली आणि त्यांना शिक्षा दिली. मात्र मंडळाच्या ठेवी कोणत्या बँकात ठेवाव्यात याविषयीची राज्य शासनाचे

निश्चित असे निर्देश त्यावेळी नसल्यामुळेच अशा प्रकारे विविध सहकारी बँकात ठेवी ठेवण्यात आल्याचे कोर्टाला आढळून आले. कोर्टाने अधिकाऱ्यांची कृती योग्य ठरवून त्यांच्या शिक्षा रद्द केल्या.[९९] मंडळाचा मोठा निधी या बँकात बुडाला. तो परत मिळविण्यासाठी न्यायालयीन लढाई सुरु आहे.

शासकीय, निमशासकीय संस्था आणि सहकारी साखर कारखाने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे टाळतात.[१००] यामध्ये एस.टी. महामंडळ, रेल्वे मालधक्का, अन्न सुरक्षा महामंडळ इत्यादींचा समावेश होतो. या ठिकाणी काम करणाऱ्या माथाडी कामगारांची नोंदणी न केल्यामुळे त्यांना माथाडी कायद्यांतर्गतचे लाभ मिळत नाहीत. बीड जिल्ह्यातील शासकीय धान्य गोदामातील हमालांना माथाडी कायद्यांतर्गत लाभ मिळावे म्हणून श्री.राजकुमार घायाळ, सहचिटणीस महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळ यांनी सन १९८९ पासून सातत्याने प्रयत्न केले आहेत.[१०१] याबाबत मंत्रालयातील कामगार विभागाने आणि पुरवठा विभागाने शासन निर्णय काढले आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर पूर्ण होत नाही. त्यामुळे माथाडी कामगारांना वारंवार संघर्ष करावा लागत आहे.

काही मालक परस्पर अनोंदीत कामगारांकडून काम करुन घेतात. तर काही कामगार स्वत:हून परस्पर काम करुन मजूरीची रक्कम मालकांकडून घेतात.[१०२] यामुळे मंडळाकडे भरणा होणारी लेव्ही बुडते आणि कामगार सामाजिक सुरक्षिततेच्या लाभांपासून वंचित राहतात. राज्यात हमाल–मापाडी स्त्री पुरुष कामगारांची संख्या सन १९९४ च्या दरम्यान पाच लक्षपेक्षा जास्त होती. तथापि त्यापैकी केवळ दिड लक्ष हमाल माथाडींनाच माथाडी कायद्याचे लाभ मिळतात.[१०३] जे उद्योगधंदे माथाडी कायद्याच्या कार्यकक्षेत येत नाहीत तसेच ज्या ठिकाणी ग्रामीण भागात अद्याप माथाडी कायदा लागू केलेला नाही अशा ठिकाणी माथाडी काम करणाऱ्या कामगारांना सामाजिक सुरक्षिततेचे कोणतेही लाभ, पुरेशी मजूरी मिळत नाही. त्यांची स्थिती १९६९ पूर्वी हा कायदा होण्यापूर्वी जी होती तीच आहे.

अशा प्रकारे माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी दरम्यान काही अनुचित घटना घडल्या. काही अनुचित प्रथा सुरु झाल्या व त्या अद्यापही चालू आहेत. शासन या प्रथा दूर करण्यासाठी माथाडी मंडळाच्या मदतीने प्रयत्न करत आहे. तसेच अनुचित घटनांची पुनरावृत्ती होवू नये म्हणून विविध समित्या किंवा उपसमित्यांच्या माध्यमातून त्याचा अभ्यास करुन उपाययोजना करत आहेत.

## ४.६ महाराष्ट्रातील माथाडी कामगार संघटना :

'बॉम्बे हॅन्डस मील असोसिएशन'ही भारतातील पहिली कामगार संघटना होय. श्री.नारायण मेघाजी लोखंडे यांनी सन १८८४ मध्ये या संघटनेची स्थापना केली. त्यानंतर मद्रास लेबर युनियन (१८८४) ही संघटित कामगार संघटना अस्तित्वात आली. इंटक (Indian National Trade Union Congres) सिटू (Central Trade Union) भारतीय मजदूर सभा, ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस या संघटना स्थापन झाल्या.[१०४] या बहुतेक सर्व संघटना कोणत्या ना कोणत्या राजकिय पक्षाच्या विचारसरणीशी संबंधित कामगार संघटना होत्या. या कामगार संघटनांनी बहुतांशरित्या कारखान्यातील संघटित स्वरुपातील कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला. यातून फॅक्टरी ॲक्ट, किमान वेतन अधिनियम, प्रसुती लाभ अधिनियम, बोनस प्रदान अधिनियम हे कामगार कायदे अस्तित्वात आले. मात्र विखुरलेल्या स्वरुपात काम करणाऱ्या माथाडी कामगारांसारख्या असंघटित कामगारांसाठी विशेष असे कोणतेही प्रयत्न किंवा कायदे केले गेले नाहीत. श्री. पी. डिमेले, श्री. भाई कोतवाल यांनी मुंबई डॉक वर्कर्स युनियनच्या माध्यमातून केलेल्या संघर्षामुळे बॉम्बे डॉक वर्कर्स ॲक्ट, १९४८ हा कायदा गोदीतील हमाल कामगारांसाठी करण्यात आला.[१०५] हे गोदीतील हमाल अशिक्षित असंघटित असले तरी ते गोदीमध्ये एकाच ठिकाणी काम करत, त्यामुळे त्यांचे संघटन करणे, त्यांना एकत्र

आणून न्याय हक्कासाठी संघर्ष करणे सोपे गेले. मात्र मुंबईभर कल्याण–भिवंडीपासून बोरीबंदरपर्यंत विविध ठिकाणी हमालीचे काम रोजंदारीवर करणाऱ्या कामगारांना एकत्र आणणे हे फार अशक्य प्रकारचे काम होते. या कामगारांचा मालकांशी थेट संबंध कायम स्वरुपी येत नसल्यामुळे त्यांना प्रचलित कामगार कायद्याचे कोणतेही संरक्षण व लाभ मिळत नव्हते. हे कामगार बहुतांश अशिक्षित किंवा अल्पशिक्षित असल्यामुळे त्यांना त्यांचे न्याय हक्कांची जाणीव करुन देणे, मालकांविषयीची आणि असंघटित होवून संघर्ष केल्यास आपली आहे ती नोकरी जाईल, ही भीती त्यांचे मनातून काढून टाकणे हे अवघड काम होते. हे कामगार एकत्रित स्वरुपात नसल्यामुळे त्यांचा राजकिय लाभासाठीही उपयोग होणार नसल्यामुळे कोणतेही राजकिय पक्ष व त्यांच्या कामगार संघटना या हमालांसाठी काम करण्यास,त्यांना एकत्र आणण्यास उत्सुक नव्हत्या. अशा परिस्थितीत श्री. अण्णासाहेब पाटील या हमाल कामाचे स्वत: चटके अनुभवलेल्या ,एका अल्पशिक्षित हमालाने आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने मुंबईतील हमालांची संघटना बांधण्यास सन १९५६ च्या सुमारास सुरुवात केली. मुंबई गोदीत प्रथम हमालीचे आणि नंतर क्रेन ड्रायव्हर म्हणून काम करताना श्री. अण्णासाहेब बॉम्बे डॉक वर्कर्स युनियन या संघटनेचेही काम पहात. मात्र संघटनेच्या अंतर्गत वादातून त्यांना अचानकपणे या संघटनेतून काढून टाकण्यात आले. त्यानंतर त्यांनी हळूहळू मुंबई परिसरातील हमालांची संघटना बांधण्यास सुरुवात केली.[१०६] नंतर १९६३ मध्ये या संघटनेची धर्मादाय आयुक्तांकडे **‘महाराष्ट्र माथाडी हमाल, ट्रान्सपोर्ट ॲण्ड जनरल कामगार संघटना** या नावाने नोंदणीही केली. माथाडी कामगारांसाठी अंमलबजावणी, माथाडी मंडळाची स्थापना यामध्ये या संघटनेने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. काही माथाडी मंडळामध्ये स्थानिक स्वरुपातील छोट्या संघटनाही होत्या. मात्र सन १९८४ पर्यंत महाराष्ट्रातील माथाडी कामगारांची हीच एकमेव मध्यवर्ती कामगार संघटना होती.

श्री. अण्णासाहेब पाटील यांचे दि. २३ मार्च १९८२ रोजी दु:खद निधन झाले. त्यानंतर संघटनेतील वर्चस्वावरुन अंतर्गत संघर्ष सुरु झाले. तरी देखील सन १९८९ मध्ये झालेल्या

निवडणूकीमध्ये श्री. शिवाजीराव पाटील यांना सरचिटणीस म्हणून निवडण्यात आले, त्यांचा दि. १४ ऑक्टोबर १९९९ रोजी आकस्मित मृत्यू झाला.[१०७] त्यानंतर श्री.नरेंद्र पाटील, विद्यमान आमदार हे या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पहात आहेत. दरम्यानच्या काळात संघटनेतील काही कामगार नेते बाहेर पडून त्यांनी वेगळ्या माथाडी संघटना स्थापन केल्या. तसेच सद्यस्थितीत स्थानिक पातळीवर विविध राजकिय पक्षांच्या पाठबळाने माथाडी कामगार संघटना निर्माण झाल्या. त्यापैकी काही महत्त्वाच्या म्हणजे अखिल भारतीय माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना, मुंबई, महाराष्ट्र माथाडी कामगार सेना या होत. या सर्व कालखंडात महाराष्ट्रातील मुंबई परिसरा व्यतिरिक्त या कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी डॉ. बाबा आढाव व त्यांचे हमाल पंचायतीने राज्यभर मोर्चे, आंदोलने, संप या माध्यमातून संघर्ष केला. या संघटनेच्या स्थानिक पातळीवरील डॉ. हरिष धुरट (नागपूर), श्री. लिंबाजी खताळ (धुळे), श्री. अप्पा कोरपे आणि श्री. शंकरराव घुले (अहमदनगर), श्री. राजकुमार घायाळ (बीड) या कार्यकर्त्यांनीही महत्त्वपूर्ण काय केले आहे. या सर्व कामगार संघटना व त्यांचे पदाधिकारी जरी वेगवेगळे असले तरी सर्वांचे ध्येय व उद्दिष्ट मात्र माथाडी कामगारांचे कल्याण हेच आहे.

# संदर्भ सूची


१. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर., (अध्यक्ष), माथाडी कामगार चौकशी समिती अहवाल बृहन्मुंबई, दि. १२ जानेवारी १९६५, पृ. क्र. २३, २४.

२. महाराष्ट्र शासन, कालेलकर बी. एस., (अध्यक्ष), लोखंडी जथा कामगार चौकशी समिती अहवाल, दि. १५ डिसेंबर, १९६५. पृ. २१.

३. महाराष्ट्र शासन, कामगार व समाज कल्याण विभाग, पत्र क्र. BSE/1459/148843-J दि.Nov. 1959, (माथाडी कायदा विशेषांक–महाराष्ट्र हमाल मापाडी महामंडळ, पुणे, १९९४ मध्ये पुनर्मुद्रित, पृ. क्र. ३८)

४. आढाव बाबा, माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ, पुणे (प्रकाशक) पृ. क्र. ३९.

५. पाटील व्ही. पी., दि ग्रेट माथाडी–अण्णासाहेब पाटील, जगदीश प्रकाशन, कराड (सातारा), पृ. क्र. ६२, ६३

६. काटे बंडू किसन, (माथाडी कामगार) कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र, विशेषांक, १९८१, पाटील अण्णासाहेब (संपादक), मुंबई, पृ. क्र. १५.

७. शिंदे यशवंतराव (माथाडी कामगार), कामगारांचे मनोगत, उपरोक्त, पृ. क. १५.

८. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. क्र. ५.

९. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ५६.

१०. कित्ता, पृ. क्र. २५.

११. आढाव बाबा, उपरोक्त, हमाल मापाडी वार्ता विशेषांक, पृ. क्र. ४०.

१२. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ७७.

१३. कित्ता, पृ. क्र. ७८.

१४. कित्ता, पृ. क्र. ७९.

१५. आढाव बाबा, उपरोक्त, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, पृ. ४०.

१६. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. २४, २५.

१७. रामिष्टे बाबुराव, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, रौप्य महोत्सव विशेषांक, १९८४, मुंबई, पृ. क्र. ३.

१८. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर., (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. क्र. ६ व ७.

१९. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ३०.

२०. कित्ता, पृ. क्र. ३१.

२१. रामिष्टे बाबुराव हरी, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, उपरोक्त, पृ. क्र. ४.

२२. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा (अध्यक्ष), राज्य सल्लागार समितीची उपसमितीचा अहवाल, १९८८, पृ. क्र. ३, परिशिष्ट अ.

२३. धुरट हरिश, नागपूर, विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७६.

२४. अतितकर जी. व्ही., 'पुण्याचे मंडळ वैशिष्ट्यपुर्ण आणि आदर्श ठरावे', पुणे माथाडी मंडळ–२० वा वर्धापन दिन स्मरणिक, दि. १५ सप्टेंबर २०००, पृ. १८.

२५. मदन गोविंदराव, भुत्ता गुलाबभाई, 'मालकांचे मनोगत', माथाडी मित्र विशेषांक १९८१, पाटील अण्णासाहेब (संपादक), मे १९८१, पृ. क्र. १७, १८.

२६. भागवत टी. आर., (अध्यक्ष), कापड बाजार मंडळ, 'सल्ला : कामगारांना आणि व्यापाऱ्यांनाही', माथाडी मित्र विशेषांक, १९८१, उपरोक्त, पृ. क्र. ११.

२७. भागवत टी. आर., उपरोक्त, पृ. क्र. १३.

२८. मदन गोविंदराव, उपरोक्त, पृ. क्र. १७.

२९. गुप्ता कविता (भा.प्र.से.) माजी प्रधान सचिव (कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य) यांची मुलाखत.

३०. रामिष्टे बाबुराव, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र विशेषांक, १९८१, उपरोक्त, पृ. क्र. १६.

३१. अध्यक्ष, सोलापूर रेल्वे हमाल पंचायत, 'माथाडी प्रश्न–सप्रेम नमस्कार', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७८.

३२. धुरट हरिश, उपरोक्त, पृ. क्र. ७६.

३३. घुले शंकरराव, अध्यक्ष– हमाल पंचायत अहमदनगर आणि कोरपे अप्पा (सचिव), 'अहमदनगर जिल्हा हमाल पंचायतीची वाटचाल'; हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ९३.

३४. मारुती विश्वासराव, 'कामगार चळवळ मजबूत करण्यासाठी श्रमशक्तीच्या एकजुटीची गरज', कै. ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, कै. ना. मे. लोखंडे श्रमविज्ञान संस्था, परेल (मुंबई), पृ. क्र. ३९, ४०.

३५. पाटील अण्णासाहेब, माथाडी मित्र विशेषांक, १९८२, पृ. क्र. २ (किराणा बाजार मंडळाची पाऊण तपपूर्ती १९७९, स्मरणिकेतील माथाडी युनियनची दीड तपाची वाटचाल, लेख पुनर्मुद्रित)

३६. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण, उपरोक्त, पृ. क्र. ४.

३७. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. २४.

३८. कित्ता, पृ. क्र. २२.

३९. राजश्री पाटील (निर्माती) अण्णासाहेब पाटील–दि ग्रेट माथाडी मराठी चित्रपट, यशोदा कलानिकेतन प्रोडक्शन, माथाडी चित्र संस्था, नवी मुंबई, सन २०११.

४०. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. २३.

४१. किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९७०–७१, दि. २८ फेब्रुवारी १९७२, पृ. क्र. ६.

४२. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. २६.

४३. कित्ता, पृ. क्र. २८.

४४. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ३०, ३१.

४५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, महाराष्ट्र विधानपरिषद इतिवृत्त, दि. २ एप्रिल १९६९, पृ. क्र. ४, ५, ६.

४६. पाटील अण्णासाहेब,माथाडी मित्र विशेषांक, १९८३, उपरोक्त, पृ. क्र. ४.

४७. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ३९.

४८. जाधव रा. भा. (अध्यक्ष), माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ *तथा सहाय्यक कामगार आयुक्त यांचे पत्र दि. १८/२/२०१४.

४९. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ४०.

५०. कित्ता, पृ. क्र. ४१.

५१. पाटील अण्णासाहेब, माथाडी मित्र विशेषांक, १९८३, उपरोक्त, पृ. क्र. ४.

५२. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ८३.

५३. कित्ता, पृ. क्र. ८३, ८४.

५४. कित्ता, पृ. क्र. ४३.

५५. कित्ता, पृ. क्र. ८४.

५६. रामिष्टे बाबुराव हरी, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, माथाडी कामगार संघटना, रौप्य महोत्सवी वाटचाल, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन–रौप्य महोत्सवी वाटचाल विशेषांक, १९८८, पृ. क्र. ८.

५७. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा (अध्यक्ष), महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार सल्लागार समितीने नेमलेल्या तिसऱ्या उपसमितीचा अहवाल, ऑगस्ट १९८८, पृ. क्र. १.

५८. कित्ता, पृ. क्र. १.

५९. कित्ता, पृ. क्र. २.

६०. कित्ता, पृ. क्र. १२, १५ ते १८, २१ ते २३, ३६, ३८, ३९.

६१. महाराष्ट्र शासन, देव डी. बी. (अध्यक्ष), माथाडी मंडळाचा आकृतीबंध आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नेमलेल्या एक सदस्यिय समितीचा अहवाल, दि. ८ फेब्रुवारी १९९१, पृ. क्र. १.

६२. कित्ता, पृ. क्र. ४ ते ८५.

६३. गायकवाड र. य., कामगार आयुक्त, यांचे अर्ध शासकीय पत्र, प्र. का.आ./ माथाडी/१०९४/मु.क.७/१२६४ दि. १७ एप्रिल १९९४.

६४. गायकवाड र. य., कामगार आयुक्त, माथाडी मंडळाच्या कामकाजाबाबत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी, दि. १७ एप्रिल १९९४, पृ. क्र. १ ते ६.

६५. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. युडब्ल्युए १५१०/आर–३५८/कामगार–५ दि. ५.१०.२०१०.

६६. महाराष्ट्र शासन, पगार दि. पो. (अध्यक्ष), सुरक्षा रक्षक व माथाडीमंडळाच्या बुडीत बँकेत केलेल्या गुंतवणुकीची चौकशी करणेसाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेली समिती– अहवाल दि. नोव्हेंबर २०११, पृ. क्र. ५ ते ४७.

६७. महाराष्ट्र शासन, निंबाळकर समितीचा अहवाल, १९८५, (पुर्नमुद्रीत) हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ६७, ६८.

६८. कित्ता, पृ. क्र. ७०.

६९. महाराष्ट्र शासन पत्र क्र. युडब्ल्युए १०८७/ सी.आर.११५८९/ कामगार–८ दि. १९ फेब्रुवारी १९९०. (पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिकेतील पुनर्मुद्रित)पृ. क्र. ८०

७०. गोळे ज्ञानदेव लक्ष्मण, उपरोक्त, पृ. क्र. २५.

७१. अण्णासाहेब पाटील माथाडी कामगार सहकारी पतपेढी मर्यादित, ४२ वा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, दि. १६ जून २०११, पृ. क्र. १२.

७२. जोशी वि. द., ‘हमाल माथाडी कामगार व आरोग्य’, पुणे माथाडी मंडळ २० वा वर्धापन दिन स्मरणिका, सन २०००, पृ. क्र. ११५.

७३. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. १२०.

७४. कित्ता, पृ. क्र. १२१.

७५. कित्ता, पृ. क्र. १२१.

७६. माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट), नवी मुंबई यांची टिप्पणी, सन २०१३, पृ. क्र. ३.

७७. कित्ता, पृ. क्र. ९.

७८. घुले शंकरराव, (अध्यक्ष) हमाल पंचायत अहमदनगर, कोरपे अप्पा (सचिव), उपरोक्त, पृ. क्र. ९१.

७९. तुंगरकर जयंत, ‘कष्टकऱ्यांसाठी आरोग्याची काळजी’, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७२.

८०. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. ११७.

८१. कित्ता, पृ. क्र. ११८.

८२. माथाडी कामगार ग्राहक सोसायटी मर्यादित, मुंबई, वार्षिक अहवाल, सन २०११.

८३. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. १२५.

८४. महाराष्ट्र शासन, आढाव बाबा (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. क्र. २६ ते २९.

८५. हमाल पंचायत, पुणे., पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ–२० वा वर्धापन दिन स्मरणिका, उपरोक्त, पृ. क्र. १३०.

८६. यादव दादू नारायण (चेअरमन), बृहन्मुंबई, माथाडी कामगार सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई, कै. अण्णासाहेब पाटील एक विशाल शक्ती होती, माथाडी मित्र पाक्षिक–तृतीय स्मृतीदिन विशेषांक, दि. २३ मार्च १९८५.

८७. हमाल पंचायत, पुणे, उपरोक्त, पृ. क्र. १३०.

८८. गिरमे सुरेश, (मुख्याध्यापक), हमाल पचायत कष्टकरी विद्यालय,हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन विशेषांक, फेब्रुवारी २०१२, पृ. क्र. ९७.

८९. नारकर प्रभाकर (अध्यक्ष, जनता दल, मुंबई), बाबुराव रामिष्टे–मॅन विथ ए मिशन, मा. बाबुराव रामिष्टे षष्ठ्याद्दिपूर्ती विशेषांक, सन २०१२, पृ. २३ ते ३७.

९०. खांदेवाल श्रीनिवास, (अर्थतज्ञ), संचालक रुईकर इंस्टिट्युट ऑफ लेबर स्टडीज नागपूर, 'जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात श्रमिक संघापुढील संघटनात्मक आव्हाने', नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विशेषांक, कै. ना. मे. लोखंडे श्रमविज्ञान संस्था, परेल (मुंबई), पृ. क्र. १०.

९१. झावरे शिवाजीराव, सरकारी कामगार अधिकारी तथा सचिव, पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, 'माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ६२.

९२. बूब बाळकृष्ण, कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य बाजार समिती सह. संघ मर्यादित आणि भुजबळ विलास, सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे, माथाडी मंडळाकडून अपेक्षा, पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, उपरोक्त, पृ. क्र. ३१.

९३. कुलकर्णी व्ही. वाय., सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे, 'माथाडी कामगार कायदा–एक दृष्टीक्षेप', २० वा वर्धापन दिन, स्मरणिका, उपरोक्त, पृ. क्र. ५८.

९४. मेहता अरुण, माजी कामगार राज्यमंत्री, 'माथाडी मंडळाची शिखर संस्था झाली पाहिजे!' (१ मे १९९२, मुंबई सकाळ, माथाडी विशेषांकावरुन पुर्नमुद्रित) हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ५७.

९५. निंबाळकर अजित, 'माथाडी कायदा–असंरक्षित कामगारांसाठी एक वरदान', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ३०.

९६. देशपांडे दा. गो., माजी कामगार उपआयुक्त, 'पुणे, माथाडी बोर्डात येणे–जाणे', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ४६.

९७. महाराष्ट्र शासन, कामगार–८ कार्यासन, मंत्रालय, मुंबई यांची टिप्पणी.

९८. महाराष्ट्र शासन, पगार दि. पो. (अध्यक्ष), उपरोक्त, पृ. क्र. २४.

९९. कित्ता, पृ. क्र. ४७.

१००. तिडके नरेंद्र, माजी कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, 'प्रत्येक कामगाराला कायद्याचे संरक्षण हवे', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. १३.

१०१. घायाळ राजकुमार, 'शासकीय धान्य गोदामातील हमालांसाठीच्या चळवळीतील संक्षिप्त नोंदी', हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. १३० ते १३२.

१०२. अध्यक्ष, नांदेड हमाल मापाडी हातगाडा संघ यांचे पत्र, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ८१.

१०३. काळबेरे दत्ता, संपादकीय, 'संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी झालीच पाहिजे', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ४.

१०४. Labourbureau nic.in, Reports Released, Trade Union in India 2002, Labour Bureau Chandigarh

१०५. Government of India, Act No. 9 of 1948, 4th March 1948

१०६. पाटील व्ही. पी., उपरोक्त, पृ. क्र. १५ ते १८.

१०७. Indian Express वर्तमान पत्रातील बातमी, दि. १४ ऑक्टोबर, १९९९

## प्रकरण ५वे
# मान्यवरांच्या नजरेतून माथाडी कामगार चळवळ

माथाडी कामगार चळवळीचे महाराष्ट्राच्या आणि एकूणच भारताच्याही कामगार चळवळीत मोठे महत्त्व आहे. उदाहरणा दाखल काही मान्यवरांच्या शब्दांत माथाडी कामगार चळवळीचे महत्त्व इथे थोडक्यात विषद करण्याचा प्रयत्न करत आहे.

श्री. वसंतदादा पाटील, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य म्हणतात की, 'कष्टकरी असुरक्षित कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळवून देणे हे ऐतिहासिक काम आहे.'[१] श्री. वसंतदादा पाटील, या कायद्यान्वये माथाडी कामगारांना संरक्षण देणे, यास एक ऐतिहासिक काम म्हणून संबोधतात यातच या कायद्याचे महत्त्व दिसून येते.

श्री. श्याम अष्टेकर, तत्कालीन उद्योग व क्रिडा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य म्हणतात की, 'महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या २५ वर्षाच्या यशस्वी वाटचालीतून कष्टकरी माथाडी कामगार व त्यांच्या कुटुंबियांचे जीवन फुलले आहे. स्व.यशवंतरावजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. अण्णासाहेबांनी माथाडी कायद्याची निर्मिती शासनामार्फत करुन कामगार चळवळीत एक इतिहास निर्माण केला आहे.[२]

अशा प्रकारे माथाडी कायदा महाराष्ट्र शासनाने निर्माण करणे ही एक ऐतिहासिक घटना असल्याचे तसेच त्यातून माथाडी कामगार आणि त्यांचे कुटुंबियांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला असल्याचे श्री. श्याम अष्टेकर यांचे म्हणण्यातून प्रतिबिंबीत होते.

श्री. नरेंद्र तिडके, माजी कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य म्हणतात की, 'माथाडी कामगारांचे पोलादी संघटन उभे केले गेले. माथाडी कामगार असुरक्षित होता, त्याला कायद्याचे संरक्षण मिळावे यासाठी संघटीत प्रयत्न केले आणि महाराष्ट्र सरकारने त्याला प्रतिसाद देवून माथाडी कायदा करुन ह्या असुरक्षित कामगारांना कायदेशीर संरक्षण देवून त्यांना न्याय दिला व त्यांचे जीवनमान सुधारले.ह्या कामगारांसाठी कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे व या कायद्याद्वारे एक नवा आदर्श निर्माण केला आहे. मी त्यावेळी महाराष्ट्राचा कामगार मंत्री होतो व हे विधेयक महाराष्ट्र

विधानमंडळाच्या दोन्ही सदनात ठेवले. याचा मला सार्थ अभिमान आहे. त्यांच्या वेतनात चांगली सुधारणा झाली. त्यांना बोनस, ग्रॅच्युईटी, प्रॉव्हिडंड फंड, औषधोपचार व इतर सुविधा मिळू लागल्या. कामगार चळवळीत हा नवा इतिहास घडविलेला आहे.'[३]

श्री. नरेंद्र तिडके हे स्वत: कामगार नेते होते आणि हा कायदा होताना ते महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री होते, त्यामुळे त्यांचे विचारास एक वेगळ्या प्रकारचे महत्त्व आहे. अशा प्रकारचा असंरक्षित कामगारांसाठी कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य असल्यामुळे या घटनेच्या वेळची कामगार मंत्री म्हणून प्रमुख भूमिका पार पाडल्याचा सार्थ अभिमान त्यांच्या विचारातून प्रकट होतो. तसेच या कायद्यामुळे माथाडी कामगारांना इतिहासात प्रथमच सोयी सुविधा, वेतन मिळू लागले. त्याबाबतचेही समाधान व्यक्त होते.

मा. श्री. मनोहर जोशी, माजी लोकसभा अध्यक्ष आणि विधान परिषद सदस्य म्हणतात की, 'या मुंबई शहरात असंघटित असणारा, गरिबी–दारिद्र्यात असणारा हमाल, त्याचा होणारा तिरस्कार, होणारी मानहानी व उपमर्द हे सर्व अण्णासाहेब पाटील यांनी मनगटाच्या जोरावर थांबवून हा सगळा वर्ग संघटित केला. घाटी–घाटी म्हणून त्यांचा होणारा उपहास, या महाराष्ट्राच्या राजधानीत त्यांचे असणारे दैन्य दूर केले.'[४]

हमाल–माथाडी कामगारांची अवहेलना थांबवून त्यांना सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी या माथाडी कामगार चळवळीने केलेले काम श्री. मनोहर जोशी यांचे विचारातून व्यक्त होते.

माथाडी कामगार चळवळीच्या सुरुवातीच्या काळापासूनच श्री. अण्णासाहेब पाटलांबरोबर असणारे श्री. याकुब मोहम्मद दरवेशी म्हणतात, 'माथाडी कामगारों की संघटना यह एक रंगबेरंग फुलों का गुलदस्ता है, हिंदुस्थान को आजादी मिल गयी। लेकीन माथाडी कामगारोंको आजादी नहीं थी। उन्हे इस बंबई नगरी में व्यापारियों के गुलामगिरी में रहना पड़ा। इस गुलामी में मैं भी एक माथाडी कामगार के हैसिएत से गुलामगिरी के दिन काट रहा था। ऐसी हालात में अण्णासाहब पाटील ने एकट्ठा होने का नारा दिया, न्याय का रास्ता दिखाया। उस रास्ते से हमारे भविष्य में खुशियाँ मिली है।'[५]

माथाडी कामगारांच्या तत्कालीन परिस्थितीचे यथार्थ वर्णन आणि त्यावर मात करण्यासाठी माथाडी कामगारांनी एकत्र येवून न्याय मार्गाने केलेल्या प्रयत्नांचे प्रतिबिंब श्री. याकुब दरवेशी या श्री. अण्णासाहेब पाटील यांच्या सहकाऱ्याच्या विचारातून व्यक्त होते.

श्री. मनोहर कोतवाल, कामगार नेते त्यांच्या 'माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा' या लेखात म्हणतात, 'आता पर्यंत जवळपास दीड लाखाच्यावर असंरक्षित कामगार या कायद्याचा महाराष्ट्रात लाभ घेत आहेत. या कायद्यामध्ये आवश्यक असलेल्या विविध औद्योगिक क्षेत्रामधल्या माथाडी व इतर श्रमजीवी कामगारांसाठी योजना तयार करण्यात आल्या आणि त्या राबविण्यासाठी त्रिपक्षीय मंडळ स्थापन झाले. परंतु या मंडळाकडून कायदा आणि त्या अंतर्भूत असलेल्या ज्या अपेक्षा होत्या, त्यामात्र पूर्ण होवू शकल्या नाहीत असे खेदाने म्हणावे लागेल. हे म्हणत असताना आजही मला असे वाटते की, प्रचलित कायदा व योजना यामध्ये काहीही बदल न करता सुध्दा लक्षावधी कामगारांना अधिक चांगल्या तऱ्हेने त्यांचा फायदा मिळवून देता येईल. माथाडी कायद्याची २५ वर्षातली वाटचाल न्याहाळताना या कायद्याच्या अंमलबजावणीतल्या अनेक त्रुटी स्पष्ट दिसत असल्या तरी या कायद्याने असंरक्षित कष्टकऱ्यांना स्वाभिमान दिला, हे मान्य करावेच लागेल.'[६]

माथाडी कायद्याची अंमलबजावणी अद्यापही समाधान कारक होत नसल्याची खंत श्री. मनोहर कोतवाल यांचे विचारातून प्रकट होते,त्यावेळी प्रचलित कायद्याच्या आधारेच अद्यापही लाभापासून वंचित राहिलेल्या माथाडी हमालांना लाभ मिळवून देता येवू शकतात हा वस्तूस्थितीदर्शक आशावादही त्यांनी मांडला आहे. तसेच या कायद्याने लाखो माथाडी कामगारांना कल्याणकारी लाभ आणि स्वाभिमान दिल्याची बाबही मान्य केली आहे. माथाडी कायद्याच्या निर्मिती पूर्वीपासूनच आणि त्याचे निर्मितीच्या प्रक्रियेतही या महान कामगार नेत्याने भाग घेतलेला असल्यामुळे त्यांचे विचारांना एक प्रकारचे वेगळे महत्त्व आहे.

श्री. अजित निंबाळकर, माजी कामगार आयुक्त तथा माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे त्यांच्या 'माथाडी कायदा–असंरक्षित कामगारांसाठी एक वरदान' या लेखात म्हणतात की, 'सामाजिक क्रांतीचा कोणताही निर्णय राबविताना सुरुवातीला जसा प्रतिगामी शक्तींचा विरोध होतो,

तसाच विरोध या क्रांतीकारक कायद्याच्या अंमलबजावणीच्या संबंधात व्यक्तिंकडून झाला. आपण देशातील इतर राज्यांशी तुलना केली तर माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीमुळे महाराष्ट्रातील असंघटित असंरक्षित कामगारांच्या दैनंदिन जीवनात जो फरक पडला आहे, त्यास तोड नाही आणि म्हणूनच या क्रांतीकारक कायद्याचे देशात मोठ्या प्रमाणावर स्वागत झाले असून इतर राज्ये देखील त्याचे अनुकरण करीत आहेत. ही गोष्ट महाराष्ट्रास भूषणास्पद आहे.'[७]

श्री. अजित निंबाळकर हे भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी होते, त्यांनी जिल्हाधिकारी, कामगार आयुक्त, शासनाच्या विविध पदांवर प्रदीर्घकाळ काम पाहिले आहे, त्यामुळे त्यांनी या कायद्याला क्रांतीकारी आणि भूषणावह कायदा संबोधले यात माथाडी कामगार चळवळीचे महत्त्व प्रतिबिंबीत होते.

श्री. वालचंद संचेती, माजी अध्यक्ष, पुना मर्चंट चेंबर्स यांनी 'माथाडी मंडळ स्वच्छ कारभाराची गरज' या लेखात नमूद केले आहे की, 'या माथाडी मंडळाकडे लेव्ही, शुल्क पध्दतीने कोट्यावधी रुपयांची आवक सुरु झाली. जसजशी निधीची रक्कम वाढू लागली, तसतसे माथाडी मंडळामध्ये गैरप्रकार वाढू लागले. कल्याण योजनांचे यशापयश त्या राबविणाऱ्या माणसांवर अवलंबून असते. याकरिता या माथाडी मंडळावर नि:स्पृहपणे काम करणारी माणसे असणे आवश्यक आहे.'[८] श्री. वालचंद संचेती यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत. तसेच त्यावर उपाय म्हणून चांगले अधिकारी मंडळावर नेमण्यात यावे असेही सूचवले आहे.

श्री. नरेंद्र अण्णासाहेब पाटील, आमदार आणि सरचिटणीस (महाराष्ट्र राज्य, माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन) 'मी माझा' या वाहीनीला दिलेल्या मुलाखतीत म्हणतात की, यांत्रिकीकरणामुळे कामगार कपात होत आहे, मालवाहतुकीत रोबोटस्‌चा वापर होत आहे, त्यामुळे कामगार चळवळीला तारेवरची कसरत करावी लागत आहे. मालकांना माथाडी कायदा लागू करणे नको वाटते, रांजणगाव, पिंपरी–चिंचवड येथे गुंड प्रवृत्तीचे लोकांमुळे माथाडी कामगारांना त्रास होतो. तसेच कारगील युध्दाचे वेळी श्री. जॉर्ज फर्नांडीस यांचेकडे भारतीय जवानांसाठी रु. ७५ लक्ष

देण्यात आले. माथाडी कायदा देशपातळीवर न्यावा अशी वडिलांची इच्छा होती, आम्ही त्यासाठी प्रयत्न करु. तसेच माथाडी कामगारांना पेन्शन स्किम लागू केली पाहीजे.'

अशा प्रकारे श्री. नरेंद्र पाटील, आमदार आणि सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य, माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल युनियन यांनी माथाडी कायद्यापुढील आव्हाने स्पष्ट केली आहेत. तसेच माथाडी कामगारांनी देशसेवेची प्रवृत्ती अद्यापही कायम ठेवली असल्याचे कारगील जवान मदतीवरुन दिसून येते.

श्री. अरुण मेहता, कामगार राज्यमंत्री त्यांच्या 'माथाडी मंडळांची शिखर संस्था झालीच पाहिजे!'या लेखात म्हणतात, 'असंरक्षित कामगारांना कायद्याचे संरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. वैद्यकिय सेवेपासून सेवानिवृत्त पर्यंतचे सर्व लाभ या कायद्यामुळे माथाडी कामगारांना मिळत आहेत. या दृष्टीने सरकारने जाणीवपूर्वक प्रयत्न केले आहेत. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची दूरदृष्टी आणि प्रेरणा तसेच माथाडी कामगारांचे आराध्य दैवत अण्णासाहेब पाटील यांच्या पुरोगामी विचारांचा धागा पकडून भूतपूर्व मुख्यमंत्री वसंतराव नाईक, वसंतदादा पाटील आणि शरद पवार यानी त्याच तोलामोलाने ही चळवळ सांभाळली, जोपासली आणि वाढविलीही.'नव्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी अण्णासाहेब पाटील, बाबा आढाव यांच्या सारख्यांचा आदर्श पुढे ठेवून काम केले पाहिजे, 'मिशन' मानून काम केले पाहिजे. ही चळवळ हाताळताना अधिक व्यापक दृष्टीकोन ठेवा. तो ठेवला नाही, तर सरकारच्या पुरोगामी धोरणामुळे आणि कामगारांच्या ताकदीमुळे तुमच्या हाती आलेली चळवळ निसटायला वेळ लागणार नाही. त्यात तुमचेही हित नाही आणि कामगारांचे तर नाहीच नाही.[१०]

श्री. मेहता यांनी माथाडी कायद्याचा कामगारांच्या जीवनावरील सकारात्मक परिणाम, त्यासाठी राज्य शासनाचे प्रयत्न आणि राज्याच्या अनेक मुख्यमंत्र्यांची पोषक भूमिका नमूद केली आहे. तसेच ही माथाडी कामगार शाश्वत व सशक्त राहण्यासाठी माथाडी कामगार नेत्यांनी व्यापक दृष्टीकोनाने, मिशन मानून काम करण्याची आवश्यकताही नमूद केली आहे. श्री. अरुण मेहता हे

प्रदीर्घकाळ महाराष्ट्राच्या राजकारणात आहेत तसेच कामगार राज्यमंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. त्यामुळे त्यांचे विचार महत्त्वपूर्ण व मार्गदर्शक ठरणार आहेत.

डॉ. हरिश धुरट, नागपूर हे आपल्या 'विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल' या लेखात म्हणतात की, महाराष्ट्रात १९६९ साली माथाडी कायदा आला. हा कायदा राबविण्यासाठी मागणीच्या रेट्याप्रमाणे मंडळे अस्तित्वात आली. हमाल कामगारांच्या मनगटातल्या शक्तीप्रमाणे कायदा राबविला गेला. विदर्भ मागे राहिला. विदर्भातील माथाडी कामगारांचे कायद्याशी नाते जुळले नाही; ज्यांचे नाते जुळले, त्यांचे संसार नीट चालू नाही.'याच लेखात त्यांनी डॉ. बाबा आढाव यांनी व्यक्त केलेले विचार नमूद केले आहेत. "शासकीय कर्मचारी, न्यायालय यावर फार अवलंबून राहता येणार नाही. कष्टकरी माणसांची एकजूटच महत्त्वाची आहे. संघर्षाची वाटचाल करावी लागेल. त्यातूनच हमाल कामगारांना यश मिळेल याची खात्री आहे.'[११]

डॉ. बाबा आढाव, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ हे आपल्या 'मुक्त अर्थव्यवस्थेत माथाडी कायद्याचे भवितव्य काय?' या लेखात म्हणतात की, 'असंघटित, असुरक्षित कामगारांच्या संख्येत रोज वाढ होत आहे, हा वर्ग माथाडी हमाल कामगार कायद्याकडे मोठ्या आशेने पहात आहे.'[१२] माथाडी कायद्यासारखा कायदा आपल्यासाठीही लागू होवून ज्या प्रमाणे माथाडी कामगारांच्या परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला तसाच लाभ आपल्यालाही होईल ही इतर असंघटित, असुरक्षित कामगारांची माथाडी कायद्याप्रतीची आशा डॉ. बाबा आढाव यांच्या उपरोक्त विचारातून व्यक्त होते.

श्री. बाबुराव रामिष्टे, सरचिटणीस, अखिल भारतीय माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन हे आपल्या 'माथाडी कायद्यात बदल करणे ही काळाची गरज' या लेखात म्हणतात, 'सदरहू कायदा फक्त महाराष्ट्र राज्याने एक स्पेशल कायदा म्हणून लागू केलेला असून या कायद्यामुळे कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसणाऱ्या असंरक्षित कामगारांना संरक्षण मिळालेले आहे. त्यामुळे माथाडी कामगारांना आर्थिकदृष्ट्या सुदृढ करण्याचे काम झालेले आहे. केवळ महाराष्ट्राचा विचार न करता या कायद्याला राष्ट्रीय स्वरुप देणे अत्यावश्यक आहे.'[१३]

देशात केवळ आपल्याच राज्यात या वैशिष्ट्यपूर्ण कायद्यातील तरतूदीमुळे माथाडी कामगारांना लाभ मिळाले असून ते देशातील इतर राज्यातील माथाडी कामगार बंधु भगिनींना मिळावे ही उच्चप्रतीची भावना श्री. बाबुराव रामिष्टे यांनी येथे व्यक्त केली आहे.

श्री. अंकुश मोरे, कामगार उपआयुक्त, माथाडी विभाग, महाराष्ट्र राज्य हे आपल्या 'माथाडी कायदा–महाराष्ट्र राज्याला पडलेले एक अविस्मरणीय स्वप्न' या लेखात म्हणतात की, 'साकल्याने विचार केला असता असे दिसून येईल की, ज्या असंरक्षित कामगारांची मालकांकडून पिळवणूक करण्यात येत होती, ती पिळवणूक कायद्यामुळे थांबलेली आहे यात शंका नाही. एवढेच नव्हे तर या कामगारांना या कायद्याचे अधिकाधिक संरक्षण प्राप्त झाल्यामुळे त्यांना आता आपले जीणे स्वाभीमानाचे वाटू लागले आहे. या कायद्यामुळे भविष्य निर्वाह निधी, उपदान, वैद्यकीय मदत, सानुग्रह अनुदान इ. विविध लाभ मिळत असून त्यामुळे त्यांचे कौटुंबिक जीवन सुसह्य झाले आहे. माथाडी कायदा हे महाराष्ट्र राज्याला पडलेले एक अविस्मरणीय स्वप्न असे म्हणण्याचा हेतू एवढाच की, महाराष्ट्र राज्याशिवाय इतर कोणत्याही राज्यामध्ये अथवा राष्ट्रामध्ये अशा प्रकारचा कायदा आजतागायत अस्तित्वात नाही. इतर राज्ये तसचे परदेशातील अनेक शिष्ट मंडळांनी आपल्या राज्यात, देशात हा कायदा लागू करण्यासाठी या कायद्याची माहिती आपल्याकडून घेतली आहे. त्यामुळे या माथाडी कायद्याचे महत्त्व माथाडी कामगारांच्या दृष्टीने अनन्यसाधारण आहे.'[१४]

श्री. अंकुश मोरे यांनी स्वत: माथाडी कायद्याची अंमलबजावणी केलेली आहे. माथाडी कायद्यामुळे माथाडी कामगारांच्या आर्थिक व सामाजिक जीवनातील बदलाचे प्रतिबिंब तसेच या कायद्याचा इतरांनी अभ्यास करुन त्याचा लाभ इतर राज्यातील, देशातील बांधवांनाही होण्याच्या दृष्टीने त्याचे महत्त्व श्री. अंकुश मोरे यांचे विचारातून स्पष्ट होते.

श्री. हसन मुश्रीफ, विद्यमान कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य म्हणतात की, 'आता राज्यभरात माथाडी मंडळे स्थापन झाली असून त्यांचे माध्यमातून माथाडी कामगारांना अनेक लाभ मिळत आहेत. आयुष्याच्या शेवटी कष्ट झेपेनासे झाल्यावर रिकाम्या हाताने गावाकडे परत जाणारा माथाडी कामगार आता भविष्य निर्वाह निधी आणि उपदानाची मोठी रक्कम घेवून सन्मानाने सेवानिवृत्तीचे

जीवन जगत आहे. माथाडी कामगारांनी आयुष्यभर ओझीच वाहत राहणे योग्य नाही. नवीन कौशल्ये शिकून त्यानुसार नोकरी किंवा व्यवसाय करण्याची त्यांची इच्छा असल्यास त्यांना तसे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील माथाडी कामगारांप्रमाणेच देशभरातील माथाडी कामगारांनाही सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळणे हा त्यांचा घटनात्मक हक्क आहे. त्यासाठी देशपातळीवर माथाडी कायदा होण्याची गरज आहे. सन १९६० ते १९७० च्या दशकातील माथाडी कामगार चळवळ ही इतर असंघटित कामगारांसाठी एक मार्गदर्शक चळवळ आहे. विखुरलेल्या स्वरुपात काम करणाऱ्या अशिक्षित कामगारांसाठी अशा प्रकारे एका स्वतंत्र कायद्याच्या माध्यमातून लाभ देता येऊ शकतात. हे उदाहरण माथाडी कायद्यामुळे अन्य असंघटित कामगारांपुढे दिसत आहे. या कायद्यामुळे व्यापारी वर्गाला निश्चितपणे, मंडळाने ठरवून दिलेल्या मजूरी दराने माथाडी कामगार उपलब्ध होत आहेत. त्यामुळे त्यांचे वेळेची बचत होते, वेळचेवेळी कामे होवून व्यापारात अडचणी येत नाहीत. माथाडी कामगार आणि व्यापाऱ्यांनी परस्परांशी समन्वय राखून काम केल्यास ते माथाडी कामगार आणि मालक दोघांनाही फायदेशीर होणारे आहे.'[१५]

माथाडी कायद्यामुळे माथाडी कामगारांचे आर्थिक, सामाजिक जीवनावर झालेला परिणाम, या कामगार चळवळीचे अन्य असंघटित कामगारांचे दृष्टीने असणारे अनन्यसाधारण महत्त्व तसेच व्यापाऱ्यांसाठीही हा कायदा उपयुक्त असल्याचे मत श्री. हसन मुश्रीफ यांनी कामगार मंत्री म्हणून अशा प्रकारचा माथाडी कायदा होऊन संपूर्ण देशातील माथाडी कामगारांना कल्याणकारी लाभ मिळावा ही व्यक्त केलेली भावना त्यांचा व्यापक सामाजिक दृष्टिकोन दर्शविते.

श्री. राजेंद्र गावित, विद्यमान कामगार राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य म्हणतात की, 'माथाडी कामगारांना या कायद्यामुळे सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावला आहे. अपमानास्पद जीवन जगणारा माथाडी कामगार आज स्वाभीमानाने जगत आहे. राज्य शासनाने राबविलेल्या गृह योजनांच्या माध्यमातून स्वत:च्या मालकीच्या घरात राहत आहे, त्यांची मुले शिकून सुशिक्षित झालेली आहेत. ही एक सामाजिक क्रांती आहे. माथाडी कामगार चळवळ ही अन्य असंघटित कामगारांच्यासाठी आदर्श व मार्गदर्शक आहे. ज्या प्रकारे माथाडी

कामगारांनी प्रतिकूल परिस्थितीत सतत संघर्ष करुन स्वतंत्र कायदा करुन घेतला, त्या माध्यमातून अनेक लाभ मिळवले, त्याप्रमाणे आपण देखील लाभ मिळवू शकतो, हा आत्मविश्वास इतर असंघटित कामगारांना या चळवळीच्या माध्यमातून मिळाला आहे. तसेच कोणत्याही कायद्याचा वापर कशा प्रकारे होत आहे, त्यावर त्याचे यशापयश अवलंबून असते. माथाडी कामगार व माथाडी नेते आणि मालक यांनी कायद्यातील तरतूदींशी एकनिष्ठ राहून मिळून काम केल्यास हा कायदा मालक व कामगार दोघांनाही उपयुक्तच ठरणार आहे.'[१६] माथाडी कामगारांचे जीवनातील या कायद्याचे महत्त्व, या कायद्यामुळे इतर असंघटित कामगारांमध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास आणि कायद्याचे यश अपयशाला मालक व कामगार दोघेही जबाबदार राहणार असल्याचे मत श्री. राजेंद्र गावित यांनी आपल्या व्यापक दृष्टिकोनातून व्यक्त केले आहे.

डॉ. हरिश धुरट यांनी 'मन–मनगटात बळ पाहिजे' या लेखात नमूद केले आहे की, 'टग्गा (टायरची गाडी) ओढताना जो दम लागतो, जी ताकद लागते, जी मेहनत लागते, जो घाम फुटतो तीच गत माथाडी कायदा पदरात पाडताना होत आहे. १९६९ साली आलेला कायदा २०१२ सालातही अनेक कष्टकऱ्यांच्या घरात गेलेला नाही. ज्या संघटनेत बळ आहे, ज्या कामगारांच्या मन–मनगटात बळ आहे, ज्याला वर्तमान भविष्याची जाण आहे, त्यालाच हा कायदा मिळतो.'[१७] देशातील कोणताही कायदा, नियम यांची अंमलबजावणी करुन घेताना लाभार्थी घटकाला वारंवार संघर्ष करावा लागतो, त्याला सहजासहजी लाभ मिळत नाहीत. हे विदारक सत्य डॉ. हरिश धुरट यांनी मांडले आहे. जोपर्यंत लाभार्थी घटक स्वत: संघर्ष करत नाही, तोपर्यंत त्याला हे कायद्याचे लाभ मिळत नाहीत. डॉ. हरिश धुरट यांनी हमाल पंचायतीच्या माध्यमातून विदर्भात माथाडी कायद्याची अंमलबजावणी करुन घेण्यासाठी आलेल्या अनुभवाअंती आपले वस्तूस्थितीदर्शक विचार व्यक्त केलेले आहेत.

डॉ. कविता गुप्ता (भा.प्र.से.) कामगार विभागाच्या माजी प्रधान सचिव म्हणतात की, 'माथाडी कामगार संघटनांनी सर्वार्थाने केवळ माथाडी कामगारांच्या भल्यासाठीच काम केले पाहिजे अन्यथा हा कायदा सुरु ठेवावा किंवा कसे या विषयी प्रश्नचिन्ह निर्माण होवू शकेल. माथाडी

कामगारांचे कामाचे स्वरुपानुसार त्यांचे शरीरावर होणारे विपरित परिणाम पाहता त्यांची दरवर्षी मोफत वैद्यकीय चाचणी व्हावी. माथाडी कामगार चळवळीचा अन्य असंघटित कामगारांच्या चळवळीवर एक सकारात्मक व चांगला परिणाम झालेला आहे. माथाडी कायदा हा कामगारांसाठी वरदानच आहे, मात्र राज्यातील उद्योग विकासात तो काही प्रमाणात अडथळाही ठरत असल्याचे दिसून येते. जर कायद्याचा योग्य तऱ्हेने वापर केला तर तो माथाडी कामगार आणि उद्योग दोघांनाही वरदान ठरेल अन्यथा घातक ठरु शकेल.'[१८]

डॉ. कविता गुप्ता यांनी प्रदीर्घ काळ कामगार विभागाच्या प्रधान सचिव पदावर काम केलेले आहे. या कायद्याची मंत्रालयीन स्तरावरुन अंमलबजावणी करताना त्यांना आलेल्या अनुभवांचे प्रतिबिंब त्यांचे विचारातून प्रकट होते. एक प्रशासक म्हणून एखाद्या कायद्याच्या बऱ्या आणि वाईट दोन्ही बाजू त्यांनी आपले अनुभवांचे आधारे नमूद केल्या आहेत आणि हा माथाडी कायदा अधिक चांगल्या पध्दतीने शाश्वतरित्या माथाडी कामगारांच्या कल्याणाकरीता राबविण्याच्या दृष्टिने त्यांचे विचार अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

श्री. यशवंतराव चव्हाण, संरक्षणमंत्री, भारत सरकार हे माथाडी कायद्याचे स्वागत करण्यासाठी आयोजित केलेल्या समारंभात दि. २६ जानेवारी १९७० रोजी म्हणतात की, 'असुरक्षित माथाडी कामगारांसाठी कायदा झाला ही आनंदाची गोष्ट असली तरी या कायद्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते की नाही हे पाहण्यासाठी, यांच्यासाठी हा कायदा केलेला आहे, त्यांनीच सदैव डोळ्यात तेल घालून जागृत राहिले पाहिजे, आपली एकजूट भरभक्कम ठेवली पाहिजे तरच कायद्याने मिळालेल्या सवलतींचा फायदा सर्वांना खऱ्याखुऱ्या अर्थाने मिळेल.'[१९]कायद्याच्या शाश्वत अंमलबजावणीसाठी स्वत: लाभार्थी माथाडी कामगारांनी सतत जागृत राहणे आवश्यक असल्याचा सल्ला श्री. यशवंतराव चव्हाण यांनी यातून दिला आहे. यातून श्री. यशवंतराव चव्हाणांची दूरदृष्टी, विचारांची परिपक्वता दिसते.

श्री. अण्णासाहेब पाटील, संस्थापक, सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन म्हणतात, 'माथाडी कामगार युनियन किंवा माथाडी कामगार संघटना ही

एक शिस्तबध्द सामर्थ्यशाली व विधायक प्रवृत्तीची संघटना होण्यासाठी शेकडो कार्यकर्ते, हजारो स्त्री–पुरुष कामगार गेली सतरा वर्षे अक्षरश: खपले आहेत! रक्ताचे पाणी करुन रात्रंदिवस राबले आहेत! अनेकांनी आपले देह झिजविले आहेत आणि अनेक जण धारातीर्थीही पडले आहेत!

कामगारांना 'काम तसा दाम' मिळाला, ग्रॅच्युईटी, भविष्य निर्वाह निधी, अपघात नुकसान भरपाई, औषधोपचार, हक्काची भरपगारी रजा व सणावाराच्या सुट्ट्या इतर फायदे मिळाले तरी या फायद्यांनी कामगारांनी उतून मातून न जाता समाजातील गरजवंतांची आठवण ठेवावी, अडीअडचणींच्या वेळी, पूर, आग वगैरे संकटाच्या वेळी लोकांच्या उपयोगी पडावे. महाराष्ट्रातील दुष्काळ असो, गुजरातमधील पूर असो की, आंध्रातील वादळ असो, माथाडी कामगार आपल्याकडून होईल तेवढी मदत तातडीने व सढळ हाताने देत आला आहे. चिनचे आक्रमण, पाकिस्तानची स्वारी अशा राष्ट्रीय संकटाच्यावेळी आपल्या ताकदीनुसार कामगारांनी फूल ना फूलाची पाकळी देशाच्या सेवेत रुजू केली आहे. राष्ट्रीय भावनेतूनच त्यांनी अल्प बचतीद्वारे बचत केली आहे. राष्ट्रीय संरक्षण निधी, रक्तदान दिले आहे.'[२०]

श्री. अण्णासाहेब पाटलांनी स्वत: माथाडी कामगार म्हणून काम केलेले आहे, स्वत: माथाडी कामगार म्हणून विदारक परिस्थिती भोगूनच माथाडींची संघटना उभारली, स्वतंत्र कायदा करुन त्याची अंमलबजावणी करुन घेतली. त्यामुळे त्यांचे उपरोक्त विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. या माथाडी कामगार चळवळीची वास्तवस्थिती त्यांनी नमूद केली आहे.

माथाडी कामगारांनी स्वत: सुखी झाले तरी इतरांच्या दु:खाचा विसर पडू न देता देशबांधवासाठी, देशासाठी मदतीला नेहमी तत्पर राहणाऱ्या माथाडी कामगारांची विधायक मानसिकता व देशप्रेम त्यांच्या विचारातून प्रकट होते.

महाराष्ट्र विधानसभेत माथाडी कायदा पास होताना झालेल्या चर्चे दरम्यान श्री. कृ. ग. देसाई (आमदार, परळ) म्हणतात की, 'माथाडी कामगारांनी चळवळ केली, लढा केला, त्याग केला आणि त्यातून हे बिल सरकारला बनवावेसे वाटले.'[२१] यातून माथाडी कायद्यासाठी माथाडी कामगारांनी केलेले प्रयत्न दिसून येतात.

महाराष्ट्र विधान परिषदेतील माथाडी कायद्यावरील चर्चे दरम्यान श्री. नरेंद्र तिडके, कामगार मंत्री म्हणतात की, 'या विधेयकावर खालच्या सदनात (विधानसभेत) जी चर्चा झाली, त्याहीपेक्षा अधिक विधायक आणि मनापासून चांगली चर्चा या ठिकाणी (विधान परिषदेत) या विधेयकावर झाली आहे. ही चर्चा ऐकत असताना या सभागृहाच्या दोन बाजू आहेत. याचाही मला विसर पडला. या विधेयकाचे जे मनापासून स्वागत झाले ती फार महत्त्वाची गोष्ट मी मानतो. या विधेयकाबद्दल ज्या सद्भावना दोन्ही बाजूच्या सदस्यांनी व्यक्त केल्या त्याबद्दल कामगार मंत्री या नात्याने मी त्यांचे आभार मानतो.'[२२]

यावरुन स्पष्ट होते की महाराष्ट्रातील सर्वच राजकिय पक्षांच्या आमदारांनी मतभेद बाजूला ठेवून एकमताने या माथाडी कायद्याला पाठिंबा व्यक्त केला होता आणि म्हणूनच शासनाच्या वतीने श्री. नरेंद्र तिडके, कामगार मंत्री यांनी सर्व आमदारांचे आभार मानले.

अशा प्रकारे मान्यवरांनी या कायद्यामुळे माथाडी कामगारांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात उन्नती झाल्याचे मत व्यक्त केले आहे. तसेच काही मान्यवरांनी या कायद्याच्या अंमलबजावणीत अपप्रवृत्तींचा शिरकाव झाला असून त्यावर वेळीच उपाययोजना करण्याची गरज नमूद केली आहे. या सर्वांची मते विचारात घेता एकंदरीत माथाडी कामगार चळवळीचे भारतीय कामगार चळवळीत मोलाचे योगदान असल्याचे स्पष्ट होते. तसेच भारतात प्रथमच असंघटित, विखुरलेल्या, अशिक्षित अशा माथाडी कामगारांसाठी अशा प्रकारचा कायदा ाल्याचे आणि त्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनात मोठा बदल घडून आल्याचे मत मान्यवरांकडून व्यक्त करण्यात आले आहे.

# संदर्भ सूची


१. पाटील वसंतदादा, माजी मुख्यमंत्री, शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन–रौप्य महोत्सवी विशेषांक, दि. २० सप्टेंबर १९८८.

२. अष्टेकर श्याम, तत्कालीन उद्योग व क्रिडा राज्यमंत्री, शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, रौप्य महोत्सवी विशेषांक, उपरोक्त दि. १९ सप्टेंबर १९८०.

३. तिडके नरेंद्र, माजी कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन–रौप्य महोत्सवी विशेषांक, उपरोक्त, दि. २१ सप्टेंबर १९८८.

४. जोशी मनोहर, माजी लोकसभा अध्यक्ष आणि तत्कालीन विधान परिषद सदस्य, 'स्वयंभू कामगार नेता',महाराष्ट्र राज्य, माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन–रौप्य महोत्सवी विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. १४.

५. दरवेशी याकुब मोहम्मद, महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन–रौप्य महोत्सवी विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ३६.

६. कोतवाल मनोहर, कामगार नेते, 'माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ, पुणे (प्रकाशन), पृ. क्र. १५ ते १७.

७. निंबाळकर अजित, माजी कामगार आयुक्त तथा माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, 'माथाडी कायदा–असंरक्षित कामगारांसाठी एक वरदान', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ३०, ३१.

८. संचेती वालचंद,माजी अध्यक्ष, पुना मर्चंट चेंबर्स, 'माथाडी मंडळ स्वच्छ कारभाराची गरज', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ५४.

९. पाटील नरेंद्र अण्णासाहेब, आमदार, मी माझा – टि.व्ही. चॅनेल, श्रेया (मुलाखतकार), नवी मुंबई.

१०. मेहता अरुण, कामगार राज्यमंत्री, माथाडी मंडळाची शिखर संस्था झालीच पाहिजे!, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ५७ ते ५९. (दि. १ मे १९९२, मुंबई, सकाळ माथाडी विशेषांक–पुनर्मुद्रित)

११. धुरट हरिष, ‘विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल’, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७५, ७६.

१२. आढाव बाबा, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ, पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० व्या वर्धापन दिन स्मरणिका, ऑक्टोबर २०००, पृ. क्र. २२.

१३. रामिष्टे बाबुराव, सरचिटणिस, अखिल भारतीय माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ–२० वा वर्धापन दिन स्मरणिका, उपरोक्त, पृ. क्र. ६९, ७३.

१४. मोरे अंकुश, कामगार उपआयुक्त, माथाडी कक्ष, पुणे माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, उपरोक्त, पृ. क्र. १३९.

१५. मुश्रीफ हसन, विद्यमान कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुलाखत, दि. ४ मार्च २०१४.

१६. गावित राजेंद्र, विद्यमान कामगार राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुलाखत, दि. ३ मार्च २०१४.

१७. धुरट हरिष, ‘मन–मनगटात बळ पाहिजे’, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. क्र. ७५, ७६.

१८. गुप्ता कविता (भा. प्र. से.) कामगार विभागाच्या माजी प्रधान सचिव, मुलाखत.

१९. चव्हाण यशवंतराव, संरक्षणमंत्री, भारत सरकार, माथाडी मित्र विशेषांक, १९८३, पृ. क्र. ४.

२०. पाटील अण्णासाहेब, संस्थापक, सरचिटणिस, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, माथाडी मित्र–कै. अण्णासाहेब पाटील स्मृती विशेषांक, १९८७,पुर्नमुद्रण पृ. क्र. २, ४. (किराणा बाजार मंडळाची पाऊण तपपूर्तीचे वेळी प्रकाशित स्मरणिका, १९७९, पुनर्मुद्रण)

२१. देसाई कृ. ग., (आमदार, परळ), महाराष्ट्र विधानसभा इतिवृत्त, दि. २५ मार्च १९६९, पृ. क्र. ४२३.

२२. तिडके नरेंद्र, कामगारमंत्री, विधान परिषद कामकाज इतिवृत्त, दि. १ एप्रिल १९६९, पृ. क्र. ४५७.

# प्रकरण ६ वे

# समारोप

## माथाडी कायद्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनातील स्थित्यंतर :

आपल्या शारीरिक श्रमाचा वापर करुन ओझी वाहून त्यावर चरितार्थ चालविणारा माथाडी कामगार शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या देखील मागासलेला होता. गावी शेती किंवा इतर रोजगाराचे पुरेसे उत्पन्न नसल्यामुळे घाटमाथ्यावरील जिल्ह्यातून हे कामगार मुंबईमध्ये येत.[१] माथाडी कामगारांची पुढील पिढी देखील माथाडी कामगार किंवा अशाच प्रकारचे इतर काम करत असे. गरिबीचे आणि हालाखीचे हे चक्र पुढच्या पिढीतही चालू राही.

कायमस्वरुपी आणि निश्चित असे कामाचे ठिकाण व स्वरुप नसल्यामुळे माथाडी कामगारांचे मालक–कामगार असे संबंध प्रस्थापित होत नव्हते.[२] यामुळे त्यावेळच्या कामगार कायद्यांचे संरक्षणही त्यांना मिळत नव्हते. विखुरलेल्या स्वरुपात असल्यामुळे त्यांची संघटना बांधणे अवघड होते.[३] तसेच त्यांचा विशेष राजकिय व आर्थिक फायदा होत नसल्यामुळे तत्कालीन कामगार नेते या माथाडी कामगारांची संघटना बांधण्यासही स्वारस्य दाखवत नव्हते. मात्र श्री. अण्णासाहेब पाटलांनी स्वत: माथाडी कामगार म्हणून काम केलेले होते, त्यामुळे त्यांना या विदारक परिस्थितीची पूर्ण जाणीव होती.[४] आपल्या सहकार्यांच्या मदतीने माथाडी कामगारांना एकत्र आणून संघर्षास सुरुवात केली. याची परिणिती म्हणून राज्य शासनाने ‘महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ पास केला.[५]

या अधिनियमामुळे माथाडी कामगारांचे आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला. माथाडी कामगार आणि मालकांची माथाडी मंडळामध्ये रितसर नोंद होवू लागली. माथाडी कामगारांना नियोजित स्वरुपात रोजगार मिळू लागला. त्यांचे वेतन दर निश्चित झाले. त्याचबरोबर भविष्य निर्वाह निधी, उपदान, भरपगारी रजा, वैद्यकीय सुविधा, अपघात नुकसान भरपाई इत्यादी लाभ मिळू लागले.[६] त्यांचे सर्वसामान्य राहणीमानही सुधारले. माथाडी

कामगार यामुळे स्वाभीमानाने समाजात वावरु लागले आहेत. आर्थिक उन्नतीमुळे मुलांचे शिक्षणाकडेही माथाडी कामगार चांगल्या प्रकारे लक्ष देवू लागले. अनेक माथाडी कामगारांची मुले आज डॉक्टर, वकिल, इंजिनिअर, आमदार आहेत, उच्चशिक्षित आहेत.[७] शासनाने राबविलेल्या अनेक गृहनिर्माण प्रकल्पामुळे माथाडी कामगार आता मुंबईत कुटुंबासह स्वत:च्या घरात रहात आहेत.[८] मुंबईतील माथाडी हॉस्पीटल मध्ये तसेच राज्यातील इतर शहरातील माथाडी मंडळांनी नोंदणीकृत केलेल्या दवाखान्यात माथाडी कामगार मोफत आणि हक्काने वैद्यकीय सुविधा घेत आहेत.

माथाडी कायद्याच्या या यशाबरोबरच काही अनुचित प्रथादेखील सुरु झाल्या आहेत.[९] काही अनुचित घटना घडल्या आहेत, काही त्रुटी आढळून येत आहेत जसे की, मंडळात नोंद झालेले काही माथाडी कामगार नोंद नसलेल्या बाहेरच्या कामगारांकडून कमी मजुरीवर काम करुन घेवून त्यांची पिळवणूक करतात. काही कामगार व मालक परस्पर संमतीने काम करुन घेतात. राजीनामा देणारा कामगार व इतर नवीन कामगाराकडून आर्थिक मोबदल्याची अपेक्षा ठेवतात. मंडळाच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षितता मिळाल्यामुळे माथाडी कामगार देखील आता निर्धास्त झाले आहेत. बऱ्याचदा हे मालकांचे ऐकत नाहीत. काही मंडळातील आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संबंधित अध्यक्ष, अधिकारी व कर्मचारी आणि पदाधिकाऱ्यांची विभागीय चौकशी शासन स्तरावर सुरु आहे.

माथाडी कामगारांना मिळणाऱ्या मजुरीमध्ये देखील बरीच तफावत आहे. माथाडी मंडळाच्या कार्यकक्षेत पुरेसे काम उपलब्ध नसल्यामुळे अनेक कामगारांची इच्छा असूनही त्यांची माथाडी मंडळात नोंद होत नाही.

आता, राज्यातील सर्व जिल्ह्यात माथाडी मंडळे स्थापन झाली आहेत. राज्यभरात ८३५८३ मालकांची नोंद झालेली आहे आणि २०१९५४ कामगारांची नोंद झालेली असून त्यांना या कायद्याचा लाभ मिळत आहे.[१०] एकेकाळी कोणतीही सुरक्षितता नसणारे माथाडी कामगार एकजुटीच्या जोरावर सन्मानाने जगत आहेत, हे या माथाडी कायद्याचे क्रांतीकारक यश आहे.

## गृहितकांच्या अनुषंगाने संशोधनातील निष्कर्ष :

सदर संशोधनाच्या सुरुवातीला काही गृहीतके मांडण्यात आली होती. या गृहितकांच्या संदर्भाने उपलब्ध साहित्य, या विषयावर यापूर्वी झालेले संशोधन, केंद्र शासनाचे अहवाल; अधिसूचना, शासनाच्या विविध समित्यांचे अहवाल; शासन निर्णय, परिपत्रके, अधिसूचना, राज्यातील सर्व माथाडी मंडळाचे सुरुवातीचे व शेवटचे उपलब्ध वार्षिक अहवाल, विविध विशेषांक, स्मरणिका, मासिके, वर्तमानपत्र यातील माथाडी कामगार विषयावरील मान्यवरांचे लेख, राज्यस्तरीय सल्लागार समितीचे इतिवृत्त, मान्यवरांच्या मुलाखती, काही कामगार व मालकांच्या मुलाखती या आधारे गृहीतकांस अनुसरुन अभ्यास करण्यात आला. त्याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार अधिनियम, १९६९ हा कायदा माथाडी–हमाल कामगारांच्या कामाचे विशिष्ट स्वरुप व त्यांच्या गरजा लक्षात ठेवून केलेला कायदा आहे हे या कायद्याच्या नावावरुन स्पष्ट होते. या कायद्यापूर्वीचे सर्व कामगार कायदे विषयानुरुप सरसकट संघटित स्वरुपात काम करणाऱ्या सर्व प्रकारच्या कामगारांसाठी तयार केलेले होते. उदा. किमान वेतन अधिनियम, १९४८ कारखाने अधिनियम,१९४८ बोनस प्रदान अधिनियम इत्यादी माथाडी कामगार एका विशिष्ट ठिकाणी; एकाच मालकाकडे कायम स्वरुपी काम करत नव्हते. त्यामुळे त्यांचे मालक आणि कामगार अशा प्रकारचे संबंध प्रस्थापित होत नव्हते. त्यामुळे या कामगारांना कोणतेही लाभ मिळू शकत नव्हते. के. आर. पोवार, बी. एस. कालेलकर आणि शिवाजीराव पाटील या तीनही समित्यांनी माथाडी कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करण्याची शिफारस केली होती. अशा प्रकारचा विशिष्ट प्रकारच्या असंरक्षित कामगारांसाठी स्वतंत्र कायदा भारतात कोणत्याच राज्यात नव्हता. तसा सुस्पष्ट उल्लेख श्री. नरेंद्र तिडके, कामगार मंत्री यांनी या कायद्याचे प्रारुप विधानमंडळात सादर करताना तसेच यावरील चर्चे दरम्यान देखील वारंवार केलेला आहे.[११] तसेच आमदार हशु आडवाणी, लिलाधर शाह, एम.बी. हॅरिस, तुषार पवार, प्र. बा. वैद्य

यांनी देखील हा अशा प्रकारचा पहिलाच कायदा असल्याचे विधानमंडळातील चर्चेदरम्यान नमूद केले आहे.[१२]

श्री. मनोहर कोतवाल, डॉ. बाबा आढाव, अण्णासाहेब पाटील यांचे सारखे अनुभवी कामगार नेत्यांनी देखील माथाडी कामगार या घटकासाठी स्वतंत्रपणे केलेला हा पहिलाच कायदा असल्याचे आपल्या लेखांमधून मांडले आहे. तसेच या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे सर्वश्री अंकुश मोरे, कामगार उपआयुक्त, तुकाराम चोळके, अपर कामगार आयुक्त यासारख्या शासकिय अधिकाऱ्यांनी देखील हा अशा प्रकारच्या असंघटित कामगारांसाठीचा देशातील पहिला कायदा असल्याचा उल्लेख केलेला आहे.

अशा प्रकारे उपलब्ध साहित्याचे आधारे हे स्पष्ट होते की माथाडी कायदा हा स्वतंत्र भारतातील असंघटित व असुरक्षित तसेच विखुरलेल्या स्वरुपात, निश्चित एका मालकाकडे काम न करणाऱ्या माथाडी कामगारांसाठी स्वतंत्रपणे तयार केलेला पहिलाच कायदा आहे.

त्यामुळे अशा प्रकारचा असंघटित, असुरक्षित अशा एका स्वतंत्र कामगार वर्गासाठी गरजेनुसार वेगळा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरते. याबाबीचा देखील उल्लेख श्री. नरेंद्र तिडके, कामगार मंत्री तसेच अनेक आमदारांनी विधानमंडळात हा कायदा पास होताना केलेल्या भाषणात केलेला आहे. पुढे या कायद्याचा आणि त्याच्या अंमलबजावणीचा अभ्यास करण्यासाठी देशातील इतर राज्यातील अधिकारी व पदाधिकारी महाराष्ट्रात येवून गेले आहेत.[१३] अशा प्रकारे उपलब्ध साहित्याचे आधारे हे स्पष्ट होते की अशा प्रकारे कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याची बाब स्पष्ट होते.

माथाडी कामगारांसारख्या अशिक्षित, असंघटित कामगारांनी एकत्र येवून आपल्या संघशक्तीच्या जोरावर शासनाकडून स्वतंत्र कायदा पास करुन घेतला. या कायद्याच्या माध्यमातून भविष्य निर्वाह निधी, उपदान, भरपगारी रजा, आरोग्य सुविधा इत्यादी लाभ मिळविले. एखाद्या विशिष्ट असंघटित कामगार वर्गासाठी मालकाने मजूरीच्या रकमेच्या प्रमाणात काही रक्कम (लेव्ही) दरमहा मालकांकडून जमा करुन त्यातून या कामगारांना विविध कल्याणकारी लाभ पुरविता येवू

शकतात, ही संकल्पना प्रथमच या कायद्याच्या माध्यमातून साध्य झाल्याचे देशातील कामगार चळवळीपुढे आले. अशाही प्रकारे असंघटित कामगारांना स्वायत्त आणि आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण मंडळाच्या माध्यमातून लाभ देता येवू शकतात,ही बाब या कायद्याच्या यशस्वी अंमलबजावणीतून स्पष्ट झाली. माथाडी कायद्यानंतर बांधकाम कामगार, यंत्रमाग कामगार, घरेलू कामगार, सफाई कामगार यांनी देखील माथाडी कायद्याच्या धर्तीवर स्वतंत्र कायद्याची मागणी केली आहे.[१४] यापैकी बांधकाम कामगारांसाठी केंद्र शासनाने स्वतंत्र कायद्याच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षिततेची तरतूद केली आहे. तसेच महाराष्ट्र राज्याने देशात पहिल्यांदाच घरेलू कामगारांसाठी स्वतंत्र कायदा करुन त्यांना सामाजिक सुरक्षितता दिली आहे. सफाई कामगारांसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबत राज्य शासन कार्यवाही करत आहे. सुरक्षा रक्षकांसाठी राज्य शासनाने स्वतंत्र कायदा करुन माथाडी कामगारांप्रमाणेच त्यांनाही सुरक्षा रक्षक मंडळाचे माध्यमातून विविध कल्याणकारी लाभ देण्यात येत आहेत. तसेच केंद्र शासनाने सर्वच असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता अधिनियम, २००८ हा कायदा पास केला आहे. हा कायदा करण्यापूर्वी वर्मा आयोग आणि अर्जुन सेन गुप्ता आयोगाने महाराष्ट्राच्या माथाडी कायद्याचा सखोल अभ्यास व संबंधितांशी चर्चाही केली आहे.[१५] माथाडी कायदा हा इतर सर्वच असंघटित कामगारांसाठी दिशादर्शक व महत्त्वपूर्ण कायदा असल्याचे दिसून येते.

माथाडी कामगारांना एकत्र आणणे, त्यांचा लढा उभारणे ही अत्यंत कठीण बाब होती. मुळात हे कामगार अशिक्षित होते. कामगार चळवळीत भाग घेतल्यास आहे ती नोकरी जाण्याची त्यांना भीती होती. त्यामुळे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांना अन्यायाविरुध्द लढण्यास प्रवृत्त करणे हे सुरुवातीच्या माथाडी कामगार नेत्यांचे व माथाडी कामगारांचे मोठे योगदान होय. श्री. पी. डिमेलो, श्री. मनोहर कोतवाल यांनी सुरुवातीच्या काळात गोदीतील माथाडी कामगारांना एकत्र आणले आणि डॉक वर्कर्स (रेग्युलेशन ऑफ एम्प्लॉयमेंट) ॲक्ट, १९४८ पास करुन घेतला.[१६] मात्र गोदीबाहेरील संपूर्ण राज्यात विशेषतः मुंबई परिसरात विखुरलेल्या स्वरुपात हजारो मालकांकडे काम करणाऱ्या लाखो माथाडी कामगारांना समजावणे व एकत्र आणण्याचे कठीण काम श्री.

अण्णासाहेब पाटील व त्यांचे सहकारी ॲड. काशिनाथ वळवईकर, श्री. अब्दुल दरेवेशी, श्री. ज्ञानदेव गोळे इत्यादींनी केले. माथाडी कायदा पास होणे, त्याचे अंमलबजावणीस सुरुवात होवून माथाडी मंडळाची स्थापना होणे यासाठी श्री. अण्णासाहेब पाटील, डॉ. बाबा आढाव व त्यांचे सहकाऱ्यांनी वारंवार संप, निदर्शने, उपोषणे यांचे माध्यमातून पाठपुरावा केला. मुंबईतील माथाडी कामगारांना या कायद्याचा लाभ त्वरीत मिळाला. राज्यातील उर्वरीत जिल्ह्यातील कामगारांनी माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जसजसा पाठपुरावा केला तसतशी या जिल्ह्यामध्ये मंडळाची स्थापना होवून कामगारांना लाभ देणे सुरु झाले.[१७] मुंबई बाहेर इतर जिल्ह्यात माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी डॉ. बाबा आढाव, श्री. बापू मगदूम, श्री.राजकुमार घायाळ, डॉ. हरिष धुरट यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला आहे. माथाडी कामगारांसाठीच्या गृहनिर्माण योजनांसाठी देखील माथाडी कामगार नेत्यांनी सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. सर्वश्री शशिकांत शिंदे, मंत्री (जलसंपदा–कृष्णा खोरे), नरेंद्र पाटील (आमदार), भाई जगताप (आमदार), बाबुराव रामिष्टे (सरचिटणीस, अखिल भारतीय माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार संघटना), गुलाबराव जगताप, बळवंतराव पवार हे माथाडी कामगार नेते सध्याच्या काळात माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत.

माथाडी कायद्यामुळे या कामगारांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडून आला आहे. माथाडी कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी माथाडी कामगार पूर्णत: असंरक्षित होते. त्यांची सामाजिक आर्थिक स्थिती अत्यंत बिकट होती. मात्र माथाडी मंडळे स्थापन झाल्यावर या माथाडी मंडळाचे वार्षिक अहवालानुसार त्यांनी माथाडी कामगारांना दिलेले आर्थिक लाभ, सामाजिक सुरक्षितता, विमा लाभ, आरोग्य सुविधा, वाटप केलेला पगार या बाबी पाहिल्या असता, या कामगारांना या कायद्यामुळे निश्चितच सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळाल्याचे स्पष्ट होते. तसेच पतपेढी, सहकारी ग्राहक भांडार, कष्टाची भाकरी उपक्रम, माथाडी हॉस्पीटल, गृहनिर्माण योजना यासारख्या उपक्रमांमुळे देखील माथाडी कामगारांना सामाजिक व आर्थिक सुरक्षितता मिळून ते स्वाभीमानाने समाजात वावरत आहेत.

तथापि, हे सर्व लाभ या कायद्यातील परिशिष्टामधील उद्योगांमध्ये असणाऱ्या आणि माथाडी मंडळात नोंद झालेल्या कामगारांनाच केवळ मिळत आहेत. या व्यतिरीक्त नोंद न झालेल्या लाखो कामगारांना आर्थिक व सामाजिक सुरक्षितता अद्यापही मिळू शकलेली नाही.[१८] त्यामुळे या कायद्याचा उद्देश्य पूर्णपणे साध्य झाला आहे असे म्हणता येणार नाही.

माथाडी कायद्यामुळे कामगारांबरोबरच मालकांनाही एक प्रकारची सुरक्षितता लाभली आहे.[१९] मंडळाच्या माध्यमातून विशिष्ट अशा मालकाकडील कामाचे प्रमाणानुसार कामगारांचा पुरवठा करण्यात येतो. आता माथाडी कामगारांना निश्चित रोजगार आणि ठराविक दराने मजूरीची रक्कम मिळते. त्यामुळे माथाडी कामगारांचे गैरहजेरीचे प्रमाण घटले आहे. यामुळे व्यापाऱ्यांना माथाडी कामगारांची सेवा नियमित व निश्चित स्वरुपात मिळते. मात्र नोंद झालेले कामगार काही कारणास्तव उपलब्ध नसले तरी मालकांना परस्पर अनोंदीत कामगारांकडून काम करुन घेता येत नाही.[२०] माथाडी कायदा होण्यापूर्वी मालकांना आपल्या मर्जीतील कामगारांकडून कमी दराने काम करुन घेण्याची मुभा होती. त्यामुळे आता माथाडी मंडळाच्या माध्यमातून निश्चितपणे व नियमित स्वरुपात कामगार उपलब्ध होत असले तरी हे कामगार मालकांच्या मर्जीतले आणि त्यांचे नियंत्रणाखाली नसल्यामुळे आणि मंडळाने ठरवून दिलेल्या दरानेच मजूरी तसेच लेव्हीची अतिरिक्त रक्कम द्यावी लागत असल्यामुळे मालक वर्ग बऱ्याचदा समाधानी नसतो.

यांत्रिकीकरण आणि माथाडी कामगारांना उपलब्ध होणारे काम यांचाही परस्पर संबंध आहे. यांत्रिकीकरण ही आधुनिक युगातील खूल्या अर्थव्यवस्थेच्या काळातील अपरिहार्य बाब आहे. मालक वर्ग उत्पादन खर्च कमी करणे आणि जागतिक दर्जाची गुणवत्ता राखण्यासाठी यांत्रिकीकरण करतात. तसेच माथाडी कामगारांनीही आयुष्यभर पाठीवर, माथ्यावर ओझीच वाहणे योग्य नाही अशा प्रकारची मते अनेक मान्यवरांनी व्यक्त केली आहेत.[२१] या कामगारांना बदलत्या काळात यांत्रिकीकरणाशी संबंधित बाबींचे प्रशिक्षण देणे, ही यंत्रे हाताळण्याचे, दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे व त्यातून अधिक चांगल्या प्रकारचा रोजगार पुरविणे आवश्यक आहे. मात्र यांत्रिकीकरणामुळे माथाडी कामगारांना उपलब्ध होणाऱ्या कामावर फार मोठा परिणाम झालेला असल्याची बाब आढळून आली

नाही. यांत्रिकीकरण होत असतानाच औद्योगिकीकरणातही मोठ्या प्रमाणात वाढ होवून माथाडी कामगारांना अधिकचे काम उपलब्ध होत आहे. माथाडी मंडळाच्या स्थापनेच्या वेळी नोंद झालेल्या कामगार व मालकांची संख्या आणि सद्यस्थितीतील संख्या पाहिली असता यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. केवळ खोका उद्योगात निर्माण होणाऱ्या खोक्यांचा वापर आता होत नसल्यामुळे आणि मुंबईतील कापड गिरण्या इतरत्र स्थलांतरीत झाल्यामुळे किंवा बंद पडल्यामुळे या उद्योगांशी संबंधित मंडळामधील कामगारांची संख्या घटली आहे. मात्र याला यांत्रिकीकरण प्रत्यक्षात जबाबदार नाही असे दिसून येते. तरी भविष्यातील यांत्रिकीकरणाची अपरिहार्यता लक्षात घेवून माथाडी कामगारांना त्यादृष्टीने प्रशिक्षित करणे व त्यांना अधिक चांगल्या प्रकारचा रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे मांडलेल्या गृहितकांपैकी अभ्यासाअंती पहिले, दुसरे, तिसरे, चौथे आणि सातवे गृहितकात पूर्णपणे तथ्य असल्याचे आढळते तर पाचवे, सहावे गृहितकांत काही प्रमाणात तथ्य असल्याचे आढळून येते.

## माथाडी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजना :

माथाडी कामगार चळवळीचा अभ्यास करताना या चळवळीच्या यश आणि त्रुटी या दोन्ही बाजू समोर आल्या. माथाडी कायद्यामुळे माथाडी कामगारांच्या जीवनात आमुलाग्र बदल झाला असला तरी या कायद्याची अधिक परिणामकारक अंमलबजावणी करता येवू शकेल ही बाब देखील अभ्यासा दरम्यान स्पष्ट झालेली आहे. या कायद्यातील काही तरतूदींची अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करणे शक्य आहे तर काही नवीन तरतूदींची कायद्यात भर घालणे आवश्यक आहे. त्याचबरोबर या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या शासकीय अधिकारी, पदाधिकारी यांनी तसेच माथाडी कामगारांनी देखील कायद्याच्या प्रभावी व योग्य अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले. या आधारे माथाडी कायद्याचा मूळ हेतू साध्य होणे आणि या

कायद्याच्या अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणीसाठी खालील प्रमाणे उपाययोजना सुचविण्यात येत आहेत.

**अ) प्रचलित माथाडी कायद्यातील तरतूदींच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीबाबत उपाययोजना :**

**१) माथाडी कायद्याची व्याप्ती वाढविण्यात यावी :** या कायद्याच्या कलम १ नुसार कायद्यातील लाभ कोणत्या उद्योगातील कोणत्या प्रकारच्या कामगारांना द्यायचे याचे अधिकार शासनाने स्वत:कडे ठेवले आहेत. माथाडी कामगारांपैकी नोंद झालेल्या कामगारांनाच माथाडी कायद्याचे लाभ मिळत आहेत, उर्वरित नोंद होवू न शकलेले कामगार अद्यापही सन १९६९ पूर्वीचेच म्हणजे माथाडी कायद्यापूर्वीचेच असंरक्षित जीवन जगत आहेत. त्यामुळे आता स्वातंत्र्यानंतर ६५ वर्षांनी आणि माथाडी कायदा लागू झाल्यानंतर ४५ वर्षांनी तरी कायद्याची व्याप्ती वाढवून सर्व माथाडी-हमालांना या कायद्याच्या कक्षेत आणून त्यांना लाभ देणे आवश्यक आहे.

**२) शासकिय-निमशासकिय कार्यालयांत माथाडी कायद्याची अंमलबजावणी :** या कायद्याच्या कलम २ नुसार शासकिय-निमशासकिय कार्यालये, राज्य शासनाची व केंद्र शासनाची महामंडळे हे देखील तेथे माथाडी-हमाल आणि तत्सम प्रकारचे काम करणाऱ्या कामगारांसाठी मालक ठरतात.[२२] त्यामुळे या ठिकाणी माथाडी कायद्याची अंमलबजावणी विशेष मोहिम आखून केल्यास फार मोठ्या संख्येने असलेल्या तेथील माथाडी कामगारांना लाभ मिळवून देता येईल.

**३) कायद्यातील तरतूदींची *प्रभावी अंमलबजावणी :** या कायद्याच्या तरतूदींची *अधिक प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. विशेषत: माथाडी कामगारांना वेळेवर वेतन मिळण्यासाठी मालकांनी विहित वेळेत मंडळाकडे वेतनाची रक्कम भरणे, राज्यातील सर्व जिल्ह्यातील माथाडी कामगारांना आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यासाठी माथाडी हॉस्पीटल ट्रस्टच्या शाखा सर्व जिल्ह्यात निर्माण करणे किंवा प्रत्येक जिल्ह्यातील चांगले दवाखाने माथाडी मंडळाने नोंद करुन त्यांचे मार्फत आरोग्य सुविधा पुरविणे; प्रत्येक कामगाराची वर्षातून एकदा वैद्यकीय चाचणी करणे, भविष्य निर्वाह निधी व इतर रकमा सुरक्षित राहतील अशा राष्ट्रीयकृत बँकांतच ठेवणे, लेव्ही वेळेवर

भरणा न करणाऱ्या मालकांकडून याजेनेतील तरतूदीनुसार आगाऊ लेव्हीची रक्कम वसूल करणे, योजनेतील तरतूदींचे पालन न करणाऱ्या मालकांचे विरुध्द खटला दाखल करणे या तरतूदींची अधिक चांगल्याप्रकारे अंमलबजावणी झाली तर नोंद झालेल्या कामगारांना कायद्यानुसार देय लाभ चांगल्या प्रकारे मिळू शकतील.

४) **माथाडी मंडळाचे गठण :** या कायद्याच्या कलम ६ नुसार राज्य शासनाने कामगार, मालक व शासन प्रतिनिधींचे त्रिपक्षीय मंडळ गठित करावयाचे आहे.[२३] तथापि अनेक मंडळात वर्षानुवर्षे अशा प्रकारे त्रिपक्षीय मंडळे शासन गठित करत नाहीत. त्यामुळे मालक व कामगार यांचे प्रतिनिधींचे योगदान मंडळाचे कामकाज घेता येत नाही, तसेच त्यांचे म्हणणेही मंडळापर्यंत पोहचत नाही. त्यामुळे सर्व ठिकाणी त्रिपक्षीय मंडळाचे गठन वेळचेवेळी झाले पाहिजे, तसेच एका मंडळाची मुदत संपल्यावर जोपर्यंत पुढील मंडळ अस्तित्वात येत नाहीत तोपर्यंत पूर्वीचेच मंडळाला पुर्ण अधिकार देण्यात यावेत.

५) **माथाडी मंडळाचे वार्षिक अहवाल विधानमंडळापुढे ठेवणे :** माथाडी मंडळाचे कामकाज पारदर्शकपणे चालावे तसेच विधानमंडळाचे माथाडी मंडळाच्या कामकाजावर नियंत्रण रहावे या उद्देशाने कलम ७ नुसार अहवाल विधानमंडळापुढे ठेवावयाचे आहेत. मात्र अनेक मंडळांनी वर्षानुवर्षे आपले अहवाल शासनाला सादर केले नाहीत. यामुळे या तरतूदीचा मुळ उद्देश सफल होत नाही. त्यामुळे प्रत्येक मंडळाचा वार्षिक अहवाल दरवर्षी विधान मंडळापुढे सादर होणे आवश्यक आहे.

६) **मंडळाचे लेखे अद्ययावत ठेवणे :** प्रत्येक माथाडी मंडळाने कायद्याच्या कलम ८ नुसार दरवर्षी लेखापरिक्षण करुन घेवून हे वार्षिक वित्तीय लेखे राज्य शासनास सादर करावयाचे आहेत.[२४] राज्यातील बऱ्याच मंडळांचे वार्षिक लेखे अद्ययावत नाहीत. यामुळे आर्थिक अपहारास वाव मिळतो, यामुळे प्रत्येक मंडळाने दरवर्षी नियमितपणे लेखापरिक्षण करुन घेवून शासनास सादर करणे आवश्यक आहे.

७) **सल्लागार समितीच्या नियमित बैठका :** माथाडी कायद्याची आणि त्या अंतर्गत योजनेची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींवर राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी मा. मंत्री

(कामगार) यांचे अध्यक्षतेखालील सल्लागार समितीच्या नियमित बैठका होत नाहीत. माथाडी मंडळांच्या कामकाजाबाबतच्या अडचणी दीर्घकाळ सोडवल्या जात नाहीत. या सल्लागार समितीच्या नियमित बैठका होणे आवश्यक आहे.

८) **निरिक्षकांच्या नेमणूका :** कायद्यातील तरतूदींची योग्य प्रकारे अंमलबजावणी करुन घेण्यासाठी कलम १५ नुसार निरिक्षक नेमण्याची तरतूद आहे. मात्र बहुतेक माथाडी मंडळात पुरेशा संख्येने निरिक्षकांच्या नेमणूका केलेल्या नाहीत. तसेच प्रत्येक जिल्ह्यात उद्योगधंद्याची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. तसेच कार्यालयीन कामामुळे निरिक्षकांना इतर कार्यालयीन कामकाजात अडकून पडावे लागते आणि कायद्याची अंमलबजावणी प्रत्यक्ष होते की नाही हे पाहण्याचे त्यांचे मूळ काम पूर्ण क्षमतेने करता येत नाही. त्यामुळे कायद्यातील या तरतूदीनुसार पुरेशा संख्येने निरिक्षकांच्या नेमणूका करणे आवश्यक आहे.

९) **न्यायालयीन प्रक्रिया :** माथाडी कायद्याच्या कलम १७ नुसार कामगार न्यायालयात दाद मागण्याची तरतूद आहे. तसेच औद्योगिक न्यायालयात महिनाभरात अपिल करण्याची तरतूद आहे. त्यानुसार मंडळाविरुध्द निर्णय लागलेल्या प्रकरणी अपुऱ्या मनुष्यबळामुळे विहित मुदतीत अपिल करणे शक्य होत नाही. तथापि माथाडी कामगारांना कायद्यानुसार देय लाभ मिळवून देण्यासाठी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द अपिल करावयाचे असल्यास ते प्रथम प्राधान्याने करणे तसेच न्यायालयात मंडळाची बाजू मांडण्यासाठी अभ्यासू वकिल नेमणे आवश्यक आहे.

१०) **मातृत्त्व लाभ अधिनियम, १९६१ नुसार स्त्री कामगारांना लाभ देणे :** या विषयाच्या अभ्यासादरम्यान स्त्री कामगारास प्रसूतीलाभ अधिनियम, १९६१ नुसार अथवा त्यामध्ये नमूद केलेले लाभ दिल्याचे आढळून आले नाही. माथाडी कायद्याच्या कलम २० नुसार अशाप्रकारे स्त्री कामगारांना मातृत्त्वाचे लाभ देण्याची तरतूद आहे. या स्त्रीया कष्टाचे काम करत असल्यामुळे त्यांना व त्यांच्या बाळासाठी या तरतूदीची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

**ब) माथाडी कायद्यात आवश्यक सुधारणा :**

माथाडी कामगारांना अधिक चांगले लाभ देणे तसेच या कायद्याचा मूळ हेतू साध्य करण्यासाठी माथाडी कायद्यातील काही तरतूदीमध्ये सुधारणादेखील करणे आवश्यक आहे.

१) **न्यायालयीन प्रक्रिये दरम्यान माथाडी कामगारांना संरक्षण देणे :** एखाद्या आस्थापनेला माथाडी कायदा लागू होतो किंवा नाही याबाबत जर न्यायालयात खटला सुरु असेल तर त्या दरम्यान माथाडी कामगारांना या कायद्यानुसार देय किमान लाभ उदा. स्थानिक दरानुसार मजूरी, रजेचा पगार, वैद्यकिय सुविधा, रजा, अपघात नुकसान भरपाई मालकाने देणे बंधनकारक असल्याची तरतूद कायद्यात करणे आवश्यक आहे. तसेच न्यायालयीन खटल्या दरम्यान कामगारांना कामावरुन काढण्यास प्रतिबंध करणे, लेव्हीची रक्कम न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून मालकांनी भरण्याची तरतूदही कायद्यात करणे आवश्यक आहे. जर मंडळाच्या बाजूने निर्णय लागला तर सदर रक्कम मंडळात जमा राहील आणि कामगारांना किमान लाभासोबतच भविष्य निर्वाह निधी, उपदान हे लाभदेखील देण्यात यावेत. जर मालकाच्या बाजूने निकाल लागला तर कामगारांना या काळात दिलेल्या लाभापोटी खर्च झालेली रक्कम वगळून उर्वरित रक्कम मालकांना परत करण्याचीही तरतूद ठेवावी.

२) **एक सदस्य मंडळाऐवजी शासकिय अधिकाऱ्यांचे बहुसदस्य मंडळ :**जर काही कारणास्तव त्रिपक्षीय मंडळ स्थापन करणे शक्य झाले नाही तर शासन प्रतिनिधीचे एक सदस्यिय मंडळ स्थापन करण्याचे अधिकार शासनाला आहेत. मात्र अशा प्रकारे नेमण्यात आलेला शासकीय अधिकारी एकट्याने धोरणात्मक निर्णय घेवू शकत नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत किमान ३ शासकिय अधिकाऱ्यांची नेमणूक करुन शासन प्रतिनिधींचे मंडळ स्थापन करण्यात यावे, जेणेकरुन सामुहिक जबाबदारीने धोरणात्मक निर्णय होवून त्याची अंमलबजावणी करणे शक्य होईल.

३) **विशेष न्यायालयाची तरतूद :** सदर कायद्याची राज्यात गेले ४६ वर्षे अंमलबजावणी सुरु आहे. या प्रदीर्घ कालावधीत कायद्यातील तरतूदींचा ऊहापोह करणारे जवळपास सर्व प्रकारच्या विषयांवर न्यायालयांनी निर्णय दिलेले आहेत. त्यामुळे बऱ्याचदा सद्यस्थितीत न्यायालयात दाखल

होणाऱ्या खटल्यामध्ये कायदेशीर कोणताही नवीन मुद्दा शक्यतो नसतो. त्यामुळे यापुढे अशा प्रकरणांवर निर्णय देताना यापूर्वीच्या तत्सम प्रकणातील निर्णयाचे आधारे तात्काळ कसा निर्णय देता येईल याबाबत कार्यपध्दती न्यायालयांनी विहित करणे आवश्यक आहे. माथाडी कायद्यासंबंधित खटले चालविण्यासाठी विशेष न्यायालयाची स्थापना करण्यात यावी किंवा कामगार न्यायालये आणि औद्योगिक न्यायालयांनी आठवड्यातील ठराविक दिवस माथाडी कायद्याशी संबंधित प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी राखीव ठेवावा अशी तरतूद करण्यात यावी.कामगार न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द अपिल करण्याचे थेट अधिकार मार्गदर्शक तत्त्वे विहित करुन माथाडी मंडळांना देण्यात यावेत. यामुळे वेळ वाचून न्यायालयीन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होण्यास मदत होईल.

**क) माथाडी मंडळाचे दैनंदिन कामकाज अधिक चांगल्या पध्दतीने होण्यासाठीच्या उपाययोजना**

माथाडी मंडळाचे दैनंदिन कामकाज अधिक चांगल्या पध्दतीने होण्यासाठी मंडळाची कार्यपध्दती, अधिकारी, कर्मचारी यांचा दृष्टिकोन व कार्यक्षमता, त्यांना उपलब्ध सोयी सुविधा याबाबी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे उपाय योजना करणे गरजेचे वाटते.

**१) पूर्णवेळ अधिकारी / कर्मचारी नेमणूक :**

सद्यस्थितीत जवळपास सर्व माथाडी मंडळांचे अध्यक्ष व सचिव या पदांचा अतिरिक्त कार्यभार कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे सोपविलेला आहे. वास्तविक मंडळांमध्ये कोट्यावधी रुपयांचा निधी हाताळला जातो. त्यामुळे किमान ५००० कामगार नोंद असलेल्या मंडळांसाठी पूर्णवेळ अधिकारी व कर्मचारी नेमण्यात यावेत.

**२) मंडळाचे कामात संगणक व संगणकीय प्रणालींचा जास्तीत जास्त वापर करणे :**

आधुनिक तंत्रज्ञानानुसार उपलब्ध विविध संगणकीय प्रणाली जसे की टॅली, एक्सेल, इंटरनेट, ऑनलाईन ट्रान्सॅक्शनस्, आर.टी.जी.एस. इत्यादीचा वापर माथाडी मंडळाच्या दैनंदिन कामकाजात केल्यास वेळ आणि मनुष्यबळाचा देखील पुरेपुर वापर होईल. यामुळे कार्यालयीन प्रशासकीय खर्च देखील कमी होईल आणि कामात पारदर्शकताही येईल.

**३) लेखा अधिकाऱ्याची नेमणूक :**

सद्यस्थितीत माथाडी मंडळाचे लेखे विषयक सर्व कामकाज मंडळाच्याच कर्मचाऱ्यांकडून हाताळले जाते, या कर्मचाऱ्यांना लेखे विषयक स्वतंत्र प्रशिक्षण दिलेले नसते. राज्य शासनाच्या वित्त व लेखा विभागाच्या अखत्यारितील प्रशिक्षित लेखा अधिकाऱ्यांची मंडळावर नेमणूक केल्यास मंडळाचे लेखाविषयक कामकाज अधिक सक्षमतेने व पारदर्शकतेने होवून लेखापरिक्षण देखील नियमित होण्यास मदत होईल.

**४) माथाडी मंडळ कर्मचाऱ्यांचा महसूली विभागनिहाय समुच्चय करणे :**

माथाडी मंडळातील कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढावी, विविध ठिकाणच्या माथाडी मंडळात काम करण्याचा त्यांना अनुभव मिळावा यासाठी महसूली विभाग स्तरावर त्या विभागातील सर्व माथाडी मंडळातील कर्मचाऱ्यांचा एक समुच्चय तयार करण्यात यावा. तसेच या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते देखील सारखेच असावेत म्हणून प्रत्येक मंडळाच्या प्रशासकीय लेव्हीचा भाग विभाग स्तरावर एकत्रित करुन त्यातून त्यांचे वेतन व भत्ते आणि मंडळाचा प्रशासकीय खर्च भागविण्यात यावा. या कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया देखील विभागस्तरावरच त्रयस्थ संस्थेमार्फत करण्यात यावी. विभाग स्तरावर त्यांची एकत्रित सेवा जेष्ठता यादी करुन त्यातून त्यांस पदोन्नती देण्यात यावी. रुजू झाल्यावर त्यांना रितसर तीन महिन्यांचे प्रशिक्षण कामगार आयुक्तालयातील अनुभवी अधिकाऱ्यांमार्फत देण्यात यावे.

**५) सहकामगार आयुक्त (माथाडी) यांचे अधिकारात वाढ करणे :**

सहकामगार आयुक्त (माथाडी) हे मंत्रालयातील सहसचिव दर्जाचे पद आहे.[२५] मात्र या पदास अधिकार मात्र पुरेसे नाहीत. त्यामुळे माथाडी मंडळाचे कामकाज अधिक प्रभावशाली होण्यासाठी माथाडी मंडळातील कर्मचाऱ्यांचे नियुक्ती प्राधिकारी म्हणून त्यांना घोषित करण्यात यावे. माथाडी मंडळाचे अध्यक्षांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत करण्याचे आणि मंडळाच्या सचिवांचे गोपनिय अहवाल पुनर्विलोकित करण्याचे अधिकार सहकामगार आयुक्तास देण्यात यावेत. यामुळे कामकाजावर नियंत्रण राखणे त्यांस शक्य होईल.

**६) अशासकीय पदाधिकाऱ्यांचे परिसंवाद व चर्चासत्र :**

मंडळावर मालक आणि कामगारांचेही प्रतिनिधी नेमण्यात येतात. त्यांचेसाठी माथाडी कायदा, योजना, मंडळाचे कामकाज याबाबत अनुभवी माथाडी कामगार नेते व शासकीय अधिकारी यांचेसह परिसंवाद आयोजित करण्यात यावे. यामुळे एकमेकांच्या अनुभवांचा उपयोग सर्वच मंडळांना होवू शकेल. यातून प्रत्येक मंडळाचे काम अधिक चांगल्या प्रकारे होवू शकेल.

**शासकीय योजनांच्या समन्वयातून आर्थिक व सामाजिक सुरक्षितता :**

**१) शासकीय योजनांचा लाभ माथाडी कामगारांना मिळण्यासाठी समन्वय :**

शासनाच्या अनेक योजना विविध वंचित घटकांसाठी सुरु आहेत. अद्यापही अनेक माथाडी कामगार आपली कुटुंबे गावाकडेच ठेवून शहरात येतात किंवा ग्रामीण भागातून दररोज शहरात रोजगारासाठी येतात. अनोंदणीकृत माथाडी कामगारांची स्थिती तर या कायद्यापूर्वी असणाऱ्या बिकट स्थिती सारखीच आहे. हे कामगार बहुतांश मागासवर्गीय तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. अशा घटकांसाठी राज्य शासनाच्या अनेक योजना आहेत. मात्र माहिती अभावी आणि योग्य समन्वयना अभावी या योजनांचा लाभ माथाडी कामगारांना मिळत नाही. यासाठी सहकामगार आयुक्त (माथाडी) यांचे कार्यालयात अशा सर्व योजनांची माहिती संकलित करुन त्याबाबतची पुस्तिका सर्व माथाडी मंडळांना देण्यात यावी. यासाठी सहकामगार आयुक्त (माथाडी) यांनी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या संपर्कात राहून तसेच मंडळ अथवा जिल्हा पातळीवर मंडळाच्या सचिवाने जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहून समन्वय साधावा आणि जास्तीत जास्त कामगारांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा. शेतीसाठीच्या योजना, राजीव गांधी जीवनदायी योजनेसारख्या आरोग्य विमा योजना, मुलांसाठी शैक्षणिक सुविधा, शिष्यवृत्ती, होस्टेल्सची सुविधा याबाबतच्या योजना, इंदिरा आवास सारख्या गृह योजना, अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत रेशनिंगची सुविधा इत्यादी लाभ देता येवू शकतात. या दृष्टिने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**२) माथाडी कामगारांच्या घरातील महिलांचे बचत गट :**

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान हा दारिद्र्य निर्मूलनासाठीचा कार्यक्रम सुरु केला आहे.[२६] या कार्यक्रमांतर्गत दारिद्र्यरेषेखालील गरीबांबरोबरच त्या–त्या भागातील ग्रामसभा किंवा स्थानिक लोकसमुहाने गरीब म्हणून मान्य केलेल्या कुटुंबानाही लाभ देण्यात येणार आहे. अशा कुटुंबातील महिलांचे बचत गट करुन त्यांना उद्योगधंदे उभारणीस मदत करणे आणि त्यांच्या उत्पादित मालाला योग्य भाव व बाजारपेठ मिळवून देण्याचा सदर कार्यक्रम आहे. पुरुष माथाडी काम करत असेल तर त्या कुटुंबाचा पी. आय. पी. (Participatory Identification of Poor) अंतर्गत या योजनेत अंतर्भाव करणे शक्य आहे. तशा प्रकारची तरतूद करुन घेवून नोंद झालेल्या व न झालेल्याही अशा सर्व माथाडी कामगारांच्या कुटुंबातील माहिलांचा बचत गटात अंतर्भाव करुन या योजनेअंतर्गत त्यांना लाभ देता येतील.

### ३) म. गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेशी समन्वय साधणे :

रोजगार उपलब्धतेअभावी माथाडी कायद्यांतर्गत नोंद होवू न शकेलेले लाखो माथाडी कामगार रोजगाराच्या प्रतिक्षेत असतात. अशा अनोंदणीकृत माथाडी कामगारांची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत नोंदणी केल्यास त्यांना जवळपासच्या ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध होवू शकेल. यातून जो अनोंदणीकृत माथाडी कामगार अद्यापही वंचित राहिलेला आहे, त्याला किमान रोजगाराची शाश्वती, किमान मजूरी इत्यादी लाभ देता येणे शक्य होईल. तसेच या योजनेअंतर्गतचे विविध कंत्राटदार, शासनाचे विभाग यांचा नियोक्ता अथवा मूळ नियोक्ता या संज्ञेत समावेश करुन त्यांचेकडून लेव्हीची रक्कम गोळा करुन त्यातून या कामांवरील माथाडी कामगारांना सामाजिक सुरक्षिततेचे विविध लाभ देता येतील का हे देखील तपासून पाहता येईल.

### ४) आम आदमी व जनश्री विमा योजनेचा लाभ :

दारिद्र्य रेषेखालील तसेच दारिद्र्य रेषेच्या किंचित वर असणाऱ्या असंघटित कामगारांसाठी भारतीय आयुर्विमा महामंडळाची सदर आयुर्विमा योजना आहे.[२८] त्या अंतर्गत अपघाती मृत्यूसाठी रु ७५,००० पर्यंत आणि अपंगत्व आल्यास त्याचे प्रमाणात विम्याचा लाभ मिळतो. दोन मुलांना

स्कॉलरशिपही मिळते. सर्व अनोंदणीकृत माथाडी कामगारांना या योजनेचा लाभ कामगार संघटना व मंडळाच्या माध्यमातून देता येईल.

**५) तांत्रिक प्रशिक्षण :**

माथाडी कामगारांनी आयुष्यभर ओझी वाहण्याचेच काम करावे हे योग्य नाही. तसेच यांत्रिकीकरणाचा परिणाम म्हणूनही काही माथाडी कामगारांची रोजगाराची संधी जावू शकते. तसेच नोंद न होवू शकलेल्या माथाडी कामगारांचे बाबत त्यांचेसाठी पुरेसा रोजगार या क्षेत्रात उपलब्ध नसणे हेच कारण आहे. त्यामुळे नोंद झालेल्या तसेच नोंद न झालेल्या माथाडी कामगारांना शासनाच्या विविध योजनांतर्गत तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने विशिष्ट उद्योग धंद्यांचे प्रशिक्षण देऊन अधिक चांगल्या रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देता येवू शकतील.

**६) सेवानिवृत्ती (पेन्शन) योजना :**

माथाडी कायदा होवून ४६ वर्षे झाली तरी माथाडी कामगारांसाठी सेवा निवृत्ती योजना लागू करता आलेली नाही. केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी राष्ट्रीय सेवा निवृत्ती योजना लागू केलेली आहे. नोंद झालेल्या कामगारांना माथाडी मंडळाच्या माध्यामातून आणि नोंद न झालेल्या माथाडी कामगारांना माथाडी कामगार संघटना व केंद्र शासनाच्या संबंधित कार्यालय यांचे समन्वयनाने पेन्शनचा लाभ देता येवू शकेल.

**७) राष्ट्रीय पातळीवर माथाडी कायदा लागू करणे :**

केवळ माथाडी कामगारांसाठीचा हा कायदा देशपातळीवर लागू करावा अथवा सामाजिक सुरक्षितता अधिनियमांतर्गत ज्या उद्योग व्यवसायात लेव्ही घेता येवू शकते तेथे लेव्हीची वसुली करण्यात यावी आणि त्याचा वापर सर्वच असंघटित कामगारांसाठी करावा.

अशा प्रकारे माथाडी कामगारांना अधिक चांगल्या प्रकारे सामाजिक सुरक्षिततेचे लाभ व अन्य सुविधा देण्यासाठी विविध पातळीवर व विविध दृष्टिकोनातून उपाय योजना करणे शक्य आहे. यासाठी शासन, शासकिय अधिकारी कर्मचारी, माथाडी मंडळाचे पदाधिकारी आणि अधिकारी, कर्मचारी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माथाडी कामगार संघटना, त्यांचे पदाधिकारी व सदस्य

माथाडी कामगार यांनी सन १९६० ते १९८० च्या दशकांतील माथाडी कामगार चळवळीप्रमाणे पुन्हा एकदा ध्येयवादाने प्रेरित होवून एकमेकांशी समन्वय राखून काम करणे आवश्यक आहे. यातून नोंद झालेल्या बरोबरच नोंद न झालेल्या माथाडी कामगारांसाठी माथाडी कामगार चळवळीचा दुसरा टप्पा साध्य करता येईल.

## प्रस्तूत विषयाच्या संशोधनातून काही नवीन संशोधन विषयाला वाव:

महाराष्ट्रातील माथाडी कायदा हा असंघटित, विखुरलेल्या स्वरुपात काम करणाऱ्या कामगारांसाठी त्यांचे कामाचे स्वरुप लक्षात घेवून केलेला देशातील पहिलाच कायदा आहे. त्यामुळे अशा प्रकारचा कायदा करण्यासाठी कामगार चळवळीचे योगदान व त्याला शासनाचा प्रतिसाद हा देखील भारतीय कामगार चळवळीच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा आहे. या माथाडी कामगार चळवळीचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून फारसा अभ्यास झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या तसेच इतर दृष्टिकोनातूनही या विषयामध्ये संशोधनाला वाव आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे नमूद करता येईल.

१) राज्यातील माथाडी मंडळाच्या स्थापनेस सन १९७० च्या दशकापासून सुरुवात झालेली आहे. या मंडळापैकी किराणा बाजार व दुकाने मंडळ, लोखंड व पोलाद मंडळ ही सर्वात जुनी मंडळे आहेत. या मंडळाच्या स्थापनेपासून ते त्यांच्या आतापर्यंतच्या प्रगतीचा अभ्यास एक स्वतंत्र विषय म्हणून ऐतिहासिक तसेच सामाजिक व आर्थिक दृष्टीकोनातून करता येईल

२) मुंबई व परिसरातील १० माथाडी मंडळे आहेत. त्यानुसार बृहन्मुंबई व परिसरातील माथाडी मंडळाचा इतिहास हा देखील अभ्यासाचा स्वतंत्र विषय होवू शकेल.

३) महाराष्ट्रातील आता सर्व जिल्ह्यात मिळून ३५ माथाडी मंडळे स्थापन झालेली आहेत. त्यामुळे महसूली विभागनिहाय महसूली विभागातील माथाडी मंडळाचा अभ्यास अशा प्रकारे करता येईल.

४) राज्यातील एखाद्या जिल्ह्यातील किंवा ३५ पैकी एका माथाडी मंडळाचा इतिहास देखील अभ्यासता येईल. सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून अशा प्रकारे नागपूर आणि सातारा जिल्ह्यातील माथाडी कामगारांचा अभ्यास सर्वश्री प्रा. लक्ष्मीकांत देशपांडे आणि प्रा. शेंडगे यांनी केलेला आहे. त्याच प्रकारे सामाजिक व आर्थिक दृष्टिकोनातून राज्यातील उर्वरित मंडळांचाही अभ्यास करता येईल.

५) कायदेविषयक दृष्टिकोनातून माथाडी कायद्यातील तरतूदी, त्यांचे इतर कामगार कायद्यांपेक्षा वेगळेपण याचा तुलनात्मक अभ्यास तसेच माथाडी कामगार कायद्यातील तरतूदी, त्यात झालेल्या सुधारणा व भविष्यातील आवश्यक सुधारणा याचा देखील अभ्यास करता येईल.

६) विविध माथाडी मंडळांचा परस्पर तुलनात्मक अभ्यास हा देखील संशोधनाचा विषय होवू शकेल.

७) खुल्या आर्थिक धोरणाचा माथाडी कायदा व माथाडी मंडळे आणि माथाडी कामगार यांचेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास व उपाययोजना.

८) श्री. अण्णासाहेब पाटील यांचे माथाडी कामगार चळवळीतील योगदान

९) श्री. अण्णासाहेब पाटील यांचे पश्चात माथाडी कामगार चळवळीची वाटचाल.

१०) माथाडी कामगार चळवळीचा महाराष्ट्रातील उद्योगधंद्यावर व व्यापारावर झालेल्या परिणामांचा अभ्यास.

अशा प्रकारे विविध दृष्टिकोनातून माथाडी कामगार चळवळीच्या अभ्यासाला वाव आहे असे वाटते.

# संदर्भ सूची


१. आढाव बाबा, माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी–वार्ता, माथाडी कायदा विशेषांक, हमाल मापाडी महामंडळ, पुणे (प्रकाशक), पृ. ३९.

२. महाराष्ट्र शासन, पोवार के. आर. (अध्यक्ष), माथाडी कामगारांबाबत चौकशी समिती अहवाल, बृहन्मुंबई, दि. १२ जानेवारी १९६५, पृ. २४.

३. पाटील व्हि. पी., दी ग्रेट माथाडी–अण्णासाहेब पाटील, जयजगदीश प्रकाशन, सातारा, सप्टेबर १९९८, पृ. १८.

४. कित्ता, पृ. १४.

५. महाराष्ट्र शासन, राजपत्र दि. १३ जून १९६९.

६. तिडके नरेंद्र, माजी मंत्री यांचा संदेश, रौप्य महोत्सवी विशेषांक, महाराष्ट्र माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन, दि. २१ सप्टेबर १९८८, पृ. ४.

७. पाटील नरेंद्र, आमदार, यांची मुलाखत, मी माझा–टि.व्ही. चॅनेल, श्रेया (मुलाखतकार), नवी मुंबई.

८. रामिष्टे बाबुराव, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, माथाडी कामगार संघटना रौप्य महोत्सवी वाटचाल, उपरोक्त, पृ. २.

९. संचेती वालचंद, अध्यक्ष, पुना मर्चंट चेंबर्स, माथाडी मंडळ स्वच्छ कारभाराची गरज, हमाल–मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ५४.

१०. महाराष्ट्र शासन, कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्ष, कार्यालयीन टिप्पणी.

११. तिडके न. म., कामगार मंत्री, विधानसभा कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई, दि. २५ मार्च १९६९, पृ. ४१७.

१२. कित्ता, पृ. ४१७ ते ४६५.

१३. मोरे अंकुश, कामगार उपायुक्त, माथाडी विभाग, पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० वा कामगार वर्धापन दिन स्मरणिका, पृ. १३९.

१४. आढाव बाबा, उपरोक्त, पृ. २२.

१५. आढाव बाबा, मुलाखत, दि. ८ एप्रिल २०१४.

१६. बागल सुर्यकांत, भारतीय कामगार चळवळ काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, ना. मे. लोखंडे श्रमविज्ञान संस्था, मुंबई (संपादक), दि. ९ फेब्रुवारी २०१२, पृ. २६.

१७. धुरट हरिष, मनगटात बळ पाहिजे, हमाल–मापाडी वार्ता, माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. ७५, ७६.

१८. कोतवाल मनोहर, माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा, हमाल–मापाडी वार्ता, माथाडी कायदा विशेषांक, उपरोक्त, पृ. १५ ते १७.

१९. खिमासिया दिनेश, मालकांचे मनोगत, माथाडी मित्र विशेषांक, १९८१, पृ. १८.

२०. भागवत टी. आर., सल्ला कामगारांना आणि व्यापाऱ्यांनाही, माथाडी मित्र विशेषांक, १९८१, पृ. ११.

२१. मुश्रीफ हसन, गावित राजेंद्र, गुप्ता कविता, प्रत्यक्ष मुलाखती.

२२. महाराष्ट्र शासन, माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९, पृ. ८३४३C.

२३. कित्ता, पृ. ८३४६A.

२४. कित्ता, पृ. ८३५०B.

२५. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, कामगार–५, दि. १९ डिसेंबर २०००.

२६. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांची वेबसाईट www.umed.in

# संदर्भ ग्रंथ सूची

## अ) प्राथमिक साधने(प्रकाशित–महाराष्ट्र शासन)


**१) महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या समित्यांचे अहवाल :**

**१.** कालेलकर बी. एस. (अध्यक्ष), लोखंडी जथा कामगार चौकशी समिती अहवाल, दि. १५ डिसेंबर १९६५.

२. गायकवाड र. य., कामगार आयुक्त, माथाडी मंडळाच्या कामकाजाबाबत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारशी, दि. १७ एप्रिल १९९४.

३. देव डी. बी. (अध्यक्ष), माथाडी मंडळाचा आकृतीबंध आणि कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने नेमलेल्या एक सदस्यिय समितीचा अहवाल, दि. ८ फेब्रुवारी १९९१.

४. निंबाळकर समितीचा अहवाल, १९८५, (पुर्नमुद्रीत) हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक.

५. पगार दि. पो., (अध्यक्ष), सुरक्षा रक्षक बृहन्मुबंई व ठाणे या मंडलातील त्रुटीची चौकशी करणे व माथाडी, सुरक्षा रक्षक मंडळाच्या बुडीत बँकेत केलेल्या गुंतवणुकीची चौकशी करणेसाठी महाराष्ट्र शासनाने नेमलेली समितीचा अहवाल, नोव्हेंबर २०११.

६. पाटील शिवाजीराव (अध्यक्ष), असंरक्षित कामगारांसाठी नेमलेल्या समितीचा अहवाल, दि. १७ नोव्हेंबर १९६७.

७. पोवार के. आर. (अध्यक्ष) माथाडी कामगारांबाबत चौकशी समिती अहवाल, बृहन्मुंबई दि. १२ जानेवारी १९६५.

८. महाराष्ट्र अधिनियम १९६९, असाधारण राजपत्र, भाग ४, दि. १३ जून १९६९.

९. राज्य सल्लागार समितीच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त, मुंबई, दि. ६.१२.१९६९.

## २) महाराष्ट्र विधानमंडळाच्या कामकाजाचे इतिवृत्त :

१. विधानसभा कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, दिनांक २५ व २६ मार्च १९६९.

२. विधान परिषद कामकाज इतिवृत्त, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,दि.३१मार्च व १एप्रिल १९६९.

## ३) माथाडी मंडळाचे अहवाल व कार्यालयीन टिप्पण्या :

१. अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, सन १९९१–९२ व १९९२–९३ चा वार्षिक अहवाल,दि. ८.११.१९९५.

२. अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अकोला, वार्षिक अहवाल, सन २००६,०७, २००७–०८, २००८–०९, दि. ६.५.२०११.

३. अकोला–वाशिम व बुलढाणा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी, डिसेंबर २०१३.

४. अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती, पहिला वार्षिक अहवाल, सन १९९१–९२ ते १९९४–९५, दि. २४ जुलै २०००.

५. अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती, वार्षिक अहवाल, सन २००९–१०, दि. १५ सप्टेंबर २०१०.

६. अमरावती माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अमरावती यांची कार्यालयीन टिप्पणी, माहे डिसेंबर २०१३.

७. अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९१–९२.

८. अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, सन २००९–१०, दि. २७ मे २०१३.

९. अहमदनगर माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर कार्यालयीन टिप्पणी, दि. १.१.२०१४.

१०. इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९३–९४.

११. इचलकरंजी माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळाची कार्यालयीन टिप्पणी दि. जानेवारी २०१४.

१२. औरंगाबाद माथाडी आणि इतर कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९२–९३, दि. १७.११.१९९४.

१३. औरंगाबाद माथाडी आणि इतर कामगार मंडळ, १९ वा वार्षिक अहवाल, सन १९१०–११, दि. १८.६.२०११.

१४. कापड बाजार आणि दुकाने मंडळ, बृहन्मुंबई प्रथम वार्षिक अहवाल (१९७१–७२) दि. ८ फेब्रुवारी १९७३.

१५. कापड बाजार आणि दुकाने मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी, डिसेंबर २०१३.

१६. कापड बाजार आणि दुकाने मंडळ, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सन २००९–१० भुलेश्वर, मुंबई दि. ५ जानेवारी २०१२.

१७. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार कोल्हापूर बारावा वार्षिक अहवाल, सन १९९६–९७.

१८. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी

१९. कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सन २००९–१० चा वार्षिक अहवाल दि. निरंक.

२०. क्लिअरींग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९१–९२, दि. २३.१०.१९९२.

२१. क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग असंरक्षित गोदी कामगार मंडळ, मुंबई सोळावा वार्षिक अहवाल, २००६–२००७, दि. निरंक.

२२. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई मंडळ, पहिला वार्षिक अहवाल, सन १९७३–७४,दि.५ डिसेंबर १९७९.

२३. खोका मेकिंग बोर्ड, मुंबई, अडतीसावा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, मुंबई फलटण रोड दि. २३.५.२०११.

२४. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, भडोच स्ट्रीट मुंबई, कळंबोली जि. रायगड प्रथम वार्षिक अहवाल (१९७०–७१) दि. ६ सप्टेंबर १९७६.

२५. चंद्रपूर–गडचिरोली माथाडी मंडळाची कार्यालयीन टिप्पणी.

२६. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम त्रैवार्षिक अहवाल, सन १९९२–९३, ९३–९४, ९४–९५, दि. २५.११.१९९७.

२७. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, सन २००७–०८, दि. ९ डिसेंबर २०१३.

२८. जळगाव जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी, सन २०१२–१३.

२९. जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, जालना, प्रथम वार्षिक अहवाल, दि. १९.७.१९८८ ते दि. ३१.३.१९९०; दि. १८.८.१९९०.

३०. जालना माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ जालना, २२ वा वार्षिक अहवाल, सन २०११–१२, दि. ६.६.२०१२.

३१. दि रेल्वे गुडस् क्लिअरिंग आणि फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंट लेबर बोर्ड फॉर ग्रेटर बॉम्बे, प्रथम वार्षिक अहवाल,

३२. दि रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंटस् लेबर बोर्ड मुंबई मंडळ, वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, २००८–०९.

३३. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी, जानेवारी २०१४.

३४. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई द्वितीय वार्षिक अहवाल १९७४–७५, दि. ३० ऑगस्ट १९७६.

३५. धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने मंडळ, मुंबई मंडळ ३७ वा वार्षिक अहवाल, सन २००९–१०, दि. ३०.५.२०११.

३६. नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी.

३७. नागपूर–वर्धा जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नागपूर, संक्षिप्त कार्यालयीन टिप्पणी.

३८. नाशिक माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ,नाशिक पहिला वार्षिक अहवाल सन१९८५–८६.

३९. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांची कार्यालयीन टिप्पणी.

४०. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा वार्षिक अहवाल सन २०११–१२.

४१. नाशिक जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव, पहिला वार्षिक अहवाल, सन १९८९–९० दि. १.४.१९९२.

४२. नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, लासलगाव, २३ वा वार्षिक अहवाल, सन २०११–१२, दि. २५.४.२०१३.

४३. नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड, लेखापरिक्षण अहवाल, सन १९९२–९३, दि. २८.४.१९९४.

४४. नांदेड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड, वार्षिक लेखापरिक्षण अहवाल, सन २००८–०९, दि. २२.७.२०११.

४५. परभणी–हिंगोली माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. २.४.२०१४.

४६. पुणे माथाडी आणि इतर श्रमजीवी कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल सन १९८०–८१ दि. २९.१२.१९८४.

४७. पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, श्रमशक्ती भवन, मार्केटयार्ड पुणे यांची कार्यालयीन टिप्पणी दि. डिसेंबर २०१३.

४८. पिंपरी चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, पुणे प्रथम वार्षिक अहवाल, सन १९९२–९३.

४९. पिंपरी चिंचवड माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, पंधरावा वार्षिक अहवाल, सन २००६–०७, चिंचवड, पुणे दि. निरंक.

५०. बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, बीड, दि. ३१.३.१९९८ रोजीचे बॅलन्स शीट, दि. ९.७.१९९९.

५१. बीड जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, बीड यांची कार्यालयीन टिप्पणी

५२. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल..

५३. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी दि. २४.१.२०१४.

५४. बृहन्मुंबई कापूस बाजार कामगार मंडळ, कॉटन ग्रीन, मुंबई, एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सन २०१०–११, दि. २१.१२.२०११.

५५. भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा, लेखापरिक्षण व वार्षिक अहवाल, सन २००५–०६, दि. १.१०.२०१०.

५६. भंडारा–गोंदिया माथाडी हमाल व असंरक्षित कामगार मंडळ, भंडारा, कार्यालयीन टिप्पणी.

५७. माल वाहतूक कामगार मंडळ, बृहन्मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी.

५८. माल वाहतूक कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९७२–७३, बृहन्मुंबई.

५९. माल वाहतूक व कामगार मंडळ, बृहन्मुंबई, अडतिसावा वार्षिक अहवाल (सन २००८–०९) दि. ९.७.२०१०.

६०. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल, सन १९८५–८६, दि. ७.७.१९८८.

६१. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, यांची कार्यालयीन टिप्पणी..

६२. मुंबई भाजीपाला असंरक्षित कामगार मंडळ, मुंबई, सव्वीसावा वार्षिक अहवाल, सन २०१०–११, दि. ५.१२.१९९२.

६३. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, सदतिसावा वार्षिक अहवाल भडोच स्ट्रीट मुंबई, (सन २००६–०७) कळंबोली जि. रायगड

६४. मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, भडोच स्ट्रीट मुंबई, प्रथम वार्षिक अहवाल सन १९७०–७१ कळंबोली जि. रायगड दि. ६.८.१९७६ .

६५. रत्नागिरी–सिंधुदूर्ग माथाडी असंरक्षित कामगार मंडळ, रत्नागिरी मंडळ, रत्नागिरी यांची कार्यालयीन टिप्पणी माहे जानेवारी २०१४.

६६. लातूर–उस्मानाबाद जिल्हा असंरक्षित कामगार मंडळाची कार्यालयीन टिप्पणी.

६७. सातारा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल.

६८. सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल सन१९८९–९०.

६९. सोलापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सोलापूर यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. ३१.१.२०१४.

७०. सांगली मिरज माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, सांगली, पहिला वार्षिक अहवाल सन १९८४–८५ दि.२९.१.१९९२.

७१. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, प्रथम वार्षिक अहवाल, उपरोक्त.

७२. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, द्वितीय वार्षिक अहवाल,१९८५–८६ दि.१७.२.१९८८

७३. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, तृतीय वार्षिक अहवाल,१९८६–८७.

७४. सांगली मिरज माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, वार्षिक अहवाल,२०१२–१३.

**४) महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय, राजपत्र, परिपत्रके, पत्रे, कार्यालयीन टिप्पण्या व इतर दस्ताऐवज :**

१. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्षाची टिप्पणी.

२. कामगार आयुक्त कार्यालय, माथाडी कक्ष, कार्यासन १४ यांची कार्यालयीन टिप्पणी, दि. २० जूलै २०११.

३. गायकवाड र. य., कामगार आयुक्त, यांचे अर्ध शासकीय पत्र, प्र. का.आ./ माथाडी/१०९४/मु.क.७/१२६४ दि. १७ एप्रिल १९९४.

४. जाधव रा. भा. (अध्यक्ष), माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ तथा सहाय्यक कामगार आयुक्त यांचे पत्र दि. १८.२.२०१४.

५. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र भाग,एफ. एल., उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १ मे २०११.

६. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र भाग एफ. एल., उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १२.८.२०१२.

७. महाराष्ट्र शासन, अधिसूचना भाग I-L UWA 1473/197778/LAB-IV उद्योग व कामगार विभाग सचिवालय, मुंबई दि. ३० मार्च १९७४.

८. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. डब्ल्युए १४/२००२/ (९८/६)/ काम–५, दि. २२.१.२००४.

९. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र.UWA 1386/CR (11109) LAB-5 दि. ८ जुलै १९९२.

१०. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 1387/ CR11639/ Labs मंत्रालय, मुंबई दि. १ सप्टेंबर १९९०

११. महाराष्ट्र शासन अधिसूचना, ऊर्जा, व उद्योग व कामगार विभाग क्र;. UWA/ 142002/ 148/8, दि. १३.२.२००४.

१२. महाराष्ट्र शासन, अधिसूचना, असाधारण राजपत्र, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. ३ मे २००६.

१३. महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. UWA/ 1487/ CR (11600)/Lab-5, दि. २१ जून १९९१.

१४. महाराष्ट्र शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 142002/(130/7)/कामगार–५, दि. ५.२.२००४.

१५. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग IV दि. १३ जून १९६९.

१६. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग आठ, महाराष्ट्र कायदा क्र.१/२००९ दि. ६ जानेवारी २००९.

१७. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग ५, महाराष्ट्र विधानसभेत व विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके, ११ मार्च १९६९.

१८. महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 1087 (11460) LAB-5 मंत्रालय, मुंबई दि. १३ जुलै १९८४.

१९. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 488 CR (11699) LAB-5 मंत्रालय मुंबई दि. १८ ऑगस्ट १९८८.

२०. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र,भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १४.३.१९९६.

२१. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र भाग I-L, MGG Sr.No. 38 क्र. UWA 1369/ Iron & Steel) LBA/4, उद्योग व कामगार विभाग, सचिवालय दि.१५.१२.१९६९.

२२. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १४.३.१९९६.

२३. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 1588/ (11855)/Labs-5 मंत्रालय, मुंबई,दि. २१.१.१९९१.

२४. महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग एक–ल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. UWA/ 142002/(97/6) कामगार–५, दि. १२.११.२००३.

२५. महाराष्ट्र शासन, अ. सा. राजपत्र, भाग एक–एल, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १ ऑगस्ट १९९२.

२६. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग राजपत्र भाग–१ MGGक्र. ४३ अधिसूचना क्र. UWA 1369/(Grocery)/LAB-IV दि. १५ डिसेंबर १९६९ (उपरोक्त प्रथम वार्षिक अहवालासोबत पुर्नमुद्रित केलेली)

२७. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग (खुद्द) कार्यक्रम अंदाजपत्रक २०१३–१४.

२८. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1472/ 152991/ Lab IV दि. ३१.१.१९७३.

२९. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1389/ 11965/ काम–५ दि. २४ एप्रिल १९८९.

३०. महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA/ 1487/ 11490/ काम–५ दि. १५.९.१९८९.

३१. महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग, अधिसूचना, क्र. UWA 1469 (GR) 160783/LAB-IV,सचिवालय, मुंबई दि. ६ एप्रिल १९७०.

३२. महाराष्ट्र शासन, कामगार–८, कार्यासन, मंत्रालय, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी.

३३. महाराष्ट्र शासन, कामगार व समाज कल्याण विभाग, पत्र क्र. BSE/1459/148843-J दि. नोव्हें. १९५९ (माथाडी कायदा विशेषांक–महाराष्ट्र हमाल मापाडी महामंडळ, पुणे, १९९४)

३४. महाराष्ट्र शासन, परिपत्रक, क्र. एसजीए १५००२(३७८३) काम–५, दि.१०.१०.२००२

३५. महाराष्ट्र शासन पत्र क्र. युडब्ल्युए १०८७/ सी.आर.११५८९/ कामगार–८ दि. १९ फेब्रुवारी १९९०. (पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिकेतील पुनर्मुद्रित)

३६. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ, मुंबई यांची कार्यालयीन टिप्पणी.

३७. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उद्योग व कामगार विभाग क्र. UWA 1471 (GL)/102307 LAB IV सचिवालय, मुंबई दि. ११ मार्च १९७१.

३८. महाराष्ट्र शासन, राजपत्र, उद्योग आणि कामगार विभाग क्र.UWA/ 272/ 101763/ Lab IV सचिवालय, मुंबई दि. ३० मार्च १९७२.

३९. महाराष्ट्र शासन, राजपत्र, असाधारण भाग एक–ल; उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. २२.१.१९८५.

४०. महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.UWA 1087 (11460) LAB-5 उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई दि. १३ फेब्रुवारी १९९२.

४१. महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक–ल, उर्जा व कामगार विभाग क्र. UWA 1484 CR (10408) LAB-5 दि. १८.८.१९८८

४२. महाराष्ट्र शासन, राजपत्र भाग एक–ल, दि. १२ ऑगस्ट १९९२, दि. २६ मार्च १९९२.

४३. महाराष्ट्र शासन, राजपत्र, ऊर्जा, व उद्योग व कामगार विभाग. दि. १ सप्टेंबर १९९०.

४४. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. उद्योग, उर्जा व कामगार विभाग, कार्यासन कामगार–५, दि. २६ मार्च २०१०.

४५. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. सिआयडी ३३०८/ १८५१ /प्र.क्र.१४ / नवि१० दि. ५ सप्टेंबर २०११.

४६. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग कार्यासन/काम–५ दि.४.१०.२०१२

४७. महाराष्ट्र शासन,शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्र. युडब्ल्यु १५०९/प्र.क्र.१८१९/कामगार–५ दि. ३१ ऑगस्ट २००९ व २६ मार्च २०१०.

४८. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय उद्योग व कामगार विभाग, क्र. MSC 70264-LAB-II, सचिवालय, मुंबई, दि. १५ जुलै १९६५.

४९. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई, दि. १९ डिसेंबर २०००.

५०. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. युडब्ल्युए १५१०/आर–३५८/कामगार–५ दि. ५.१०.२०१०.

५१. विक्रीकर आयुक्त कार्यालय, परिपत्रक, क्र. विउआ/प्रशा. २९/२०११/ परिपत्रक प्र. १२७, मुंबई दि. ३ ऑगस्ट २०११.

५२. Goverment of Maharashtra, Notification, Industries, Energy Labour Department, Dt 12/4/1991

## प्राथमिक साधने(प्रकाशित– साधने)

### ५) नियतकालिके, विशेषांक व इतर साधने(प्रकाशित) :

१. नारायण मेघाजी लोखंडे स्मृती विशेषांक, फ्रेबुवारी २०१२.

२. पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ, २० व्या वर्धापन दिन स्मरणिका, सप्टेंबर २०००.

३. महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन रौप्य महोत्सवी विशेषांक, सप्टेंबर १९८८.

४. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ संदर्भ पुस्तिका, दि. २२ नोव्हेंबर २०१२. माथाडी मित्र, कामगार व महाराष्ट्र दिन विशेषांक, मे १९८१.

५. माथाडी मित्र (पाक्षिक) कै. अण्णासाहेब पाटील स्मृती विशेषांक, दि. २३ मार्च १९८३.

६. हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

७. माथाडी कामगार सहकारी पतपेढी वार्षिक अहवाल, सन २०१०–११.

८. माथाडी कामगार सहकारी ग्राहक भांडार वार्षिक अहवाल,सन२०११-१२.

९. माथाडी हॉस्पीटल ट्रस्टची कार्यालयीन टिप्पणी, सन २०१३.

### ६) लेखसूची(प्रकाशित) :

१. अतितकर जी. व्ही., पुण्याचे माथाडी मंडळ वैशिष्ट्यपूर्ण आणि आदर्श ठरावे, पुणे माथाडी मंडळ, स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००.

२. अध्यक्ष, सोलापूर रेल्वे हमाल पंचायत, माथाडी प्रश्न–सप्रेम नमस्कार, हमाल माथाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

३. अध्यक्ष, नांदेड हमाल मापाडी हातगाडा संघ यांचे पत्र, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

४. अष्टेकर श्याम,शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन रौप्य महोत्सव विशेषांक, दि. २१ सप्टेंबर १९८८.

५. आढाव बाबा, माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

६. आढाव बाबा (संपादकीय), हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन पेन्शन विशेषांक, फेब्रुवारी २०१२.

७. ओविद पी. जे., ‘अण्णासाहेब पाटील एक महान कामगार पुढारी’, रौप्य महोत्सव विशेषांक, सप्टेंबर १९८८.

८. काटे बंडू किसन, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र विशेषांक, १९८१.

९. कुलकर्णी व्ही. वाय., माथाडी कामगार कायदा–एक दृष्टिक्षेप, पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००.

१०. कुलकर्णी एस. आर., कामगार चळवळ–काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

११. कोतवाल मनोहर, ‘माथाडींच्या जगण्याला अर्थ देणारा कायदा’, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१२. कोरपे अप्पा, घुले शंकरराव, अहमदनगर हमाल पंचायतीची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१३. काळबेरे दत्ता (संपादकिय), संपूर्ण महाराष्ट्रात प्रभावी अंमलबजावणी झालीच पाहिजे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१४. खिमासिया दिनेश, मालकांचे मनोगत, माथाडी मित्र पाक्षिक, मे १९८१.

१५. खांदेवाले श्रीनिवास, जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात श्रमिक संघापुढील संघटनात्मक आव्हाने, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

१६. गिरमे सुरेश, हमाल पंचायत कष्टकरी विद्यालय, हमाल मापाडी वार्ता–पुणे अधिवेशन विशेषांक, फेब्रुवारी २०१२.

१७. घायाळ राजकुमार, शासकीय धान्य गोदामातील हमालांसाठीच्या चळवळीतील संक्षिप्त नोंदी, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१८. चोळके टी. जी., माथाडी कामगार कायदा–एक मूल्यमापन, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

१९. जोशी वि. द. हमाल माथाडी कामगार व आरोग्य, पुणे माथाडी मंडळ स्मरणिक, सन २०००.

२०. जोशी मनोहर, स्वयंभू कामगार नेता, रौप्य महोत्सव विशेषांक, सप्टेंबर १९८८.

२१. झावरे शिवाजीराव, 'माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीबाबत', हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२२. झावरे शिवाजीराव, मुंबई स्थित माथाडी मंडळे व जिल्हा स्तरीय माथाडी मंडळे–एक दृष्टिक्षेप, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२३. डिंगरे चित्तरंजन, माथाडी कायद्याची पार्श्वभूमी, कायदा व अपेक्षित बदल, पुणे माथाडी मंडळ स्मरणिका, सप्टेंबर २०००.

२४. तुंगतकर जयंत, कष्टकऱ्यांसाठी आरोग्याची काळजी, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२५. तुंगारे राजन, गोर गरीब कष्टकऱ्यांचे कैवारी–नारायण मेघाजी लोखंडे, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

२६. तिडके नरेंद, प्रत्येक कामगाराला कायद्याचे संरक्षण हवे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२७. तिडके नरेंद्र, शुभसंदेश, महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियन रौप्य महोत्सव विशेषांक, दि. २१ सप्टेंबर १९८८.

२८. देशपांडे दा. गो., माथाडी बोर्डात जाणे–येणे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

२९. देशपांडे प. द., हमाल संबंधी कायदे आणि योजना, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

३०. दौंड अविनाश, कामगार चळवळ–काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

३१. धुरट हरिष, विदर्भातील माथाडी कायद्याची वाटचाल, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

३२. धुरट हरिष, मन मनगटात बळ पाहिजे, हमाल मापाडी वार्ता, पुणे अधिवेशन विशेषांक, फेब्रुवारी २०१२.

३३. नारकर प्रभाकर, बाबुराव रामिष्टे–मॅन विथ ए मिशन, मा. बाबुराव रामिष्टे षष्ठ्यद्बिपूर्ती विशेषांक, सन २०१२.

३४. निंबाळकर अजित, माथाडी कायदा–असंरक्षित कामगारांसाठी एक वरदान, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९४४.

३५. पटेल शांती, स्वातंत्र्यपूर्व व नंतरची कामगार चळवळ, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

३६. पाटील अण्णासाहेब, 'माथाडी कामगार चळवळ', किराणा बाजार व दुकाने मंडळ, मुंबई तपपूर्ती स्मरणिका, १९७९ (पुनर्मुद्रित)

३७. पाटील अण्णासाहेब, नाशिक जिल्ह्यातील असुरक्षित कामगारांना कायद्याचे संरक्षण मिळावे म्हणून माथाडी युनियनची नाशिक जिल्ह्याकडे धाव, माथाडी मित्र पाक्षिक, मे. १९८१.

३८. पाटील उदय, माथाडी कायद्याने आमुलाग्र बदल घडविला, पुणे माथाडी मंडळ, २० वा वर्धापन दिन स्मरणिका, दि. १५ सप्टेंबर २०००.

३९. पाटील वसंत दादा, शुभसंदेश, रौप्य महोत्सव विशेषांक, दि. २० सप्टेंबर १९८८.

४०. पाटील राजाराम, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र पाक्षिक, मे, १९८१.

४१. पाटील रामचंद्र (संपादकीय), पुणे माथाडी मंडळ–२० वा वर्धापन दिन स्मरणिका, सन २०००.

४२. बाबू बाळकृष्ण, भुजबळ विलास, माथाडी मंडळाकडून अपेक्षा, पुणे माथाडी मंडळ स्मरणिका, सन २०००.

४३. भागवत टी. आर., सल्ला कामगारांना आणि व्यापाऱ्यांनाही, माथाडी मित्र विशेषांक, १९८१.

४४. भिलारे ज्ञानेश्वर, कामगार चळवळ–काल, आज आणि उद्या, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

४५. मारुती विश्वासराव, 'कामगार चळवळ मजबूत करण्यासाठी श्रमशक्तीच्या एकजुटीची गरज', ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी, २०१२.

४६. मेहता अरुण, माथाडी मंडळाची शिखर संस्था झाली पाहिजे, हमाल मापाडी वार्ता– माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

४७. मोरे अंकुश, पुणे माथाडी मंडळ स्मरणिका, सन २०००.

४८. यादव दादू नारायण, अण्णासाहेब पाटील एक विशाल शक्ती होती, माथाडी मित्र पाक्षिक, दि. २३ मार्च १९८५.

४९. रामिष्टे बाबुराव हरि, पवार बळवंतराव, पाटील शिवाजीराव, 'माथाडी कामगार संघटना', रौप्य महोत्सवी वाटचाल, सप्टेंबर १९८८.

५०. रामिष्टे बाबुराव, पुणे माथाडी मंडळ, स्मरणिक, सन २०००.

५१. शेलार नामदेव, भारतीय कामगार चळवळीचे जनक–नारायण मेघाजी लोखंडे, ना. मे. लोखंडे स्मृती विशेषांक, दि. ९ फेब्रुवारी २०१२.

५२. शिंदे यशवंतराव, कामगारांचे मनोगत, माथाडी मित्र विशेषांक, १९८१.

५३. साळुंखे अरुण, पाठीवर किती ओझे घ्यावे, हमाल मापाडी वार्ता–माथाडी कायदा विशेषांक, १९९४.

**७)राज्यघटनेतील तरतूदी व केंद्र शासनाचे कायदे ,अहवाल व प्रकाशने :**

१. आंबेडकर भिमराव (अध्यक्ष, मसुदा समिती), भारतीय राज्य घटना.

२. Government of India Act, No.9/1948, The Dock Workers (Regulations of employment) Act, 1948, Dt. 4th March, 1948.

३. Government of India, Industrial Disput Act, 1947, Act No. 14/1947, Dt. 11th March 1947.

४. Government of India, Industrial Disput (Labour Appellate Tribunal) Act, 1950, Dt. 20 May 1950.

५. Government of India Act,The unorganized Workers Social Security Act, 2008.

६. Government of India Act,Building and Other onstructionWorkers(Regulations of Employment) Act, 1996.

७. Indian Industrial Commission Report, 1916.

८. Indian Labour Year Book, 2011.

९. Letter by Mr.S.N.Jariya,Labour Minister,Government of India to Mr.Narayan Rane,Chief Minister,Maharashtra dt.30 Auguest 1999

१०. Report of National Commission on Labour, 1999, Dt. 15. 10.1999.

११. Report of National Commission for Enterprises in the unorganized sector, Dt. 7.7.2007.

## ८)महाराष्ट्र शासनाचे कायदे ( प्रकाशित )–

१.महाराष्ट्र माथाडी, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९.

महाराष्ट्र पुरोगामी राज्य आहे. राज्याने सन १९६९ मध्ये माथाडी कायदा पास केला मात्र त्याची अंमलबजावणी सुरु व्हायला १९७४ साल उजाडले. पुण्यात १९८० नंतर अंमलबजावणी सुरु होवू शकली. काही व्यापारी मा. सर्वोच्च न्यायालयात गेले, त्यामुळे हा वेळ लागला. राज्यात सन १९६९ मध्ये मार्केट कमिटया स्थापना झाल्या. त्यामुळे माथाडी कायदा लागू करावा कि नाही या विचारात शासन होते. वाईट गोष्ट अशी कि यानंतर काही कालावधीतच मुक्त अर्थव्यवस्था स्विकारली गेली, त्यामुळे माथाडी कायदयाची प्रभावी अंमलबजावणी होवू शकलेली नाही. आता तर मार्केट कमिटया आणि माथाडी कायदा दोन्ही उधळून लावण्याचे प्रयत्न सुरु झालेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार माथाडी कायदा हा Operations ला लागु आहे. त्यामुळे लोडींग, अनलोडींग, वाहतूक ही कामे यंत्रामार्फत कायम पगारी कामगारांकडून करुन घेतली तरी लेव्हीची रक्कम देय होणार आहे. सर्वश्री. तिडके, अरुण मेहता, रोहीदास पाटील यांसारखे मंत्री असे पर्यंत माथाडी कायदयाची अंमलबजावणी व्यवस्थित होत होती. काही मंडळामध्ये कर्मचा-यांचे पगार देण्याइतकी सुध्दा लेव्ही जमा होत नाही, जसे की चंद्रपूर, धुळे-नंदुरबार. या कायदयामुळे शासनाच्या तिजोरीवर भार येत नाही, तरी सरकार अंमलबजावणीत कुचराई करते. या मागे आपण स्विकारलेले मुक्त अर्थव्यवस्थेचे धारेण हेच कारण आहे.

मोलकरीण, कचरा वेचणारे हे देखील आता माथाडी कायदयासारखा कायदा करा अशी मागणी करत आहेत. माथाडी कायदयामुळे माथाडी हमालांच्या Working Conditions आणि living conditions मध्ये बदल झाला आहे. पुणे - मुंबईत त्यांनी स्वत:ची घरे उभारली आहेत, एन.डी. पाटील यांचे कार्यकाळात हमालांना मार्केट कमिटीत प्राधान्य मिळाले, पाटीवरचं ओझं कमी होवुन ५० किलो इतके कमी झाले. जेवढे बदल करणे शक्य आहेत तेवढे केले गेले.

आता व्यापारी माते-यावर हक्क सांगू लागलेत, त्यामुळे पालेवाल्या महिलांच्या पगारांचे प्रश्न निर्माण झाला आहे. श्री. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना कामगार आयुक्त कार्यालयात वेगळा माथाडी कक्ष निर्माण करण्यात आला आहे. मात्र मंत्रालयात माथाडी व इतर असंघटीत कामगारांसाठी अदयापही स्वतंत्र विभाग केलेला नाही. जेथे अधिकारी क्रियाशील आहेत, तेथे कायदयाची अंमलबजावणी चांगली होते. शासकीय धान्य वितरण व्यवस्थेतील हमालांबाबत ब-याचदा जिल्हा पुरवठा अधिकारी आगावूपणे वागतात, त्यांना प्रतिबंध केला पाहिजे. अॅडव्हायझरी कमिटीचा सल्ला शासनावर बंधनकारक नाही असा शासनाने या बाबतच्या तरतुदीचा अर्थ लावलेला आहे. तो बदलला पाहिजे व या कमिटीचा सल्ला शासनावर बंधनकारक केला पाहिजे. एस.टी. महामंडळात वाहतुकीचे काम हमाल-माथाडी मार्फत न करता तेथे कॉन्ट्रॅक्ट देतात. तेथे हा कायदा लागू करणे आवश्यक आहे. शासन कायदयातील Operations ची संख्या वाढवून शासन कायदयाचा आवाका वाढवू शकतात. बांधकाम मंडळात रु. २०००/- कोटी जमा झालेत, मात्र कर्मचा-यांअभावी अदयापही कामगारांना लाभ मिळत नाहीत. मालधक्के, सरकारी गोदामे, मार्केट कमिटया या मोठया आस्थापना आहेत. तेथे सर्वत्र वाहतूकीच्या कामाची कंत्राटे देतात. भारत आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या सदस्य असूनही कायदयाचे व संकेतांचे पालन होत नाही. रेल्वे मालधक्क्यावर हमालांना साधे पिण्याचे पाणी देखील नसते. रेल्वे म्हणते हे आमचे कामगार नाहीत, हुंडेक-यांचे आहेत. या व्यवसायात काम करणा-या स्त्रियांचे प्रश्न गंभीर आहेत. विदर्भात ६ ते ७ हजार स्त्रीया कपासीच्या उदयोगांत काम करतात. चंद्रपूर मधील वीट भटटी / कवेलू कामगारांचा प्रश्न आहे. डावी मंडळी असंघटीत कामगारांना कामगार म्हणून मानत नाही, त्यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे माथाडी कायदयाची पाने इतिहासातून काढली जातील कि काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

पुण्यातील नामांकित अस्थिव्यंग तज्ञ डॉ. हर्डीकर व डॉ. संचेती यांचेकडे हमालांचे X-Ray काढून त्यांच्या आजाराची वस्तुस्थिती मांडली. रिक्षांची काच आणि त्यावर पडणा-या पाण्यामुळे रिक्षावाल्यांना डोळयांचे विकार होतात. शेतमजूर , मच्छीमार यांची नोदणी देखील झालेली नाही. कायदयाच्या अंमलबजावणी बहुतेक कामे राजकीय हेतूनेच होतात. अॅडव्हायझरी कमिटीत स्थानिक व पक्षाचीच माणसे घेतली जातात, हे बदलणे गरजेचे आहे. या सर्वच असंघटीत कामगारांसाठी मंत्रालय स्तरावर स्वतंत्र बजेट आणि वेगळा मंत्री असावा. मालक- कामगार नाते नसताना सुध्दा कामगारांना या कायदयामुळे सामाजिक न्याय मिळाला हे या कायदयाचे वैशिष्टय आहे. हा कायदा देशभरासाठी मॉडेल आहे.

(डॉ. बाबा आढाव)

नागपूरमध्ये माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आयोजित केलेल्या मोर्चाची बातमी व महिला माथाडी कामगारांविषयक लेख

महासागर, दि. ६ फेब्रु १९८८

## हमाल कामगारांची जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार धडक

नागपूर, शुक्रवार (स्था. प्र.) नागपूर कृषि उत्पन्न बाजार समिती अंतर्गत मिरची बाजार, धान्य बाजार, संत्रा मार्केट, भाजी मार्केट व कळमना बाजारातील हमाल कामगारांना माथाडी बोर्डात सामील करून घ्यावे, या प्रमुख मागणीसाठी आज सकाळी लकडगंज विभागातून हमाल कामगारांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा नेऊन मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केले.

हमाल कामगारांना बोनस, भविष्य-निर्वाह निधी, वैद्यकीय रजा व कामाच्या तासाचे निर्धारण इत्यादी इतर मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

मोर्चाचे नेतृत्व विदर्भातील माथाडी कामगारांचे नेते श्री. जनक कडू, डॉ. हरिश धुरट, प्रभाकर शिंगोटे इत्यादिंनी केले.

मोर्चात सुमारे ३०० हमाल कामगार सहभागी झाले होते.

## Hamals to take out Morcha to collectorate

(By Staff Reporter)

Nagpur, Feb.5- The porters (Hamal) of grain Gunj, Mirchi Bazar, Santra Markat Bhaji Market and Kalmna Market attached with Krishi Utpanya Bazar Samiti will take out a morch to local collectorate tomorrow to press their various demands, including the introduction of Provident Funds scheme, Medical facitiets, Bonus and others.

According to Dr. Harish Dhurat, General Secretary of Hamal Sanghatana, Nagpur city, the Moeha will start from Dhanyaganj at 10 a.m and reach Collectorate at 1 p. m, The Morcha will be by Janak Kadu, veteran Congress (I) leader, Adv, Mankar Ram Korke, Sanjay Kadu and others.

The marchers will later on submit a memorandum to the Collector, regarding their demands.

Date 6 febru, १९८८

## माथाडी कामगार संघटना एकीकरण

लोकमत

# विविधा

रविवार, दि. ६ मार्च २००५

## पसऱ्यावर जगणाऱ्या स्त्रिया



दि. ६ मार्च २००५ अकोला येथे आयोजित दुसऱ्या कष्टकरी महिला परिषदेच्या निमित्ताने---

शतकापूर्वी शेतमालाची आपसात अदलाबदल होत असे. पुढे गरजेच्या जीवनावश्यक वस्तू शेतमालाच्या मोबदल्यात घेतल्या जाऊ लागल्या. हा विनिमय वा देवाण-घेवाणीचा व्यवहार जिथे होत होता, त्या ठिकाणाला 'गुजरीहाट', 'मंडई' म्हटल्या जात असे. या गुजरीहाटात शेतकरी-ग्राहक यात सरळसरळ व्यवहार करण्याऐवजी तो दलालामार्फत व्हायचा. आज शासनाने 'दलाल' हा शब्द काढला. व्यापाऱ्यांनी पळवाट काढून 'अडत्या' हा शब्द आणला. गुजरीहाट हा शब्द कालौघात गेला, त्याऐवजी 'मार्केट' शब्द आला.

मार्केट म्हटल्याबरोबर कंपनी, वाहतुकीची वेगवेगळी साधने, मार्केट कलेरी, गोदामे इत्यादी नावं आलीत. या सर्व ठिकाणी काम करणाऱ्या महिलांना फार पूर्वी 'रेचा' म्हटल्या जात. आज याच 'रेचा' बाईला टोपलेवाली, हारेवाली, पाणीवाली, सुपडेवाली, चाळणीवाली म्हणून ओळखल्या जाते. बाजार समितीच्या आवारात काम करणाऱ्या या महिलांना कोणीही नोकर मानायला तयार नाही. ती नोकर नसताना तिच्याकडून पोती खाली करणे, खाली सांडलेलं धान्य जमा करणे, मालाचा ढीग लावणे, लिलावाच्या वेळी मालाचे सॅम्पल घेणे, सॅम्पलचे टोपलं घेऊन लिलावाच्या ठिकाणी तासन्‌तास उभे राहणे, खळा साफ करणे, खळा वा दुकान राखणे आदी कामे फुकट करून घेतली जातात. बाजारात ज्या शेतकऱ्यांचा माल येतो तो खाली करताना, भरताना, शिलाई करताना, माल साफ करताना, चाळण करताना शेतकऱ्याला जी मदत होते, त्या कामाच्या मोबदल्यात दया म्हणून वा मदत पसा-पसा धान्य मिळते. ते पसाभर धान्य म्हणजे या महिलांचा रोजगार!

या महिलांना अडत्याचे वा व्यापाऱ्यांचे काम करावे लागते. द्रव्य म्हणून मेहनताना कधी-कधी शेतकरी देतो, तर आवारात काम करण्यासाठी परवाना बाजार समितीचा घ्यावा लागतो. बाजार समितीचा परवाना काढणे वा त्याचे नूतनीकरण करणे भयंकर तापदायक ठरते.

बाजार समितीचा स्वतंत्र कायदा

### आव्हान

असला तरी व्यापाऱ्यांच्या लहरीवर, अडत्याच्या कलाकलाने बाजार समितीचा कारभार चालवावा लागतो.

हंगाम असला तर कामाची वेळ निश्चित नसते. सकाळी कामावर आलेली बाई सायंकाळी ६ वाजता घरी जाईल, याची खात्री नसते.

कामगार कायद्याप्रमाणे कामाचे तास ठरवले आहेत. अधिक वेळ काम करणाऱ्यांना ओव्हरटाईम मिळण्याची व्यवस्था आहे. महिलांना सूर्यास्तानंतर सार्वजनिक ठिकाणी, असुरक्षित क्षेत्रात काम करण्याची मनाई आहे, पण हे सारे कायद्याच्या पुस्तकात किंवा कामगार आयुक्तांच्या दप्तरात जमा आहेत. बाजारात काम करणारी कष्टकरी महिला कामगार आहे, हेच कोणाला मान्य नाही.

■ डॉ. हरीश धुरट
नागपूर

माथाडी कामगार चळवळींविषयी विविध वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या बातम्या.

६ ■ देशोन्नती, नागपूर, गुरुवार, दि. ३ फेब्रुवारी, २००५

# अडतियांच्या विरोधात माथाडी कामगारांची निदर्शने



निदर्शने करताना माथाडी कामगार

*प्रतिनिधी/ २ फेब्रुवारी* .

**नागपूर :** माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण करणाऱ्या दलाल व अडतियांच्या विरोधात भारतीय श्रमिक व माथाडी कामगार संघ कळमना मार्केट यांच्या वतीने येथील सिव्हिल लाईन्समधील भोसला चेंबर्समध्ये असलेल्या माथाडी मंडळाच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

याप्रसंगी माहिती देताना महाराष्ट्र राज्य हमाल माथाडी महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. हरीश धुरट यांनी सांगितले की, अडतियांनी कायद्याच्या चाकोरीत न बसणाऱ्या ३ अटी ठेवण्यात आलेल्या आहेत. यामध्ये ५० टक्के अडतियांचा माथाडी मंडळात समावेश, कामगारांचे पगार वसूल करण्याचे आदेश लेखी स्वरूपात देणे, व २० टक्के लेव्ही देण्यात यावी आदीचा समावेश आहे.

अडत्यावर अवमान याचिका दाखल करावी, ११० अडतियांवर चालू असलेल्या फौजदारी खटल्याचा निकाल लावावा, अशा मागणीचे निवेदन माथाडी बोर्ड नागपूरचे अध्यक्ष व कामगार साहाय्यक आयुक्त आर.बी. जाधव यांना देण्यात आले आहे.

याप्रसंगी माहिती देताना आ.बी. जाधव यांनी म्हटले की, अडतियाद्वारे शासनविरोधी चालविलेले धोरण योग्य नाही कारण माथाडी बोर्डाद्वारे मजुरीवर ३० टक्के लेव्ही आकारली जाते व त्यामुनच मजुराची ग्रॅच्युईटी, बोनस, भत्ता, पगार व इतर सुविधा पुरविल्या जातात.

माथाडी कायदा नागपुरात ७-८ वर्षांपासून लागू करण्यात आला आहे. परंतु कृषी उत्पन्न बाजार समितीचा समावेश करण्यात आला नाही.

सकाळ

नागपूर

नागपूर, गुरुवार, ३ फेब्रुवारी २००५ / ७

# माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी निदर्शने

नागपूर, ता. २ : माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी कळमना येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती कार्यालयासमोर आज महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळातर्फे उपाध्यक्ष डॉ. हरीश धुरट यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली.

माथाडी कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळ, भारतीय श्रमिक व माथाडी कामगार संघ यांच्यातर्फे ३० जानेवारीपासून आंदोलन सप्ताह चालविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज निदर्शने करण्यात आली. निदर्शनानंतर उपसचिव व्ही. एन. भांडारकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. निवेदनात महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियम १९६२ च्या नियम ९२ प्रमाणे बाजारात गैरवर्तणूक करणाऱ्या अडत्यांवर कारवाई करण्याचे अधिकार व त्यांचे परवाने रद्द करण्याचे अधिकार सभापतींनी वापरावे व पणन संचालक यांचे निर्देश पाळावे आदी मागण्यांचा समावेश आहे. आंदोलनात ४०० कामगार सहभागी झाले होते. आंदोलनात बाजार समितीचे हमाल मापाडी संचालक किशोर पालांदूरकर, राम ढेपे, नरहरी धोपटे, इक्बाल हुसेन, राजू नायडू, विनायक रामटेके, सलीम शेख, शेख अख्तर, युसूफ शेख, किसनाबाई खोब्रागडे, यमुना गायकवाड, शेवंता ढोरे, राजू मानकर, बेबी खोब्रागडे, संतोष वर्मा आदी सहभागी झाले होते.




महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळातर्फे माथाडी कामगारांनी सभापती कार्यालयासमोर निदर्शने केली.

माथाडी कामगारांनी माथाडी कामगारांच्या कुटुंबियांना केलेल्या मदतीबाबत बातमी व

# माथाडी कामगारांकडून आर्थिक मदत



चंद्रपूर : धनादेश वितरण करताना संजय चिमूरकर

*प्रतिनिधी / २३ मार्च*

**चंद्रपूर :** कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूर येथील कामगार भाऊराव दामोदर नखाते यांच्या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटुंबावर ओढवलेल्या संकटात बाजार समितीच्या माथाडी कामगारांनी पाच हजारे रुपयांचे आर्थिक सहाय्य संजय चिमूरकर यांच्या हस्ते मृताच्या आईला प्रदान केले.

मृताच्या कुंटूबियांच्या दु:खात बाजार समितीचे सर्व हमाल, मापारी माथाडी कामगार सहभागी आले. यापुढे ही प्रत्येक कामगाराच्या दु:खात आम्ही सहभागी राहू. कामगारांनी कामगाराच्या दुखात नेहमी मदत करण्याची भावना त्यांच्यात निर्माण व्हावी हा या मागील उद्देश असल्याचे कष्टकरी पंचायतचे रमजानखॉं पठाण अशरफी यांनी म्हटले आहे. सहाय्यता निधी प्रदान करताना बाजार समितीचे कामगार यशवंत नंदनवार, रमेश तोडासे, वासुदेव नैताम, प्यारेलाल आदी कामगार उपस्थित होते.

नागपूर, शुक्रवार, ९ डिसेंबर २००५

थेट भेट



डॉ. हरीश धुरट

माथाडी कामगार संघटनेचे अध्यक्ष

## माथाडी कामगार कायदा दलालांनी रोखला

**पंडित जवाहरलाल नेहरू मार्केट यार्ड कळमना मार्केट येथे माथाडी कायदा लागू करण्यासाठी मंगळवारपासून हमाल माथाडी कामगारांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे. कायद्याच्या अंमलबजावणीपर्यंत काम बंद आंदोलन मागे घेण्यात येणार नाही, असा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर दीड दशकांपासून असंघटित कामगारांसाठी सातत्याने लढा देत असलेले माथाडी कामगार संघटनेचे अध्यक्ष डॉ. हरीश धुरट यांच्याशी केलेली बातचीत...**

**■ माथाडी कायद्याची अंमलबजावणी का केली जात नाही?**

अडते आणि दलाल यास कारणीभूत आहेत. त्यांच्याच विरोधामुळे पाचवेळा निर्णय होऊनही कळमना बाजारात माथाडी कायदा लागू होऊ शकला नाही. अडत्यांना खिशातून पैसे द्यायचे नाही, तर उलट आणखी लुबाडणूक करायची आहे. खरेदी-विक्री करणाऱ्यांकडून दिला जाणारा मोबदला त्यांना त्यांच्या हाती हवा आहे.

**■ माथाडी कायद्यात काय तरतुदी आहेत?**

मालाची चढ-उतार व माल वाहून नेणाऱ्या सर्व असंघटित कामगारांचा माथाडी कायद्यांतर्गत समावेश होतो. ७४ साली महाराष्ट्राने कायदा स्वीकारला आणि नागपूर जिल्ह्यात ९१ साली लागू केला. यात कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, वैद्यकीय सेवा, अपघात नुकसानभरपाई सुविधा

(पान २ पाहा)

सकाळ

## माथाडी कामगार कायदा दलालांनी रोखला

देण्याची तरतूद आहे. जेवढे काम तेवढा मोबदला, असे स्वरूप आहे. याशिवाय विक्री करणारा किंवा खरेदी करणारा यांच्याकडून दाम घ्यायचे आहेत. नागपूर आणि वर्धा जिल्हे वगळता संपूर्ण महाराष्ट्रात या कायद्याची अंमलबजावणी केली आहे.

**● नागपूर-वर्धा मंडळांतर्गत किती कामगार येतात?**

दोन्ही जिल्ह्यांच्या मंडळांतर्गत ४५ हजार असंघटित कामगार आहेत. सध्या यापैकी जवळपास फक्त पाचच हजार कामगारांना कायद्याचे संरक्षण प्राप्त झाले आहे. कळमना मार्केट येथे सहा हजार, वर्धा येथे सहा हजार व इतर तालुकानिहाय कृषी उत्पन्न बाजार समिती, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत गोदामात कामगार कार्यरत आहेत.

**● जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या गोदामात काय प्रश्न आहेत?**

शासकीय गोदामातील कामे खासगी कंत्राटदारांकडून केली जातात. कायद्यांतर्गत सर्व अडते व कंत्राटदारांना मंडळात नोंदणी करणे आवश्यक आहे. नागपूरमध्येच काही गोदामांमध्ये एका कामगाराला एक पोते उचलण्यासाठी दोन रुपये ८५ पैसे, तर दुसरीकडे एक रुपया ३० पैसे मोबदला दिला जातो. कंत्राटदाराला मिळणाऱ्या नफ्यातील रक्कम कामगारांच्या सुविधेसाठी कापून घेण्यास त्यांना नकार आहे. राज्य शासनाने याकरिता अधिकचा निधी द्यावा, अशी त्यांची मागणी आहे. सध्याच्या दरातच लेव्ही कापल्यास स्वस्त धान्याचे भाव वाढण्याची भीती दाखवून कामगारांना न्याय दिला जात नाही.

**● दलालांचा काय तोटा आहे?**

औरंगाबाद उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शेतकऱ्यांकडून हमाली वसूल करता येत नाही. मात्र, ती कोणी द्यावी याचा उल्लेख न्यायालयाने आदेशात केलेला नाही. दलालांना किमतीवर दलाली मिळते, तर दलालाला २४ रुपये मिळतात, तेव्हा कामगारांना एक रुपया नगानुसार हमाली मिळते. बाजार समितीने खरेदीदार किंवा विक्रेत्यांकडून दलाली दरपत्रक काढले होते. मात्र, त्यालाही दलाल, अडते विरोध करीत आहेत.

**● शासनाची काय भूमिका आहे?**

आजपर्यंत पाच कामगार मंत्री आणि नितीन गडकरी पालकमंत्री असताना त्यांनी माथाडी कायद्याची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले होते. मागील हिवाळी अधिवेशनात कामगार मंत्री नवाब मलीक यांनी होकार देऊन वर्ष उलटले तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही. उच्च न्यायालयानेही कळमना बाजारात माथाडी कायदा लागू होतो, असे आदेश दिले आहेत. मात्र, अंमलबजावणी झालेली नाही. कायदा करूनही तो लागू केला जात नसेल तर याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची आहे.

पान १ वरून

**● पूर्ती केली जात नसताना पुन्हा आंदोलनाने काय साध्य होईल?**

आता आम्ही आश्वासनांच्या भूलथापांना बळी पडायचे नाही, असे ठरवले आहे. जोपर्यंत अंमलबजावणी होत नाही तोवर कामबंद ठेवण्याच्या निर्णयावर आम्ही ठाम आहोत. दलालांच्या मर्जीवर कायद्याची अंमलबजावणी राज्य शासन करीत नसेल तर हे सरकारचे अपयश आहे. गरीब कामगारांनी कोणाकडे दाद मागावी, असा प्रश्न आहे. यामुळे आम्हीच अंमलबजावणीशिवाय मागे हटायचे नाही, असा निर्णय घेतला आहे.

दै. पुण्यनगरी मधील श्री. एकनाथ दळवी यांच्या निधनानंतर प्रसिध्द झालेला लेख.

# एका माथाडीचा कर्तबगार सुपुत्र

एकनाथ दळवी यांची माझी पहिली ओळख करून दिली ती माथाडींचे आराध्यदैवत असलेल्या अण्णासाहेब पाटील यांनी. त्या वेळी मी पत्रकारच होतो म्हणजे, मी पत्रकारितेला सुरुवात केली होती आणि दळवी माथाडींच्या ग्रोसरी बोर्डात हिशेब खात्यात कारकून पदावर होते. हे काम करून उरलेल्या वेळेत ते माथाडी युनियनमध्ये यायचे. अण्णासाहेब पाटील सांगतील ते लहान-मोठे काम करायचे. यातूनच त्यांची अण्णासाहेबांशी अगदी जिगरी दोस्ती झाली आणि पुढे ती खूप वाढलीही.

या सगळ्या वाटचालीत दळवींची व माझीही खूप मैत्री झाली. आमच्या वरचेवर भेटी होऊ लागल्या. त्यातून मला जी माहिती मिळाली त्यानुसार दळवी हे कोंडीबा दळवी या माथाडी कामगारांचे चिरंजीव. आपल्या वडिलांचा हात धरून ते या महानगरीत आले आणि माथाडीतच उठूबसू लागले. इतर माथाडी कामगारांच्या मुलांपेक्षा दळवी थोडेसे भाग्यवान म्हटले पाहिजेत. कारण त्यांनी काही ना काही शिकावे, शिकून मोठे व्हावे व त्यातून त्यांनी आपले आणि आपल्याबरोबर घराण्याचे, गावाचेही नाव मोठे करावे, अशी इच्छा असणारे त्यांचे गणपत म्हसकर नावाचे मामा त्यांच्या पाठीशी उभे होते. त्यामुळे दळवी शिक्षणासाठी म्हणून मामांकडे राहिले व तिथेच मोठे होत होत मुंबईत आले ते अधिकाधिक शिक्षण घेण्याची इच्छा मनात बाळगूनच. शिक्षणाबद्दल असणाऱ्या या आंतरिक इच्छेमुळेच दळवी प्रथम कॉलेजात गेले. बी.कॉम. ही झाले. त्यामुळेच ग्रोसरी बोर्डात हिशेब खात्यात रुजू होऊ शकले. अंगच्या हुशारीमुळे तसेच कौशल्यामुळे हिशेब तपासनीस व या पदापर्यंतही पोहचू शकले. आपल्या युनियनशी संलग्न असणाऱ्या माथाडीचा मुलगा शिक्षणात अशाप्रकारे प्रगती करतो आहे, हे पाहून अण्णासाहेबांना खूप आनंद तर व्हायचाच; परंतु अभिमानही वाटायचा. त्यामुळे दळवींच्या एकूणच वाटचालीला अण्णासाहेबांचे सक्रिय प्रोत्साहन आहे, असे अनेकदा दिसून यायचे.

**मृत्यू पावलेला माणूस आपल्याला पूर्णपणे दुरावतो आणि राहतात त्या नुसत्या आठवणी. गेल्या आठवड्यात माथाडी कामगारांच्या ग्रोसरी बोर्डाचे माजी मुख्य हिशेब तपासनीस एकनाथ कोंडीबा दळवी यांचे निधन झाले. तेव्हा हे सर्व तत्त्वज्ञान पुन्हा एकदा आठवले. मनाची समजूत करून वरचेवर पाणवणारे डोळे पुन्हा पुन्हा पुसून कामाला लागावे लागले. जगरहाटी... जगरहाटी म्हणतात ती अशीच आहे आणि कितीही नवनवे शोध लागले, सुधारणा झाल्या तरी ती तशीच चालू राहणार आहे.**

एकनाथ दळवी माथाडी कामगारांत वाढले, वावरले तरी त्यांची खरी आवड ही काही ना काही उद्योगधंदा करण्याचीच होती. गप्पा मारतानाही ते काहीतरी उद्योग करण्याचा विषय मांडत आणि त्यात आपण प्रगती करण्याची गरज असल्याचे सांगत. अगदी सुरुवातीला त्यांनी गावदेवी भागात एका गोमांतकीय माणसाचा प्रिंटिंग प्रेस चालवायला घेतला होता. त्या वेळी ते ठाणे येथे राहायचे; परंतु गावदेवीच्या प्रेसवर ते सातच्या ठोक्याला हजर असायचे. तेथे दोन-अडीच तास काम करून ते मसजिद बंदर येथे ग्रोसरी बोर्डात जायचे. काही वर्षे अशी सातत्यपूर्वक मेहनत करून त्यांनी तो प्रेस अतिशय चांगल्या प्रकारे चालवला व नावारूपालाही आणला. त्याच सुमारास मूळ मालकाला तो छापखाना पुन्हा चालवण्याची इच्छा झाली. त्यामुळे त्यांनी तो देऊन टाकला; पण असे करताना शिवडी भागातील एका औद्योगिक वसाहतीत एक गाळा घेऊन तेथे त्यांनी 'श्रममुद्रा' हा छापखाना सुरू केला आणि तो खूप वर्षे स्वत: चालवून आपला मुलगा प्रशांत याला तो देऊन टाकला. आता 'श्रममुद्रा'चे कामकाज त्यांचा मोठा मुलगा प्रशांत दळवी पाहत आहे. दरम्यानच्या काळात त्यांनी मसजिद बंदरला एका इमारतीच्या पोटमाळ्यावरील एक १० बाय १० ची छोटीशी जागा घेऊन तेथे आपला बंधू राम याला टेलरिंगचे दुकानही काढून दिले होते. 'कोंडीबा दळवीच्या मुलांना जागा हवी' एवढ्या माहितीवर ट्रस्टच्या एका गुजराती विश्वस्थाने त्यांना ती फार पैसेन घेता देऊन टाकली होती! पुढे राम प्रिंटिंग व्यवसायाकडे वळला व स्थिरावलाही.

दीड-दोन वर्षांपूर्वी ते ग्रोसरी बोर्डाच्या मुख्य हिशेब तपासनीस पदावरून वयोमनानुसार निवृत्त झाले आणि बाबुराव रामिष्टे यांच्या नेतृत्वाखालील संघटनेत दाखल झाले; रामिष्टे यांनी त्यांना उपाध्यक्षपद देऊन त्यांचा सन्मान केला. पण त्यांना तिथे फारसे काम करता आले नाही. त्यानंतर त्यांनी बांधकाम व्यवसायात नशीब आजमवण्याचा प्रयत्न केला. माथाडी अधिकाऱ्यांची एक सहकारी सोसायटी खारघर येथे उभारून देण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. या अनुभवाचा त्यांना बांधकाम व्यवसाय सुरू करण्यासाठी खूप उपयोग झाला. बांधकाम व्यवसायाची मुंबई व मुंबई परिसरात सुरुवात करायची तर त्याला खूप मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते. तसे ते उभे करणे कठीण आहे, हे ओळखून स्वत:कडे असलेल्या तुटपुंज्या भांडवलावर हा व्यवसाय करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. यासाठी त्यांनी सातारा शहराची निवड केली. कारण सातारा हे शहर त्यांच्या म्हाते गावापासून जवळ होते. गावात त्यांची वृद्ध आई राहत होती. तिच्याकडे लक्ष देणे आवश्यक होते. यासाठी त्यांनी मुंबईऐवजी सौभाग्यवती अनुराधासह साताऱ्यातच राहायला सुरुवात केली. यात सौ. वहिनींनी त्यांना अतिशय सुरेख साथ दिली. स्वत:चा दुसरा मुलगा सुशांत याला या व्यवसायात बरोबर घेतले आणि त्यांनी सुरुवातही केली. या व्यवसायात त्यांना बऱ्यापैकी यश मिळत होते, असे दिसते. कारण 'मी आता सातारा येथेच राहून सुशांतबरोबर काम करणार आहे' असे ते वरचेवर सांगत. ठरवलेल्या नुसार गेली दोन-तीन वर्षे त्यांनी तेथे जे काम केले त्यात त्यांनी व त्यांच्या मुलाने बऱ्यापैकी प्रगती केलेली दिसते. कारण हा...हा म्हणता साताऱ्यासारख्या शहरात 'दळवी कॉम्प्लेक्स' उभे राहिले आणि नावारूपालाही आले.



वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रगती करतानाच माथाडी कामगारांच्या कामातही दळवी यांनी अनेकदा पुढाकार घेतल्याने काही चांगली व चिरस्थायी स्वरूपाची कामे होऊ शकली. अण्णासाहेब पाटील यांच्या माथाडींच्या चळवळीत ते होतेच. ती चळवळ यशस्वी व्हावी म्हणून जे शेकडो कार्यकर्ते रक्ताचे पाणी करत होते त्यात दळवींचेही नाव घ्यावे लागेल. या पलीकडे जाऊन ग्रोसरी बोर्डाचे हिशेब तपासनीस या नात्याने काम करतानाही त्यांनी माथाडी कामगारांच्या हिताला प्राधान्य दिले. इतकेच नव्हे तर काही वेळा माथाडींच्या कामासाठी म्हणून नियम-अटी वगैरेंना थोडी मुरड घालून संबंधित अधिकाऱ्यांना कामगारांच्या बाजूने निर्णय घेण्यास भाग पाडले. यासाठी नवी मुंबईत 'सिडको'ने माथाडींना दिलेल्या घरांचे उदाहरण देता येईल. त्यावेळी एक रकमी पैसे देऊन घर घेण्याची ऐपत माथाडींत नव्हती. खरे तर आताही ती नाही. कामगारात सर्वसाधारणपणे तशी कुणाचीही नसतेच; परंतु माथाडींना घरे मिळावीत म्हणून हिशेब तपासनीस या नात्याने दळवी यांनी कामगारांच्या पेन्शन व प्रॉव्हिडंट फंडाचा वापर करावा व त्यावर बँकांनी कर्ज उपलब्ध करून द्यावे, असा प्रस्ताव अधिकाऱ्यांपुढे ठेवून त्यांना तो मान्य करायला लावला. यात अण्णासाहेब पाटील यांनीही आपले वजन वापरले. त्यामुळेच माथाडींना सुरुवातीच्या काळात नवी मुंबईत घरे मिळू शकली. याच संदर्भातले दुसरे उदाहरण आहे ते माथाडींची आयकरातून मुक्तता केल्याचे. मध्यंतरीच्या काळात म्हणजे ४-५ वर्षांपूर्वी दळवी अचानकपणे मला येऊन भेटले व म्हणाले, 'माथाडी बोर्ड मोठ्या अडचणीत आहे आणि ही अडचण दूर झाली नाही तर आयकराचे म्हणजे इन्कम टॅक्सचे लचांड त्यांच्यामागे कायमचेच लागणार आहे. याचा माथाडी कामगारांनाही त्रास होईल. आयकर आयुक्तांनी सर्वच माथाडी बोर्डांना तशा नोटिशी दिल्या आहेत आणि एकट्या ग्रोसरी बोर्डाकडून २६० कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. हा आयकर माफ व्हावा म्हणून ताबडतोबीने पावले उचलली पाहिजेत. हे काम केंद्रीय मंत्री शरद पवारसाहेबच करू शकतात. त्यांना तुम्ही म्हणजे मी विनंती केली तर हे काम मार्गी लागू शकते. यासाठी तुम्ही, मी आणि चार्टर्ड अकाऊंटंट विनायक जोशी असे दिल्लीत जाऊ आणि पवार साहेबांची भेट घेऊ. असे करायला चेअरमननी परवानगी दिली आहे. तेव्हा आपण तिघेही उद्याच्या उद्या दिल्ली गाठू.'

दळवी यांच्या सांगण्याप्रमाणे आम्ही तिघांनीही शरद पवार यांची त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी भेट घेतली. त्यावेळी ते मंत्री नव्हते पण खासदार होते. त्यांना सर्व प्रकरण समजावून सांगितले. माथाडी कामगारांचाच प्रश्न असल्याने पवार साहेबांनी कोणत्याही प्रकारे आढेवेढे न घेता सर्व प्रकारचे सहकार्य दिले. माथाडींसाठी आपली सर्व ताकद वापरली. आणि त्याच दिवशी संध्याकाळी माथाडी बोर्डावर इन्कम टॅक्स बसवण्यासाठी दिलेल्या नोटिसा मागे घेण्याचा निरोप मुंबईच्या आयकर आयुक्तांना मिळाला! त्यानंतर अर्थ खात्याने सर्व सोपस्कार पूर्ण केले. अशाप्रकारे कामगारांना इन्कम टॅक्समधून सूट देण्याचे उदाहरण शोधून काढण्यात आले. दळवी व जोशी यांनी केरळला जाऊन शोधून काढले. ते पुढे करून मुंबई-महाराष्ट्रातील माथाडी बोर्डाची इन्कम टॅक्समधून कायमची सुटका करून घेण्यात यश मिळाले! या कामात दळवींचा वाटा मोठा होता; परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की माथाडी कामगारांच्या असंख्य संघटनांपैकी एकाही संघटनेने त्याची उत्साहाने दखल घेतली नाही किंवा दळवींना धन्यवादही दिले नाहीत. माथाडी कामगारांप्रमाणे दळवींना आपले म्हाते गाव, मेढे, जावळी तालुका व परिसर याबद्दलही खूप आस्था होती. प्रेम होते. त्या परिसरातील विकासकामाला ते सैल हाताने मदत करत. त्या भागातील अनेक तरुणांना त्यांनी माथाडी बोर्डाचे वा निरनिराळ्या कंपन्यांचे दरवाजे नोकरीसाठी खुले करून दिले. काहींना उद्योगधंदे काढण्यासाठी प्रोत्साहितही केले.

दळवी यांच्या या व्यापक जनसंपर्कामुळेच त्यांचे निधन होताच त्यांच्या म्हाते या गावी लोकप्रतिनिधींची आणि सर्वसामान्य लोकांचीही अक्षरश: रिघच लागली होती. सातारा-जावळी मतदारसंघाचे आमदार शिवेंद्रसिंह राजे भोसले, माजी आमदार सदाशिवभाऊ सपकाळ, माथाडी युनियनचे नेते बाबुराव रामिष्टे, माजी शिक्षण व अर्थ समिती सभापती वसंतराव मानकुमरे, साहेबराव देशमुख श्रमिक सहकारी बँकेचे अध्यक्ष सुभाषराव देशमुख, जावळी पंचायत समितीचे माजी सभापती बापुराव पार्टे, महाबळेश्वर पंचायत समितीचे माजी सभापती अमित कदम, आनंदराव जुणघरे, जावळी सहकारी बँकेचे हिंदुराव तरडे असे एक ना दोन. अक्षरश: शेकडो लोक शोकाकूल अवस्थेत त्यांच्या म्हाते येथील घरात आले व कुटुंबीयांचे सांत्वन करून गेले. त्या परिसरात निरनिराळ्या गावात त्यांच्या निधनाची माहिती देणारे केवढे तरी फलक लागलेले दिसले. लोक अक्षरश: डबडबलेल्या डोळ्यांनी व कातरस्वरात त्यांच्या मोठेपणाच्या आठवणी सांगत होते. दळवी यांच्या कर्तृत्वामुळेच हे व्यक्त होत होते. असे भाग्य सर्वांनाच लाभत नाही. एका माथाडी कामगाराचा मुलगा किती जणांना व कशाप्रकारे आपल्याशी जोडून ठेवतो, याचे हे चालते-बोलते उदाहरणच होते. त्यांच्या या आठवणीतूनच त्यांना आता भेटत राहायचे...!

• राधाकृष्ण नार्वेकर

१. श्रीमती इंदिरा गांधी, पंतप्रधान यांचे अण्णासाहेब पाटील यांना लिहीलेले पत्र, २. कोयना भूकंपाचे वेळी माथाडी कामगारांनी दिलेल्या आर्थिक मदतीबाबत धन्यवाद देणारे पत्र, ३. माथाडी कामगारांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिलेल्या आर्थिक मदतीबाबत धन्यवाद पत्र.



१

प्रधान मंत्री भवन
PRIME MINISTER'S HOUSE
NEW DELHI

10 MAR 1966

Thank you for your message & good wishes, which I greatly value. Your affection and trust will give me strength to serve our country.

With good wishes,

Indira Gandhi

1.2.66



२

MINISTER FOR REVENUE
GOVERNMENT OF MAHARASHTRA
Sachivalaya, Bombay-32

Dated 16th January 1968.

Dear Shri Patil

Thank you very much for your kind donation of Rs. 4,201.00 (Rs. Four thousands and two hundred one) only by cheque, which you were kind enough to collect for the Koyna Earthquake Rehabilitation Fund. The amount donated by you will be solely utilised for the rehabilitation of the earthquake affected people.

I hope you will continue to extend your cooperation in solving this great problem of rehabilitation of these affected people.

Yours

( D.S. Desai )

Shri A.P. Patil,
Maharashtra Rajya Mathadi
Kamgar Union,
Shroff Mansion,
P' Demello Road,
Carnac Bunder, Bombay-1.



३

PRIVATE SECRETARY TO
CHIEF MINISTER

MAHARASHTRA

Sachivalaya, Bombay-32-BR.

4th May 1976

Dear Sir,

I am desired by the Chief Minister to convey to you his thanks for the generous donation of Rs. 5000/- (Rupees Five thousand — — — —only) sent by ~~Cheque/Money Order/Cash~~ towards the Chief Minister's Relief Fund.

An official receipt is enclosed.

Yours faithfully,

Private Secretary.

General Secretary,
Maharashtra Rajya Mathadi
Transport and General Kamgar Union,
Mehta Chambers, 1st floor, Kalyan St,
Bombay-9.

माथाडी कामगारांनी वाहण्याचे वजन ५० किलो पेक्षा कमी असावे याबाबत केंद्रीय श्रममंत्री यांचे पत्र.

सत्यनारायण जटिया
SATYANARAYAN JATIYA

श्रम मंत्री
भारत सरकार
MINISTER OF LABOUR
GOVT. OF INDIA

30 August, 1999

Dear Shri Narayan Rane ji,

